म. ग्रं सं. ठाणे.
विषय : भू. प्रवास
सं. क्र. 330

REFBK-0013377
REFBK-0013377

मनोहर ग्रंथमाला
प्रकाशन १२३ वें

REFBK-0013377
REFBK-0013377

# नवरंग

र मे श मं त्री

१५ मार्च १९६३
रंगपंचमी १८८४

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला
१६०९ सदाशिव, टिळक रोड, पुणें २

सर्व हक्क लेखकाचें स्वाधीन

मुखपृष्ठ :
सौ. पद्मा [illegible]

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
४६१ १० 'शिवपार्वती', सदाशिव,
पुणें २.

किंमत
पांच
रुपये

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १. दहा देशांची धांवती सफर : १ | १ |
| २. दहा देशांची धांवती सफर : २ | १२ |
| ३. दहा देशांची धांवती सफर : ३ | २७ |
| ४. ऑक्टोबर महोत्सव | ४३ |
| ५. दहा देशांची धांवती सफर : ४ | ४९ |
| ६. जगाला जीवनदृष्टि देणारें पॅरिस | ६९ |
| ७. रात्रीचें रंगेल पॅरिस | ८० |
| ८. पाश्चात्य तमाशा कसा असतो | ९४ |
| ९. लंडन | ११५ |
| १०. लंडनमधील नाताळ | १३७ |
| ११. हरपलेलें वैभव शोधणारें इस्तंबूल | १४७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

# दहा देशांची धांवती सफर : १

बावीस सप्टेंबर एकोणीसशेंछप्पन्न रोजीं सकाळीं सात वाजतां मी लंडनमधील माझी जागा सोडून निघालों. मी हजारों मैलांच्या प्रवासाला निघालों होतों. वर्ष–सव्वा वर्षाच्या परदेशच्या वास्तव्यानंतर परत मायदेशीं चाललों होतों. माझा जवळजवळ पांच हजार मैलांचा प्रवास रेल्वेनें होणार होता, आणि साडेबाराशें मैलांचा प्रवास बोटीनें होणार होता. इतक्या लांबचा प्रवास मी एकट्यानें करणार होतों. आठदहा देशांतून आपण जाणार, दोनचार दिवस कुठकुठें राहणार, भाषेची अडचण, पैसे पुरतील का ? तिकिट आणि पासपोर्ट कुठें हरवणार नाहीं ना ?—असे अनेक विचार मनांत येत होते. महत्त्वाचे कागदपत्र आणि पुस्तकें मीं पूर्वीच रजिस्टर्ड पोस्टानें घरीं पाठविलीं होतीं; त्यामुळें जवळच्या सामानांत हरवण्यासारखें महत्त्वाचें कांहीं नव्हतें. प्रत्येक वेळीं आपल्या बॅगा स्वतःलाच उचलाव्या लागणार म्हणून मी दोनच बॅगा बरोबर घेतल्या होत्या.

लंडनच्या एजवेअर रोडवरील मैदा अव्हेन्यूचें नं. १ चें घर मीं सोडलें तेव्हां रस्त्यावर बरेंच धुकें पसरलेलें होतें. आमच्या घरासमोर सुंदर कालवा होता; त्याच्या दोन्ही बाजूंना उंच उंच झाडें होतीं. त्यांचा शीतल वारा अंगाला झोंबत असे. आतां हें सारें पुन्हा दिसणार नव्हतें. लंडनची थंडी, शेगडीची ऊब, हाइड पार्कमधील व्याख्यानें, नृत्यगृहांतील ‘वॉल्ट्झ्’, ‘रंबा’

इत्यादि नृत्यें, टेम्स नदीवरील सहली, ब्रिटिश म्युझियमची जगद्विख्यात लायब्ररी, टेलिव्हिजनचे विविध कार्यक्रम, इंडिया हाऊसमधील हिंदी जेवण, क्लबसमध्यें भेटलेल्या अनेक देशांच्या सुंदर तरुणी...आतां हें सारें पुन्हा कधीं दिसणार नव्हतें; कायमचें दृष्टीआड होणार होतें.

सोळा नंबरच्या बसमध्यें बसलों. लंडनच्या बसमधून हा शेवटचा प्रवास, असा विचार मनांत आला. आज सकाळपासून हा विचार प्रत्येक क्षणाला येत आहे. डॉ. जॉन्सन म्हणतो, 'अखेरच्या प्रत्येक कृतींत दुःखाची छटा असते.' --आणि हें अवाढव्य पण सुंदर लंडन शहर तर गेलें वर्ष-सव्वावर्ष माझा जीव कीं प्राण होतें. या तांबड्या बसेस्च्या वरच्या मजल्यावर बसून शांतपणें सिगरेटचे झुरके मारीत मीं किती रस्त्यावरून रपेट केली असेल!— ऑक्स्फर्ड स्ट्रीट, स्ट्रँड, एजवेअर रोड, मार्बल आर्च, वेज वॉटर, फ्लीट स्ट्रीट, होबर्न... त्यावेळीं भविष्याचा विचारहि कधीं मनांत आला नाहीं. हें सारें सोडून जावें लागणार असें कधीं वाटलेंच नाहीं, इतका त्याच्याशीं मी तद्रूप झालों होतों. हे रस्ते अगदीं पायांखालचे; त्यांवरून झोंपेंतसुद्धां मी नीट जाऊं शकेन असें वाटे. पण आज याचा शेवट होत आहे. आचार्य विनोबा भावे यांनीं आपल्या बाळपणींची एक गोष्ट सांगितली आहे, ती आठवली. आचार्य विनोबांनीं अशा आशयाचे उद्गार काढले आहेत कीं, "लहानपणीं गणपति–विसर्जनाच्या वेळीं मला अतिशय दुःख व्हायचें. एवढ्या समारंभानें आणलेली मूर्ति. तिचें पूजाअर्चन केलें, कोडकौतुक केलें, आणि आतां आपल्याच हातानें तिचें पाण्यांत विसर्जन करायचें? पण मी वयानें मोठा झालों, तेव्हां मला त्याचा अर्थ उमगला. आयुष्यांत आपल्या हातानें जें जें वाढवावयाचें तें तें शेवटीं सोडून जावें लागतें. या त्यागाची शिकवण म्हणजे गजानन–मूर्तीचें विसर्जन..."

व्हिक्टोरिया स्टेशनवर आलों. स्टेशनवर नेहेमींप्रमाणें गर्दी होती; पण गोंधळ नव्हता, गोंगाट नव्हता. लंडनच्या कचेऱ्या सकाळीं साडेआठ–नवालाच सुरू होतात. त्यामुळें कचेऱ्यांना जाणाऱ्या स्त्रीपुरुषांची घाई चालली होती; पण ती निःशब्द. स्टेशनवर चहा घेतला आणि बारा नंबरच्या फलाटावर नजर टाकली. आम्हांला घेऊन जाण्यासाठीं लांबलचक आगगाडी तिथें उभी होती. फलाटाच्या दारावर फलक होता, — 'लंडन — डोव्हर — ९ वाजतां.' मला ती गाडी भयानक शत्रूसारखी वाटूं लागली. पण पुन्हा मनांत आलें,

मींच तिकिट काढलें...कधींतरी आपल्या देशीं जायला हें हवेंच. त्या गाडीला दोष देण्यांत काय अर्थ?...पण हा शहाणपणा नंतर सुचतो. ज्याच्यावर रागवायला नको, त्याच्यावर आपण रागावतों आणि नंतर आपल्याला कळून येतें कीं, त्याचा दोष म्हणून नव्हे तर कुणावर तरी रागवायचें होतें म्हणून त्याच्यावर रागावलों आपण.

व्हिक्टोरिया स्टेशनवर सामानाची तपासणी होईल असें वाटलें होतें; पण कुणीच कांहीं विचारलें नाहीं. मीं आपण होऊन एका पोलिसाला विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "तपासणी डोव्हरला होईल." सकाळीं दहा वाजतां गाडीनें व्हिक्टोरिया स्टेशन सोडलें आणि लंडनला मीं अखेरचा रामराम केला. लंडनमध्यें माझी एक मैत्रीण मला पॅरिसबद्दल सांगत असे, त्याची आठवण झाली. ती म्हणे, "मी पॅरिसला अनेकवार गेलें आहें. मी पॅरिसमध्यें असतें तेव्हां मी इतकी पॅरिसमय होतें कीं, पॅरिसशिवाय मी आणि माझ्याशिवाय पॅरिस जगूंच शकणार नाहीं असं मला वाटतं; पण कांहीं कालानं मी पुन्हा पॅरिसला गेलें म्हणजे मला आढळून येतं कीं, माझ्याशिवाय पॅरिसचं सारं कांहीं ठीक चाललं आहे, आणि पॅरिसशिवाय माझंहि कांहीं वाईट चाललेलं नाहीं." तेंच मला लंडनबद्दल शेवटीं वाटलं. ऐंशी लक्ष लोकवस्तीच्या या अजस्र शहरांतून मीं गेलों तर त्या शहरांत कांहींच फरक पडणार नाहीं. शहराचे सारे व्यवहार पूर्वीसारखेच चालू राहतील. माझ्या वर्गांतील मुलांमुलींना थोडे दिवस माझी आठवण येईल, लंडनचे मित्र आणि मैत्रिणी संध्याकाळीं अधूनमधून माझ्याबद्दल बोलतील आणि आठ-पंधरा दिवसांत माझ्या स्मृतीची ही रेषाहि पुसून जाईल.

साडेबाराच्या सुमाराला गाडी डोव्हरला पोंचली. तिथें स्टेशनवरच्या लाउडस्पीकर्समधून सांगण्यांत आलें कीं, बोटीच्या उतारूंनीं थेट बोटीवर जावें. स्टेशनला लागूनच बोटीचा धक्का होता. धक्क्याच्या दरवाज्यांतून आंत जातांना एक इसम प्रत्येकाच्या बॅगेवर खडूनें रेघोटी ओढीत होता. हीच कस्टमची तपासणी. बोटीवर तीनचारशें उतारू होते. बोट लहान होती आणि त्या मानानें बोटीवर गर्दी होती. पण डोव्हर-ऑस्टेंड प्रवास फक्त अडीच तासांचा होता; म्हणून गर्दी जाणवली नाहीं. बहुतेक लोक बोटीच्या स्मोकिंग-रूममध्यें आणि लाउंजमध्येंच होते. एक वाजतां बोट सुरू झाली. त्याबरोबर बार उघडला

आणि तिथें सिगरेट नि बीअर घेण्यासाठीं उतारूंची गर्दी झाली. इंग्लंडपेक्षां हे दोन्ही पदार्थ बोटीवर बरेच स्वस्त होते. त्यामुळें एकेका उतारूनें पन्नास – शंभर सिगरेट्स घेतल्या. बोटीवरच बेल्जियन नाणीं सुरू झालीं. आतांपर्यंत पौंड – शिलिंग – पेन्समध्यें व्यवहार केला होता; आतां या नाण्यांबरोबरच बेल्जियन फ्रँक्स आणि सेंटिम्स सुरू झाले. डोव्हरचे पांढरे खडक दूर जाऊं लागले आणि शाळेंत कुठेंतरी वाचलेल्या ' White Cliffs of Dover ' या शब्दांची आठवण झाली.

ऑस्टेंड बंदर साडेतीनच्या सुमाराला आलें. धक्क्यावर बोटींची गर्दी होती; म्हणून आमची बोट अंमळ थांबली. धक्क्यावर बेल्जियन अधिकारी, आणि इष्टमित्रांना–नातेवाईकांना उतरून घेण्यासाठीं उत्सुक असलेले नागरिक दिसत होते. धक्क्याजवळ आंघोळीचा किनारा होता. त्यावर शेंकडों स्त्रीपुरुष पोहण्याचे कपडे घालून अंग वाळवीत, वाळूंत विश्रांति घेत होते, तर कांहींजण पोहत होते. ऑस्टेंड शहराच्या उंच उंच इमारती, चर्चेस्, पुतळे लांबून दिसत होते. या बंदरांतहि कस्टमची तपासणी झालीच नाहीं. एक अधिकारी ' सामानांत आक्षेपार्ह कांहीं आहे काय ? ' असें विचारी आणि उतारूंनीं ' नाहीं ' म्हणतांच खडू बॅगवर ओढल्यासारखा करून त्याला जाऊं देई. धक्क्यावर उपाहारगृह होतें. त्यांत गेलों आणि चहा मागविला. चहा पिणारे लोक थोडेच दिसले. बहुतेक लोक बीअर किंवा कॉफी घेत होते. चहाची किटली कपांत ओतूं लागलों, तेव्हां नुसतें गरम पाणीच पडूं लागलें. किटलीचें झांकण काढून पाहिलें, — आंत गरम पाणी होतें आणि एका कापडी पिशवींत चहाची पूड होती. त्या पिशवींतून झिरपून जो चहा होईल तेवढाच ' स्ट्रॉंग ' चहा प्यायचा. म्हणून मी पुन्हा झांकण घालून चहा मुरायची वाट पहात बसलों. आजूबाजूला दहाबारा टेबलें होतीं. बहुतेक सारे प्रवासी होते, आणि घाईत होते. अशा वेळीं हा चहा म्हणजे संयमशीलतेची परीक्षाच ! शेवटीं वाट पहाण्याचा कंटाळा येऊन किंचित् पिंगट रंगाचा चहा मीं घेतला.

गाडी सुटायला अद्याप अर्धा–पाऊण तास होता. तेवढ्यांत ऑस्टेंड गांव पहावें ही माझी पहिली कल्पना. पण हातांत दोन जड बॅगा घेऊन किती चालणार ? अगदीं थोड्या वेळासाठीं क्लोकरूममध्यें त्या ठेवायच्या आणि काढायच्या हे सोपस्कारहि मला नको होते. म्हणून मीं स्टेशनच्या पायरीवर

सहज बाहेरून दिसेल अशा रीतीनें सामान ठेवलें, हातांत कॅमेरा घेऊन रस्त्यावर गेलों, आणि जवळपासचे एक-दोन फोटो घेतले. खरें म्हणजे, हा मुशाफिरीचा आंबटषौक. यांत नीट कांहीं पहातां येत नाहीं, आणि वरवर पाहिलेलें कांहीं ध्यानांतहि रहात नाहीं. पण एवींतेवीं माझ्या या सफरींचें स्वरूपच असें होतें कीं, जें हातीं मिळेल तें तोडून घ्यायचें आणि अनुभवाच्या पोतडींत सांठवायचें. ऑस्टेंडला त्या घाईत सूर्यास्ताचा एक फोटो मी घेत होतों. त्याच वेळीं रस्त्यानें जाणारी एक स्त्री अभावितपणें मध्येंच थबकली आणि आरसा काढून ओठांना लिप्स्टिक् लावूं लागली. माझ्या कॅमेऱ्यांत सूर्यास्ताऐवजीं तिचाच फोटो आला !

ऑस्टेंड ते ब्रुसेल्स हा प्रवास करण्यासाठीं मी स्टेशनवर आलों. तीन प्लॅट-फॉर्म्सवर तीन गाड्या उभ्या होत्या. मला कोणत्या गाडीनें गेलें पाहिजे याची माझी मलाच कल्पना नव्हती. माझ्या तिकिटाचे अनेक भाग होते. त्यांपैकीं डोव्हर ते हेरगेनराथ हा भाग आतां मी वापरीत होतों. पण हेरगेनराथ हें गांव कोणत्या देशांत आहे हें मला कुठें माहीत होतें ? मीं गार्डाला तिकिटें आणि रिझर्व्हेशन स्लिप दाखविली. माझें लंडनपासून बगदादपर्यंतचें तिकिट रिझर्व्ह होतें; पण मी ब्रुसेल्सलाच उतरून हॉलंड-फ्रान्सला जाणार होतों; त्यामुळें माझी पुढील प्रवासाची जागा रिझर्व्ह असूनहि मला तिचा उपयोग नव्हता. तरीहि जागा राखून ठेवावीच लागते; कारण लांबच्या प्रवासाचें तिकिट रिझर्व्हेशनशिवाय देतच नाहींत. ऑस्टेंड ते ब्रुसेल्स हा मार्ग अगदीं लहान लहान गांवांतून आणि शेतांतून जातो. अनेक वेळां अगदीं आपल्या महाराष्ट्रां-तील रेल्वेमार्गाची आठवण होते. एका ठिकाणचें रेल्वेफाटक, झाडें वगैरे दृश्य तर हुबेहूब एम्. एस्. एम्. फांट्यावरच्या जयसिंगपूर गांवासारखें दिसलें.

साडेपांचच्या सुमाराला ब्रुसेल्स मिडि हें स्टेशन आलें. ब्रुसेल्सचीं तीन स्टेशनें आहेत. त्यांपैकीं 'मिडि' हें एक स्टेशन. ( दुसरीं — दक्षिण या अर्थी 'सूद' व उत्तर या अर्थी 'नॉर्द' अशीं दोन आहेत. ) मीं बाहेर पाहिलें, तों स्टेशन म्हणजे चार–पांच प्लॅटफॉर्म्स दिसले. दुकानें नाहींत. तिकिटऑफिस नाहीं, गर्दी नाहीं, गडबड नाहीं, कीं कांहीं नाहीं ! एखाद्या सायडिंगसारखें किंवा हॉल्टसारखें तें स्टेशन वाटलें. SORTIE ( बाहेर जाण्याचा रस्ता ) म्हणून पाटी होती, त्या बाजूनें मी निघालों. हा मार्ग

जिन्यानें जमिनींत तळघरांत गेला होता. तळघर सिमेंट कॉंक्रीटचें, स्वच्छ आणि निऑनट्यूब लावून उत्तम प्रकाशित केलेलें होतें. हा बोगदा बराच लांब होता. तो ओलांडल्यावर पाहतों तों एक भव्य स्टेशन जमिनीच्या पोटांतच आहे असें दिसलें. तेथें अद्ययावत् उपाहारगृहें होतीं, मद्यालयें होतीं, क्लोकरूम होती, पुस्तकें आणि वृत्तपत्रांचे स्टॉल्स होते, चौकशी-कचेरी होती, फुलविक्याचें दुकान होतें, आइस्क्रीम स्टॉल्स होते, पोलिस-स्टेशन होतें-अद्ययावत् स्टेशनाचीं सर्व अंगें होतीं. हा भाग प्रशस्त, सुंदर आणि अतिशय स्वच्छ होता. दोन-अडीच फर्लांग लांब असा आंतील रस्ता, पण त्यावर कागदाचा कपटा नव्हता कीं धुळीचा ठिपका नव्हता. सर्व ठिकाणीं उत्तम प्रकाश होता आणि प्रसन्न वातावरण होतें. स्टेशनची वेटिंगरूम, मोठें रेस्टॉरंट आणि तिकिट-ऑफिस याच्याहि बाहेर होतें.

क्लोकरूममध्यें सामान ठेवून मी बाहेर पडलों. ब्रुसेल्स 'पहायचें' होतें. हातांतील गाइड पाहून मीं ठरवलें कीं, 'ग्रान् प्लास' ( grand place - बडा चौक ) हें येथील सर्वांत महत्त्वाचें ठिकाण असल्यानें प्रथम तिकडे मोर्चा वळवायचा. हॉलंडला जाणारी माझी गाडी पहांटे पांचला होती. आणि आत्तां कुठें संध्याकाळचे साडेपांच वाजलेले होते. तसा मला भरपूर वेळ होता. उन्हाळा असल्यानें रात्रीं आठ वाजेपर्यंत तरी सूर्यप्रकाश राहणार होता. रात्रीचा मुक्काम हॉटेलमध्यें न करतां ब्रुसेल्सच्या वेटिंगरूममध्येंच करायचा असें मीं ठरवलें होतें. त्यामुळें कसलीच काळजी न करतां रात्रीं साडेअकरा-बारापर्यंत तरी शहर पाहण्यांत घालवायला हरकत नव्हती. स्टेशनच्या समोरच गडद निळा गणवेश घातलेला आणि गोल टोपी परिधान केलेला पोलिस होता. त्याला मीं फ्रेंचमधून विचारलें, "'ग्रान प्लास' कुठें आहे?" त्यानें सांगितलें कीं, "समोरच्या रस्त्यानें जाऊन डावीकडे वळा आणि ट्रॅम पकडा." मी त्या रस्त्यानें चालूं लागलों. रस्ते दगडी होते; पण स्वच्छ होते. स्टेशनच्या आसपास चार चित्रपटगृहें होतीं. त्यांचें एक वैशिष्ट्य अद्याप लक्षांत राहिलें आहे, तें असें कीं, बाहेर तिकिट-ऑफिसजवळ लाऊडस्पीकर होता. त्यावर चित्रपटांत चाललेले सर्व संवाद ऐकूं येत असत. हे संवाद ऐकून चित्रपटाबद्दल उत्सुकता वाटावी, आणि प्रेक्षकांनीं तिकिटें घ्यावीं, यासाठीं तें आकर्षण होतें. सर्व चित्रपट बेल्जियम भाषेंत 'डब्' केलेले; पण मूळ फ्रेंच किंवा जर्मन.


पहिला रस्ता बराच अरुंद होता; पण दोन्ही बाजूंना फूटपाथ होते. किंचित् पुढें गेलों, तेव्हां मोठा रस्ता लागला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना फूटपाथ, मग रस्ता, मध्यें झाडांच्या रांगा आणि पुन्हा मध्यभागीं चालण्यासाठीं पायवाट — असा हा रस्ता प्रशस्त होता. सारे रस्ते दगडी. त्यांवरून चालण्याचा सराव नसल्यामुळें पायाला अधूनमधून ठोकर बसे, क्वचित् अडखळायला होई; पण एकंदरींत रस्त्यावर शांत आणि प्रसन्न वातावरण होतें. ब्रुसेल्समधील बहुतेक मोठ्या रस्त्यांवर उपाहारगृहें आणि मद्यालयें आहेत. पॅरिसप्रमाणें फूटपाथवर खुर्च्या टाकून गोल टेबलांभोंवतीं शेंकडों लोक बीअर किंवा इतर पेयें घेत मजेनें बसलेले दिसतात. ब्रुसेल्सच्या मद्यालयांचा एक विशेष मला आवडला. तो असा कीं, लंडनच्या ' पब 'प्रमाणें त्यांच्या जागा तोकड्या नसतात. ब्रुसेल्सच्या या ' बार्स ' मध्यें भरपूर जागा असतेच; पण बिलियर्ड्सचीं टेबलेंहि आढळलीं. कांहीं ठिकाणीं रेडिओग्राम्स होते आणि त्यांवर रेकॉर्ड्स लावून हौशी जोडपीं नृत्य करीत होतीं. उपाहारगृह किंवा मद्यालय म्हणजे खाद्यपेयें झटकन् घेऊन क्षुधा शांत करण्याच्या जागा नव्हेत, तर त्याबरोबरच भरपूर विश्रांति घेण्याच्या, मनोरंजनाच्या त्या जागा आहेत — किंबहुना ते क्लब्स् आहेत, ही भावना ब्रुसेल्समध्यें दिसली आणि मला ती विलोभनीय वाटली. बेल्जियन स्त्रिया इंग्लिश स्त्रियांच्या मानानें किंचित् जाड, फॅशन कमी करणाऱ्या, पण अधिक मनमोकळ्या दिसल्या.

मी ट्रॅमनें ' ग्रान प्लास ' कडे गेलों. हा चौक, म्हणजे ' युरोपांतील एक अत्यंत प्रशस्त ' ( One of the biggest in Europe ) चौक अशी त्याची जाहिरात करण्यांत आलेली होती. पण मला कांहीं तो लंडनच्या ट्रॅफल्गार स्क्वेअरसारखा भव्य वाटला नाहीं. मात्र तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण, चौकाच्या चारी बाजूंना उंचच उंच गोथिक शिल्पकलेच्या इमारती आहेत. त्या अडीचशें ते तीनशें वर्षांपूर्वीच्या आहेत. गांवाची नगरपालिका येथेंच आहे आणि मुख्य पोलिस-स्टेशनहि या चौकांतच आहे. या चौकाची जमीनहि विटांएवढ्या दगडांची आहे. मध्यभागीं कांहीं फुलविक्ये असतात. हा चौक पाहिल्यावर माझ्या मनांत एक कल्पना चाटून गेली, — विजयादशमीला सोनें लुटायला हा चौक फार नामी आहे ! या चौकाच्या कडेला प्रशस्त फूटपाथ आहे, आणि अर्ध्या फूटपाथवर टेबलखुर्च्या मांडून लोक बीअर हें आवडतें


पेय पीत बसलेले दिसतात. मी एका उपाहारगृहांत गेलों आणि चहा घेतला. बेल्जियम देश आरशांबद्दल जगांत प्रसिद्ध आहे. त्यामुळें मला वाटत होतें कीं, ब्रुसेल्समध्यें जावें त्या ठिकाणीं आरसेच आरसे दिसतील! पण तसा आरशांचा प्रमाणाबाहेर वापर कुठेंच दिसला नाहीं.—याउलट, लंडनला ग्रॅनव्हिल स्ट्रीटवर मी एका हॉटेलमध्यें राहिलों होतों, तेथें इतके आरसे होते कीं, आपण सबंध हॉटेलमध्यें एकटे असलों तरी भयंकर गर्दी आहे असें वाटायचें !

ब्रुसेल्समध्यें एक लहानशी पण गमतीची गोष्ट आहे. इकडे आलेले प्रवासी ती पाहण्यास कधींच चुकत नाहींत. बेल्जियमच्या या राजधानींतील एका चौकांत 'मॅनकेन पीस' या नांवानें ओळखला जाणारा एक पुतळा आणि कारंजें आहे. हा पुतळा दीड–दोन वर्षांच्या एका नग्न मुलाचा असून तो लघुशंका करीत आहे अशा 'पोझ' मध्यें उभा आहे. त्याचेंच कारंजें करण्यांत आलेलें आहे. गर्दीत हरवलेल्या आणि नंतर सांपडलेल्या एका लहान मुलाचें हें स्मारक आहे. हें कारंजें सतत वहात असतें. आजूबाजूचे लोक हौसेनें या 'मॅनकेन पीस' पुतळ्याला सणावाराला नवेनवे कपडे घालतात; पण बाळाचा 'उद्योग' चालूच असतो ! या पुतळ्याच्या शेंकडों प्रतिकृति आजूबाजूच्या दुकानांत विक्रीसाठीं ठेवलेल्या आहेत. ब्रुसेल्सची आठवण म्हणून प्रवासी लोक हे पुतळे किंवा पुतळ्याचे फोटो घेतात. कित्येक हौशी मुशाफीर स्वतःच्या कॅमेऱ्यानें त्याचे फोटो घेतात, फिल्म घेतात आणि कौतुक करतात. ब्रुसेल्स-मधील 'बुकेर्स प्लास' हा चौकहि भव्य असून रोमन पद्धतीच्या शिल्पांनीं त्याची भव्यता वाढवलेली आहे. ब्रुसेल्समध्यें वाट फुटेल तिकडे मी गेलों. नजरेला येईल तें पाहिलें, आणि रात्रीं अकराच्या सुमाराला स्टेशनवर परत आलों. त्या रात्रीं तेंच माझें घर होतें.

प्रथम तिकिटाची चौकशी केली. कारण, रात्रीं स्टेशनवर झोंपायचें तर 'बोनाफाइड'—अधिकृत—उतारू म्हणून तिकिट हवें. हॉलंडमधील रूज-न्दालचें तिकिट काढलें. बेल्जियम आणि हॉलंड यांच्या सरहद्दीवरचें हें डच स्टेशन. तेथून मी रॉटरडॅम आणि हेग येथें जाणार होतों. तिकिट काढलें; पण सव्वाअकरापासूनच वेटिंगरूममध्यें पथारी पसरून झोंपणें शक्य नव्हतें. कारण ब्रुसेल्सची वेटिंगरूम म्हणजे एक प्रचंड हॉल आहे. त्याच्या एका भागांत




श्री. रमेश मंत्री यांनीं आपली ' दहा देशांची सफर ' या मार्गानें केली



ब्रुसेल्स येथील रॉयल पॅलेस

तिकिट-कचेऱ्या, दुसऱ्या भागांत रेस्टॉरंट, मनी ‘एक्स्चेंज’ (पैसे बदलून देण्याची जागा), चौकशी-कचेरी वगैरे आहेत. अजून बऱ्याच गाड्या सुटायच्या होत्या; त्यामुळें या हॉलमध्यें अतिशय वर्दळ होती. वेटिंग-हॉलमध्यें आठदहा बांक होते; पण त्यावर लोक दाटीवाटीनें बसलेले असल्यामुळें झोंपण्यास जागा मिळणें कठिणच होतें. म्हणून मी स्टेशनच्या रेस्टॉरंटमध्यें गेलों आणि चहा मागवून हॉलंडचें ‘गाइड’ वाचीत बसलों.

साडेबाराच्या सुमाराला वेटिंगरूमधील गर्दी थोडी कमी झालेली दिसली; म्हणून तेथें गेलों. तेथून समोरच मद्यालयें दिसत होतीं. त्या वेळींहि लोकांचें मद्यपान -- विशेषतः बीअरपान चालूच होतें. पण आतां अधिक कांहीं पाहण्याच्या मनःस्थितींत मी नव्हतों. मी एका बांकावर आडवा झालों आणि माझा जाड ओव्हरकोट अंगावर घेतला. दिवसभराच्या श्रमांमुळें शरीर थकलें होतें; झोंपेसाठीं उत्सुक झालें होतें. पण झोंप येण्यासारखी परिस्थिति नव्हती. सेलिंगवरच्या ट्यूबचा प्रकाश सरळ डोळ्यांवर येत होता, उतारूंची तुरळक कां होईना, वर्दळ चालूच होती आणि आगगाड्यांचा आवाज अधूनमधून येत होता. त्या अवाढव्य स्टेशनांत पडल्यापडल्या माझ्या मनांत विचार येत होते -- आयुष्य किती विचित्र आहे ! मी कोण, कुठल्या देशाचा, आणि आज कुठें येऊन झोंपलों आहे! माझें कांहीं बरेंवाईट झालें, तर भोंवतालच्या कुणाला कांहींच वाटणार नाहीं. जगाच्या या अजस्र हालचालींत एक व्यक्ति म्हणजे किती क्षुद्र आहे!... पण दैनंदिन व्यवहारांत आपण आपल्याच भोंवतालच्या वातावरणांत इतके गुरफटून जातों कीं, आपण किती तात्कालिक, क्षणभंगुर आहोंत याची जाणीव रहात नाहीं. स्वतःबद्दल आपल्या मनांत भलत्याच कल्पना असतात ...

रात्रीचा एक वाजून गेला असेल. दहा-बारा पोर्टर्स वेटिंग-हॉलमध्यें आले. त्यांच्या हातांत बादल्या, खराट्यासारख्या लंब झाडण्या, होजपाइप वगैरे फरशी धुण्याचें साहित्य होतें. मला वाटलें, आतां तर झोंपेची उरलेली आशाहि संपली ! त्यांनीं जोरजोरानें हॉल धुवायला सुरुवात केली. निरनिराळ्या बांकांवर झोंपलेले सात-आठ लोक जरा आंखडून झोंपले. मी त्या साफसफाईकडे पहात पडलों होतों. हें काम साधारण तासभर चाललें. ब्रुसेल्स स्टेशनवर तीन-चार ठिकाणीं कॉफीचीं यंत्रें आहेत; त्यांपैकीं एका यंत्रांत एक ‘फ्रँक’

( सुमारें पांच आणे ) टाकून मीं कॉफी घेतली. या यंत्रांत एक बेल्जियम फ्रँक टाकला कीं, तगडाचा एक पेला यंत्रांतून बाहेर येतो. या यंत्राला कॉफी, साखर, दूध आणि लिंबू यांसाठीं निरनिराळीं बटनें असतात. तीं दाबलीं, म्हणजे त्यांपैकीं हवे ते पदार्थ तगडाच्या कपांत पडतात, आणि कपभर गरमगरम कॉफी मिळते. त्या रात्रीं स्टेशनवर कंटाळा आला, कीं अधूनमधून उठून मी ही यांत्रिक कॉफी घेत होतों.

अडीच वाजण्याच्या सुमाराला माझे जड डोळे मिटूं लागले आणि झोंप येऊं लागली, तोंच चार-पांच पोलिस ' खाड् खाड् बूट वाजवीत वेटिंग–हॉल-मध्यें शिरले. मीं डोळे उघडून नीट पाहिलें, तों ते प्रत्येक उतारूला बांकावरून उठवून त्याची चौकशी करीत होते असें दिसलें. ही काय नवीनच ब्याद आली म्हणून मीं पासपोर्ट आणि तिकिट हातांत घेतलें आणि पोलिस जवळ येण्याची वाट पहात बसलों. मीं लांबूनच पाहिलें कीं, पोलिसांनीं दोघां इसमांना बांकावरून उठवून बाहेर घालवून दिलें. पोलिस माझ्याजवळ आले. मी पास-पोर्ट आणि तिकिट पुढें करणार, तोंच मला त्यांनीं खुणेनें सांगितलें कीं, त्याची गरज नाहीं, तुम्ही झोंपा. नंतर मला कळलें कीं, शहरांतले कांहीं बेकार आणि गुन्हेगार रात्रीं स्टेशनच्या वेटिंग–रूमचा आश्रय घेतात; म्हणून पोलिसांना दररोज अशी तपासणी करावी लागते. तरी पण या पोलिसी ढवळाढवळीनें माझी झोंप चाळवली होती. मीं ओव्हरकोट घेतला, कॉफीयंत्राजवळ गेलों आणि एक फ्रँक यंत्रांत टाकून कॉफीचे गरम घुटके घेऊं लागलों.

कॉफी घेऊन मी परत आलों, तों माझ्या जागेवर कोणीतरी शांतपणें झोंप-त्याचें दिसलें. अर्थातच मला दुसरा बांक शोधावा लागला. बहुतेक बांकांवर कोणीतरी झोंपलेलें होतें. एक बांक रिकामा दिसला. त्यावर मी जाऊन बसलों आणि आतां मी झोंपणार, तोंच एक स्त्री येऊन त्याच बांकावर बसली. तेव्हां मीं बसल्याबसल्याच अंगावर ओव्हरकोट चढवला आणि बसून झोंप ध्यायचा प्रयत्न करूं लागलों. ती स्त्री एकदम फ्रेंचमध्यें म्हणाली, "इल् फे थय् शॉद् !" ('काय थंडी पडली आहे !') मीं म्हटलें, "वी मदमॉयसेल, इल् फे थय् शॉद् !" ( ' होय बाईसाहेब, फारच थंडी पडली आहे ! ) मला फ्रेंच समजतें एवढी खात्री झाल्यावर ती स्त्री भराभर बोलूं लागली. खरें म्हणजे मला अगदीं मोज-केंच फ्रेंच येतें. आणि फ्रेंच लोक इतक्या गडबडीनें फ्रेंच भाषा बोलतात, कीं

त्याचें बोलणें समजणें बरेंच कठिण जातें, तरी पण मी अधूनमधून 'होय', 'नाहीं', 'तुमचें बरोबर आहे', असें कांहींसें म्हणत होतों. त्या स्त्रीचें वय साधारण पन्नाशीपर्यंत असेल. प्रथम ती स्टेशनच्या वेटिंगरूममध्यें झोंपलेल्या लोकांचा उल्लेख करून म्हणत होती, " यांना एवढ्या गडबडींत आणि उजेडांत कशी झोंप येते, कुणास ठाऊक ! मला तर अशा ठिकाणीं मुळींच झोंप येणार नाहीं." मग ती आपल्या आजाराकडे वळली. ती कांहीं दिवस हॉस्पिटलमध्यें होती, आणि आतां दक्षिण–फ्रान्सला चालली आहे एवढीच माहिती तिच्या प्रदीर्घ भाषणांतून मी जमा करूं शकलों. पहांटे चार-सव्वाचारच्या सुमाराला ती उठून गेली आणि मी बांकावर झोंपलों. पण आतां भीति वाटूं लागली कीं, मला झोंप लागून गाडी चुकली तर ? म्हणून नुसती विश्रांति घ्यायची असें मीं ठरवलें. पांचच्या सुमाराला उठलों. क्लोकरूममध्यें जाऊन एक बॅग घेतली. दुसरी बॅग मी हॉलंड आणि पॅरिसला जाऊन परत आल्यावर घेणार होतों. लहानशी बॅग आणि ओव्हरकोट घेऊन मी सात नंबरच्या प्लॅटफॉर्मवर गेलों. उतारूंची गर्दी तुरळकच होती. दोन-तीन रेल्वे अधिकाऱ्यांना विचारून रूजन्दालची गाडी याच प्लॅटफॉर्मवर येणार अशी खात्री करून घेतली. पहांटेच्या अंधुक प्रकाशांत गाडी आली आणि मी हॉलंडला जाण्यासाठीं निघालों.

♥♥♥

# २

## दहा देशांची धांवती सफर : २

ब्रुसेल्स ते रूजन्दाल हा प्रवास फक्त साडेतीन तासांचा. गाडींत गर्दी विशेष नव्हती. बेल्जियन आणि डच पोलिस यांनीं गाडींतच दोनदां तपासणी केली. उतारूंपैकीं बहुतेक डच होते; थोडे जर्मन आणि बेल्जियन होते. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें. जो तो वृत्तपत्रें वाचीत किंवा खिडकीबाहेर पहात होता.

सकाळीं नऊच्या सुमाराला रूजन्दाल स्टेशन आलें. उतरण्यापूर्वीं एक तिकिट–इन्स्पेक्टर तिकिट पाहून गेला. त्यानें ‘ रिझर्व्हेशन आहे का ? ’ विचारलें. माझें रिझर्व्हेशन नव्हतें, पण तें सक्तीचें असल्यानें मला सुमारें आठ आणे द्यावे लागले. याचा उल्लेख करण्याचें कारण असें कीं, मी रूजन्दाल स्टेशनवर उतरलों, तेव्हां पोलिसांनीं प्रथम माझा पासपोर्ट पाहिला आणि हॉलंडला येण्याचें कारण विचारलें. ‘ मी टूरिस्ट आहे ’ असें मीं सांगितलें. मग त्यांनीं तिकिट मागितलें. तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं, रिझर्व्हेशनचे पैसे घेणाऱ्या इन्स्पेक्टरनें माझें तिकिट घेतलें होतें. मीं पोलिसांना तसें सांगितलें; पण त्यांचा त्यावर विश्वास बसेना. त्यांना इंग्रजी नीट येत नव्हतें, आणि मला त्यांचें जर्मनमिश्रित इंग्रजी समजत नव्हतें. मग त्यांनीं स्टेशनवरच्या इंग्रजी जाणणाऱ्या एका अधिकाऱ्याला बोलावून आणलें. शेवटीं

मीं एक डच गिल्डर दंड दिला आणि क्लोकरूममध्यें सामान ठेवून रूजन्दाल गांव पहायला स्टेशनबाहेर पडलों.

बाहेर एका उपाहारगृहांत चहा घेतला. चहाचे पैसे देण्यासाठीं खिशांत हात घातला, तेव्हां ब्रुसेल्स ते रूजन्दाल रेल्वेचें तिकिट माझ्या हाताला लागलें ! मला आश्चर्य वाटलें. मीं पुन्हा स्मृतीला ताण देऊन विचार केला, तेव्हां हा तिकिटाचा घोटाळा माझ्या लक्षांत आला. वास्तविक तिकिट-इन्स्पेक्टरनें मला रिझर्व्हेशनची पावती आणि तिकिट हीं दोन्ही दिलेलीं होतीं. पण माझी समजूत त्यानें तिकिट घेतलें अशी झालेली होती. इंग्लंडमध्यें कांहीं मार्गावर अशा रीतीनें स्टेशन येण्यापूर्वीच तिकिटें घेतात; म्हणजे स्टेशनच्या दारावर एकदम गर्दी होत नाहीं. ही पद्धत माझ्या मनांत इतकी घोळत होती कीं, खिशांत तिकिट असूनहि ‘ नाहीं ’ म्हणून मीं सांगून टाकलें होतें आणि दंड दिला होता. आतां तिकिट सांपडलें; पण त्याचा कांहीं उपयोग नव्हता.

रूजन्दाल गांव लहानच — म्हणजे दहापंधरा हजार वस्तीचें असेल. पण हॉलंडचीं हीं छोटीं गांवें अतिशय स्वच्छ, प्रसन्न आणि सुंदर असतात. एक तर तीं शांत असतात. युरोपच्या औद्योगिकरणाचा या लहान गांवांवर परिणाम झालेला नसतो. मच्छीमारी, दूधदुभतें किंवा शेती यांवर येथील लोक निर्वाह करतात. मात्र युरोपच्या औद्योगिकरणाचे फायदे — म्हणजे वीज, टेलिफोन, रेल्वे, मोटारी, ड्रेनेज या सर्व सोयी या लहान गांवांतहि असतात. निसर्गविरुद्ध लढा देऊन समुद्र हटवावा, ( कारण अनेकदां समुद्र हॉलंडच्या जमिनीवर आक्रमण करतो, ) शेती करावी, शिक्षण करावें, साहित्य वाचावें, संगीत-नृत्यादींनीं जिवाला विरंगुळा आणावा आणि शांततेनें व मजेनें जीवन जगावें, ही समाधानी आणि प्रसन्न वृत्ति लोकांत आहे. रूजन्दालनंतर ब्रेडा, हेग, रॉटर्‌डॅम वगैरे शहरें मीं पाहिलीं आणि माझा हा हॉलंडबद्दल आदर वाढतच गेला. रॉटर्‌डॅमसारख्या अवाढव्य गांवांत बोटी बांधण्याचे आणि दुरुस्त करण्याचे मोठमोठे कारखाने आहेत. पण युरोपांतील इतर देशांत जेथें असे कारखाने आहेत, त्यांच्या मानानें हॉलंडमधील हीं मोठीं शहरेंहि शांत आणि समाधानी दिसलीं. मोठ्या शहरांत सर्वसाधारपणपणें दिसणारा बकालीपणा तेथें दिसत नाहीं.

( सुमारें पांच आणे ) टाकून मीं कॉफी घेतली. या यंत्रांत एक बेल्जियम फ्रँक टाकला कीं, तगडाचा एक पेला यंत्रांतून बाहेर येतो. या यंत्राला कॉफी, साखर, दूध आणि लिंबू यांसाठीं निरनिराळीं बटनें असतात. तीं दाबलीं, म्हणजे त्यांपैकीं हवे ते पदार्थ तगडाच्या कपांत पडतात, आणि कपभर गरमगरम कॉफी मिळते. त्या रात्रीं स्टेशनवर कंटाळा आला, कीं अधूनमधून उठून मी ही यांत्रिक कॉफी घेत होतों.

अडीच वाजण्याच्या सुमाराला माझे जड डोळे मिटूं लागले आणि झोंप येऊं लागली, तोंच चार-पांच पोलिस ' खाड् खाड् बूट वाजवीत वेटिंग–हॉल-मध्यें शिरले. मीं डोळे उघडून नीट पाहिलें, तों ते प्रत्येक उतारूला बांकावरून उठवून त्याची चौकशी करीत होते असें दिसलें. ही काय नवीनच ब्याद आली म्हणून मीं पासपोर्ट आणि तिकिट हातांत घेतलें आणि पोलिस जवळ येण्याची वाट पहात बसलों. मीं लांबूनच पाहिलें कीं, पोलिसांनीं दोघां इसमांना बांकावरून उठवून बाहेर घालवून दिलें. पोलिस माझ्याजवळ आले. मी पास-पोर्ट आणि तिकिट पुढें करणार, तोंच मला त्यांनीं खुणेनें सांगितलें कीं, त्याची गरज नाहीं, तुम्ही झोंपा. नंतर मला कळलें कीं, शहरांतले कांहीं बेकार आणि गुन्हेगार रात्रीं स्टेशनच्या वेटिंग–रूमचा आश्रय घेतात; म्हणून पोलिसांना दररोज अशी तपासणी करावी लागते. तरी पण या पोलिसी ढवळाढवळीनें माझी झोंप चाळवली होती. मीं ओव्हरकोट घेतला, कॉफीयंत्राजवळ गेलों आणि एक फ्रँक यंत्रांत टाकून कॉफीचे गरम घुटके घेऊं लागलों.

कॉफी घेऊन मी परत आलों, तों माझ्या जागेवर कोणीतरी शांतपणें झोंप-ल्याचें दिसलें. अर्थातच मला दुसरा बांक शोधावा लागला. बहुतेक बांकांवर कोणीतरी झोंपलेलें होतें. एक बांक रिकामा दिसला. त्यावर मी जाऊन बसलों आणि आतां मी झोंपणार, तोंच एक स्त्री येऊन त्याच बांकावर बसली. तेव्हां मीं बसल्याबसल्याच अंगावर ओव्हरकोट चढवला आणि बसून झोंप घ्यायचा प्रयत्न करूं लागलों. ती स्त्री एकदम फ्रेंचमध्यें म्हणाली, "इल् फे थय् शॉद् !" ('काय थंडी पडली आहे !') मीं म्हटलें, "वी मदमॉयसेल, इल् फे थय् शॉद् !" ( ' होय बाईसाहेब, फारच थंडी पडली आहे ! ) मला फ्रेंच समजतें एवढी खात्री झाल्यावर ती स्त्री भराभर बोलूं लागली. खरें म्हणजे मला अगदीं मोज-केंच फ्रेंच येतें. आणि फ्रेंच लोक इतक्या गडबडीनें फ्रेंच भाषा बोलतात, कीं

त्याचें बोलणें समजणें बरेंच कठिण जातें, तरी पण मी अधूनमधून 'होय', 'नाहीं', 'तुमचें बरोबर आहे', असें कांहींसें म्हणत होतों. त्या स्त्रीचें वय साधारण पन्नाशीपर्यंत असेल. प्रथम ती स्टेशनच्या वेटिंगरूममध्यें झोंपलेल्या लोकांचा उल्लेख करून म्हणत होती, " यांना एवढ्या गडबडींत आणि उजेडांत कशी झोंप येते, कुणास ठाऊक ! मला तर अशा ठिकाणीं मुळींच झोंप येणार नाहीं. " मग ती आपल्या आजाराकडे वळली. ती कांहीं दिवस हॉस्पिटलमध्यें होती, आणि आतां दक्षिण-फ्रान्सला चालली आहे एवढीच माहिती तिच्या प्रदीर्घ भाषणांतून मी जमा करूं शकलों. पहांटे चार-सव्वाचारच्या सुमाराला ती उठून गेली आणि मी बांकावर झोंपलों. पण आतां भीति वाटूं लागली कीं, मला झोंप लागून गाडी चुकली तर ? म्हणून नुसती विश्रांति घ्यायची असें मीं ठरवलें. पांचच्या सुमाराला उठलों. क्लोकरूममध्यें जाऊन एक बॅग घेतली. दुसरी बॅग मी हॉलंड आणि पॅरिसला जाऊन परत आल्यावर घेणार होतों. लहानशी बॅग आणि ओव्हरकोट घेऊन मी सात नंबरच्या प्लॅटफॉर्मवर गेलों. उतारूंची गर्दी तुरळकच होती. दोन-तीन रेल्वे अधिकाऱ्यांना विचारून रूजन्दालची गाडी याच प्लॅटफॉर्मवर येणार अशी खात्री करून घेतली. पहांटेच्या अंधुक प्रकाशांत गाडी आली आणि मी हॉलंडला जाण्यासाठीं निघालों.

♥♥♥

# २

## दहा देशांची धांवती सफर : २

ब्रुसेल्स ते रूजन्दाल हा प्रवास फक्त साडेतीन तासांचा. गाडींत गर्दी विशेष नव्हती. बेल्जियन आणि डच पोलिस यांनीं गाडींतच दोनदां तपासणी केली. उतारूंपैकीं बहुतेक डच होते; थोडे जर्मन आणि बेल्जियन होते. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें. जो तो वृत्तपत्रें वाचीत किंवा खिडकीबाहेर पहात होता.

सकाळीं नऊच्या सुमाराला रूजन्दाल स्टेशन आलें. उतरण्यापूर्वी एक तिकिट–इन्स्पेक्टर तिकिट पाहून गेला. त्यानें 'रिझर्व्हेशन आहे का?' विचारलें. माझें रिझर्व्हेशन नव्हतें, पण तें सक्तीचें असल्यानें मला सुमारें आठ आणे द्यावे लागले. याचा उल्लेख करण्याचें कारण असें कीं, मी रूजन्दाल स्टेशनवर उतरलों, तेव्हां पोलिसांनीं प्रथम माझा पासपोर्ट पाहिला आणि हॉलंडला येण्याचें कारण विचारलें. 'मी टूरिस्ट आहे' असें मीं सांगितलें. मग त्यांनीं तिकिट मागितलें. तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं, रिझर्व्हेशनचे पैसे घेणाऱ्या इन्स्पेक्टरनें माझें तिकिट घेतलें होतें. मीं पोलिसांना तसें सांगितलें; पण त्यांचा त्यावर विश्वास बसेना. त्यांना इंग्रजी नीट येत नव्हतें, आणि मला त्यांचें जर्मनमिश्रित इंग्रजी समजत नव्हतें. मग त्यांनीं स्टेशनवरच्या इंग्रजी जाणणाऱ्या एका अधिकाऱ्याला बोलावून आणलें. शेवटीं

मीं एक डच गिल्डर दंड दिला आणि क्लोकरूममध्यें सामान ठेवून रूजन्दाल गांव पहायला स्टेशनबाहेर पडलों.

बाहेर एका उपाहारगृहांत चहा घेतला. चहाचे पैसे देण्यासाठीं खिशांत हात घातला, तेव्हां ब्रुसेल्स ते रूजन्दाल रेल्वेचें तिकिट माझ्या हाताला लागलें! मला आश्चर्य वाटलें. मीं पुन्हा स्मृतीला ताण देऊन विचार केला, तेव्हां हा तिकिटाचा घोटाळा माझ्या लक्षांत आला. वास्तविक तिकिट-इन्स्पेक्टरनें मला रिझर्व्हेशनची पावती आणि तिकिट हीं दोन्ही दिलेलीं होतीं. पण माझी समजूत त्यानें तिकिट घेतलें अशी झालेली होती. इंग्लंडमध्यें कांहीं मार्गांवर अशा रीतीनें स्टेशन येण्यापूर्वींच तिकिटें घेतात; म्हणजे स्टेशनच्या दारावर एकदम गर्दी होत नाहीं. ही पद्धत माझ्या मनांत इतकी घोळत होती कीं, खिशांत तिकिट असूनहि 'नाहीं' म्हणून मीं सांगून टाकलें होतें आणि दंड दिला होता. आतां तिकिट सांपडलें; पण त्याचा कांहीं उपयोग नव्हता.

रूजन्दाल गांव लहानच -- म्हणजे दहापंधरा हजार वस्तीचें असेल. पण हॉलंडचीं हीं छोटीं गांवें अतिशय स्वच्छ, प्रसन्न आणि सुंदर असतात. एक तर तीं शांत असतात. युरोपच्या औद्योगिकरणाचा या लहान गांवांवर परिणाम झालेला नसतो. मच्छीमारी, दूधदुभतें किंवा शेती यांवर येथील लोक निर्वाह करतात. मात्र युरोपच्या औद्योगिकरणाचे फायदे — म्हणजे वीज, टेलिफोन, रेल्वे, मोटारी, ड्रेनेज या सर्व सोयी या लहान गांवांतहि असतात. निसर्गविरुद्ध लढा देऊन समुद्र हटवावा, (कारण अनेकदां समुद्र हॉलंडच्या जमिनीवर आक्रमण करतो,) शेती करावी, शिक्षण करावें, साहित्य वाचावें, संगीत-नृत्यादींनीं जिवाला विरंगुळा आणावा आणि शांततेनें व मजेनें जीवन जगावें, ही समाधानी आणि प्रसन्न वृत्ति लोकांत आहे. रूजन्दालनंतर ब्रेडा, हेग, रॉटर्डॅम वगैरे शहरें मीं पाहिलीं आणि माझा हा हॉलंडबद्दल आदर वाढतच गेला. रॉटर्डॅमसारख्या अवाढव्य गांवांत बोटी बांधण्याचे आणि दुरुस्त करण्याचे मोठमोठे कारखाने आहेत. पण युरोपांतील इतर देशांत जेथें असे कारखाने आहेत, त्यांच्या मानानें हॉलंडमधील हीं मोठीं शहरेंहि शांत आणि समाधानी दिसलीं. मोठ्या शहरांत सर्वसाधारपणपणें दिसणारा बकाली-पणा तेथें दिसत नाहीं.

सकाळीं दहा–साडेदहाच्या सुमाराला रूजन्दालहून ब्रेडाला गेलों. तेथें स्टेशनवर ' आन्स कैसर ' ही माझी डच मैत्रीण माझी वाटच पहात होती. मी त्या गाडीनें येणार म्हणून तिला आधीं कळविलेलें होतें. तिनें मला आपल्या घरीं नेलें आणि आपल्या आईची व भावाची माझ्याशीं ओळख करून दिली. ब्रेडा हें हॉलंडमधील ' टिपिकल ' किंवा वैशिष्ट्यपूर्ण गांव आहे. वस्ती असेल तीस–चाळीस हजारांपर्यंत; पण रस्ते प्रशस्त, रस्त्यांत मध्यभागीं चिंचोळी, लांबट पण शोभिवंत बाग, दोन्ही बाजूंना दोन दिशांना जाणारे रस्ते, त्यानंतर फूटपाथ, त्यावर अधूनमधून उंचउंच झाडें, मुख्य रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना आकर्षक दुकानें आणि या स्वच्छ रस्त्यांवरून जाणारे आनंदी लोक. मला ब्रेडा गांव तर आवडलेंच; पण या गांवांतील ' ग्रॉत् मार्क्त ' हा चौक तर मला रसिक, शांतताप्रिय बुद्धिवाद्यांच्या जीवनाचा आदर्शच वाटला. या चौकांत सभोंवतींच्या फूटपाथवर अर्ध्या जागेंत वेताच्या खुर्च्या टाकलेल्या आहेत. या खुर्च्यांवर बसून बीअर घेत गप्पा मारायचा डच लोकांना भारी छंद. उघड्या वातावरणांत रसिक मित्रांबरोबर किंवा मैत्रिणीबरोबर जीवनांतील जिव्हाळ्याच्या विषयांवर चर्चा करणें हा एक अत्यंत मोलाचा आणि वेगळाच आनंद आहे असें मला वाटलें. आम्ही तीन-चारजण असे गप्पा मारीत बसलों असतां आठ–नऊ वर्षांची एक उंच मुलगी आणि पांच-सहा वर्षांचा तिचा भाऊ तेथें आलीं. ती मुलगी म्हणाली, " साहेब, माझ्या आईनं मला ब्रेड आणायला पैसे दिले होते. मी आणि माझा भाऊ पैसे घेऊन दुकानाकडे पळत जातांना रस्त्यांत पैसे पडले. आतां आम्हांला आई मार देईल. आम्ही काय करूं ? " आम्हांला त्यांची दया आली. आम्हीं त्या दोघांना दहा सेंट ( सुमारें चार आणे ) चें नाणें दिलें. तीं दोघेंहि आभार मानून परत गेलीं. दहा–पंधरा मिनिटांनीं तीं बहीण–भाऊ पुन्हा आलीं. जोआकिम ( ' आन्स 'चा भाऊ ) त्यांना म्हणाला, " आतां काय हरवलं आणखी ? " तेव्हां तीं दोघेंहि हंसू लागलीं. ती मुलगी म्हणाली, " हें बघा, मघांपासून आम्हीं किती पैसे मिळवले ते ! " असें म्हणून त्यांनीं आम्हांला पांच आणि दहा सेंटचीं दहा-बारा नाणीं दाखवलीं !

मी ब्रेडाला एक दिवस राहिलों. मी जेथें उतरलों होतों, त्या जागेसमोरच एक ' कॉन्व्हेंट ' होतें. तेथें अनेक योगिनी काळे कपडे घालून धर्माचरण करण्यांत

गुंतलेल्या दिसत. आदल्या दोन रात्रीं नीट झोंप न लागल्यानें मला त्या रात्रीं अतिशय गाढ झोंप लागली. सकाळीं उठल्याबरोबर मला इतकें प्रसन्न वाटलें कीं, जणूं नवा जन्म झाला आहे! खिडकीचा पडदा उघडून बाहेर पाहिलें. इतकें शांत, प्रसन्न, पवित्र दृश्य मीं पूर्वी क्वचितच पाहिलें असेल. मी दुसऱ्या मजल्यावर रहात होतों. त्यामुळें समोरच्या 'कॉन्व्हेंट'च्या उंच पांढऱ्या भिंतीच्याहि वरून मला आंतील दृश्य दिसत होतें. आठदहा योगिनी काळा पोषाख करून आणि डोक्याजवळ पांढरा शुभ्र कपडा बांधून प्रार्थनेसाठीं चालल्या होत्या. तें दृश्य पाहून आपल्या देशांतील सुवासिनी पूजेचें साहित्य घेऊन मंदिराकडे जातांनाचें पवित्र दृश्य मला आठवलें. नास्तिकालाहि केव्हां केव्हां धार्मिकांचा हेवा वाटत असावा. ज्यांचा देवावर, धर्मावर विश्वास असतो त्यांना दृढमूल श्रद्धा असतात; जगांत कांहींतरी महान्, अचल, उद्धारक, पवित्र आहे असा ज्यांचा विश्वास असतो त्यांच्या जीवनाला कांहीं निराळीच आंतरिक प्रतिष्ठा असते. ही श्रद्धा ज्यांना नसते, त्यांना आपलें जीवन पोकळ, बनावट, वैराण वाटत असावें.

त्या वेळीं माझ्या मनांत आणखी एक विचार आला. तो असा कीं, संस्कृतीचीं मुळें किती खोल असतात. मी कित्येक पाश्चिमात्य देशांत हिंडलों, फिरलों, राहिलों, अपेयपान केलें, आम्ही अनाचार समजतों ते सारे प्रकार पाहिले, आमचीं नैतिक मूल्यें जेथें हास्यास्पद ठरावींत अशा समाजव्यवस्था पाहिल्या; तरीहि या पवित्र, धर्ममय वातावरणाची मोहिनी—थोडी जरब म्हणा—सुटत नाहीं. आम्ही ऐहिक सुखाच्या मागें धडपडत असतां या प्रशांत चेहेऱ्यांच्या पवित्र योगिनींना शाश्वत असें कांहीं गवसलें आहे असें वाटत राहिलें. कुणी सांगावें? तें खरें असेल, खोटेंहि असेल; पण त्यांच्या समाधानतेला मी — आणि यांत्रिक युगांतलीं माझ्यासारखीं कोट्यवधि माणसं पारखीं झालीं आहोंत असें मात्र वाटलें आणि चुकल्याचुकल्यासारखें झालें.

अशा किंचित् खिन्न–प्रगल्भ मनःस्थितींतच मीं अल्पोपाहार घेतला. हॉलंडच्या मुबलक लोण्यानें परिपूर्ण असा तो 'भरपूर अल्पोपाहार' — ही शाब्दिक विसंगतीच आहे! — घेतल्यावर मी बॅग घेऊन हॉटेलमधून बाहेर पडलों. गांव सोडण्यापूर्वी पुन्हा 'ग्रॉत् मार्क्त' चौकांत जाऊन थोडा वेळ बसावें अशी ओढ लागली; म्हणून त्या बाजूला गेलों. एका हॉटेलच्या फूटपाथवर खुर्च्या टाकलेल्या

होत्या, त्यांपैकीं एक घेतली आणि चहा मागवला. हॉटेल--म्हणजे उपाहार-गृह--लहानच होतें. त्याची पस्तीशीच्या वयाची मालकीण जवळ आली आणि हंसून म्हणाली, "ऑंग्ले, फ्रॉन्से?" ('तुम्हांला इंग्रजी भाषा येते कीं फ्रेंच?') मीं म्हटलें, "ऑंग्ले." मग तिनें "गुड् मॉर्निंग" म्हणून मी कोणत्या देशाचा याची चौकशी केली. मला जरा बरें वाटलें. इंग्लंडमध्यें अशी चौकशी कोणी करणार नाहीं. त्यामुळें तेथें जो तुटक परकेपणा वाटतो, तो येथें वाटला नाहीं.

चहा घेऊन झाल्यावर त्या विलोभनीय चौकांत जरा रेंगाळलों. ब्रेडामधील दृश्यांचीं तीन-चार कार्डें विकत घेतलीं, आणि प्रशस्त, रमणीय अशा 'विल्यम स्त्रात' या रस्त्यावरून ब्रेडा स्टेशनकडे निघालों. हॉलंडमध्यें आल्यासारखें ॲमस्टरडॅम आणि हेग पहावें असा पहिला विचार होता. पण नकाशांत पाहिलें, तों ॲमस्टरडॅम खूपच दूर होतें. याचाच अर्थ असा कीं, रात्र होण्यापूर्वी तें पाहून पॅरिसच्या वाटेला लागणें कठिण होतें. तेव्हां हेग आणि वाटेवरचें रॉटर्डॅम शहर पाहूनच समाधान मानावें, असें मीं ठरविलें.

ब्रेडा गांवची गोष्ट. परदेशांत नेहमीं अडणारी गोष्ट येथेंहि आडवी आली. '--येथें मुतारी कुठें आहे?' असें परदेशांतील--आणि विशेषतः आपल्याला त्या देशाची भाषा येत नसेल तर--तिऱ्हाईतांना विचारणें अवघड असतें. पण आन्सच्या भावानें त्याबाबत मला एक 'टिप्' दिली होती. ती अशी कीं, ब्रेडा गांवांत सार्वजनिक मुतारी अशी जवळजवळ नाहींच; पण प्रत्येक उपाहार-गृहांत ही सोय आहे. माझ्यापुढें मग असा प्रश्न पडला कीं, स्त्रियांच्यासाठीं कोणती मुतारी आणि पुरुषांसाठीं कोणती हें कसें ओळखायचें? कारण त्याबाबत घोटाळा झाला तर चमत्कारिक प्रसंग ओढवायचा! तेव्हां त्यानें सांगितलें कीं, HERMEN हा शब्द लक्षांत ठेवा; ज्या 'टॉयलेट'वर हा शब्द असेल, तेथें जा. त्याप्रमाणें हा शब्द घोकीत मी एका उपाहारगृहांत गेलों. हा शब्द कोठें दिसतो का हें मी हळूंच शोधक नजरेनें पाहूं लागलों; पण तो कोठेंच दिसेना. मीं मागविलेलें 'सॅलड्' आणि कॉफी घेत असतां आतां काय करावें, व्यवस्थापिकेला विचारावें का, असा प्रश्न माझ्यापुढें पडला. अखेर मीं धाडस करून वेट्रेसला "टॉयलेट कोठें आहे?" असें फ्रेंचमधून विचारलें. हॉलंडमध्यें फ्रेंचपेक्षां जर्मन भाषेचा प्रसार जास्त आहे; पण बहुतेकांना फ्रेंचहि समजतें.



ब्रुसेल्स येथील ' मॅनकेन पीस ' पुतळा




हॉलंडमधील ब्रेडा या गांवांतील ' विल्यम स्ट्रान ' हा रस्ता. दोन्ही बाजूंना रस्ते आणि मध्यें हिरवळ व उद्यान असल्यानें हे रस्ते अतिशय मनोहर दिसतात.

असा प्रश्न सुंदर तरुणीला विचारणें मला अवघड वाटत होतें. पण तेथें साऱ्या स्त्रियाच कामाला असल्यानें माझा नाइलाज झाला. तरी पण तिनें मला ती जागा दाखवली. ती जागा उपाहारगृहाच्या तळघरांत होती. तळघरांत टॉयलेटचे दोन विभाग होते. मीं थांबून HERMEN हीं अक्षरें वाचलीं आणि आंत गेलों. पण आंत पाहतों तों काय! आंत एक पंचविशीच्या वयाची तरुणीच होती! मला वाटलें, अरे बाप रे! इतकी दक्षता घेऊनहि आपण चुकून बायकांच्या सुतारींत आलों! मी अगदीं शरमून गेलों. माझा संकोच चटकन् तिच्या लक्षांत आला. ती हंसून म्हणाली, "आँत्रे मेस्युधिर." ('महाशय, आंत या.') तिनें मला सांगितलें, "ही पुरुषांचीच आहे. मी इथं सफाई करीत होते." तिच्या या स्पष्टीकरणानें मला जरा बरें वाटलें. पण तो चमत्कारिक प्रसंग माझ्या मनांत पुढें कित्येक दिवस रेंगाळत राहिला.

हॉलंडचा नकाशा पाहून मीं ठरविलें होतें कीं, एवींतेवीं हॉलंडमध्यें आलोंच आहोंत; तर ॲमस्टरडॅम, रॉटर्डॅम आणि हेग हीं प्रमुख गांवें पहायचीं. ब्रेडानंतर मी कुठें जाणार याची चौकशी आन्सनें केली होती, तेव्हां मीं तिला या तीन गांवांचीं नांवें सांगितलीं होतीं, आणि मीं असेंहि सांगितलें होतें कीं, एकाच दिवसांत हीं तिन्ही गांवें 'उरकून' टाकायचा माझा विचार आहे. तेव्हां ती हंसून म्हणाली होती, "मोठमोठे देश आणि गांवं अशीं घाईघाईनं 'उरकून' टाकायची कल्पना तूं सोडावीस हें बरं. कांहीं प्रवासी प्रवास करतात ते अशा पद्धतीनं कीं, जणूं कचेरीचीं कामं भराभर उरकायचीं आहेत! तशीं एकामागून एक प्रेक्षणीय स्थळं डोळ्यांखालून घातलीं कीं काम झालं, असं कर्तव्य म्हणून प्रवास करण्यांत कांहीं मौज नाहीं. मला वाटतं, तूं यांपैकीं एखादंच गांव निवडावंस, शक्य तर तिथं एकदोन दिवस रहावंस, त्यामुळं तुला सहलीचं सुख मिळेल. वणवण करून चार गांवं एका दिवसांत पाहून आलास तर नुसता त्रास होईल तुला; पाहिलेलं कांहीं लक्षांत रहायचं नाहीं."

मला तिचें म्हणणें पटलें. ॲमस्टरडॅम आणि रॉटर्डॅम हीं मोठीं गांवें असतील. पण त्यासाठीं उगाच धांवपळ करण्यांत काय अर्थ?—अर्थात् हीं गांवें पहायला जायचें पूर्वी मीं ठरवलें होतें, त्यालाहि कांहीं कारण होतें. लंडन ते मुंबई या प्रवासांत शक्यतों दिवसा प्रेक्षणीय स्थळें पहायचीं आणि रात्रीं आगगाडीनें प्रवास करायचा; म्हणजे हॉटेलांत रहायचा खर्च वांचेल हें

माझ्या प्रवासाचें सूत्र होतें. तसें केलें, तरच माझ्याजवळचे पैसे मुंबईला पोंचेपर्यंत जेमतेम पुरणार होते. मात्र हें कारण आन्सला सांगणें मला योग्य वाटलें नाहीं. पण तिचें म्हणणें खरें होतें. आपण पाहिलेल्या गांवांच्या यादींत आणखी दोन गांवांचीं नांवें पडावींत म्हणून स्वतःला व्यर्थ शिणवणेंहि योग्य नव्हतें. तेव्हां फक्त हेगला जाऊन यायचें मीं ठरवलें.

सकाळीं साडेदहाच्या सुमाराला मी हेगला पोंहोंचलों. हेग ही हॉलंडची जवळजवळ राजधानीच आहे. ( हॉलंडची राजधानी ॲमस्टरडॅम आहे. ) पांच लाख वस्तीच्या या शहरांत हॉलंडची राणी ज्युलियाना रहाते; तिचा दरबार येथें भरतो; हॉलंडच्या कायदेमंडळाची बैठक येथें भरते, आणि डच सुप्रीम-कोर्ट आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयेंहि येथेंच आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची इमारत भव्य नसली तरी रुबाबदार वाटते. याच न्यायालयापुढें गोव्याबाबतची आपली केस आहे, हा विचार त्या वेळींहि मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. या न्यायालयाच्या इमारतीजवळच 'स्केव्हेनिन्‌गेन' हें विहाराचें प्रसिद्ध स्थळ आहे. समुद्राच्या कांठीं असलेल्या या रमणीय ठिकाणीं ओघळत्या लाटांत स्नान करावें आणि तेथील उल्हासदायक उपाहारगृहांत खाना घ्यावा असा मोह कोणालाहि होईल. हेगमध्यें — आणि हॉलंडमधील बऱ्याच शहरांत — इंडोनेशियन उपाहारगृहें आहेत. त्यांत भात, पापड वगैरे रुचकर पौर्वात्य पदार्थ मिळतात.

हेगमध्यें तीनचार तास मी फिरलों. आंतरराष्ट्रीय कोर्ट आणि मुख्य सरकारी इमारती यांशिवाय कोणतेंहि स्थळ मीं मुद्दाम जाऊन पाहिलें नाहीं. आंतरराष्ट्रीय कोर्टाच्या इमारतीजवळच्या विहारस्थानासमोर अनेक देशांचीं निशाणें एका मोठ्या रिंगणाभोंवतीं लावलेलीं आहेत. त्यांत भारताचेंहि निशाण आहे. अशा दूरच्या ठिकाणीं आपल्या देशाचें चिन्ह पाहून जरा बरें वाटतें हें खरें. या परदेशांतहि आपल्याला कसला तरी आधार आहे, ही भावना सुरक्षिततेची साक्ष देते. हेगमध्यें मी वाट फुटेल तिकडे फिरलों आणि समोर येईल तें पाहिलें. कांहीं नवीन पाहण्यापेक्षां पॅरिसची संध्याकाळची गाडी येईपर्यंत वेळ काढायचा, एवढाच उद्देश होता. हेगमध्यें फिरून कंटाळा आला, तेव्हां परत रॉटर्‌डॅमला आलों. तसाच थोडासा गांवांत फिरलों आणि संध्याकाळीं सहाच्या सुमाराला स्टेशनवर आलों. अर्धा-पाऊण तासांत गाडी होती. थकून मी स्टेशनच्या

प्रतीक्षागृहांतील एका बांकावर बसलों आणि हॉलंडविषयीं विचार करूं लागलों.

मीं इतकें देश पाहिले; पण हॉलंडसारखा रमणीय देश दुसरा पाहिला नाहीं. या देशांत कसली गडबड नाहीं, गोंधळ नाहीं, घाई नाहीं. येथले लोक आपल्या लहानमोठ्या व्यवसायांत रमलेले, समाधानी दिसतात. आंतरराष्ट्रीय राजकारणांत आपण कांहीं उच्च स्थान मिळवावें अशी आंवाक्याबाहेरची आकांक्षा त्यांना नाहीं, आणि ती सफल न झाल्यामुळें येणारी निराशाहि नाहीं. आपलें काम इमानेंइतबारें करावें आणि घर, खेळ, संगीत, नृत्य, वाचन इत्यादींत रमावें, अशी डच लोकांची ( हॉलंडच्या लोकांना ' डच ' म्हणतात ) जीवनपद्धति दिसली. त्यांच्या शहरांत अवाढव्य इमारती सर्वसामान्यपणें दिसत नाहींत. डच लोकांचीं वैशिष्ट्यपूर्ण घरें म्हणजे लहान, लांकडी, सुंदर रंगांनीं सुशोभित केलेलीं. लांबून पहाणाऱ्याला तीं खेळण्यांतल्या घरांसारखीं दिसतात. किंबहुना सारा हॉलंड देशच खेळण्यांचा आणि बाहुल्यांचा देश वाटतो. हेंच त्याचें वैशिष्ट्य आणि हीच त्याची खरी गंमत. वर्षांतून एखादा दिवस मुलांनींच शाळा चालवावी, तसा हा देश मुलामुलींनींच चालविल्या-सारखा वाटतो. ज्याला प्रसिद्धि, भरमसाट आर्थिक भरभराट, ऐहिक यश यांचा हव्यास नसेल अशा माणसांना आपल्या लहानशा सुखद जगांत आपलें बौद्धिक उद्दिष्ट साधायला हा देश मोठा नामी आहे, असें मला राहून राहून वाटतें.

डच लोकांनीं निसर्गाशीं जेवढा लढा दिला, — आणि अद्याप देत आहेत, — तेवढा लढा जगांतील इतर कोणत्याहि देशांतील लोकांनीं दिलेला नसेल. खरें म्हणजे हा सबंध देशच समुद्रसपाटीखालीं आहे. या देशाचें नांवच ' नेदरलँड ' — म्हणजे ' तळाचा देश ' असें आहे. पाण्याखालचा हा देश डच लोकांनीं बंधारे घालून, समुद्र हटवून आणि तळीं–डबकीं बुजवून भरून काढलेला आहे. एका फ्रेंच लेखकानें तर म्हटलें आहे, ' God created all the world except Holland, which the Dutch created themselves.' ( ' हॉलंडशिवाय इतर जग परमेश्वरानें निर्माण केलें; हॉलंड देश मात्र डच लोकांनींच निर्माण केला. ' ) डच लोकांची असामान्य कर्तबगारी नसती, तर भौगोलिकदृष्ट्या हॉलंडला अस्तित्वच राहिलें नसतें. अद्यापहि या देशांत छोटीं रंगीबेरंगीं ' टुलिप 'चीं फुलें आणि अवाढव्य पवनचक्क्या दिसतात. या

पवनचक्क्यांमुळें आपण अद्याप मध्ययुगीन शालीनतेच्या आणि सौहार्दाच्या वातावरणांत वावरत आहोंत असा भास होतो. कालवे, दुभतीं जनावरें, हिरवळी, शेतें, पवनचक्क्या आणि दिलदार डच लोक यांनीं समृद्ध असा हा देश पाहणें म्हणजे एक भाग्य आहे खरेंच.

हॉलंडमध्यें सायकलींचा सुळसुळाट फार; पण पुण्यांतील रस्त्यांवर सायकलींचा चक्रव्यूह होतो तसा तेथें दिसत नाहीं. रहदारी सारी रस्त्याच्या उजव्या बाजूनें होते. त्यामुळें इंग्लंडमधून नुकत्याच आलेल्या माझ्यासारख्याला सुरुवातीला चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. या सायकली संथपणें एका कडेनें चाललेल्या असतात. डच-सरकारच्या प्रवासविषयक पुस्तिकेंत म्हटलेलें आहे कीं, हॉलंडची राणीसुद्धां सायकलवर बसते. राणी सायकलवर बसलेली आहे असा तिचा फोटोहि या पुस्तिकेंत दिलेला आहे. तसें पाहिलें तर हॉलंड हा सनातनी देश आहे. इतर पाश्चिमात्य देशांत दिसणारा नर्म वाह्यात्‌पणा येथें दिसणार नाहीं. लोक जुन्या परंपरांचे अभिमानी आहेत. ब्रेडा आणि हेग येथील रस्त्यांवरून फिरतांना मला एक गंमत दिसली. कांहीं मासिकांच्या मुखपृष्ठांवर अर्धनग्न स्त्रियांचीं चित्रें होतीं. हीं मासिकें अर्थातच फ्रान्समधून आणि इतर देशांतून आयात झालेलीं होतीं; पण तीं विक्रीसाठीं कांचांच्या तावदानांमागें ठेवतांना डच दुकानदारांनीं मखलाशी केलेली होती. या उन्मादक चित्रांतील स्त्रियांच्या छातीभोंवतीं आणि कमरेभोंवतीं त्यांनीं दोन बोटांच्या रुंदीच्या ब्राउनपेपरच्या पट्ट्या गुंडाळल्या होत्या ! म्हणजे म्हटलें तर उन्मादक मासिकांची विक्री झाली, म्हटलें तर संस्कृतिरक्षणहि झालें !

बेल्जियम आणि हॉलंड यांच्या धांवत्या दौऱ्यांत आणखी एक गोष्ट माझ्या लक्षांत आली. एखादा देश एखाद्या गोष्टीबद्दल इतका प्रसिद्ध असतो कीं, त्या देशांत पाऊल ठेवल्याबरोबर आपल्याला जिकडेतिकडे ती एकच गोष्ट दिसणार असें वाटूं लागतें. कोल्हापूरच्या अगदीं लहानशा गल्लींतहि बेल्जियमच्या कांचांचा आणि आरशांचा एवढा दबदबा मी लहानपणापासून पहात होतों कीं, बेल्जियम हा देश कांचांचा आणि आरशांचाच बनवलेला असावा अशी त्या वेळीं माझी कल्पना होती. ब्रुसेल्समध्यें मी पहिल्याच उपाहारगृहांत गेलों, तेव्हां त्यांत आरसेच आरसे असतील असें मला वाटलें होतें; पण छेः ! आंत एकहि आरसा नव्हता. आणि ब्रुसेल्समध्यें इतरत्रहि हा 'आरसे पिकविणारा

देश ' आहे असें वाटण्यासारखें मला कांहीं दिसलें नाहीं. तसेंच हॉलंडच्या ' दूधदुभत्यांचा देश ' या लौकिकाचें झालें ! — हा लौकिक वाचून मला वाटत होतें कीं, हॉलंडमध्यें गेल्यावर सर्वत्र लोक लोण्याचे गोळे हातांत घेऊन त्यांचे बकाणे मारतांना दिसणार; पण वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, हॉलंडमध्यें दूधदुभतें भरपूर होत असलें तरी, डच लोक त्यावर फारसा हात मारीत नाहींत. त्याबद्दल मी विचारतां आन्स कैसर म्हणाली, " आमच्या देशांत होणारं बहुतेक दूधदुभतं आम्ही परदेशांत निर्यात करतों. कारण आमचा देश गरीब आहे. तें खाणं आम्हां सर्वांनाच परवडतं असं नव्हे. आणि दुसरं असं कीं, घरांतले उत्तम पदार्थ आपण पाहुण्यांना देतों ना ? तसंच हें आहे म्हटलं तरी चालेल..."

हे विचार माझ्या मनांत येत असतांनाच ॲमस्टरडॅम–पॅरिस गाडी आली. त्या हिरवट–धुरकट गाडींत मी चढलों, आणि गुबगुबीत गादीच्या एका कोपऱ्यां-तील जागेवर बसलों. गाडींत फारशी गर्दी नव्हती; पण रॉटर्डॅम ते पॅरिस या प्रवासांत कोणालाहि झोंप येणें कठिण आहे. रात्रभर झोंपेच्या मार्गांत इतके अडथळे येतात कीं, अगदीं स्थितप्रज्ञहि निश्चिंत झोंपूं शकणार नाहीं. कारण या प्रवासांत आगगाडी तीन देशांच्या सरहद्दी ओलांडते. हॉलंड, बेल्जम आणि फ्रान्स या तिन्ही देशांच्या सरहद्दीवर कस्टमची तपासणी होते. मात्र ' कस्टम–तपासणी ' म्हटल्यावर आपल्यापुढें जें चित्र उभें रहातें, तशी तपासणी येथें सहसा होत नाहीं. उंच टेबलावर आपण आपल्या बॅगा आणि ट्रंका उघडल्या आहेत, त्यांतील सर्व वस्तू अस्ताव्यस्तपणें पसरल्या आहेत, तरीहि ट्रंकेचा तळ पहायचाच अशा निश्चयानें कस्टमचा अधिकारी बारीकसारीक वस्तूहि तपाशीत आहे आणि ह्या सर्व प्रकाराला दोन-अडीच तास वेळ लागत आहे, असें दृश्य कदाचित् तेथें दिसत असेल, अशी कुणाची — विशेषतः जे लोक पूर्वी गोव्याला गेले आहेत त्यांची तरी — कल्पना असेल तर ती मात्र ॲमस्टरडॅम–पॅरिस रेल्वेवर चुकीची ठरते. या गाड्यांतून निरनिराळ्या देशांच्या कस्टम्स–खात्याचे चित्रविचित्र पोषाखाचे अधिकारी डब्यांत येतात. हातांतील लोखंडी पट्टीनें खट्खट् असा आवाज करतात आणि " Customs Anything to declare " ( ' आम्ही कस्टमचे तपासणी — अधिकारी आहोंत. आपल्याजवळ अबकारी निर्बंधाच्या कक्षेंतील कांहीं आहे

काय ? ) असें उतारूंना विचारतात. मग उतारू झोंपेच्या डोळ्यानें त्यांच्याकडे पहात मान हालवितात किंवा ' नो ' असें पुटपुटतात आणि अधिकारी तें ग्राह्य मानून पुढें जातात. हीच तपासणी; पण प्रत्येक उतारूला झोंपेंतून उठविण्याची मात्र खबरदारी घेतली जाते.

झोंपेच्या मार्गांतील हा एकमेव अडथळा नव्हे. कस्टमच्या मागोमाग पासपोर्ट पहाणारे अधिकारी येतात, त्यांना पासपोर्ट आणि ' व्हिसा ' ( Visa ) दाखविण्यासाठीं उतारूंना उठावेंच लागतें. आपल्या देशाचा पासपोर्ट, ज्या देशांत जायचें त्या देशांत जाण्यासाठीं आपल्या सरकारची परवानगी आणि पुन्हां त्या देशच्या सरकारचा ' व्हिसा, ' असें सर्व पासपोर्टवर पाहतात. देशांत आल्याची तारीख आणि जातांना देशांतून गेल्याची तारीखहि हे अधिकारी पासपोर्टवर नमूद करतात. प्रत्येक देशांत पासपोर्टच्या या तपासणीस तोंड देऊन उतारू जरा आडवा होतो न होतो, तोंच 'बीए, बीए' (तिकीट) असें ओरडत तिकिट–तपासनीस येतो. म्हणजे प्रत्येक देशांतील कस्टम, पासपोर्ट आणि तिकिट–तपासणी अशा तीन अधिकाऱ्यांच्या डब्यांत फेऱ्या होतात. ॲमस्टरडॅम ते पॅरिस या अकरा तासांच्या प्रवासांत अशा एकंदर नऊ तपासण्यांसाठीं उतारूला उठावें लागतें. मग निवांत झोंप येणें कसें शक्य आहे ?

पॅरिस शहराच्या ' गार द नॉर्द ' या स्टेशनवर गाडी पोचण्याची वेळ सकाळी सहाची होती. पण पहांटे साडेचार वाजल्यापासूनच डब्यांत गर्दी वाढूं लागली. कारण पॅरिसपासून पन्नास ते पाऊणशें मैलांवर राहणारे स्त्रीपुरुष नोकरीसाठीं पॅरिसला चालले होते. डब्यांत पॅरिसला जाणारे लोक शिरले आहेत हें लक्षांत येतांच मी जरा तरतरी आणून आणि हुषारीनें पाहूं लागलों. सौंदर्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या फ्रेंच तरुणी याच का ? रंगेल आणि कलावंत म्हणून नांवाजलेले फ्रेंच लोक हेच का — असें एकसारखें मनांत येई. पण खरें म्हणजे त्या वेळीं आमच्या डब्यांत शिरलेल्या फ्रेंचांनीं माझी अगदींच निराशा केली. एखाद्या देशाबद्दलच्या आपल्या कल्पना किती ठोकळेबाज असतात, याची मला तेव्हां प्रचीति आली. फ्रेंच तरुणी म्हणजे रंगेल, सुंदर, उंची कपडे आणि अत्तरें वापरणाऱ्या, वात्रट, विलासी असाव्यात, अशी परकीयांची कल्पना असते. पण मीं आगगाडींत पाहिलेल्या स्त्रिया तर कोणत्याहि पाश्चिमात्य देशांतील स्त्रियांप्रमाणेंच दिसल्या. त्या संसारी, काम करणाऱ्या,

प्रेमळ, पण आपल्यापुरतें पाहणाऱ्या अशा वाटल्या. निदान फ्रेंच महिलांबद्दलच्या पारंपरिक कल्पनांशीं त्या जुळत नव्हत्या.

'पॅरिस' या नांवांतच कांहींतरी जादू आहे. हें नांव उच्चारल्याबरोबर कोणत्या तरी स्वप्ननगरीची आठवण होते. पण प्रत्येकाची ही स्वप्ननगरी निराळी असते. मी 'गार द नॉर्द' स्टेशनांत उतरलों, तेव्हां माझें मन याच स्वप्न-नगरीच्या दर्शनानें पुलकित झालें. मी हातांत सामानाची बॅग घेतली, आणि फ्रेंच स्त्रीपुरुषांच्या गर्दींतून वाट काढीत स्टेशनच्या पुढच्या मोठ्या आवारांत शिरलों. माझें मोडकेंतोडकें फ्रेंच मी घासूनपुसून ठेवूं लागलों. पहिली गरज होती ती छानपैकीं चवदार गरम चहाची आणि सिगरेटची. स्टेशनच्याच आवारांतील उपाहारगृहांत मी शिरणार, तोंच लक्षांत आलें कीं, आपल्याजवळ फ्रेंच पैसे नाहींत !

पैसे बदलण्याचें ठिकाण कोठें दिसतें का, हें मी पाहूं लागलों. एका कोपऱ्यांत ती पाटी दिसली; तेव्हां तेथें गेलों आणि तेथील फ्रेंच तरुणीकडे पांच पौंडांचा ट्रॅव्हलर्स चेक सही करून दिला. तिनें चेकवरील सही पाहिली आणि ती म्हणाली, " पासपोर्ट ? " मीं पासपोर्ट काढून दाखवला. पासपोर्टवरील माझा फोटो आणि खुद्द मी, तसेंच पासपोर्टवरील माझी सही आणि चेकवरील सही यांतील साम्य तिनें ताडून पाहिलें आणि मला सुमारें साडेचार हजार फ्रँक्स आणि पासपोर्ट परत दिला.

मीं प्रथम एक सिगरेटचें पाकीट खरेदी केलें. मग स्टेशनवरच्याच उपाहार-गृहांत गेलों. कारण बाहेर बारीक पाऊस पडत होता. उपाहारगृहांत वेटरनें अदबीनें विचारलें, " कॅफे मेस्युअर ? " " नॉन् सिल्व्हूप्ले ते " (नाहीं, चहा हवा) असें फ्रेंचमध्यें उत्तर देऊन मीं माझ्या फ्रेंचचा पहिला प्रयोग पॅरिसमध्यें केला, तेव्हां माझा मीच त्यावर खूष झालों. माझ्याकडे किंचित् आश्चर्यानें पाहून " वी मेस्युअर " असें म्हणून वेटर चहा आणायला गेला. पॅरिसमध्यें बहुतेक सर्वजण कॉफीच घेतात. त्यामुळें वेटरनें व्यक्त केलेलें तें आश्चर्य माझ्या चहाच्या मागणीबद्दल होतें, कीं माझ्या विचित्र फ्रेंचबद्दल, तें मात्र मला समजलें नाहीं.

चहा घेतल्यावर मला तरतरी आली. जरा बाहेर जाऊन पॅरिसचें दर्शन घ्यावें असें खूप वाटलें, पण प्रथम हॉटेलमध्यें जागा मिळवून मगच बाहेर

पडावें अशा विचारानें मी 'गार द ऑर्लिन्स' स्टेशनकडे जाण्यासाठीं भुयारी-मार्ग शोधूं लागलों. कारण लंडनमध्यें माझ्या एका मैत्रिणीनें सांगितलें होतें कीं, या स्टेशनजवळ खूपच हॉटेल्स असून तीं पॅरिसच्या मानानें स्वस्तहि आहेत. पॅरिसच्या 'मेट्रो' किंवा भुयारी-रेल्वे समजण्यास अगदीं सोप्या आहेत. प्रत्येक स्टेशनवर एक मोठा नकाशा असतो आणि त्याजवळच सर्व स्टेशनांचीं नांवें असतात. आपल्याला जेथें जायचें असेल, त्या स्टेशनचें बटन दाबलें कीं तेथपर्यंतचा सर्व मार्ग नकाशावर विजेच्या साहाय्यानें प्रकाशित होतो. मीं 'ऑर्लिन्स' स्टेशन नकाशावर पाहिलें आणि तीस फ्रँकचें तिकिट काढून भुयारी रेल्वेंत बसलों. पॅरिसमध्यें स्थानिक रेल्वेला कोणत्या स्टेशनचें तिकिट किती असा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण पॅरिसच्या सर्व स्थानिक स्टेशनांना एकच म्हणजे ३० फ्रँक तिकिट असतें.

ऑर्लिन्स स्टेशनबाहेर पडलों, तेव्हां मन अगदीं प्रसन्न झालें. नुकताच पाऊस पडून गेलेला असल्यामुळें पॅरिस शहर ओलें झालेलें होतें.--पण स्नान केल्यामुळें आल्हाद वाटावा तसा आल्हाद वाटण्याइतपतच तें ओलें झालेलें होतें; कंटाळा येण्याइतकें चिकचिकीत झालेलें नव्हतें. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंचच उंच 'चेसनट'चीं झाडें होतीं. वाऱ्यानें त्यांचे शेंडे किंचित् हालत आणि कांहीं पानें गळून खालीं पडत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना विस्तीर्ण फूटपाथ होते. आणि त्यांवर पॅरिसचें वैशिष्ट्य दाखविणारीं खुलीं उपाहारगृहें होतीं. फूटपाथवरच टाकलेल्या खुर्च्यांवर कॉफीचे किंवा मद्याचे घुटके घेत बसावें आणि रस्त्यावरून जाणाऱ्या विशाल मानवी प्रवाहाचें निरीक्षण करीत खुशाल तासचे तास काढावेत, हें पॅरिसचें मोहक वैशिष्ट्य.

या भागांत राहण्याची हॉटेल्स इतकीं होतीं कीं, जवळजवळ प्रत्येक घर म्हणजेच हॉटेल होतें ! मी पहिल्याच हॉटेलांत चौकशी केली. हातांतील बॅग संभाळीत मी माझ्या समजुतीप्रमाणें मोठ्या ऐटबाजपणें फ्रेंचमधून विचारलें, "शॉम्ब्र ?" ('खोली आहे का ?') हॉटेलची व्यवस्थापिका हंसून म्हणाली, "नॉन् मेस्युअर. तूत् कॉम्प्ले." ('नाहीं महाशय, सर्व जागा भरल्या आहेत.') मी दुसऱ्या हॉटेलांत गेलों, तिसऱ्या गेलों... चांगला दोन तास हातांत बॅग घेऊन वीसपंचवीस हॉटेलांत मीं चौकशी केली. पण कुठेंहि जागा नव्हती. कांहीं हॉटेलांवर तर बाहेरच पाटी लावलेली असायची-- 'जागा

शिल्लक नाहीं ' ! दहा–साडेदहा वाजले, तेव्हां मला जागेच्या शोधार्थ भटकायचा कंटाळा आला. मनांत आलें, दिवसभर असेंच भटकावें लागलें, तर शहर पहायचें तरी केव्हां ? म्हणून मीं ठरवलें कीं, बॅग कोणत्या तरी स्टेशनच्या क्लोकरूममध्यें ठेवायची, दिवसभर शहरांत फिरायचें आणि संध्याकाळीं हॉटेल पहायचें. मी पुन्हां ऑर्लिन्सच्या भुयारी स्टेशनवर गेलों. जवळचें मोठें स्टेशन म्हणून ' गार लेस्त 'ची निवड केली. क्लोक–रूममध्यें बॅग ठेवतांना लक्षांत आलें कीं, निदान दाढीचें सामान तरी बरोबर हवेंच. म्हणजे पुन्हा सामानासाठीं आजच इकडे यायला नको. तेव्हां मीं दाढीचें सामान काढून खिशांत ठेवलें आणि क्लोक–रूममध्यें बॅग ठेवून सडा बाहेर पडलों.

प्रथम मी पॅरिसचें एक ' गाइड ' घेतलें. पॅरिसच्या मुक्कामांत शक्य तेवढें स्वतःच्या जबाबदारीवर पहायचें आणि अगदींच महत्त्वाचीं ठिकाणें चुकूं नयेत किंवा तीं शोधण्याकरितां फार वेळ लागूं नये म्हणून एखाद्या मोठ्या कंपनीतर्फे शहरांतर्गत ' सफर ' करावी, असें मी ठरविलें होतें. सुरुवातीला मात्र अमूक एका ठिकाणीं जायचें असा बेत न करतां दिसेल त्या ट्रॅम किंवा बस्‌मधून वाटेल त्यां दिशेनें जावें असें मला वाटलें. अनपेक्षिताचा आनंद कांहीं वेगळाच असतो. म्हणून मी ' गार एस्त ' स्टेशनसमोरच्या प्रशस्त चौकाबाहेरील हमरस्त्यावर गेलों आणि समोरून येणारी हिरवी बस् पकडली. लंडनप्रमाणें बस्‌ला कांहीं शिस्तबद्ध रांग नव्हती. आठदहा स्त्रीपुरुष बस्‌च्या स्टॉपजवळ घोळक्यानें उभे होते, आणि बस् थांबल्यावर ते पद्धतशीर बेशिस्तीनें आंत घुसले. त्यांच्या घोळक्यांतून मीहि आंत ढकलला गेलों खरा; पण जेव्हां कंडक्टरबाई माझ्याजवळ येऊन उभी राहिली, तेव्हां तिला कोणतें ठिकाण सांगावें असा प्रश्न माझ्यापुढें पडला. मग मला चटकन् आठवलें कीं, भुयारी गाड्यांप्रमाणें पॅरिसच्या बस्‌चाहि दर ' सब घोडे बारा टक्के ' असेल; म्हणून मीं चटकन् तीस फ्रँक्स काढून तिच्या हातावर ठेवले आणि तिनेंहि घाईघाईनें तीस फ्रँक्सचें तिकिट पंच करून माझ्याजवळ दिलें. थोडा वेळ उभे राहून आणि मग बसून मी पॅरिसच्या रस्त्यांवरून गर्दीतून वेगानें जात होतों. त्या वेळीं माझी अवस्था एखाद्या लहान मुलासारखी झाली होती. जत्रेतील वेगवान् अजस्र पाळण्यांत बसलेल्या मुलाच्या नजरेसमोरून अनेक दृश्यें भराभर जातात, त्याचें मन उल्हसित आणि तरीहि किंचित् भयभीत होतें. कोणतेंच दृश्य त्याच्या

मनावर ठसत नाहीं आणि तरीहि नवीं नवीं चित्रें त्याच्या मनःपटलावर दर क्षणाला उमटत असतात. बस्च्या त्या प्रवासांत सुंदर इमारती, मोहक महिला, भव्य वास्तु, मनोहर कारंजीं, स्वप्नसृष्टींतील बगीचे, अवाढव्य चौक, इत्यादींचें भांडार माझ्यापुढून जात होतें. अरबी कथेंतील अलीबाबानें गुहेचें दार उघडल्यावर त्याला समोर रत्नभांडार दिसलें, तें पाहून त्याला जें वाटलें असेल, त्याची मला कल्पना आली.

♥♥♥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों. दि: ......

# ३

# दहा देशांची धांवती सफर : ३

पॅरिस हें अद्‌भुत शहर आहे. तें स्वप्न-नगरीसारखेंच वाटतें. त्यांतील उंच उंच चेसनटचीं झाडें, सीन नदीचे धांवते फांटे, त्यांवरील गजबजलेले कित्येक पूल, सौंदर्यवती स्त्रिया, त्यांचे अत्याधुनिक पोषाख — किंवा पुरेशा पोषाखाचा अभाव, सुगंधानें भरलेले रस्ते, सर्वांच्या वागण्यांतील अनिर्बंधतेला स्पर्शणारा मनमोकळेपणा, सौंदर्यानें समृद्ध असलेल्या बगीचांत ठेवलेले शुभ्र, सौष्ठवपूर्ण पुतळे, मति गुंग करणारीं अवाढव्य स्मारकें आणि या विलासी, भव्य जगाला गवसणी घालणाऱ्या इतिहासाचा मनावर असलेला पगडा, इत्यादींमुळें पॅरिसमध्यें असण्याचा आनंद कांहीं वेगळाच असतो.

पॅरिसमध्यें पहिले दोनतीन तास मी कुरणांत सोडलेल्या कोंकरासारखा स्वच्छंद फिरलों. कुठेंहि बसमध्यें किंवा ट्रॅममध्यें चढावें, कुठेंहि उतरावें, कुठेंहि चालावें आणि कांहींहि पहावें, असा हा योजनाशून्य कार्यक्रम होता. खेड्यांतून मुंबईत प्रथमच आलेला गांवकरी जसा बावळटपणें 'आ' वासून इकडेतिकडे पहात हिंडतो, तसाच मीं हिंडलों. कारण जेथें आपल्याला कोणी ओळखीत नाहीं, तेथें बावळटपणा करण्याची लाज तरी कां धरावी?

परदेशांत गेल्यावर अपरिचित नांवांची एक विलक्षण मोहिनी पडते. 'लुव्हर', 'प्लास ब्लांझ', 'बुलेव्हार सेंट मायकेल', 'बुलेव्हार क्लिशि',

'जार्दिन द लक्झेंबर्ग', 'रु द ला पें', 'इतोली', 'गार द लेस्त' 'मॅडलीन' 'अॅव्हेन्यु बॉक्स', 'पॉई नफ', 'प्लास कॉकॉर्ड', 'अव्हेन्यु व्हिक्टर ह्यूगो', हीं आणि अशींच कर्णमधुर नांवें कानांवर पडत होतीं. प्रसन्न पहांटे पांखरांची किलबिल ऐकूं यावी, तशीं फ्रेंच स्त्री-पुरुषांचीं गोड आवाजांतलीं संभाषणें कानांजवळून भुरुभुरु उडून जात होतीं, कोपऱ्या-कोपऱ्यावर हिरव्या-तांबड्या पट्ट्यांच्या छत्र्या पसरलेले 'कॅफे' दिसत होते, आणि आपण एका नव्याच जगांत आलों आहोंत ही जाणीव क्षणाक्षणाला होत होती. अशा नव्या जगाचें खरें सुख कोणतें? नव्या जगाची नवलाई, कीं केवळ जुन्या जगाची विस्मृति? -— दोन्हीहि. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या जीवनांतील ही 'सिंद-बादची सफर'च होती. या सफरींत नवीं आकर्षणें पहायला, अनुभवायला मी उत्सुक होतों, तसाच अज्ञात धोक्यांपासून सावध रहायलाहि शिकत होतों.

दुपारचा एक वाजून गेला, तरी मी भटकतच होतों. पण आतां उदरंभरणाची कांहींतरी सोय केली पाहिजे, याची जाणीव होऊं लागली. पॅरिसमध्यें मला मोठमोठ्या हॉटेलांची भीतीच वाटायची. एक तर, अशा हॉटेलांत प्रवेश मिळविण्यासारखा माझा पोषाख होता कीं नाहीं याची मला शंकाच होती. लंडनला शिवून घेतलेला एक काळा 'इव्हिनिंग ड्रेस' माझ्या अंगावर होता; पण पॅरिसचे हे हॉटेलवाले म्हणजे भलतेच चोखंदळ असतात असा लौकिक मीं ऐकला होता. सकाळच्या जेवणाचा त्यांचा कांहीं खास पोषाख असेल आणि तो मीं पेहेरलेला नसल्यानें मला बाहेरचा रस्ता दाखविण्यांत येईल असें मला वाटूं लागलें. कदाचित् माझे कपडे ठीक असले तरी माझ्या कोटाची कॉलर एक वर्षापूर्वीच्या फॅशनची आहे म्हणूनहि मला प्रवेश नाकारण्यांत येईल! कुणी सांगावें? आणि दुसरें असें कीं, अशा बड्या हॉटेलांत भोजन करायची परवानगी मिळाली, तरी बिल आल्यावर त्या परवानगीविषयीं माझी मलाच खंत वाटूं नये, म्हणून मी एखादें सर्वसामान्य उपाहारगृह दिसतें कीं काय हें पाहूं लागलों. अखेरीस 'सेंट जर्मेन' हमरस्त्यावरील एका आड रस्त्याला एक आड-उपाहारगृह सांपडलें. त्यांत शिरण्यापूर्वींहि मी थोडा वेळ बाहेर उभा राहून आधीं आंतील गिऱ्हाइकांचा अंदाज घेतला. त्यांत मी खपून जाऊं शकेन अशी मनाची खात्री झाल्यावरच भीतभीत मी आंत शिरलों. एका वेट्रेसनें माझें हंसून स्वागत केलें आणि मला 'काय पाहिजे' असें विचारलें.

लंडनला फ्रेंच भाषेच्या वर्गात 'मला कांहींतरी खायला द्या' (दोनेम्वॉ मॉय केल्क शोज् पू मॉंजे,') हें वाक्य मीं किती तरी वेळां पाठ केलें असेल; पण ऐन वेळीं तें आठवेल तर शपथ! मीं मोठ्या धीरानें 'मेन्यु' मागितला. तिनें छापील मेन्यु दिला. पण त्यावरील एकहि नांव मला ओळखीचें वाटेना. फ्रेंचमधील चमत्कारिक नांवांनीं भरलेल्या त्या कार्डावरुन मला कसल्याहि नांवाचा बोध होईना. हे पदार्थ कशाचे असावेत याचा मी किंचित् विचार करीत आहें, तोंच माझ्या मनांत एक कल्पना शिरशिरली,—यांत बेडूक तर नाहींत? फ्रेंच लोकांना बेडूक आवडतात हें मला माहीत होतें. मार्सेलिसमध्यें (मार्सेय्) आणि पॅरिसमध्यें फिरतांना उपाहारगृहांच्या शोकेसिस्मध्यें आणि बाजारांत भलेमोठे बेडूक मांडून ठेवलेले मीं पाहिले होते. मोठे म्हणजे केवढे म्हणतां? चांगल्या माजलेल्या मांजराएवढे बेडूक! ती कल्पना मनांत आल्याबरोबर मला कसेंसेंच होऊं लागलें. मी त्या सुंदर परिचारिकेकडे पाहूं लागलों. अशी लावण्यवती तरुणी बेडूक खाते ही जाणीव मला चमत्कारिक वाटूं लागली. माझ्या मनांत काय चाललें आहे याची तिला किंचित्हि कल्पना नसावी. आपल्या सौंदर्याचें हा गृहस्थ रसग्रहण करीत असावा अशीच तिची भावना असावीसें दिसलें. आमच्याकडील तरुणींकडे रोखून पाहिल्यावर त्या (निदान लटका तरी) राग धरतात; पण पॅरिसमधील सुंदर तरुणीकडे रोखून पाहिल्यावर ती त्याचा 'कॉंप्लिमेंट' (प्रशंसा) म्हणून स्वीकार करते.

कार्डावरील कांहीं मला समजलें नाहीं. मी आजूबाजूला पाहूं लागलों. तेव्हां कॅशियरजवळच्या शोकेसमध्यें ठेवलेले निरनिराळे खाद्यपदार्थ मला दिसले. त्यांत भात, अंडें आणि टोमॅटो असलेला एक पदार्थ दिसल्याबरोबर मीं सहर्ष त्याच्याकडे बोट दाखवून अडखळत फ्रेंचमध्यें म्हटलें, "मला तें पाहिजे." जत्रेंत एखादी वस्तु मागणाऱ्या मुलाला समजावून ती देतात, तशा आविर्भावानें मला त्या तरुणीनें "वी मेस्युअर" म्हटलें. आणि मग पुन्हा मला बेडकाची आठवण होऊन मी तिला जवळजवळ ओरडूनच म्हणालों, "मॅदमॉयसेल, पा पा फ्रॉग—पा फ्रॉग!" ("मला बेडूक नको!") बेडूक याला फ्रेंच शब्द मला ऐन वेळीं आठवेना, तेव्हां मीं इंग्रजीच शब्द ठोकून दिला. माझी प्लेट समोर आल्यावरहि मीं प्रथम भात ढवळून पाहिला आणि त्यांत बेडकाची तंगडी किंवा इतर भाग नसल्याची खात्री करून घेतली. बशी—दीड बशी

भात, अर्धें अंडें आणि टॅमॅटोच्या दोन फोडी यांचें बिल सुमारें साडेसात रुपये झालें! वर पन्नास फ्रँकची 'टिप्' देऊन सुखरूप बाहेर पडलों, तेव्हां हायसें वाटलें.

रात्रीच्या अर्धवट झोंपेमुळें, दिवसभराच्या श्रमांमुळें आणि नुकतेंच जेवण झाल्यानें माझे डोळे जड होत होते. पण विश्रांति घ्यायला मला जागा कुठें होती? मी पुनः हॉटेलांच्या पाट्या शोधूं लागलों. तास-दीड तासांत पंधरा-वीस हॉटेलांत तरी विचारणा केली; पण छेः! जागा शिल्लक नाहीं. असाच मी फिरत मॅडलीन स्टेशनजवळ 'थॉमस कुक कंपनी'च्या कचेरीजवळ आलों, तेव्हां पॅरिसच्या सफरीच्या आकर्षक जाहिराती दिसल्या. तेव्हां ८०० फ्रँक देऊन मीं एक तिकिट घेतलें. सफर दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजतां सुरू होणार होती. फिरतांफिरतां नकळत इफेल टॉवरजवळ मी आलों आहे असें मला आढळून आलें. त्याच्याजवळच्याच बागेंत जाऊन जरा विश्रांति घेतली. पॅरिसमध्यें सार्वजनिक बागा इतक्या आहेत कीं निदान दिवसा तरी विश्रांति घेण्याची अडचण पडूं नये. त्याच वेळीं मीं खूणगांठ बांधली कीं, तेथून बगदाद-पर्यंतच्या प्रवासांत रात्रीं गाडीनें प्रवास करायचा, आणि जेथें उतरलों असूं, त्या गांवांतील सार्वजनिक उद्यानांत दिवसा विश्रांति घ्यायची, असा शक्य तों बिनखर्चाचा प्रवास करायचा. या योजनेमुळें पुढें युगोस्लाव्हियांत एकदां मीं किंचित् चमत्कारिक परिस्थितींत सांपडलों; पण तें नंतर सांगेन.

संध्याकाळीं सात वाजून गेले, तरी उतरायला हॉटेल मिळेना, हें पाहून मला चिंता वाटूं लागली. हा वेळपर्यंत भटकत भटकत मी एका रस्त्यावर आलों होतों. या रस्त्यावर एका जुनाट इमारतीवर हॉटेलची पाटी दिसली. तेथें प्रयत्न करून पहावा म्हणून मी आंत शिरलों. समोरच एक अतिशय जाड, गोरीपान स्पॅनिश स्त्री बसलेली होती. तिनें सांगितलें, "जागा हवी असेल तर नाहीं." इतक्यांत आंतून एक स्पॅनिश गृहस्थ तेथें आला आणि स्पॅनिश भाषेंत तिच्याशीं कांहीं बोलूं लागला. त्यानें मला थांबायला सांगितलें. नंतर ती बाई अशुद्ध इंग्रजींत मला म्हणाली, 'खोली आहे; पण मोठी — डबल खोली आहे." मीं म्हटलें, "पण मी तर एकटाच आहे. मला सिंगल खोली हवी." ती म्हणाली, "तुमच्या मैत्रिणीला आणा किंवा तुम्ही एकटे रहा. डबल खोलीच शिल्लक आहे. साडेसहाशें फ्रँक्स." मीं पैसे काढले तेव्हां ती म्हणाली,

" तुमचा पासपोर्ट दाखवा. " तिनें माझा पासपोर्ट पाहिला. त्यावरील नांवगांव, पासपोर्ट-नंबर वगैरे आपल्या रजिस्टरमध्यें टिपून घेतलें. मग मला त्या गृहस्थानें माझी खोली दाखविली. ही खोली पहिल्या मजल्यावरची. जुनाट पण प्रशस्त होती. तींत मध्यभागीं एक भला मोठा पलंग होता. बाजूला लहानसें टेबल आणि आरसा होता. एका कोपऱ्यांत एक मोरी होती. मीं "ठीक आहे" म्हटलें. त्यानें विचारलें, " तुमचें सामान कुठें आहे ? " मीं सांगितलें, " सामान ? छेः ! माझ्याकडे कांहीं सामान नाहीं. " त्यावर तो कांहीं बोलला नाहीं; पण विचित्र नजरेनें माझ्याकडे पहात तो तिथून निघून गेला. डबल खोली घेणारा, बरोबर मुलगी आणि सामान न आणणारा, हा कोण चमत्कारिक गृहस्थ आहे, अशी त्याची भावना मला त्याच्या नजरेंत स्पष्ट उमगली.

त्या वेळीं रात्रीचा आठाचा सुमार झाला होता. ही नुसती रहायची जागा होती; जेवण, चहा वगैरेची व्यवस्था त्या हॉटेलांत नव्हती. बाहेर जाऊन जेवण करावें, पॅरिसचा एखादा तमाशा किंवा नाइट-क्लब पहावा, म्हणून मी बाहेर पडलों. पांच मिनिटें चाललों तर काय ! जगप्रसिद्ध ' मूलांरूज ' हा नाइट–क्लब माझ्या हॉटेलच्या अगदीं जवळच आहे, असें मला आढळून आलें. आपण कोठें आलों आहोंत हें मीं पाहिलें, तों मी ' प्लास पिगॅल ' चौकांत उभा आहे असें मला आढळून आलें. हा पिगॅल चौक म्हणजे जगांतील रसिकतेचा, मौजेचा, ख्यालीखुशालीचा आणि ' नग्न करमणुकी 'चा अड्डाच. या भागांत रात्रीच खरा दिवस सुरू होतो. रात्रीं निरनिराळे नाइट–क्लब, बार, आणि उपहारगृहें यांचा एवढा झगझगाट येथें असतो कीं, ही रात्र कीं दिवस असा भ्रम पडावा. ' पिगॅल ', ' मूलां रूज ', ' स्फिंक्स ', ' ब्ल्यू ', 'नार्सिस', ' लिडो ', ' नॅचरिस्ट ' इत्यादि कित्येक रात्रीचे क्लब आणि तमाशे या भागांत आहेत.

रात्रींच्या क्लबांत जायचें, तर पहांटेपर्यंत जागायची तयारी हवी. पण त्या रात्रीं तर मी इतका थकलों होतों कीं, रात्रभर जागण्यानें मला खूपच त्रास झाला असता. म्हणून क्लबाऐवजीं तमाशालाच जावें, म्हणजे बारा–एकपर्यंत परत येतां येईल, अशा विचारानें तमाशाचें चांगलें थिएटर कोणतें आहे हें पहाण्यासाठीं एका गोल स्तंभावर चिकटवलेल्या रंगीबेरंगी जाहिराती मी वाचूं लागलों. तोंच—

" माफ करा महाराज, सिगरेट पेटवायला आपल्याकडे काड्यांची पेटी आहे का ? " असे कुणाचे तरी इंग्रजी भाषेंतले शब्द माझ्या अगदीं जवळ ऐकूं आले आणि माझ्या हातालाहि लहानसा हिसका बसला.

मीं चमकून मागें वळून पाहिलें, तों पंचविशीच्या सुमाराची एक लावण्यवती स्त्री माझ्याशीं बोलते आहे असें मला दिसलें. तिच्या तोंडांत न पेटविलेली सिगरेट होती आणि काड्यांच्या पेटीसाठीं तिनें माझ्यापुढें हात केलेला होता. ती वेश्या आहे, हें मीं ओळखलें. पण पॅरिसच्या त्या भागांत आणि आपण होऊन ओळख काढणारी म्हणूनच मी तिला ओळखूं शकलों; इतरत्र ती एक सुंदर, शालीन गृहिणीच वाटली असती.

मी बावरून खिसे चांचपूं लागलों. दुर्दैव असें कीं, त्या वेळीं माझ्या खिशांत सिगरेटचें पाकीट सांपडलें, पण काड्याची पेटी मात्र नव्हती. मीं दिलगिरीपूर्वक इंग्रजींतूनच म्हटलें, " माफ करा, माझ्याकडे काड्यांची पेटी नाहीं; पण माझी सिगरेट घ्या तुम्ही. "

तिनें पटकन् आपली वीतभर लांबीची पर्स उघडली. ओठांतील सिगरेट पर्समध्यें टाकली आणि माझ्या पाकिटांतील सिगरेट घेऊन आपल्या ओठांत धरली. ' कंपनी ' म्हणून मीहि एक सिगरेट घेतली. पण पेटवायची कशानें ? माझी गोंधळलेली स्थिति तिच्या लक्षांत आली. तिनें चटकन् आपल्या पर्समधून सिगरेट–लायटर बाहेर काढला आणि हंसून तिनें माझी आणि आपली सिगरेट पेटविली. म्हणजे काय गंमत आहे पहा ! हिच्याजवळ लायटर आहे आणि हीच माझ्याकडे काड्यांची पेटी मागते आहे ! अर्थात् हें केवळ ओळख काढायचें निमित्त आहे आणि तिचें खरें काम पुढेंच आहे हें मीं ओळखलें. पण मीं विचार केला कीं, जरा गप्पा मारायला आपलें तरी काय जातें ? ती लडिवाळपणानें म्हणाली, " तूं माझा मित्र आहेस. माझ्याबरोबर येतोस का ? "

" कुठें ? " मीं बावळटपणें विचारलें. पण लगेच माझ्या लक्षांत आलें कीं, लंडन–पॅरिससारख्या शहरांत वेश्या रस्त्यावर ओळख काढून गिऱ्हाईक पटवितात आणि मग त्याला खोलीवर घेऊन जातात.

" तूं मला आवडतोस; माझ्या खोलीवर चल. " ती म्हणाली. एवढ्या वेळांत तिनें माझा हातहि आपल्या हातांत घेतला होता. तो हळूंच सोडवून




म्युनिक येथील ' ऑक्टोबर-फेस्ट ' या महोत्सवांत बीअरचीं पिंपें शृंगारलेल्या गाडींतून आणलीं जात आहेत !



साल्झबुर्ग शहराचें विहंगम दृश्य

घेत मीं म्हटलें, " छेः छेः ! मला भीति वाटते ! "

आतां मात्र ती मनापासून हंसली;— धंदेवाईकपणें नव्हे. ती म्हणाली, " भीति ? माझी भीति वाटते तुला ? मी तुझं काय वाईट करणार आहे ? फक्त पांच हजार फ्रँक पडतील. माझ्यावर विश्वास नाहीं ? "— याला समाधानकारक उत्तर माझ्यापाशीं नव्हतें. पण पॅरिसमध्यें रात्रीं-अपरात्रीं प्रमुख रस्ते सोडून कोणत्याहि कारणासाठीं आजूबाजूला कोणाबरोबर जाणें धोक्याचें असतें, हें मीं वाचलें होतें. तेव्हां मी इतर कुणाबरोबर गेलों नसतोंच आणि अशा बाईचें निमंत्रण स्वीकारणें हें तर अशक्यच होतें. तरी पण एवींतेवीं आपण सिगरेट दिली आहे, जरा गप्पा तरी माराव्यात म्हणून मीं तिला विचारलें, " तुझ्या गळ्यांतलें हें लॉकेट फार सुंदर आणि किंमती आहे. तूं खूप पैसे मिळवीत असशील ! "

" पैसे ? छेः ! माझ्या मुलांच्यासाठीं मी हें करतें. तशी मी फार धार्मिक आहें. " असें म्हणून ती झटकन् म्हणाली, "बरं आहे, थँक यू. गुड नाईट." तिनें ओळखलें कीं, हें गिऱ्हाईक कांहीं उपयोगाला येणारें नाहीं, आणि अशा धंद्याच्या ' टायमा 'ला शिळोप्याच्या गप्पा मारायला तिला वेळ नव्हता हें उघड होतें. तेव्हां ' ताकासाठीं सुरू केलेलें रामायण ' तिनें आवरतें घेतलें आणि ती नव्या ' मित्रा 'च्या शोधार्थ निघून गेली.

मीं ' कसिनो द पारी ' या थिएटरचा पत्ता काढला. तमाशाचें हें थिएटर पांचसहा मिनिटांच्याच रस्त्यावर होतें. पण तेवढ्यांत पांचसहा तरी स्त्रियांनीं मला ' गुड इव्हिनिंग ' अथवा ' बोस्वां ' म्हणून अभिवादन केलें, आणि आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह केला. पण अशा स्वागताचें रहस्य मला कळलेलें असल्यानें, " नो, थँक यू " म्हणून मीं त्यांची संभावना केली. ' कसिनो द पारी ' ( पॅरिसचें तमाशागृह ) मधील तमाशा पाहिला आणि रात्रीं एकच्या सुमारास मी घरीं परत आलों.

पॅरिसच्या तमाशांना ' रेव्ह्यू ' म्हणतात. तमाशे दाखविणाऱ्या थिएटरांना ' व्हरायटी थिएटर्स ' असें म्हणतात. ' फॉलीज बर्जर ', ' मेयॉल ', ' कसिनो द पारी ' अशीं अनेक तमाशागृहें पॅरिसच्या रात्रींच्या जीवनाला खरा रंग आणतात. या तमाशांत कांहीं अर्धनग्न आणि नग्न स्त्रियांचे नाच, संगीत, विनोदी दृश्यें, भव्य सीनसीनरी, वगैरेंचा सुमारें तीन–साडेतीन तासांचा

कार्यक्रम असतो. नाइट–क्लबप्रमाणेंच तमाशांतूनहि जवळजवळ नग्नतेचें प्रदर्शन करायला फ्रान्सच्या कायद्यानें मुभा आहे. या तमाशांचें वर्णन पुढें अन्यत्र करणारच आहे.

रात्रीं मी घरीं परतत असतांनाहि 'तूं माझा मित्र आहेस, तूं माझ्याबरोबर ये' म्हणणाऱ्या स्त्रियांचा पिच्छा पाठीशीं लडिवाळ हट्ट चाललाच होता. माझ्या मनांत आलें, कुणाहि परक्या इसमाला वाटावें, अबब! पॅरिसमध्यें आपल्या किती मैत्रिणी ह्या! पॅरिसमध्यें कोणीहि फार काळ एकटें राहूं शकत नाहीं अशी ख्याति आहे, तिचें रहस्य अशा प्रकारें लौकरच कळून येतें.

पॅरिसच्या या भागांत कांहीं पानगृहें आणि उपाहारगृहें रात्रभर उघडीं असतात. अशाच एका ठिकाणीं थोडी कॉफी घेतली आणि रात्रीं दीडच्या सुमाराला मी आपल्या हॉटेलांत पोहोंचलों. पुढचें दार उघडेंच होतें; पण कुणाची कुठें चाहूल दिसली नाहीं. मी माझ्या खोलीकडे गेलों. मला खोलीची किल्ली देण्यांत आली नव्हती आणि तिची आवश्यकता नाहीं असें सांगण्यांत आलें होतें. ती जुनाट इमारत, अंधारे जिने, विचित्र निःशब्दता यांनीं मला एकाएकीं भयाण वाटूं लागलें. तसाच चांचपडत खोलींत शिरलों. अंदाजानें दिव्याचें बटन दाबलें, आणि दार लावून कडी लावूं लागलों. तों काय?— दाराला कडीच नव्हती! मीं एकदम चरकलों. आधींच हें जुन्या बगदाद शहरांतील भयंकर खाणावळीसारखें धोक्याचें हॉटेल आणि त्यांत दाराला कडीहि घालतां येत नाहीं. रात्रीं कुणी खोलींत शिरून पासपोर्ट, पैसे, तिकिट वगैरे नेलें तर काय करणार? एकीकडे अशा धोक्याच्या जागीं झोंपायला मन कचरत होतें, तर दुसरीकडे आदल्या रात्रींच्या जागरणानें आणि दिवस-भराच्या श्रमानें शरीर कमालीचें थकलें होतें. अखेर मीं ठरविलें कीं 'अंथरुणावर पडून फक्त विश्रांती घ्यायची, पण झोंप येऊं द्यायची नाहीं. असेंच डोळे उघडे ठेवून सकाळपर्यंत पडायचें आणि हवें तर मग दिवसभर झोंपायचें. असें ठरवून मीं पैसे, पासपोर्ट वगैरे उशाखालीं ठेवले आणि गादीवर आडवा झालों.

मी जागा झालों, तेव्हां ऊन चांगलें वर आलेलें होतें. ट्रॅमचा खडखड होत होता; मोटारींची वाहतूक स्पष्टपणें ऐकूं येत होती; रस्त्यावरचा गोंगाट मला गोंधळून टाकीत होता. आपण कुठें आहोंत हेंच प्रथम माझ्या लक्षांत येईना.

आणि पॅरिसमध्यें उघड्या दारांच्या एका भयानक हॉटेलांत आपण खुशाल झोंपलों होतों हें लक्षांत येतांच मी धडपडून एकदम उठलों. उशाखालीं हात घातला. सगळे जिन्नस जेथल्या तेथें आहेत हें पाहून मीं सुटकेचा निःश्वास टाकला. घड्याळांत पाहिलें, तों पावणेअकरा वाजले होते! म्हणजे डोळे सताड उघडे ठेवून सकाळपर्यंत जागें रहायचा माझा निश्चय कुठल्याकुठें लुप्त झाला होता. मनाचा निश्चय आणि शरीराची गरज यांत मनानें हार खाल्ली होती, आणि कुठल्याहि धोक्याबद्दल चिंता न करतां मी त्या बकाली हॉटेलांत नऊ तास खुशाल झोंपलों होतों!

पुन्हा या हॉटेलांत पाऊल टाकायचें नाहीं, अशा विचारानें उठलों. दाढीचें सामान काढलें आणि दाढी केली. पॅरिसमधल्या या सबंध मुक्कामांत मी हें सामान सतत खिशांत बाळगूनच होतों. माझें मलाच याचें केव्हांकेव्हां हंसू यायचें. पण त्याशिवाय गत्यंतर नव्हतें. माझी खोली सोडून खालीं आल्यावर चहा घेतला आणि मग मला एकदम आठवलें कीं, आदल्या दिवशीं मीं 'थॉमस कुक अँड कंपनी'चें सकाळीं दहाच्या सफरीचें तिकिट घेतलेलें आहे; पण आतां तर अकरा वाजून गेले आहेत! तसाच लगबगीनें मी 'मॉंतमात्र' या स्टेशनवरून 'मेट्रो'नें (जमिनीखालची आगगाडी) मॅडलीन स्टेशनवर गेलों. तेथें या प्रवास–संस्थेतील व्यवस्थापकानें सांगितलें कीं, सकाळच्या सफरीचें तिकिट दुपारच्या सफरीला चालेल. मॅडलीन या सुप्रसिद्ध इमारतीजवळील 'रू रॉयल' या रस्त्याला छेदून जाणारा 'बुलेव्हार द ला मॅडलिन' हा रस्ता भारतीयांच्या विशेष स्मरणांत राहील. कारण, या रस्त्यावर 'सारीज् (फ्रान्स) लिमिटेड' नांवाचें साड्यांचें मोठें दुकान आहे. पॅरिसमध्यें साड्या किती खपत असतील, कोण जाणे! पण त्यांच्या भारी किंमती पाहून मात्र मला आश्चर्य वाटलें. भारतांत ज्या साड्यांना ४० ते ७५ रुपये पडावेत, त्यांच्या किंमती पॅरिसमध्यें २०० रुपयांपासून ४०० रुपयांपर्यंत होत्या. याच रस्त्यावरून पुढें गेलें म्हणजे 'ऑपेरा' ही जगप्रसिद्ध इमारत लागते. पाश्चिमात्य संगीतकलेचें हें सर्वांत मोठें केंद्र आहे. ही इमारतहि अत्यंत कलापूर्ण आहे. मला नेपोलियनचें थडगें पहायचें होतें, म्हणून मी गाइडमध्यें शोधूं लागलों. नेपोलियनचें थडगें 'हॉटेल द इन्व्हॅलिड्स्'मध्यें आहे. त्याजवळच नेपोलियनच्या वस्तूंचें संग्रहालयहि आहे. हें थडगें व त्या वस्तू पाहून भव्यतेचा

साक्षात्कार झाल्यावांचून रहात नाहीं. या ठिकाणानजीक 'प्लास द ला कॉंकॉर्ड हा इतिहासप्रसिद्ध चौक आहे. फ्रान्सच्या विलासी राणीला आणि भोळ्या राजाला जेथें फांसावर लटकावलें, तो हा भव्य–उदास चौक. तेथून 'शॉप–एलेसी' या जगांतील सर्वांत सुंदर रस्त्यानें सरळ गेलें कीं, 'प्लास द ला इटोली' हा चौक' आणि 'आर्क द ट्रायंफ' ही कमान लागते. अशीं अनेक प्रसिद्ध स्थळें पाहून मीं दुपारपर्यंत वेळ काढला आणि थॉमस कुकच्या सफरींत दाखल झालों.

या सफरीची मोटार मोठी अलीशान होती. पंचवीस–तीस परकीय–बहुतेक इंग्लिश आणि अमेरिकन–तींत बसलेले होते. या पथकाची व्यवस्थापिका एक फ्रेंच तरुणी होती. ती अस्खलित इंग्लिश बोलत होती. कारण 'अशा सफरींना बहुधा इंग्रजी जाणणारेच जातात. तिला फ्रेंच, जर्मन, डच आणि इटालियन या भाषाहि चांगल्या अवगत होत्या. तिनें आम्हांला मोटारींतून 'लुव्हर' (जगप्रसिद्ध म्युझियम), नॉन देमचें चर्च, स्टॉक एक्स्चेंज, कोर्ट, बाजार, बॅस्टील चौक, इफेल टॉवर, रु द पें ला इत्यादि प्रसिद्ध स्थळांना नेलें, आणि त्या ठिकाणीं उतरून माहिती सांगितली. ही सफर उद्बोधक असली, तरी तींत धांवपळ फार. 'लुव्हर' सारखें जगांतील उत्तमोत्तम चित्रांचें संग्रहालय पहायला दोन दिवस पुरले नसते, तें स्थळ तिनें पंधरा मिनिटांत उरकलें. कोर्ट अथवा बाजार अशा मोठ्या ठिकाणीं गेल्यावर पथकांतील लोक अनवधानानें इकडेतिकडे पांगत आणि पुन्हां मोटारींत सर्वांना भरतांना त्या व्यवस्थापिकेला पुरेवाट होऊन जाई.–लहान मुलांच्या सहलीच्या वेळीं मास्तरांना होते तशी!

संध्याकाळीं ही धांवती सफर संपल्यावर मी रहाण्यासाठीं हॉटेल पहाण्याच्या शोधार्थ लागलों नाहीं. कारण, ती रात्र नाइट–क्लबांतच काढायचें मीं ठरविलें होतें. हे क्लब पहांटे चारपांच वाजेपर्यंत चाललेले असतात. त्यामुळें रात्रीं मुक्कामासाठीं हॉटेल शोधण्याची मला घाई नव्हती. मात्र अगदीं हलक्या नाइट-क्लबापासून प्रथम दर्जाच्या नाइट–क्लबापर्यंतचे सर्व नमुने दोनतीन रात्रींत पहायचे असें मीं ठरवलें होतें. म्हणून 'जीन द काया' नांवाच्या क्लबांत मी रात्रीं नऊच्या सुमाराला गेलों. आंत कोणत्या मुली नग्न होऊन नृत्य करणार आहेत, त्यांचे फोटो बाहेरील शो–केसिस्मध्यें ठेवलेले होते. शंभर फ्रँक प्रवेश-फी देऊन मी क्लबमध्यें म्हणजे तळघरांत गेलों. या क्लबाच्या

जागेचा आकार रेल्वेच्या डब्यासारखा होता. वीसपंचवीस लोकांना बसण्याची जागा होती. कडेला लहानसें स्टेज होतें. त्यावर मुली येत आणि बँडच्या तालावर एक-एक कपडा काढीत जवळजवळ नग्न होत. कंबरेखालीं तळहाता-एवढा कापडाचा तुकडा ठेवला, कीं बाकी सर्व अंगाची नग्नता फ्रान्सच्या कायद्यांत बसूं शकते. या खेळांना 'स्ट्रिप टीज्' म्हणतात. क्लबांत चार तरुणी होत्या. त्या स्टेजवर क्रमाक्रमानें येऊन हा कार्यक्रम करीत. आपल्याकडील तमाशांत सोंगाड्या असतो, तसें एक विनोदी पात्र अधूनमधून येऊन विनोदी कार्यक्रम करीत असे. रात्रीं बाराच्या सुमाराला मला त्या मुली आणि तेच ते कार्यक्रम पाहून कंटाळा आला; म्हणून मी दुसऱ्या क्लबांत गेलों. त्या वेळीं मला आढळून आलें कीं, बहुतेक क्लबांच्या जाहिराती फसव्या असतात. जाहिरातींत 'रात्रीं नऊपासून पहांटेपर्यंत' असें लिहिलेलें असलें तरी बारा-साडेबाराच्या सुमाराला सर्वांना सांगण्यांत येतें कीं, पहिली 'सभा' (सेशन) संपली; आतां एक वाजतां दुसरी सुरू होईल. या सुमाराला शहरांतील तमाशे संपलेले असतात आणि तमाशे पाहून आलेले रसिक अधिकच उल्हसित होऊन नाइट-क्लबची मौज पहायला येतात, त्यामुळें एकाच रात्रींत दुहेरी फायदा घेण्याची शक्कल नाइट-क्लबांचे चालक काढतात.

'नार्सिस' या दुसऱ्या क्लबांत मी गेलों. तो पहिल्या दर्जाचा, प्रशस्त आणि अद्ययावत् होता. त्यांत अप्रतिम लावण्य असलेल्या तीस-चाळीस तरुणी होत्या. त्या नग्न होत असतांना पाहून वाटतें कीं स्वप्न तर नव्हें ? अगदीं रेखीव चित्रासारखीं त्यांचीं मादक शरीरें अणि त्याहून मादक अंगविक्षेप पाहून आपण कोणत्या तरी अद्भुत, स्वर्गीय वातावरणांत आहोंत, असा भास होतो. डोळ्यांसमोर तें सारें घडत असतांनाहि हें सत्य आहे यावर विश्वास बसणें कठिण वाटूं लागतें, इतकें तें दृश्य कल्पनेला मागें टाकणारें वाटतें. पण या मुली नृत्य झाल्यावर प्रेक्षकांच्याजवळ बसून मद्य घेतात, तेव्हां थोडा थोडा विश्वास बसूं लागतो. पहांटेचे पांच वाजले असतील. मी नाइट-क्लबांतून बाहेर पडलों. गार वारा अंगाला झोंबत होता. चेसनटचीं उंच उंच झाडें वाऱ्याच्या वेगानें कलत होतीं. कॉफी घेण्यासाठीं म्हणून मी एका कॅफेकडे वळणार, तोंच एक तरुणी मला म्हणाली, "गुड मॉर्निंग सर ! तुम्ही कोणत्या देशाचे ?" संशयित नजरेनें तिच्याकडे पहात म्हटलें, "हिंदुस्थानचा." ती आनंदून

म्हणाली, " खरंच ? मला हिंदुस्थान फार आवडतो. सलाम आलेकुम. तुम्ही माझे मित्र आहांत. मी फक्त तीन हजार फ्रँकला तुमच्याबरोबर येईन. " माझा संशय खरा ठरला होता. मीं हंसून नकार दिला आणि कॉफी घेऊं लागलों. त्या कॅफेमध्यें मीं अर्धा तास काढला आणि ' मेट्रो ' च्या ( भूमिगत रेल्वेच्या ) स्टेशनावर जाऊन ती सुरू होण्याची वाट पहात बसलों. माझ्यापुढेंच एक तरुणी फ्रेंच वर्तमानपत्र वाचीत बसलेली दिसली. मघाशीं नाइट–क्लबमध्यें सर्वांच्या पुढें नग्न होणारी ती हीच सुंदरी हें मीं ओळखलें. मघाशीं ती माझ्याशीं चांगली बोलली – बसली होती; पण आतां ती ओळख दाखवायला तयार असेल तर शपथ !

असेच आणखी चार दिवस मीं पॅरिसमध्यें काढले. दिवसा प्रेक्षणीय स्थळें पहायचीं आणि रात्रीं नाइट–क्लबमध्यें किंवा तमाशांच्या थिएटरांत काढायचे. झोंप अगदींच अनावर झाली, तर हॉटेलांत जागा घ्यायची. आतां कुठल्या हॉटेलांत जागा मिळूं शकेल याचा मला अंदाज लागला होता. बुलेव्हार बार्बेस रस्त्यावर सुप्रसिद्ध सॅक्र–स्यूर चर्चसमोरच्या हॉटेलमध्यें मी एक दिवस राहिलों होतों. तेथें खोली झाडणारी फ्रेंच तरुणी आली, तेव्हां डबल रूममध्यें मी एकटाच आहे असें पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें. ती म्हणाली, " तुझी मैत्रीण ( गर्ल फ्रेंड ) केव्हां येणार आहे ? " मीं सांगितलें, " तसें कोणी येणार नाहीं. " तेव्हां तिनें सरळ सुचविलें, " मग तूं हॉटेलच्या व्यवस्थापकाला कां सांगत नाहींस ? तो तुला एखाद्या मुलीची ओळख करून देईल. " पॅरिसमध्यें अनेक आड–व्यवहार चालतात हें खरें. पण ती मुलगी हें इतक्या सहजतेनें सांगत होती कीं, ही अगदीं दैनंदिन घडणारी, सरावाची गोष्ट आहे, अशी खात्री व्हावी.

एक दिवस सकाळीं उठून मी व्हर्सायला गेलों. व्हर्सायची बाग ही जगांतली सर्वांत सौंदर्यपूर्ण बाग आहे असें मीं ऐकलें होतें आणि तेथें प्रत्यक्ष गेल्यावर तर उत्तमोत्तम वनश्री पाहून डोळ्यांचें पारणें फिटलें ! अगदीं पॅरिसच्याच आठ-वर्णांच्या भाषेंत सांगायचें तर, स्वतः रूप–उन्मत्त वनश्रीच संपूर्णपणें अनावृत्त होऊन धरणीवर खुशाल पहुडली आहे, असें वाटावें ! मानव आणि निसर्ग यांचें असें कांहीं अद्‌भुत सहकार्य व्हर्सायच्या उद्यानांत दिसतें कीं, ही दोघांचीहि सर्वश्रेष्ठ कलाकृति होय, असा विश्वास वाटतो. साहित्य, संगीत,

स्त्रीचें लावण्य इत्यादींचा सर्वोच्च आविष्कार पाहिल्यावर मनाला जी भव्यता येते तिची प्रचीति या ठिकाणीं आल्यावांचून रहात नाहीं. पण मानवानें रेखीव आंखणीच्या कोंदणांत बसविलेलें अतुलनीय सृष्टिसौंदर्य एवढेंच कांहीं व्हर्सायचें वैशिष्ट्य नाहीं; जागतिक महत्त्वाचे अनेक करार येथें झाले आणि या स्थळानें जगावर आपली छाया टाकली. कित्येक देखण्या कलाकृतींचा संग्रह अद्याप तेथील वाड्यांत आहे.

व्हर्सायहून मी दुपारीं परतलों. त्या दिवशीं मी हॉटेलांत राहिलों नव्हतों, त्यामुळें विश्रांतीसाठीं मला सीन नदीच्या कांठच्या एका सार्वजनिक बांकाचा आश्रय घ्यावा लागला. त्या पेंगुळलेल्या दुपारीं कांहीं षौकिन लोक नदींत गळ टाकून पेंगत होते. लोकांची तुरळक वहातूक जाणवत होती. अधूनमधून एखादी लहान बोट नदींतुन जाई. अशा उघड्या हवेंत मी तास दीड तास झोंप घेतली आणि मग उठून संध्याकाळचे कार्यक्रम सुरू होण्याची वाट पाहूं लागलों. ती सारी रात्र मीं एका मोठ्या नाइट-क्लबांत घालविली. पहांटे रेल्वेच्या स्टेशनवर गेलों. तेथें क्लोकरूममध्यें ठेवलेली माझी बॅग घेतली आणि मेट्रोनें 'गार दु नॉर्द' स्टेशनावर गेलों. त्या वेळीं पावसाची झिमझिम सुरू होती. त्या ओलसर मोहक नगरीचा मोह सोडवत नव्हता; पण 'खिशाचा सल्ला' घेणें आवश्यक असल्यानें आतां आणखी कांहीं काळ पॅरिसमध्यें मुक्काम केला, तर हिंदुस्थान-पर्यंत पोंचण्याची खात्री नाहीं, हें मला कळून चुकलें होतें. माझ्याकडचे फ्रेंच पैसे संपले होते आणि नवे बदलून घ्यायचे, तर एकदम पांच पौंडांचा ट्रॅव्हलर्स चेक मोडायला हवा होता. खिशांत दोनचार किरकोळ फ्रेंच नाणीं होतीं; पण तेवढ्यांत चहाहि आला नसता. पॅरिसमध्यें मद्य घेऊं शकलों असतों, पण सकाळींच उठून तें घेण्यांत मौज नव्हती.

पॅरिसहून मी जर्मनीला ज़ाणार होतों; पण त्यासाठीं आधीं ब्रुसेल्सला जावें लागलें. सकाळीं आठच्या सुमाराला निघालेली आमची गाडी एकच्या सुमारास ब्रुसेल्सला आली. जर्मनीला जाणारी गाडी संध्याकाळीं सहा वाजतां सुटून सकाळीं सहा वाजतां म्युनिकला पोचणार होती. त्यामुळें मला चारपांच तासांचा वेळ होता. या फुरसतीच्या वेळांत शहरांत एक चक्कर टाकली. ब्रुसेल्सचें आणखी एक वैशिष्ट्य लक्षांत आलें. तें असें कीं, या शहरांत पोस्टाच्या तिकिटांचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चलतो. हें शहर अगदीं मोक्याच्या

जागीं आहे आणि तेथून अनेक युरोपीय देशांना रस्ते फुटतात. त्यामुळें कित्येक देशांचीं तिकिटें येथें येतात; तशाच प्रवाशांच्या मागाण्याहि येतात. 'फिलॅटे-लिस्ट ' अशा पाट्या असलेलीं शेंकडों दुकानें ब्रुसेल्समध्यें आहेत.

संध्याकाळीं सहाच्या सुमाराला मी जर्मनीस जाणाऱ्या गाडींत बसलों. माझ्या डब्यांत एक ऑस्ट्रियन तरुण, दोन जर्मन तरुणी आणि दोन जर्मन धर्मोपदेशिका (नन्स ) होत्या. त्या जर्मन तरुणींचें वय फार तर पंधरासोळा वर्षांचें असावें. त्यांना अगदीं मोजकेच इंग्रजी शब्द येत होते. दोन्ही ' नन्स ' मात्र चांगलें इंग्रजी बोलत होत्या. त्यांनीं सांगितलें कीं, एका जर्मन मठांत ( 'मोनॅस्ट्री' मध्यें ) धार्मिक शिक्षण घेण्यासाठीं या तरुणी जात आहेत. त्या निरागस, गोड जर्मन मुली अजून माझ्या नजरेसमोर उभ्या रहातात. खरोखर या कोंवळ्या मुलींचा धर्माकडे असलेला ओढा विचारपूर्वक असेल का ? ही विरक्ति किती काळ टिकेल ? प्रेम, संसार, मुलेंबाळें यांकडे पाठ फिरवून या किती दिवस आध्या-त्मिक वातावरणांत घालवूं शकतील ? असे प्रश्न माझ्यापुढें पडले. पण पुन्हा वाटलें, कुणी सांगावें ? प्रत्येक व्यक्ति शरीरसुखासाठीं आसुसलेली असते अशी तरी कल्पना कां करून घ्यावी ? अगदीं वृद्धावस्थेंतहि अति रंगेलपणें वागणारे लोक आढळतात, त्याप्रमाणेंच यौवनांतहि विरक्त होणाऱ्या तरुणी कां असूं नयेत ?

अशा विचारांतच मला झोंप लागली. पहांटे पांचच्या सुमाराला मी जागा झालों असेन. थंड वातावरणांतून गाडी चालली होती. मीं अगदीं गारठून जात होतों. माझ्याकडे अंथरुण-पांघरुण कांहीं नव्हतें. मीं माझा गरम, जाड ओव्हर-कोट काढला. त्या वेळींच माझ्या लक्षांत आलें कीं, त्या धर्मोपदेशिका आणि संन्यासाश्रम घेणाऱ्या तरुणी मध्येंच कुठल्यातरी स्टेशनवर उतरून गेल्या होत्या. खिडकींतून बाहेर पहायचा मीं प्रयत्न केला; पण धुकें इतकें दाट होतें कीं, जर्मनी पहाण्यास उत्सुक असलेलें माझें मन आवरणें मला भाग पडलें. समोरच्या बांकावर तो ऑस्ट्रियन तरुण शांतपणें झोंपला होता.

जर्मनींतील ' म्युनिक ' गांव मीं मुक्कामासाठीं निवडलें होतें तें कांहीं हेतूनें. महाराष्ट्रांतील एका श्रीमान् कार्यकर्त्यांचे एकुलते एक चिरंजीव शिक्षणासाठीं म्हणून सहा वर्षांपूर्वी जर्मनीला गेले होते, ते परत येण्याचें चिन्ह दिसत नव्हतें. म्हणून त्यांनीं मला सांगितलें होतें कीं, आपला मुलगा म्युनिकमध्यें

काय करतो आणि तो परत केव्हां येणार आहे याची चौकशी मीं करावी. म्हणून सकाळच्या वेळीं मी म्युनिकला उतरल्याबरोबर क्लोकरूममध्यें सामान ठेवून प्रथम म्युनिकच्या नकाशाकडे पाहूं लागलों. म्युनिक हें गेल्या महायुद्धांत उध्वस्त झालेलें शहर असलें, तरी पुन्हा द्रुतगतीनें आणि नव्या जोमानें उभारलेलें शहर आहे. सुमारें दहा लक्ष वस्तीचें हें अद्ययावत् शहर साहित्य, विद्या, कला, यंत्र–उत्पादन, कापड आणि बीअर यांचें जगांतील एक महत्त्वाचें केंद्र आहे. ' म्युनिक–करार ' आणि हिटलरची कारकीर्द यामुळें हें शहर इतिहासांत विशेष प्रसिद्ध आहे. म्युनिक स्टेशनवर शहराचा मोठा नकाशा आहे. त्यांत प्रत्येक रस्त्याचें नांव आणि तो रस्ता कसा सांपडेल याविषयींचें दिग्दर्शन दिलेलें आहे. मला मार्क्यूत्रासला जायचें होतें. मीं त्याची दिशा नकाशांत पाहिली, आणि ट्रॅमनें निघालों.

ती सकाळ मोठी प्रसन्न होती. अंगांत उत्साह आणणारे वारे वहात होते. म्युनिकचे स्वच्छ, सुंदर, काळेकुळकुळीत असे रस्ते जर्मन लोकांनीं आणि वाहनांनीं भरून गेलेले होते. पण त्यांची शिस्त पाहून मात्र मी चकित झालों. वाहतूक मोठी असली, तरी कुठें गोंधळ नाहीं, गडबड नाहीं, कीं गुंतागुंत नाहीं. पॅरिसच्या वहातुकींतील गबाळेपणा येथें दिसला नाहीं. हें टवटवीत गांव कांहीं वर्षांपूर्वींच बेचिराख झालें होतें, हें खरेंसुद्धां वाटत नाहीं. ' जगांतील सर्वांत स्वच्छ गांव ' असा म्युनिकला एकदां किताब मिळाला होता, तो सार्थ वाटला.

मी ट्रॅममधून खालीं उतरल्यावर मुख्य अडचण आली, ती भाषेची. कारण हे जर्मन लोक म्हणजे आपल्या भाषेचे जाज्वल्य अभिमानी. युरोपमध्यें इतर देशांत इंग्रजी किंवा फ्रेंच भाषा कामचलाऊ तरी ठरेल; पण जर्मनींत जर्मन भाषेशिवाय चालणें कठिण आहे. मीं मला हवा असलेला त्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्याचा पत्ता एका चिठ्ठीवर लिहिला आणि रस्त्यांत भेटणाऱ्या व्यक्तींना विचारूं लागलों. अखेर त्या रस्त्यावर आलों; पण २९ नंबरचें घर कांहीं केल्या मला सांपडेना. चांगला तीन तास त्या रस्त्यावरून फिरलों; चारपांच घरांत जाऊन चौकशी केली; पण छेः ! सारे श्रम व्यर्थ गेले. तेव्हां मी कंटाळून परत शहराच्या मध्यवर्ती भागांत आलों; तों मला मोठमोठे फलक दिसले. शहरांत कसला तरी उत्सव होता. मीं चौकशी केली तेव्हां कळलें कीं, तो

OKTOBERFEST ( ऑक्टोबरफिएस्त ) किंवा 'नव्या बीअरचा महोत्सव' होता. त्याची एकच गडबड शहरांत चालली होती. जेवण करून मीहि त्या महोत्सवाला जायचें ठरविलें.

आतां मी कार्ल्सप्लाझ चौकांत आलों. तेथें बरीच मोठी गर्दी झालेली होती आणि ते सर्व लोक एका उंच मनोऱ्यावरच्या घड्याळाकडे पहात होते. मीहि पाहूं लागलों. बाराचा सुमार होता. बाराचे ठोके पडणार, तोंच घड्याळावरील चित्रें हलूं लागलीं. प्रथम हत्ती, घोडे, शिपाई इत्यादींच्या चित्रांची पलटण सरकत गेली. दोन्ही बाजूंनीं दोन घोडेस्वारांचीं चित्रें आलीं. त्या स्वारांनीं भाल्यांनीं युद्ध केलें. त्यांपैकीं एक घोड्यावरून खालीं पडला. मग दोन्ही स्वार पुढें सरकले आणि राजाचें चित्र आलें. मग हीं सर्व चित्रें पुन्हा स्थिर झालीं, आणि बाराचे ठोके पडूं लागले. प्रत्येक तासाचे घंटे पडतांना हलत्या लढाईचें हें सर्व दृश्य त्या घड्याळावर दिसतें आणि त्यामुळें तें जगांतील एक वैशिष्टय-पूर्ण घड्याळ मानलें जातें.

या चौकाजवळच्याच एका उपाहारगृहांत मी शिरलों. एका प्रशस्त हॉलमध्यें साठसत्तर जर्मन स्त्री–पुरुष बीअर पीत होते आणि खाद्यपदार्थ खात होते. ती जांभळी–काळसर जर्मन बीअर मींहि मागविली. उपाहारगृहांत माल आणून देणाऱ्या सर्व स्त्रिया तरुण होत्या. त्यांनीं काळे स्वेटर आणि काळे फ्रॉक घातलेले होते. त्यांपैकीं एका सुंदर, रेखीव जर्मन तरुणीनें बीअर आणून माझ्या पुढ्यांत ठेवली. ती बीअर इतकी उत्साहवर्धक आणि चवदार होती कीं, तशी बीअर मीं त्यापूर्वीं कधींहि घेतलेली नव्हती. तेथें थोडे 'निरुपद्रवी' पदार्थ खाऊन मीं समोरच्या चौकांत म्युनिकच्या दृश्यांचीं कांहीं छायाचित्रें घेतलीं, आणि 'ऑक्टोबरफेस्ट' कडे जाण्यासाठीं ट्रॅमनें निघालों.

♥♥♥

४

# ऑक्टोबर महोत्सव

आत्म्याचें वर्णन करतांना गीतेंत म्हटलें आहे कीं, त्याला शस्त्रें तोडीत नाहींत, अग्नि जाळूं शकत नाहीं, पाणी भिजवीत नाहीं, वायु सुकवीत नाहीं. तो जळत नाहीं, कुजत नाहीं, सुकत नाहीं. हें वर्णन यथार्थतेनें कोणत्या देशाला लागूं पडत असेल तर तें जर्मनीला. बॉंबच्या वर्षावांतून हा देश जगला, बलाढ्य राष्ट्रांच्या मगरमिठींतून सुटला, आर्थिक आपत्तींतून बचावला आणि कृत्रिम उपायांनीं तोडला गेला, तरी तो पुन्हा आपल्या पायावर उभा राहिला आहे. हें असीम सामर्थ्य जर्मनींत कुठून आलें ? त्याचीं राजकीय कारणें मी शोधीत नाहीं. पण गेल्या ऑक्टोबरमध्यें मीं जर्मनींत जो महोत्सव पाहिला, त्यावरून जर्मनीचें मन समजण्यांत थोडी मदत होईल, असें मला वाटतें. म्हणून मीं पाहिलेलीं दृश्यें खालीं देत आहे.

ऑक्टोबर १९५६ मध्यें मी म्युनिकला होतों. स्टेशनवर उतरल्याबरोबर सर्वांत मोठ्या जाहिराती दिसल्या त्या ऑक्टोबर फिएस्त म्हणजे ऑक्टोबर–महोत्सवाच्या. जर्मनींत शिरण्यापूर्वींच इंग्लंड, बेल्जम व फ्रान्स या देशांतहि टुरिस्ट एजन्सींच्या कचेरींत मीं या जाहिराती पाहिल्या होत्या. त्यामुळें हा महोत्सव असतो तरी कसा याची मला उत्सुकता लागून राहिली होती. या जाहिरातींत म्हटलें होतें, " दरसाल हजारो लोक जर्मनींत ऑक्टोबर महोत्सवासाठीं येतात.

तुम्हीहि या व पाहा. " म्हणून मी शहरांत आल्यावर थोड्याच वेळांत या महोत्सवाच्या जागेकडे वळलों.

एका विस्तीर्ण पटांगणावर ऑक्टोबर महोत्सवाची विराट् मांडणी करण्यांत आली होती. लांबून पाहिलें, तर उंच उंच तंबू, अॅसबेस्टॉसचे उभारलेले प्रचंड हॉल्स, चक्रीची ( मेरी गो राउंड ) अवाढव्य चक्रें, पोलादी डिपरच्या नागमोडी उंच सखल मार्ग, बीअरच्या निरनिराळ्या कारखान्यांचीं बोधचिन्हें आणि हजारो लोकांची गर्दी दिसत होती. या ठिकाणाकडे ट्रॅम्स आणि बसेस भरून जात होत्या. मी जसाजसा त्या ठिकणाजवळ जाऊं लागलों तसतशी गर्दी एवढी वाढली कीं, ठरलेल्या ठिकाणाच्या आधींच बसेस व ट्रॅम्स थांबवाव्या लागत होत्या. रस्ते लोकांनीं फुलून गेले होते आणि सर्व गर्दी फक्त एकाच दिशेनें वाहत होती. कोणी रंगेल तरुण आपल्या मैत्रिणीच्या कमरेभोंवतीं हात ठेवून चालले होते. कोणी वयस्क पतिपत्नी हातांत हातांत हात घालून जात होते तर मित्रांचीं टोळकीं पिपाण्या आणि शिट्या वाजवीत मौजेनें रमतगमत जात होतीं. कांहीं कुटुंबें घोळके करून जात होतीं. त्यांत ऐंशी वर्षांच्या वृद्धापासून पांचसहा वर्षांच्या मुलामुलींपर्यंतचे जर्मन नागरिक होते. गर्दींत कोणी चारसहा जणांच्या जोड्या करून जर्मन गाणीं गात होते तर कोणी माऊथऑर्गनवर गाण्यांचे सूर काढीत होते. ऑक्टोबर महोत्सवाच्या जागेवर जाण्यापूर्वींच त्याची नांदी रस्त्यावर होत होती.

महोत्सवाची जागा सुमारें चार चौरस मैल होती. एवढ्या मोठ्या जागेंत कुठें काय आहे याची कल्पना येण्यासाठीं निरनिराळ्या प्रवेशद्वारांजवळ महोत्सवाचे तक्ते ( प्लॅन्स ) ठेवण्यांत आले होते. त्याशिवाय पोलिस आणि स्वयंसेवक मार्गदर्शनासाठीं होतेच. मुख्य प्रवेशद्वारावर मोठी पाटी होती— ‘ October fest 1956 ’ सुरुवातीला डाव्या बाजूला करमणूकविभाग होता. त्यांत प्रथमच चित्रविचित्र आरशांचा दिवाणखाना ( Hall of Mirrors ) होता. महोत्सवाला प्रवेशमूल्य नव्हतें. पण आंतील खेळांना एकदोन आणे ( पांच ते दहा फेनिंग ) प्रवेशमूल्य होतें. आरशांच्या दिवाणखान्यांत सुमारें पन्नास आरसे ठेवलेले होते. ते अंतर्गोल किंवा निरनिराळ्या तऱ्हेचे बांक आलेले असल्यानें त्यांत पाहणाऱ्यांच्या आकृती मोठ्या चमत्कारिक आणि हास्यकारक दिसत. एखाद्या आरशांत आपण ताडामाडासारखे उंचच उंच

दिसतों तर दुसऱ्या आरशांत एक फूटच उंचीचे खुजे दिसतों. कोठें भलेंमोठें डोकें व पोट आणि लांबलचक टांगा असें आपलें रूप दिसतें तर कोठें हत्तीसारखे जाड पाय आणि पडवळासारखें लांबट डोकें दिसतें. या हॉलमध्यें प्रेक्षकांच्या हास्याचे स्फोट सारखे होत असतात आणि हास्य हें सांसर्गिक असल्यानें सगळेच उपस्थित हंसूं लागतात. केव्हांकेव्हां भल्यामोठ्या पण वांकड्यातिकड्या आरशापुढें सातआठ माणसांचें कुटुम्ब उभें राहतें आणि एकेकाचा तो विलक्षण अवतार पाहून त्यांना हंसू आवरणें अशक्य होतें. या हंसण्यामुळें हा 'ग्रुप फोटो' अधिकच विलक्षण दिसू लागतो.

या आरशांच्या मयसभेंतून बाहेर पडल्यावर शिकारी खेळ दिसले. कार्डबोर्डच्या चालत्या बदकांना पाडणें, फिरत्या सशांना मारणें, वेगानें फिरणाऱ्या छोट्या विमानांना नेम धरून पाडणें वगैरे प्रकारचे हे खेळ होते; आणि त्यांत विजयी होणाऱ्यांना अनेक वस्तू बक्षीस मिळत होत्या. आपल्या नेमबाजीचा पडताळा घेऊन जर्मन लोक 'दैवाच्या खेळां'कडे ( Games of chance ) जात होते. या खेळांत फिरत्या तबकड्या, बिंगो, लांकडी घोड्यांचा रेसकोर्स वगैरेंचा समावेश होता. त्यांत कसब असें फारसें नव्हतेंच. अनेकांकडून पैसे जमा करून त्यांतील बरेचसे एकाला देण्याचे हे निरनिराळे खेळ होते. त्यानंतरच्या विभागांत एका मोठ्या गोल वर्तुळांत लांकडी मोटारी, घोडे वगैरे होते. हें वर्तुळ तबकडीसारखें फिरत असें. त्यावरील मोटारींतून जर्मन तरुणतरुणी बसलेल्या होत्या. वर्तुळ फिरत असतांनाच सर्व मोटारी व घोड्यांवर जाड हिरवा पडदा येई आणि आंतील लोक पांचसात मिनिटें संपूर्ण अंधारांत असत आणि अर्थात् आंत काय चाललें आहे याबद्दल बाहेरचे प्रेक्षकहि अंधारांत असत. तबकडीवरून फिरतां फिरतां नर्म प्रणयास वाव देण्यासाठीं ही स्क्रीनची किंवा पडद्याची क्लृप्ति होती. याच विभागांत 'विश्वसंचार' नांवाचा एक उंच जागेवरील खेळ होता. त्याचीहि अवाढव्य तबकडी होती व त्या तबकडीवर पृथ्वी, चंद्र, सूर्य वगैरे ग्रह आणि तारे होते. लहान विमानासारख्या आकाराचीं वाहनें या ठिकाणीं होतीं व विश्वसंचार सुरू झाल्याबरोबर अतिशय वेगानें हीं वाहनें ग्रह व ताऱ्यांच्या आजूबाजूनें संचार करीत. पाश्चात्य देशांत लहान मुलांत सध्यां Space Travel ( अंतरीक्षांतील प्रवास ) करण्याबद्दल अतिशय उत्सुकता असते. आपण पंधरावीस मिनिटें कां होईना पण हजारों

मैल दूर गेलों असून खगोलामधून संचार करीत आहोंत असा भास निर्माण करणारा हा गोल मुलांत बराच लोकप्रिय झालेला दिसला.

ऑक्टोबर महोत्सवाच्या या विशाल जागेंत दोन लहान तळीं होतीं. त्यांत लहानलहान मोटार बोट्स होत्या. अर्ध्या तासाला सुमारें एक रुपया या दरानें त्या भाड्यानें मिळत. त्यांत दोन लोक बसण्याची सोय होती. या मोटार बोट्स-मधून आठदहा वर्षांचीं मुलें गमतीसाठीं तर तरुण मित्रमैत्रिणी प्रणयपूर्ण फेर-फटक्यासाठीं तळ्यांतून फिरत. तळ्याच्या कांठावर शोभेचीं कृत्रिम घरें उभारलीं होतीं व त्यांवर रोषणाई केली होती. तळ्याजवळच लहानसें उपाहारगृह होतें हें उपाहारगृह उघड्यावरच होतें. येथें तळ्याच्या कांठीं बसून मोटारबोट्सची शोभा अवर्णनीय दिसत होती. या तळ्याजवळच मोठमोठीं चक्रें, पाळणें, डिपर, भोंवरे वगैरे उभारण्यांत आले होते. कांहीं पाळण्यांत वृद्ध जर्मन जोडपीं बसून फिरत आहेत हें दृश्य गमतीचें दिसत होतें. डिपरच्या गाडींत बसल्यावर जेव्हां ती छोटी गाडी अतिशय वेगानें एकदम उंच गेली व तेथून कोणी तरी ढकलून दिल्यासारखी एकदम खाली आली तेव्हां माझ्यासारख्या नवख्या इसमाला खरोखरच भीति वाटली. अशाच तऱ्हेचा पाणगाडी म्हणून एक खेळ होता. त्यांत जमिनीच्या उंचीबरोबरच पाण्याचें लहानसें तळें ठेवलेलें असतें. त्याच्या नजीकच सुमारें पन्नास फुटांवर लोखंडी रूळ नेलेले असतात. तीनचार लोकांना घेऊन एक गाडी या उंचावरून वेगानें येते आणि पाण्या-मधून भरधांव जाते. आंतील लोकांना आतां आपण पाण्यांत बुडणार अशी भीति वाटते. पण गाडीच्या वेगामुळें पाणी दोन्ही बाजूंना उंच उडतें व गाडीं-तील लोक न भिजतां पाण्यांतून जातात. जेथें पाणी उडतें तेथें उंच कांचेच्या भिंती असल्यानें प्रेक्षकांना पाण्याचे फवारे चांगले पाहतां येतात.

या खेळांशिवाय 'भयंकर घर' ( House of Horrors ) म्हणून एक इमारत होती. त्यांत निरनिराळी भीतिदायक दृश्यें दाखविण्यांत येत होतीं. 'जगाची सफर' म्हणून एक भाग होता, त्यांत लहान बोटींत बसून जायचें व सहारा वाळवंट, न्यूयॉर्कमधील उंच इमारती, आफ्रिकेंतील दाट जंगलें, भार-तांतील हिमालय पर्वत वगैरेचीं दृश्यें पहात प्रवास करावयाचा. 'प्रेमाचा बोगदा' ( Tunnel of Love ) या खेळांत तरुणतरुणी लहान बोटींत बसून कधीं अंधाऱ्या भागांतून तर कधीं रमणीय वनश्रींतून प्रवास करीत होते. असे

विविध खेळ मांडलेले मीं पाहिले व सणासुदीचे पोषाख घालून त्यांची रंगत लुटणारे जर्मन लोकहि पाहिले. कांहीं जर्मनांनीं कागदाच्या रंगीबेरंगी टोप्या घातल्या होत्या आणि लहान मुलांच्या शिट्या वाजवीत ते फिरत होते. पण ऑक्टोबर महोत्सवांत मला सर्वांत उल्लेखनीय आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी कोणती गोष्ट दिसली असेल तर ती म्हणजे बीअरचे मोठमोठे हॉल्स व तेथील वातावरण. किंबहुना ऑक्टोबर महोत्सव हा खरोखरच बीअरचाच महोत्सव. या सुमाराला नवी बीअर तयार होते आणि बीअर हें जर्मन लोकांचें अत्यंत प्रिय असें पेय आहे. बार्लीपासून तयार होणाऱ्या या तांबूस–काळसर पेयाचें मोठमोठे पेले रिचवतांना जर्मन माणूस अगदीं रंगांत येतो.

बीअर हें जर्मनीचें राष्ट्रीय पेय असल्यानें साहजिकच जर्मनींत बीअरचे अनेक मोठमोठे कारखाने आहेत. आपल्या बीअरची जाहिरात करण्याकरतां या कारखान्यांना ऑक्टोबर महोत्सव म्हणजे मोठीच पर्वणी असते. म्हणून हे कारखानदार या वेळीं प्रशस्त पण तात्पुरते हॉल्स बांधतात. या एका इमारतींत पांचसहा हजार लोकांना बसण्याची सोय असते. या हॉलच्या मध्यभागीं गोल उंच व्यासपीठ असतें व त्यावर सुस्वर बँड वाजत असतो. हें व्यासपीठ फिरत असतें. हॉलच्या उरलेल्या भागांत लहानमोठीं टेबलें व त्याभोंवतीं खुर्च्या असतात. कांहीं टेबलांवर चार, कांहीं टेबलांवर आठ तर कांहीं मोठ्या टेबलांवर वीसपंचवीस लोकांची बसण्याची सोय असते.

मी 'लॉवेन ब्रॉ' या कारखान्याच्या हॉलजवळ गेलों, तेव्हां बीअरच्या पिपाची एक गाडी नुकतीच आली होती. एका गाडींत बारा ते अठरा पिपें असतात. या गाडीचे घोडे, गाडी व पिपें पानाफुलांनीं सुशोभित केलेलीं होतीं. गाडीला सहा घोडे लावण्यांत आले होते व गाडीवर पानांची एक सुंदर कमानहि करण्यांत आली होती. गाडींतील पिपें उतरून घेऊन हॉलमध्यें नेण्यांत आलीं. या हॉलच्या भिंतीजवळ सुमारें चाळीस पन्नास ठिकाणीं आपल्याकडील गुऱ्हाळाच्या काहिलीएवढ्या मोठ्या लांकडी काहिली ठेवलेल्या होत्या. पिपांतील बीअर या काहिलींत ओतण्यांत येई. आमच्याकडे पूर्वी रंगपंचमीच्या दिवशीं मोठमोठ्या काहिलींत रंग करून सामुदायिक रंग उडविण्याचे प्रकार होत, त्याची या वेळीं मला आठवण झाली. या समारंभांत बीअर पिण्यासाठीं चिनी मातीचे खास मोठे पेले असतात. एका वेळीं या ग्लासांत सुमारें पाऊण

तांब्या बीअर राहते. जर्मन लोकांच्या उत्साहाप्रमाणेंच या ग्लासावर पांढरा स्वच्छ फेस ओसंडून जात असतो. एक परिचारक किंवा परिचारिका एका वेळीं असे सातआठ ग्लास घेऊन टेबलाभोंवतालच्या ग्राहकांना ते देते.

बीअरचे एकदोन पेले घेतल्यावर आणि अस्सल जर्मन गीताचे स्वर बँडवर निघाल्यावर जर्मन लोक खरे रंगांत येऊं लागले. आपल्या हातांतील पेले घेऊन कोणी आपल्या मित्राला किंवा मैत्रिणीला बीअर पाजूं लागले. दोनचार तरुणांनीं मला जवळ येण्याची खूण केली. मग एक जण म्हणाला, " इंडिया ? नेहरू ? " मीं होय म्हटलें. मग त्यांनी अत्याग्रहानें मला जवळ बसवून घेतलें व बीअरचा पेला मागवला. या वेळीं हॉल चिक्कार भरला होता. बँडवर चाल-लेल्या गाण्याचे शब्द हॉलच्या एका भागांत दहापांच लोक म्हणूं लागले. मग गाणें म्हणण्याची ही टूम इतरत्र पसरली. थोड्याच वेळांत हॉलमधील चारपांच हजार लोक तें गाणें म्हणूं लागले. या वेळीं निरनिराळ्या टेबलांवरील लोक आपल्या शेजाऱ्यांचे हात कोपराजवळ आपल्या हातांत अडकवून प्रत्येक टेबलाची एक गोल सांखळी करीत. मग सर्व टेबलांवरील लोक एकदां इकडे तर एकदां तिकडे डुलत आणि शक्यतों एका सुरांत गाणें म्हणत. माझे जर्मन मित्र मला म्हणाले, " Sing. " ( तुम्हीहि गाणं म्हणा ). मीं म्हटलें, " मला गाण्याचे शब्द माहीत नाहीत. " तेव्हा एकानें म्हटलें, " कांहीं हरकत नाहीं. आमच्या सुरांत सूर मिसळा म्हणजे झालें !"

याच वेळीं कांही तरुणतरुणी खुर्चीवर उठून नृत्य करूं लागले. तो देखावा अविस्मरणीय होता. पांचपांच हजार लोक आनंदानें नाचत गाणीं म्हणत आहेत आणि जर्मनीची एकी पुकारीत आहेत हें पाहून मला अतिशय कौतुक वाटलें. आपल्या मित्रदेशाचा नागरिक म्हणजे आपला वैयक्तिक मित्र ही त्यांची भावना होती. आपल्या शेजारी बसलेला माणूस आपल्या ओळखीचा नसला तरी त्याचा हात हातांत घेऊन मोठ्या प्रेमानें ते नाचत व गात होते, इतक्या एकोप्यानें वागणारे, स्वतःला विसरून जाणारे लोक जगाच्या पाठीवर क्वचितच असतील असें मला वाटलें. जें राष्ट्र इतक्या एकतानतेनें नाचूंगाऊं शकतें, तें तितक्याच एकात्मतेने लढूं शकतें व कांहीं काळ पराजित झालें, तरी पुन्हा नव्या उत्साहानें भरभराट पावूं शकतें, हेंच खरें.

♥♥♥



युगोस्लाव्हियामधील जुब्लिजना गांवांतून जाणारा ओढा व त्याच्या कांठावरील फुलबाग



**जगप्रसिद्ध शिल्पकार ऑगस्ट रोडीन याचें 'चुंबन' हें शिल्प**

(हा पुतळा सध्यां लंडन येथील टेट गॅलरीमध्यें आहे)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५०७९८ दि: १-९-५८
क्रमांक ३३३९ नों दि: १५१५८

५

## दहा देशांची धांवती सफर : ४

ऑक्टोबर महोत्सवाच्या अविस्मरणीय दृश्यानें भारून जाऊनच मी शहरांत परत फिरलों. त्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा पत्ता काढण्याचें काम अजून शिल्लकच होतें. त्याचें काय करावें असा विचार करीत असतांनाच रस्त्यांत तीनचार भारतीय विद्यार्थी दिसले. त्यांपैकीं एकाला विचारलें तों, तो सुदैवानें पुण्याचाच निघाला. त्यानें मला हवें असलेलें तें ठिकाण दाखविलें, आणि माझें कामहि झालें. आतां मला म्युनिकमध्यें राहायचा उत्साह राहिलेला नव्हता. मीं लगेच निघणाऱ्या गाडीची चौकशी केली. एक गाडी रात्रीं साडेदहाला म्युनिकहून निघून पाऊणला ऑस्ट्रियांतील 'साल्झबुर्ग'ला जाणार होती. स्टेशनवर रात्र काढायच्या माझ्या योजनेला ही गाडी चांगली जुळत होती. म्हणून मी त्याच गाडीनें निघालों. दोनच तासांनीं उतरायचें असल्यानें झोंप घेणेंहि शक्य नव्हतें. पण विश्रांति मात्र चांगली मिळाली. त्या थंड, अंधाऱ्या, भयाण रात्रीं वेगानें जाणारी गाडी थेट साल्झबुर्गच्या प्रशस्त, सुप्रकाशित आणि अद्ययावत् स्टेशनवर रात्रीं पाऊण वाजतां पोंचली आणि हातांत दोन बॅगा घेऊन मी स्टेशनच्या विश्रांतिस्थानाकडे निघालों.

म्युनिकहून निघून रात्रीं पाऊण वाजतां मी साल्झबुर्गला उतरलों, तेव्हां डोळ्यांत झोंप भरलेली होती. हातांत दोन बॅगा घेऊन लडबडत मी स्टेशन-

वरच्या प्रतीक्षागृहांत गेलों आणि बांकाजवळ बॅगा ठेवून आसपास पाहिलें.— निदान शंभर माणसांना बसतां येईल अशा त्या प्रशस्त, अद्ययावत् आणि स्वच्छ प्रतीक्षागृहांत सारीं पांचसहाच माणसें होतीं. एका कोपऱ्यांत एक तरुण अन् तरुणी शक्य तितक्या जवळजवळ बसून आणि हातांत हात घेऊन हळू आवाजांत बोलत होतीं. दुसऱ्या कोपऱ्यांत पन्नाशीच्या वयाचा एक इसम, त्याची बायको ( अर्थात् हें मी अंदाजानें म्हणतों. पाश्चात्य देशांत सहप्रवासी हीं नवराबायकोच असतील अशी खात्री देणें कठिण असतें. ) आणि दहाबारा वर्षांचीं दोन मुलें पेंगुळलेल्या डोळ्यांनीं समोर पहात बसलीं होतीं.

हे लोक खुशाल झोंपत कां नाहींत असा विचार माझ्या मनांत आला. कदाचित् थोड्याच वेळांत त्यांची गाडी येणार असेल असेंहि मला वाटलें. मी मात्र आमच्या कोल्हापुरी मनमोकळेपणानें बांकावर खुशाल झोंपलों, — किंवा झोंपण्यासाठीं आडवा झालों, असेंच म्हटलें पाहिजे; कारण मी आडवा होतों न होतों, तोंच काळ्या पोषाखांतील एक पोलिस बाहेरून माझ्याजवळ आला आणि ऑस्ट्रियांतील भाषेंतून कांहीं बोलूं लागला. मी उठून बसलों आणि मला कांहीं समजत नाहीं असें खुणेनें सुचविलें. त्याला माझें तिकिट किंवा पासपोर्ट पहायचा असेल म्हणून मीं तें खिशांतून काढलें; पण त्याच्याकडे न पहातांच त्यानें फ्रेंचमधून सांगितलें, “ या ठिकाणीं उतारूंना फक्त बसतां येईल; झोंपतां येणार नाहीं. ”

त्या विचित्र नियमाचें मला आश्चर्य वाटलें. पण त्या वेळीं वादविवाद करूनहि कांहीं उपयोग नव्हता. एवढी जागा रिकामी असतांना एखादा मनुष्य अंमळ झोंपला, तर ऑस्ट्रियन रेल्वेचें कांहीं नुकसान होणार नाहीं असा शहाणपणा मला सुचला. पण सत्तेपुढें हा शहाणपणा मला बाजूला ठेवावा लागला. इतर प्रवासी तेथें कां झोंपत नव्हते हें आतां माझ्या लक्षांत आलें. मग तसाच चुरचुरत्या डोळ्यांनीं तेथें चारपांच तास बसून काढले. पहांटे स्टेशनवरच्या क्लोकरूममध्यें सामान ठेवलें, तेथील बुकस्टॉलवर साल्झबुर्गचें एक गाइड घेतलें आणि गांव पहाण्यासाठीं निघालों. मीं इतकीं स्टेशनें पाहिलीं; पण लंडन, पॅरिस इत्यादि बड्या स्टेशनांपेक्षांहि साल्झबुर्गचें स्टेशन मला सुंदर, अद्यावत्, सर्व सोईचें आणि स्वच्छ वाटलें. या स्टेशनमध्यें उपाहारगृहें, प्रतीक्षागृहें स्नानगृहें, केशकर्तनालय, शहरांतील सर्व रस्त्यांचे नकाशे, प्रसिद्ध

१३

स्थळांची माहिती, हॉटेलांचे पत्ते, साल्झबुर्ग भागांतील इतर प्रमुख ठिकाणांची माहिती, पुस्तकें आणि वृत्तपत्रांचे स्टॉल इत्यादि सर्व सोयी आहेत. विशेष म्हणजे हें सर्व अगदीं आधुनिक व चित्रासारखें व्यवस्थित मांडून ठेवलेलें दिसलें. मी साल्झबुर्ग शहरांत गेलों, तेव्हां मला आढळून आलें कीं, हें मनोहर स्टेशन म्हणजे कांहीं शहराला अपवाद नाहीं. सर्वच शहर अतिशय सुंदर आणि आल्हाददायक आहे. खरोखर साल्झबुर्गइतकें सुंदर शहर मीं दुसरें पाहिलें नाहीं. तें अवाढव्य नाहीं पण टुमदार, स्वच्छ, गोंडस आहे. साल्झबुर्ग हें जगांतील सर्वांत सुंदर शहर आहे असें अलेक्झँडर व्हॉन ह्युबोल्ट या जगप्रसिद्ध प्रवाशानें म्हटलें आहे, तें सार्थ वाटतें.

साल्झबुर्ग शहर एका गर्द झाडीनें शोभिवंत झालेल्या पर्वताच्या पायथ्याशीं वसलेलें आहे. शहराचा कांहीं भाग या पर्वताच्या उतारावर आहे. शहराच्या मधून सॅल्झॅक नदी वहाते, आणि या नदीच्या दक्षिण भागाला शहराचा 'अतस्टॅट' ( जुनें गांव ) भाग आहे, तर उत्तरेला 'न्यूस्टॅट' ( नवें गांव ) भाग आहे. डोंगरमाथ्यावर जाण्याकरितां 'फनिक्युलर' रेल्वे आहे, ती एखाद्या घोरपडीसारखी सरसर करीत डोंगरावर वेगानें चढते. शहरापासून चारशें फूट उंचीवरच्या डोंगरमाथ्यावर एक किल्ला आहे. सुमारें आठशें वर्षांपूर्वीचा हा किल्ला अद्याप बळकट आहे. या किल्ल्यांत नगरपालिकेनें एक वस्तुसंग्रहालयहि ठेवलें आहे. किल्ल्याच्या बुरुजावरून साल्झबुर्ग शहराचा दिसणारा देखावा अविस्मरणीय आहे. उत्तुंग प्रतिभेच्या कवीनें एखादी मानस–नगरी रचावी आणि दिव्य शक्तीनें ती अस्तित्वांत यावी, तसें या देखण्या, बाळसेदार शहराकडे पाहून वाटतें.

मोझार्ट या जगप्रसिद्ध संगीततज्ञाचें हें गांव. त्याची स्मृति सर्वत्र दिसते. इंग्लंडला शेक्सपीयरचा अभिमान वाटतो, तसाच ऑस्ट्रियाला या विख्यात संगीतकाराचा वाटतो. त्याच्या स्मृतिनिमित्त दरसाल येथें एक जागतिक संगीत–महोत्सव भरतो आणि त्यासाठीं जगाच्या अनेक भागांतून संगीतज्ञ येतात. मोझार्टचा जन्म ज्या घरांत झाला, तें घर अद्याप राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करून ठेवण्यांत आलें आहे. मोझार्टच्या कांहीं वस्तू, त्याच्या गीतरचना, त्याच्याशीं निगडित असलेल्या वस्तू इत्यादींचें एक प्रदर्शनहि या घरांत ठेवण्यांत आलेलें आहे. याशिवाय साल्झबुर्ग शहरांत इतरत्रहि त्याचा पुतळा, संगीत-कले-

विषयींचें प्रदर्शन, मोझार्ट उन्हाळ्यांत ज्या घरांत रहात असे तें घर, संगीताची अकॅडमी, इत्यादि अनेक स्मारकांनीं या श्रेष्ठ कलावंताची स्मृति जागृत ठेविली आहे. कलावंताचा हा सत्कार पाहून कोणत्याहि रसिकाला अतिशय समाधान वाटतें आणि सारेंच क्षणभंगुर आहे, हा विचार मागें पडतो. जगाच्या विविध, व्यापक पसाऱ्यांतून आणखी कोणत्या चिरकालीनतेची किंवा अमरत्वाची अपेक्षा करावी ?

साल्झबुर्ग शहरांतील प्रसन्न रस्त्यांवर बराच वेळ फिरल्यावर चहा घ्यावा म्हणून एका उपाहारगृहांत गेलों. चहा सांगितल्यावर वेट्रेसनें इंग्रजींत विचारलें, " कशाबरोबर ? रमबरोबर देऊं का ? " चहामध्यें रम घालून पिण्याची कल्पना मला कशीशीच वाटली. पण मग कळलें कीं, ऑस्ट्रियांत लिंबू, रम किंवा ब्रँडी घालून चहा घेतात. चहांत दूध घालून पिण्याचा प्रकार अगदींच क्वचित् — केवळ प्रवाशांसाठीं. मीं चहा आणि दूध मागविलें आणि तें मला मिळालें. मीं सहज दरपत्रिका पाहिली, तर लिंबू–चहाला बारा आणे ( तीन ऑस्ट्रियन शिलिंग ) आणि रम–चहाला दीड रुपाया, असे दर होते. एका जेवणाला सुमारें सातआठ रुपये पडत होते. या सुंदर शहरांतील सौंदर्याबरोबरच महागाईहि चटका लावीत होती. एका सार्वजनिक स्नानगृहांत एकदां अंघोळ करायला दोन रुपये द्यावे लागल्यावर तर मला हा चटका अधिकच जाणवला !

दुपारीं जेवल्यावर सॅल्झॅक नदीच्या कांठीं विश्रांति घेतली आणि ऊन थोडें खालीं आल्यावर किल्ला सर करण्याच्या अभिनिवेशानें डोंगर चढूं लागलों. रात्रीं एकच्या गाडीनें मी पुढें युगोस्लाव्हियाला जाणार होतों. त्यामुळें वेळ भरपूर होता. मीं किल्ला पाहिला, आणि गर्द झाडीनें भरून गेलेल्या त्या डोंगराच्या सौंदर्यानें मोहित होऊन, वाटेल तिकडे निघालों. मी कोणत्या बाजूनें आणि कोठें जात आहे हेंहि मला कळत नव्हतें. चालण्यांत मौज होती आणि निसर्गसौंदर्य अप्रतिम होतें, म्हणून मी चालत होतों खरा; पण असें बराच वेळ चालल्यावर मी थकलों आणि विश्रांतीसाठीं म्हणून एका ठिकाणीं बसलों. त्या वेळीं, त्या झाडींतील अज्ञात भागांतच मला थोडी डुलकी लागली. मी जागा झालों, तेव्हां आपण ' अरेबियन नाइट्स् ' मध्यें वावरत असल्यासारखें मला वाटलें. हा कोणता देश, कोणतें जंगल, गांव कोठें आहे हें कांहींच समजेना. उठून मी बावरून इकडेतिकडे पाहूं लागलों, तों जवळपास मानवी

वस्ती दिसेना. रात्र होत होती, आणि पायाखालची जमीनहि अंधुकच दिसत होती. थोडें इकडेतिकडे जाऊन पाहिलें, तों दूरवर दिवे दिसले आणि साल्झबुर्ग शहर लांब नाहीं अशी खात्री झाली; तेव्हां थोडें बरें वाटलें. पण तेथपर्यंत जायचा रस्ता तरी मला कोठें माहीत होता ?

अंदाजानें मी शहराच्या रोखानें निघालों. थोड्या वेळानें एक डांबरी रस्ता दिसला. पण रस्त्याच्या कोणत्या दिशेनें जावें हेंहि समजेना. कोणाला विचारावें तर रस्त्यावर एकहि माणूस दिसेना. त्यांतच बराच वेळ कांहीं खाल्लेलें नसल्यानें अतिशय भूक लागली होती. आपण जंगलांत चुकलों आहोंत ही चिंता आतां कमी झाल्यानें भूक अधिकच जाणवली असावी. तिचें कसें निवारण करावें असा विचार करीत असतांनाच एक आश्चर्य घडलें ! तें असें कीं, माझ्यासमोरच चारपांच फुटांवर झाडावरून एक सफरचंद पडलें ! कोणी याचा संबंध परमेश्वरी लीलेकडे लावतील, तर कोणाला हा एक केवळ योगायोग वाटेल. पण साल्झबुर्गच्या त्या विजन रस्त्यावर भुकेच्या वेळीं मला अचानक सांपडलेल्या त्या लालबुंद सफरचंदाचें मला अजून आश्चर्य वाटतें हें मात्र खरें. त्या ' आकाशफळा ' ची चव मोठी नामी होती.

बरीच वाटचाल करून मी डोंगर उतरून खालीं आलों, आणि परदेशांत अज्ञात ठिकाणीं पुन्हा मुशाफिरी न करायचा निश्चय केला. रात्रीं पाऊणला निघणारी माझी गाडी दुसऱ्या दिवशी दुपारीं तीन वाजतां बेलग्रेडला पोंचणार होती. त्यामुळें, आतां थकलेल्या जिवाला भरपूर विश्रांति मिळेल असें मला वाटलें. गाडींत झोंप चांगली लागली; पण पहांटे होण्यापूर्वीच युगोस्लाव्हियाचे अधिकारी गाडींत शिरले. पासपोर्ट, व्हिसा वगैरे दाखविण्याचे सोपस्कार करण्यांत झोंपमोड झाली, आणि मग अंधुक प्रकाशांत दिसणाऱ्या युगोस्लाव्हियाच्या भूमीकडे पहात मीं तासभर प्रवास केला.

जुब्लिजना गांवीं गाडी उभी राहिली, तेव्हां नुकतेंच उजाडलें होतें. गांव लहानसेंच दिसलें; पण एकदम माझ्या मनांत आलें, येथें उतरून पाहूं तर खरें ! तो अचानक निर्णय म्हणजे सकाळच्या उत्साहाचा परिणाम असावा ! या स्टेशनाचा एक विशेष माझ्या लक्षांत आहे, तो असा कीं, त्याला प्लॅटफॉर्मच नव्हते. आगगाड्यांच्या रुळांच्या तीनचार जोड्या होत्या आणि त्यांमधील जमिनीवरच लोक गाड्यांची वाट पहात उभे होते. तरी स्टेशनवर

विषयींचें प्रदर्शन, मोझार्ट उन्हाळ्यांत ज्या घरांत रहात असे तें घर, संगीताची अकॅडमी, इत्यादि अनेक स्मारकांनीं या श्रेष्ठ कलावंताची स्मृति जागृत ठेविली आहे. कलावंताचा हा सत्कार पाहून कोणत्याहि रसिकाला अतिशय समाधान वाटतें आणि सारेंच क्षणभंगुर आहे, हा विचार मागें पडतो. जगाच्या विविध, व्यापक पसाऱ्यांतून आणखी कोणत्या चिरकालीनतेची किंवा अमरत्वाची अपेक्षा करावी ?

साल्झबुर्ग शहरांतील प्रसन्न रस्त्यांवर बराच वेळ फिरल्यावर चहा घ्यावा म्हणून एका उपाहारगृहांत गेलों. चहा सांगितल्यावर वेट्रेसनें इंग्रजींत विचारलें, " कशाबरोबर ? रमबरोबर देऊं का ? " चहामध्यें रम घालून पिण्याची कल्पना मला कशीशीच वाटली. पण मग कळलें कीं, ऑस्ट्रियांत लिंबू, रम किंवा ब्रँडी घालून चहा घेतात. चहांत दूध घालून पिण्याचा प्रकार अगदींच क्वचित् — केवळ प्रवाशांसाठीं. मीं चहा आणि दूध मागविलें आणि तें मला मिळालें. मीं सहज दरपत्रिका पाहिली, तर लिंबू–चहाला बारा आणे ( तीन ऑस्ट्रियन शिलिंग ) आणि रम–चहाला दीड रुपाया, असे दर होते. एका जेवणाला सुमारें सातआठ रुपये पडत होते. या सुंदर शहरांतील सौंदर्याबरोबरच महागाईहि चटका लावीत होती. एका सार्वजनिक स्नानगृहांत एकदां अंघोळ करायला दोन रुपये द्यावे लागल्यावर तर मला हा चटका अधिकच जाणवला !

दुपारीं जेवल्यावर सॅल्झक नदीच्या कांठीं विश्रांति घेतली आणि ऊन थोडें खालीं आल्यावर किल्ला सर करण्याच्या अभिनिवेशानें डोंगर चढूं लागलों. रात्रीं एकच्या गाडीनें मी पुढें युगोस्लाव्हियाला जाणार होतों. त्यामुळें वेळ भरपूर होता. मीं किल्ला पाहिला, आणि गर्द झाडीनें भरून गेलेल्या त्या डोंगराच्या सौंदर्यानें मोहित होऊन, वाटेल तिकडे निघालों. मी कोणत्या बाजूनें आणि कोठें जात आहे हेंहि मला कळत नव्हतें. चालण्यांत मौज होती आणि निसर्गसौंदर्य अप्रतिम होतें, म्हणून मी चालत होतों खरा; पण असें बराच वेळ चालल्यावर मी थकलों आणि विश्रांतीसाठीं म्हणून एका ठिकाणीं बसलों. त्या वेळीं, त्या झाडींतील अज्ञात भागांतच मला थोडी डुलकी लागली. मी जागा झालों, तेव्हां आपण ' अरेबियन नाइट्स् ' मध्यें वावरत असल्यासारखें मला वाटलें. हा कोणता देश, कोणतें जंगल, गांव कोठें आहे हें कांहींच समजेना. उठून मी बावरून इकडेतिकडे पाहूं लागलों, तों जवळपास मानवी

वस्ती दिसेना. रात्र होत होती, आणि पायाखालची जमीनहि अंधुकच दिसत होती. थोडें इकडेतिकडे जाऊन पाहिलें, तों दूरवर दिवे दिसले आणि साल्झबुर्ग शहर लांब नाहीं अशी खात्री झाली; तेव्हां थोडें बरें वाटलें. पण तेथपर्यंत जायचा रस्ता तरी मला कोठें माहीत होता ?

अंदाजानें मी शहराच्या रोखानें निघालों. थोड्या वेळानें एक डांबरी रस्ता दिसला. पण रस्त्याच्या कोणत्या दिशेनें जावें हेंहि समजेना. कोणाला विचारावें तर रस्त्यावर एकहि माणूस दिसेना. त्यांतच बराच वेळ कांहीं खाल्लेलें नसल्यानें अतिशय भूक लागली होती. आपण जंगलांत चुकलों आहोंत ही चिंता आतां कमी झाल्यानें भूक अधिकच जाणवली असावी. तिचें कसें निवारण करावें असा विचार करीत असतांनाच एक आश्चर्य घडलें ! तें असें कीं, माझ्यासमोरच चारपांच फुटांवर झाडावरून एक सफरचंद पडलें ! कोणी याचा सबंध परमेश्वरी लीलेकडे लावतील, तर कोणाला हा एक केवळ योगायोग वाटेल. पण साल्झबुर्गच्या त्या विजन रस्त्यावर भुकेच्या वेळीं मला अचानक सांपडलेल्या त्या लालबुंद सफरचंदाचें मला अजून आश्चर्य वाटतें हें मात्र खरें. त्या ' आकाशफळा ' ची चव मोठी नामी होती.

बरीच वाटचाल करून मी डोंगर उतरून खालीं आलों, आणि परदेशांत अज्ञात ठिकाणीं पुन्हा मुशाफिरी न करायचा निश्चय केला. रात्रीं पाऊणला निघणारी माझी गाडी दुसऱ्या दिवशी दुपारीं तीन वाजतां बेलग्रेडला पोंचणार होती. त्यामुळें, आतां थकलेल्या जिवाला भरपूर विश्रांति मिळेल असें मला वाटलें. गाडींत झोंप चांगली लागली; पण पहांट होण्यापूर्वीच युगोस्लाव्हियाचे अधिकारी गाडींत शिरले. पासपोर्ट, व्हिसा वगैरे दाखविण्याचे सोपस्कार करण्यांत झोंपमोड झाली, आणि मग अंधुक प्रकाशांत दिसणाऱ्या युगोस्लाव्हियाच्या भूमीकडे पहात मीं तासभर प्रवास केला.

जुब्लिजना गांवीं गाडी उभी राहिली, तेव्हां नुकतेंच उजाडलें होतें. गांव लहानसेंच दिसलें; पण एकदम माझ्या मनांत आलें, येथें उतरून पाहूं तर खरें ! तो अचानक निर्णय म्हणजे सकाळच्या उत्साहाचा परिणाम असावा ! या स्टेशनाचा एक विशेष माझ्या लक्षांत आहे, तो असा कीं, त्याला प्लॅटफॉर्मच नव्हते. आगगाड्यांच्या रुळांच्या तीनचार जोड्या होत्या आणि त्यांमधील जमिनीवरच लोक गाड्यांची वाट पहात उभे होते. तरी स्टेशनवर

सामान ठेवण्यासाठीं क्लोकरूम होती हें नशीबच. तिथें सामान ठेवून मी निघालों.

चहा घ्यायची हुक्की आली; म्हणून उपाहारगृहासारख्या दिसणाऱ्या एका दुकानांत मी गेलों. युरोपांतील इतर देशांत दिसणारी स्वच्छता, टापटीप, सौंदर्य यांचा तेथें अभावच दिसत होता. उपाहारगृहांत ऐन सकाळींच लोक मद्य घेत होते. तें पाहून मला कसेंसेंच वाटलें. मीं चहा मागविला. प्रथम माझी भाषा कोणाला समजेना व त्यांची भाषा मला समजेना. हॉटेलवाल्यानें अनेक मद्यांच्या बाटल्या पुढें करून 'हें हवें का' असें खुणेनें विचारलें. अखेर त्याला चहाच्या समानार्थी फ्रेंच शब्द समजला. पण त्यानें तुटक फ्रेंचमध्यें सांगितलें कीं, चहा नाहीं, कॉफी मिळेल. त्यानें रांजणाच्या आकाराच्या चमत्कारिक पितळेच्या भांड्यांतून कॉफी दिली. त्याच्याकडे दूधहि नव्हतें, आणि कॉफीचा घट्टसर कडवट अर्क होता. तो कसाबसा संपवून मी गांवांत फेरफटक मारण्यासाठीं निघालों.

ऑस्ट्रियांतून निघतांना मीं एक हजार दिनार (१ पौं. = सुमारें बाराशें दिनार) घेतले होते. त्यामुळें पैशाची अडचण नव्हती. दुसरें असें कीं, युगोस्लाव्हियाइतकी स्वस्ताई इतर कुठें आढळली नाहीं. बहुतेक मालाच्या किमती ऑस्ट्रियाच्या मानानें चतुर्थांश किंवा त्याहूनहि कमी होत्या. जुब्लिजना हें गांवहि सुरुवातीला वाटलें तितकें वाईट नव्हतें. मुख्य गांव स्टेशनपासून दीडदोन फर्लांगावर आहे. त्यांतून एक सुंदर ओढा जातो. तो चांगला बांधून काढलेला आहे. आणि त्याच्या कांठाला फुलझाडें लावलेलीं आहेत. गांवांत एका कवीचें हृदयंगम स्मारक दिसलें. शहरांतील उद्यानांत केरासाठीं कोंडोळी होतीं, तीं वैशिष्ट्यपूर्ण दिसलीं. हीं कोंडोळीं सिमेंटची होतीं आणि त्यांना अवाढव्य बेडकांचें आकार दिलेले होतें. तोंड पसरून बसलेल्या या बेडकांच्या तोंडांत निरुपयोगी कागद किंवा केरकचरा टाकायचा.

फिरत फिरत बाजारांत आलों. तेथील वस्तूसुद्धां स्वस्त, पण ओबडधोबड वाटल्या. गांव फारसें मोठें नसल्यानें उत्तम मालाचा उठाव होत नसावा. लोक निरुत्साही, गांजलेले दिसले, पण तो त्यांचा स्थायीभाव आहे असें इतक्या ओझरत्या दृष्टिक्षेपाच्या पुराव्यावर म्हणणें योग्य नव्हे.

दुपारीं काय खावें हा विचारच पडला. कारण उपाहारगृहांतील खाद्यपदार्थ कशाचे केलेले आहेत हेंहि मला कळत नव्हतें, आणि कोणाला विचारण्याचीहि

सोय नव्हती. मग कुठल्यातरी उपाहारगृहांत जाऊन दूध अन् 'बोरका' नांवाचा पावाचा पदार्थ घेतला आणि थोडीं फळें खाऊन भूक भागवली. मग एन उन्हांतून दिसेल त्या रस्त्यानें भटकलों. कुठल्याशा बागेंत झाडाखालीं भटक्यासारखी उडतउडत विश्रांति घेतली आणि संध्याकाळीं पुन्हां स्टेशनवर येऊन गाडीची प्रतीक्षा करीत बसलों. तद्देशीय सिगरेट कसली असते तें पहावें म्हणून एक सिगरेट घेतली तर ती आमच्याकडील विडीसारखी कडक आणि ओबडधोबड वाटली!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बेलग्रेडला पोंचलों. आतां मला वणवण हिंडायचा कंटाळा येऊं लागला होता. उगीच चुरचुरत्या डोळ्यांनीं आणि कांहींतरी खाऊन किती भटकायचें? नवेनवे देश पहायचा माझा उत्साह त्या काळापुरता मावळला होता. पण खिशांत युगोस्लाव्हियाचे पैसे भरपूर शिल्लक होते आणि बेलग्रेड शहरहि चांगलें आकर्षक वाटलें. त्यामुळें माझें क्षणिक वैराग्य संपलें आणि मी पुन्हा भटकूं लागलों. शहराचें गाइड घेतलें. वस्तुसंग्रहालयें, उद्यानें, मोठे चौक, स्मारकें पहात सुटलों. 'कॅलेमॅग्डेन' उद्यानांत स्वातंत्र्याचें प्रतीक म्हणून उभारलेलें भव्य स्मारक फ्रान्सनें दिलेलें असून तें पहाणाऱ्याच्या मनावर चांगलीच छाप पाडतें. या उद्यानांतून डॅन्यूब नदी मोठी आकर्षक दिसते. त्या वेळीं 'ब्ल्यू डॅन्यूब'चें गाणें आठवलें आणि या वाल्ट्झच्या तालावरचें नाजुक, भावरम्य नृत्यहि आठवलें.

अज्ञात योद्धयाचें स्मारकहि असेंच भव्य आणि छाप पाडणारें आहे. या स्मारकाकडून येतांना मला एक युगोस्लाव्ह माणूस भेटला. मी भारताचा आहे असें त्यानें मला विचारून घेतल्यावर, त्याला माझ्याशीं खूपच बोलावेंसें वाटूं लागलें. पण त्याचें फ्रेंच अगदीं तोकडें होतें, तर माझेंहि फ्रेंच तितकेंच तुटपुंजे. अखेर अर्ध्या तासाच्या आमच्या चर्चेत मला त्याचे "टिटो--नेहरू मित्र" एवढेच शब्द कळले. माझे कोणते शब्द त्याला कळले हें तोच जाणे! खरोखर, ज्या देशांत आपण फिरतों, त्या देशाची भाषा आपल्याला अवगत असल्याशिवाय देश पहाण्याला कांहीं फारसा अर्थ नाहीं. असा देश पहाणें आणि त्याचा चित्रपट पहाणें, जवळजवळ सारखेंच आहे, असें मला वाटतें.

रात्रीं आठच्या सुमाराला बेलग्रेडहून निघालेली आमची गाडी ग्रीसमध्यें केव्हां शिरली हें कळलेंहि नाहीं. पण मी जागा झालों, तेव्हां

युगोस्लाव्हियाचे आणि ग्रीसचें अधिकारी माझ्यासमोर उभे असलेले दिसले. रात्रीं झोंप चांगली लागल्यानें मला चांगली हुषारी वाटत होती. कायदेशीर सोपस्कार झाल्यावर मी गाडींतून ग्रीसच्या भूमीकडे पाहूं लागलों. उजाड अशा भागांतून गाडी जात होती आणि आसपास एकहि गांव दिसत नव्हतें. असाच थोडा वेळ गेल्यावर एक गांव लागलें. बसक्या, पांढऱ्या घरांचा तो पुंजका होता. ग्रीसचें वैशिष्ट्यपूर्ण वाहन म्हणजे गाढव. त्या गाढवांचा वापर खूपच दिसला. गांवाचें स्टेशन लहानच होतें. पण गाडींत आतां गर्दी झाल्यानें ते ग्रीक उतारू लौकर गाडींत जागा मिळविण्याची कोशीस करीत होते. माझें वरच्या वर्गाचें तिकिट होतें; म्हणून मी या उतारूंच्या लोंढ्याकडे पहात दारांत स्वस्थ उभा होतों.

इतक्यांत पस्तिशीच्या वयाची एक ग्रीक सुंदरी माझ्या डब्याजवळ आली, आणि एक अक्षरहि न उच्चारतां तिनें आपलें साधारण वर्षभराचें गुटगुटीत गोरेंपान मूल माझ्या हातांत दिलें. मला वाटलें, तिला मूल घेऊन गाडींत चढतां येत नसेल; म्हणून क्षणभर तिनें माझ्याकडे तें मूल दिलें असावें. मीहि त्या अज्ञात मुलाला हातांत धरून गाडीच्या दारांत उभा राहिलों. तेवढ्यांत मुलाची आई दुसऱ्या डब्याजवळ गेली. ती सामान आणायला गेली असेल अशा समजुतीनें मीहि मुलाकडे गमतीनें पाहात राहिलों. इतक्यांत गाडी सुरू झाली. माझ्याकडे मूल देऊन गेलेली ती ग्रीक बाई कोठेंच दिसेना !

दाराजवळ मुलाला घेऊन उभें राहणें धोक्याचें म्हणून मीं आंत येऊन माझ्या जागेवर बसलों. पण माझ्या मांडीवर बसून आनंदानें खिडकींतून बाहेर पहाणाऱ्या त्या बाळसेदार मुलाचें काय करायचें तें मला समजेना. कांहीं वेळ तें माझ्याकडे राहिलें तरी त्याचा कांहीं त्रास नव्हता. पण कांहीं वेळानें तरी त्याची आई येणार आहे याची खात्री काय ? आणि ती आली नाहीं तर मी त्याचें काय करूं ?...ग्रीक मूल पळवून नेल्याचा तर माझ्यावर आरोप येणार नाहीं ना ? आणि तसा आरोप आलाच तर या परक्या देशांत मीं माझें निर्दोषित्व सिद्ध तरी तसें करणार ?...या वेळींच माझ्या लक्षांत आलें कीं, डब्यांतील इतर प्रवासी माझ्याकडे संशयानें पाहत आहेत. कोणी हळू आवाजांत कुजबुजतहि होते; पण त्यांना कोणत्या भाषेंत हा प्रकार समजावून सांगूं ?...

—ही माझी सारी चिंता त्या मुलाच्या गांवींहि नव्हती. तें हातांतील चॉकलेटची कांडी चघळीत मजेनें बसलें होतें. माझ्या मनांत एकदम कल्पना चमकून गेली कीं, हें मूल मला असेंच भारतांत न्यावें लागलें तर माझ्याबद्दल घरच्या मंडळींचें आणि इतरांचे भलतेच गैरसमज होतील! आणि हा चालता-बोलता पुरावा असल्यावर ते गैरसमज काढणेंहि सोपें होणार नाहीं. एकदां वाटलें कीं स्टेशन आल्यावर रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडे तें मूल सोंपवावें; पण ते घेतील का? समजा, मूल मीं त्यांच्याकडे दिलें, आणि त्याची आई याच गाडींतून दुसऱ्या डब्यांतून प्रवास करीत असली, आणि तिनें मूल परत मागितलें, तर तिला मीं काय सांगणार?...

अशा चिंतेंत असतांनाच तीन स्टेशनें गेलीं. मी थिसालोनिकीला उतरणार होतों. तेथपर्यंत ही बाई आली नाहीं तर मुलाला बरोबर घेऊन पुढें जायचें कीं काय, असाहि मी विचार करूं लागलों. सुमारें दोन तासांनीं एका स्टेशनवर ती ग्रीक बाई घाईनें डब्यांत शिरली. मीं रागानेंच फ्रेंचमध्यें तिला विचारलें, "हें काय केलंत तुम्हीं?" तिला फ्रेंच येत नव्हतें. पण ती ग्रीकमधून कांहीं बोलली आणि मुलाला घेऊन झपाट्यानें गाडींतून उतरली. मग एका सहप्रवाशानें मला सांगितलें कीं, तिसऱ्या वर्गात अतिशय गर्दी असल्यानें तिनें मूल दुसऱ्या वर्गात ठेवलें होतें आणि ती तिसऱ्या वर्गानें प्रवास करीत होती. हें स्पष्टीकरण आणि त्या कृतींतील विश्वास ठीक होता; पण त्या दोन तासांत माझी जी बिकट अवस्था झाली, तिची थोडी तरी कल्पना तिला आली कीं नाहीं, कोण जाणे!

थिसालोनिकी शहरांत सकाळीं दहाच्या सुमाराला गाडी शिरली. साल्झबुर्ग-सारखेंच हें गांवहि मनोरम, टुमदार वाटलें. स्टेशनच्या सामान-खोलींत (क्लोकरूममध्यें) सामान टाकून मी बाहेर पडलों. हवा अगदीं हिंदुस्थानांतल्या हिंवाळ्यासारखी बोंचक-सुखद पडली होती. सुदैव हें कीं, या शहरांत अगदीं उत्तम चहा मिळाला. फ्रान्स सोडल्यापासून चांगला चहा मिळाला नव्हता; त्यामुळें त्याची चव विशेष वाटली. या शहरांत प्रवासी-मार्गदर्शनाची उत्तम सरकारी कचेरी आहे. तेथें शहराचा आणि त्या भागांतील प्रदेशाचा नकाशा, माहितीपुस्तिका वगैरे मोफत देण्यांत येतात. सम्राट् अलेक्झांडरच्या बहिणीचें नांव 'थिसालोनिकी' होतें; तिच्या नांवावरून तिच्या नवऱ्यानें हें गांव इ. स.-पूर्वी ३१५ मध्यें वसविलें. बिझंटाइन साम्राज्याची ही राजधानी होती आणि

अद्याप ग्रीसमधलें हें दुसऱ्या क्रमांकाचें मोठें शहर आहे. भूमध्य–समुद्राकांठचें हें बंदर अद्ययावत्, प्रसन्न आहे. याच्या एका भागाला सुंदर टेकडी आहे आणि तीवर अनेक मठ ( monastries ) आहेत. तेथील ग्रीक धर्मगुरु काळा डगला आणि उंच काळी टोपी घालून गाढवावरून इकडेतिकडे जातात, तेव्हां लोक त्यांना लवून अभिवादन करतात. ॲरिस्टॉटल चौक, अलेक्झांडर रस्ता, राजा कॉन्स्टंटाइन रस्ता इत्यादि नांवांत या देशाचा इतिहास जिकडेतिकडे दिसतो. असा उज्ज्वल इतिहास जगांतील फारच थोड्या देशांना लाभला असेल. काव्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला इत्यादींची ही गंगोत्री होय. ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस, प्लेटो, होमर, प्लुटार्क इत्यादि ग्रीक पुरुषोत्तमांचीं नांवें मानवी संस्कृति असेतों-पर्यंत अमर राहतील. त्यांच्या काळीं जगांत अशीच भावना होती कीं, शिक्षण–शिक्षण म्हणजे काय ? ग्रीसमध्यें राहणें म्हणजेच सुसंस्कृत होणें होय. गगनाल गवसणी घालणाऱ्यांचा हा देश. त्यांच्या भूमीवरून जाणाऱ्या माझ्यासारख्य सामान्य पांथस्थाला तेवढा स्पर्शहि भाग्यदाता वाटतो.

थिसालोनिकी गांवांत जशीं द्राक्षें पाहिलीं, तशीं इतर कोठें पाहायला मिळालीं नाहींत.— ताजीं, सुंदर, काळीभोर टपोरीं द्राक्षें. आणि स्वस्त तरी किती म्हणतां ? त्या शहरांच्या बाजारांत हिंडतांना मीं अशीं द्राक्षें पाहिलीं आणि एक ' द्राक्मा ' ( ग्रीक नाणें ) चीं द्राक्षें मागितलीं. सुमारें पांच आण्यांचीं द्राक्षें इतकीं आलीं, कीं इतर कांहींहि न खातां माझें जेवण त्यांत झालें असतें आणि पुन्हां बरींच शिल्लक राहिलीं असतीं. मी दुकानदाराची क्षमा मागून अर्ध्या द्राक्माचींच द्राक्षें घेतलीं, आणि तें ओझें घेऊन टेकडी चढूं लागलों. टेकडीवर चढतांना मला आढळलें कीं, बहुतेक प्रत्येक घराच्यासमोर द्राक्षांचा मांडव आहे आणि त्या मांडवांतून द्राक्षांचे घडच्या घड लोंबत आहेत. अशाच एका मांडवाच्या उपाहारगृहांत मी चहासाठीं बसलों, तेव्हां दोनतीन गिऱ्हाइकें आपल्या खुर्च्यांवरूनच मांडवावरचीं द्राक्षें तोडून खात आहेत असें दिसलें. उपाहारगृहाचा मालक चहा घेऊन माझ्याकडे आला आणि खुणेनें त्यानें मला सुचविलें, " तुम्हीहि हवीं तर खा वाटेल तितकीं द्राक्षें. त्यासाठीं कांहीं पैसा घेत नाहीं आम्ही." अशीं मनसोक्त द्राक्षें खाण्याचीं स्वप्नें आम्ही लहानपणीं रंगवीत असूं. पण खरोखरच असा एखादा देश जगांत असेल आणि तेथें आपण कधीं जाऊं असें मात्र त्यावेळीं वाटलें नव्हतें.

कधीं काळीं आपण ग्रीसबद्दल लिहिलेंच, तर ' तत्त्वज्ञांचा, गाढवांचा आणि द्राक्षांचा देश ' असेंच त्याचें वर्णन करायचें, असें त्यावेळीं माझ्या मनांत आलें.

थिसालोनिकींत एकदोन छोट्या गमती दिसल्या. पहिली म्हणजे बूटपॉलिशचें वेड आणि दुसरी म्हणजे फोटोचें. दर पांचसहा पावलांवर पॉलिश करणाऱ्यांचे स्टँड होते. प्रत्येक स्टँड म्हणजे मोठ्या देव्हाऱ्यासारखा सजवलेला. त्याच्या उतरत्या पायऱ्यांवर निदान पंचवीसतीस तऱ्हांच्या रंगीबेरंगी बाटल्या आणि डब्या ठेवलेल्या. खरोखरच त्या सर्वांत पॉलिश होतें, कीं सोड्याच्या दुकानांत हिरवें तांबडें पाणी भरून ठेवलेल्या शोभेच्या बाटल्यांसारख्या त्या दिखाऊ होत्या, कोण जाणे ! या गांवांत कित्येक ठिकाणीं तर मला ' हेअर कटिंग सलून'सारखीं बूटपॉलिशचीं दुकानेंच दिसलीं. त्या दुकानांत जायचें, उंच खुर्चीवर बसायचें आणि समोरच्या लहान मेजावर पाय टाकून बूट-पॉलिश करून घ्यायचें. फोटोच्या छंदाचीहि तीच तऱ्हा. दर पांचदहा मिनिटाला कोणी व्यावसायिक किंवा हौशी छायाचित्रकार तुम्हांला रस्त्यांत गांठतो आणि फोटो काढून घेण्याचा आग्रह करतो. त्यांना ' नको ' म्हटलें तरी ते—खोटी कां असेना--पण कॅमेऱ्याची कळ दाबतातच, आणि आपला फोटो तयार आहे असा भास निर्माण करतात. समुद्रकांठावर ' व्हाइट टॉवर ' नांवाचा शुभ्र मनोरा आहे. त्या उंच मनोऱ्यावर जाऊन मी शहराची शोभा पहात असतांनाच एक छायाचित्रकार तेथें अचानक उद्भवला आणि ' फोटो काढल्याशिवाय आतां तुम्हांला सोडीत नाहीं ' अशा जवळजवळ धमकीनेंच त्यानें माझा फोटो काढला. आपल्या पत्त्याचें कार्ड माझ्या हातांत देऊन आणि संध्याकाळीं पांच वाजतां येऊन फोटो घेऊन जाण्याचें निमंत्रण देऊन तो पसार झाला. त्यामुळे संध्याकाळीं त्या अज्ञात छायाचित्रकाराचा पत्ता शोधण्यांत माझा तासभर वेळ आणि मग पांच सहा ' द्राक्मा ' वायां गेले.

ग्रीसमध्यें भारतीय माणसाची जेवणाची मात्र अडचण होत नाहीं. हा उष्ण देश असल्यामुळें असेल, पण तेथें भात आणि मसाल्याचे जिन्नस असलेलें चमचमीत कालवण मिळूं शकतें. युरोपमधील कडक शिस्त आणि औपचारिकपणा येथें आढळत नाहीं. कोणाच्या वागण्यांत तुटकपणा, तुसडेपणा दिसत नाहीं. त्यामुळें आमच्याकडील माणसाला येथें अगदीं मनमोकळें वाटतें. कोणी

रस्त्यांत अगर उपाहारगृहांत " इंडिया ? नेहरू ? " असे तुटक इंग्रजी शब्द काढतो, तर कोणी फ्रेंचमधून " कमिअलेझ्वु मेस्युअर ? " ( ' कसें काय, ठीक आहे ना ? ' ) असे अभिवादनात्मक उद्‌गार काढतो. पण आपला 'मास कॉंटॅक्ट ' एवढ्यावरच थांबतो, आणि इंग्रजी चित्रपट चुकून पहायला आलेल्या आपल्याकडील गांवढळाप्रमाणें आपण मग ' गांव पहात ' बसतों.

रात्रीं थिसालोनिका स्टेशनच्या प्रतीक्षागृहांत आलों. रात्र तेथें काढावी आणि सकाळीं नऊच्या गाडीनें पुढें तुर्कस्थानांत जावें असा माझा उद्देश होता. माझ्यासारखेंच आणखी चारसहा उतारू तेथें पथारी टाकून पडलेले होते. पण रात्रीं अकराच्या सुमाराला स्टेशनवरचे दोन नोकर आले आणि त्यांनीं आम्हांला हुसकून लावायला सुरुवात केली. आम्ही प्रतिकार करूं लागलों. या अपरात्रीं कोठें जायचें हा एक प्रश्न आणि अगदीं थोड्या वेळासाठीं हॉटेलचें एक दिवसाचें भाडें द्यावें लागणार हा दुसरा. अखेर स्टेशनमास्तर स्वतः आला आणि त्यानें आम्हांला तेथें झोंपायला परवानगी दिली. तेथें झोंपणाऱ्या एका व्यक्तीनें मला हिंदींतून " तुम्हीं कुठें जाणार ? " असें विचारलें, तेव्हां मला आश्चर्य वाटलें. त्याची ओळख झाली, तेव्हां कळलें कीं, त्याचें नांव ' शरीफ शेठी ' असें असून तो कराचीचा रहिवासी आहे. साधारण पन्नाशीच्या वयाचा, बुटका, स्थूल असा तो मुसल्मान गृहस्थ पुढें कराचीपर्यंत माझ्या सोबतीला होता. त्यानें तर मला आपल्याबद्दल खूपच मोठमोठ्या गोष्टी सांगितल्या. खरेंखोटें देव जाणें. पण तो म्हणाला, " मीं गांधीजी, पटेल यांच्याबरोबर कॉंग्रेसचं काम केलेलं आहे. मीं काबूलमध्यें अनेक वर्षं होतों. सुभाषचंद्र बोस भारतांतून गेले, तेव्हां ते काबूलमध्यें माझ्या मित्राकडे राहिले होते आणि त्यांची सर्व व्यवस्था मीच केली होती. " हा गृहस्थ ज्या वेळीं मला भेटला, त्या वेळीं मात्र त्याच्यांत देशभक्ति, उदात्तता, ध्येयवाद यांचा लवलेशहि दिसत नव्हता. त्याचीं दोन मुलें इंग्लंडला शिकत होतीं, आणि त्यांना भेटून तो आगगाडीच्या मार्गानें परत पाकिस्तानला जात होता. या मार्गानें तो त्यापूर्वी दोन वेळां गेलेला असल्यानें त्याला त्या मार्गाची चांगली माहिती होती हें ऐकून मला बरें वाटलें.

सकाळीं शरीफ शेठीबरोबर माझा प्रवास सुरू झाला. थिसालोनिकी ते इस्तंबूल हा प्रवास बराच लांबचा होता; पण गाडींत दोन–तीन उतारू ओळखीचे

झाले; त्यामुळें तो कंटाळवाणा वाटला नाहीं. बगदादचा एक व्यापारी आमच्या-बरोबर होता. त्यानें डब्यांतच तुर्की नाण्यांची विक्री करायला सुरुवात केली. फ्रान्समधून पळून आलेला एक तरुण सैनिक घाबरलेला दिसत होता. अल्जि-रियांत लढाईवर जायचा त्याला हुकूम आला होता; पण त्याला तेथें जायला नको होतें; म्हणून तो फ्रान्समधून पळून आला होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहाच्या सुमाराला तुर्कस्थानांतील इस्तंबूल शहराच्या सिरकेसी स्टेशनवर गाडी उभी राहिली आणि एकदम वेगळ्या जगांत आल्याची खूण पटली. युरोपमध्यें कोठें न दिसलेली गडबड, गोंधळ, अस्वच्छता, गर्दी या स्टेशनवर दिसली. धिप्पाड, उग्र तुर्की लोक गबाळ्या आणि अस्वच्छ पोषाखांत फिरतांना अतिशय गोंगाट करीत. अस्ताव्यस्त पसरलेला काळा बुरखा किंवा खांद्याखालीं काळा पोषाख घालून स्त्रिया जमिनीवरच घोळके करून बसल्या होत्या आणि कांहीं जणी मुलांच्या खिल्लारांना बोटाशीं धरून नेत होत्या. फेरीवाले, हमाल, उतारू, आगगाडी, हातगाड्या, मुलें इत्यादींच्या आरडाओरड्यानें स्टेशनला एखाद्या युद्धभूमीचें स्वरूप आलें होतें.

स्टेशनच्या बाहेर पडल्याबरोबर ' ओटेली ओटेली ' असा ओरडा करणारीं पंचवीसतीस पोरें दिसलीं. अनेकांनीं माझ्या कोटाला आणि बाहीला धरलें. हें काय आहे हेंच प्रथम मला समजेना. तेव्हां शेठीनें सांगितलें कीं, ' हॉटेलमध्यें उतरायला जागा हवी काय ? ' असें तीं मुलें विचारीत आहेत. पण शेठीच्या माहितीचें हॉटेल स्टेशनजवळच्याच एका रस्त्यावर असल्यानें आम्ही थेट तेथेंच गेलों. तें बरेंच अंधेरें होतें आणि व्यवस्थाहि साधारणच होती, पण तें सोडून दुसऱ्या अनोळखी हॉटेलांत जाऊं या, असें म्हणायचें धाडस मला होईना. इस्तंबूलच्या त्या उग्र, कांहींशी रानटी छटा असलेल्या संस्कृतीची थोडीफार भीति वाटत होती; केव्हां काय घडेल याचा नेम नाहीं असें वाटत रहायचें आणि तरीहि इस्तंबूल शहर मला आवडलें हें खरें.

इस्तंबूल म्हणजे जगाच्या इतिहासांतील एक महान् शहर. अथेन्स, रोम, जेरुसलेम, पॅरिस आणि इस्तंबूल हीं पांच शहरें म्हणजे मानवी संस्कृतीची घडण करणारीं केंद्रें असें मानलें जातें. इस्तंबूल जेव्हां बादशाही वैभवांत होतें, तेव्हां लंडन आणि पॅरिस हीं नुसतीं खेडीं होतीं. पूर्वेकडील रोमन साम्राज्याची आणि ओटोमन साम्राज्याची राजधानी म्हणून एका काळीं इस्तंबूलनें जगावर

मोठी जरब बसविली होती. कॉन्स्टॅन्टिनोपल हें याच शहराचें दुसरें नांव. Coveted City, Queen of Christiandom या नांवांनीं तें विख्यात होतें. जगांतील सर्वांत मोठ्या मुस्लिम साम्राज्याची ही राजधानी. चेंगीजखान, तैमूरलंग, अक्बर, औरंगजेब हे सारे तुर्कीच होते; यावरून तुर्कांनीं जगावर केवढा दरारा बसविला होता हें लक्षांत येतें; तसेंच दारूगोळ्याचा पहिला वापर करणारा आणि वीस वर्षांत एक कोटी लोकांची कत्तल करणारा चेंगीजखान याच भागांतला हेंहि आठवतें. पण क्रौर्य हेंच इस्तंबूलचें वैशिष्ट्य नव्हे; ज्ञान हाहि त्याचा गाभा होता. इस्तंबूलहून शास्त्री, पंडित, धर्मगुरु युरोपांत पसरले आणि तेथें विद्येचें आणि कलांचें पुनरुज्जीवन झालें. इस्लामी धर्मसंस्थापक महंमद म्हणत असे, "तुर्कांची भाषा शिका, कारण त्यांचें राज्य चिरकाल टिकणारें आहे." व्यापार, नौकानयन, राजनैतिक डावपेंच, कला, इत्यादि सर्व दृष्टींनीं हें शहर अगदीं मोक्याचें असल्यानें त्याच्यावर अनेकदां परचक्र आलें. त्याचें रोमांचकारी वर्णन गिबन या जगप्रसिद्ध लेखकानें 'डिक्लाइन अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' या अभिजात ग्रंथांत केलेलें आहे.

इस्तंबूल शहराचा अर्धा भाग युरोपमध्यें आहे, तर अर्धा भाग आशियांत आहे. या दोन्हींच्या मध्यें 'गोल्डन हॉर्न' नांवाचा समुद्राचा चिंचोळा पट्टा आहे. त्यावर भव्य पूल बांधलेले आहेत. एका काळीं बगदादला जाणारा माल या पुलावर खरीदला जाई आणि विकला जाई. या मालांतच उत्तमोत्तम लावण्यवती स्त्रियांचाहि सौदा होई. पण तो अन्याय, आणि तें वैभवहि आतां लोपलें आहे. आतां इस्तंबूलचें वैभव अनेक वस्तुसंग्रहालयें आणि 'अया सोफिया' सारख्या जगप्रसिद्ध मशिदी यांतच सामावलेलें आहे, असें दिसून येतें. या शहरांतला मसाले–बाजार आणि फळ–बाजारहि पहाणाऱ्यावर छाप ठेवून जातो.

आम्हीं दिवसभर इस्तंबूलचें वैभव पाहिलें, आणि संध्याकाळीं थकून हॉटेलवर आलों. तेव्हां शेठी म्हणाला, "चल, आपण 'बे अग्लू' भागांत जाऊन रात्रींची मौज पाहूं." आम्ही जेवण करून कोठल्याशा बसनें गेलों. हा 'बे अग्लू' भाग म्हणजे इस्तंबूलमधील पॅरिसच. तमाशा, नाइट–क्लब, नाट्य-गृहें इत्यादि सारे रंगेल प्रकार या भागांत आहेत. शेठीनें मला स्पष्टच सांगितलें, "हें पहा, माझ्याजवळ कांहीं पैका नाहीं; पण फुकटांत जेवढी मौज करतां येईल तेवढी करूं."

मीं म्हटलें, "एखाद्या तमाशाचीं तिकिटं मी काढीन. तुझी मौजेची कल्पना तेवढ्यावरच थांबली तर ठीक; पण बरंच कांहीं फुकटांत पाहून घ्यायचा प्रयत्न करून, या परदेशांत मीहि तुझ्याबरोबरच गोत्यांत येईन असं कांहीं तूं करूं नकोस !" आम्ही एका तमाशाला गेलों आणि रात्रीं बाराच्या सुमाराला परतूं लागलों, तेव्हां शेठी म्हणाला, "चला आतां नाइट–क्लबांत जाऊं." मीं म्हटलें "पॅरिसमध्यें मीं सारं कांहीं पाहिलं आहे." त्यावर त्यानें सांगितलें, "तूं कां चिंता करतोस ? मला हें गांव चांगलं माहीत आहे. तूं फक्त माझ्या-बरोबर चल. कांहीं द्यायचं नाहीं आणि घ्यायचं नाहीं. फुकटांत थोडी मौज तर पाहूं !"

त्यानें मला आपल्याबरोबर अनेक नाइट–क्लबमध्यें नेलें. इस्तंबूलच्या मानानें ते क्लब खरोखरच चांगले होते, आणि त्यांची रचनाहि पॅरिसच्या क्लबांच्या धर्तीवर होती. प्रत्येक क्लबांत दहापंधरा तरी सुंदर तरुणी होत्या. चुंबन, आलिं-गन इत्यादि प्रकार या क्लबांतून उघडपणें चाललेले दिसत होते. शेठी आणि मी क्लबांत जात असूं, तेथें थोडा वेळ बसून गंमत पाहिल्यावर शेठी तिथल्या व्यवस्थापकाला म्हणे, "क्लब चांगला आहे; पण माझ्या या मित्राला कांहीं मद्य घ्यायचं नाहीं. मी नंतर येईन पुन्हा–" असें म्हणून तो मला घेऊन बाहेर पडे. जास्तींत जास्त फायदा मोफत कसा घेतां येईल हें त्याला चांगलेंच माहीत होतेंसें दिसलें. रात्रीं बऱ्याच उशीरां आम्ही हॉटेलमधें परत आलों. दुसऱ्या दिवशीं लौकर उठायची घाई नव्हती. कारण बगदादला जाणारी गाडी हदर-पाशाहून, ( इस्तंबूलजवळचें रेल्वे-स्टेशन ) फक्त सोमवारीं आणि शुक्रवारींच सुटत होती. त्यामुळें आम्हांला इस्तंबूलमध्यें दोन दिवस मुक्काम करावा लागला. तरी पण वाटेंत उतरून अंकारा ( तुर्कस्तानची राजधानी ) पहावें म्हणून आम्ही हैदरपाशा–अंकारा गाडीनें रविवारीं संध्याकाळीं निघालों आणि सकाळीं अंकाराला पोंचलों. इस्तंबूलच्या मानानें अंकारा एकदम आधुनिक वाटतें. त्याची रचनाच पाश्चिमात्य शहराच्या धर्तीवर केलेली आहे. तरी पण तेथील लोक, त्यांची रहाणी, त्यांचा गबाळेपणा यावरून हें तुर्कस्तान आहे हें पटत होतें.

अंकारांत फिरतां फिरतां माझा मित्र शेठी दमून फळ–बाजारांत बसला आणि मी शहरांत चक्कर टाकण्यासाठीं गेलों. एका लहानशा उपाहारगृहांत

जाऊन मीं काय खावें याचा विचार करूं लागलों, इतक्यांत एक तुर्की बाई आली आणि माझ्या टेबलापाशीं बसली. तिनें मागितलेला पदार्थ तांदळाच्या खिरीसारखा चांगला मोहक वाटला; पण त्याचें नांव मला माहीत नव्हतें. म्हणून वेटरला बोलावून, मीं त्या बाईसमोरच्या बशीकडे बोट दाखवून मला तों हवा असें सुचविलें. पण बराच वेळ झाला, तरी माझ्या टेबलावर कांहीं येईना. दरम्यानच्या काळांत बाई आपलें खाणें संपवूनहि गेली. मीं वेटरला हांक मारली. तेव्हां त्यानें बिल आणून माझ्या टेबलावर ठेवलें. मी चकितच झालों. मीं घेतलें तर कांहीं नाहीं आणि हें बिल कशाचें झालें? मी खुणेनें विचारूं लागलों, तेव्हां तो वेटर आपल्या भाषेंत कांहीं सांगूं लागला. मला तें समजेना. मग आम्हीं दोघेहि मालकाकडे गेलों. या वादांत इंग्रजी जाणणाऱ्या एका तुर्की गृहस्थानें मध्यस्थी केली; तेव्हां मला समजलें कीं, ती बाई माझ्याबरोबर आली आहे असें वेटरला वाटलें होतें. 'ती खात असलेला पदार्थ मला हवा' अशी खूण मीं केली होती; तिचा अर्थ 'तिचें बिल मी देईन' असा त्या वेटरनें घेतला होता!

हा वाद कसाबसा मिटवून मी फळ–बाजारांत आलों. शेठीनें आणि मीं एक भलेंमोठें टरबूज घेऊन खाल्लें आणि गांवांत थोडें भटकून संध्याकाळीं स्टेशनवर परत आलों. रात्रीं आठच्या सुमाराला गाडी निघाली. हा सतत चार दिवसांचा प्रवास होता. गाडींतील बहुतेक प्रवाशांनीं भली मोठी तयारी केलेली होती. परातीएवढे मोठे किंवा दुध्या भोपळ्यासारखे लांबलचक ओबडधोबड पाव, तांदूळ, भांडींकुंडीं, मीठमसाला इत्यादि सामान बहुतेक उतारूंच्याबरोबर दिसत होतें. प्रवास लांबचा असल्यानें आगगाडींत स्वैंपाक करायची सोय होती; पण आम्हीं बरोबर कांहींच घेतलेलें नसल्यानें आमचें मात्र काय होणार अशी चिंता पडली. तरी पण गाडींत जेवणाचा डबा होता, त्यावर भागवून घेऊं असें वाटलें. या डब्यांत दुसऱ्या दिवशीं दुपारीं जेवायला गेलों, तेव्हां चांगलीच निराशा झाली. कसली तरी उग्र वासाची पालेभाजी, उकडून तिखटमीठ घातलेले मांसाचे तुकडे आणि पाव, एवढेंच बेचव जेवण होतें. शेठीनें गाडींत एक तुर्की मद्याची बाटली घेतली; पण मला तें इतकें कडक लागलें कीं, तुर्की मद्याचा मीं धसकाच घेतला. अंकारा तें बगदाद हे चार दिवस मोठ्या त्रासाचे गेले. सहासहा, आठआठ तास स्टेशन नाहीं, गाडी सारखी वाळवंटांतून,



इस्तंबूल येथील हिपोड्रोम चौक



पॅरिसच्या तमाशांतील एक तरुणी

धुळींतून चाललेली, मनस्वी उकाडा आणि पिण्याचें चांगलें पाणीसुद्धां नाहीं, अशा परिस्थितींत केलेला तो प्रवास म्हणजे एक दिव्यच होतें. पिण्याच्या पाण्याची टंचाई पाहून कुठल्यातरी लहान स्टेशनवर आम्हीं दोन भलीं मोठीं कलिंगडें घेतलीं. तहान लागली, कीं त्याचा एक लचका तोडून खायचा.

असा कष्टप्रद प्रवास करतांनाच रात्रीं गाडी तुर्कस्तान – सीरियाच्या सरहद्दींत उभी राहिली. शेठीचा पासपोर्ट पाहून सीरियाच्या अधिकाऱ्यानें सांगितलें, "यावर सीरियाचा व्हिसा नाहीं. खालीं उतरा." त्यावर शेठीनें सांगितलें कीं, "पाकिस्तानच्या नागरिकांना सीरियाचा व्हिसा घेण्याची आवश्यकता नसते." पण अधिकारी म्हणूं लागला कीं, "खालीं उतरा आणि फार तर सीरियाच्या नागरिकाचा जामीन देऊन पुढें जा." आतां या अपरात्रीं परक्या देशांत जामीन कसा देणार ? पण शेठी म्हणाला, "स्टेशनमास्तरकडे चला. मी तुमची खात्री करून देतों." दोघेहि खालीं उतरले आणि पंधरा मिनिटांनीं शेठी विजयी मुद्रेनें परत आला. त्यानें काय केलें, कोण जाणे ! पण त्याचा पुढचा प्रवास निर्वेध झाला, एवढें मात्र खरें.

चार दिवसांच्या या कष्टदायक प्रवासानें मी थकलों होतों. किंचित् तापहि येत होता. पण बगदादला उतरल्यावर, 'अरेबियन नाइट्स्' मधील या स्वप्ननगरीचें दर्शन घेतल्यावांचून पुढें जावेंसें वाटेना. शेठीला तेवढा उत्साह नव्हता. म्हणून बगदादला भेटलेल्या कलकत्त्याच्या हझरा नांवाच्या एका तरुण विद्यार्थ्याबरोबर मी बगदाद पहायला निघालों. प्राचीन काळीं, हरुन –अल रशिदच्या वेळीं बगदाद शहर वैभवशाली आणि भव्य–गूढ असेल; पण आज मात्र, त्याचें प्राचीन वैभव लुप्त होत असून तें पाश्चिमात्य शहरांची भ्रष्ट नक्कल करतांना दिसतें. किलानी मशिदीजवळच्या भागासारखे कांहीं भाग अजून अरबी सुरस ग्रंथांतील गूढता निर्माण करतात. पण आतां ती गूढ–रम्यता अमेरिकन किंवा फ्रेंच अद्ययावततेवर चिकटल्यासारखी, विशोभित वाटते. तैग्रिस नदीच्या कांठचा भाग मात्र मोठा रमणीय आहे. या नदींतून डाळिंबें-कलिंगडें, अक्रोड, टरबूज इत्यादि भरून लहानलहान नावा संथपणें प्रवाहाबरोबर जातात, तें दृश्य पहात बसावेंसें वाटतें. लोक मात्र अस्वच्छ, बेशिस्त आणि हुमदांडगे वाटले. ते कधीं रस्त्यावर बससाठीं रांग धरायचे नाहींत आणि आगगाडीच्या स्टेशनवरहि तिकिटासाठीं त्यांची यथेच्छ धक्काबुक्की चाललेली

असते. बगदादमध्यें मी चारपांच तासच होतों, या अल्पावधींत झालेलें त्याचें दर्शन कांहीं खास संस्मरणीय नव्हतें. नाहीं म्हणायला एका उपाहारगृहांत घेतलेला दुधाचा चहा तुरट लागला; तो उंटाच्या दुधाचा होता, असें कळल्यावर आमचे चेहेरे अधिकच तुरट झाले, तेवढें आठवतें.

संध्याकाळीं बगदादहून निघालों आणि धूळ खात कसाबसा प्रवास करून सकाळीं बसऱ्याला पोंचलों. बसऱ्याहून आमची 'दारा' नांवाची बोट दुपारीं तीनला सुटणार होती, आणि आठ दिवसांनीं मुंबईला पोंचणार होती. हा बोटीचा प्रवास मोठा औरच होता. सबंध प्रवास उघड्या डेकवरून करायचा. सुमारें दीडदोनशें प्रवासी कसेबसे रहातील एवढ्या जागेंत पांचसहाशें उतारू घुसडलेले होते. बहुतेक उतारू अगदीं गरीब स्थितींतील अरब, मुसलमान किंवा हिंदी होते. त्यांची रहाणी घाणेरडी होती. त्यांच्याबरोबर उघड्या डेकवर आठ दिवस काढायचे म्हणजे – माझ्या छातींत धस्स झालें. पण आतां त्याला कांहीं इलाज नव्हता. बहुतेकांनीं बरोबर स्टोव्ह आणि शेगड्या आणलेल्या होत्या, त्यावर ते स्वयंपाक करीत. अनेक कुटुंबांनीं बसऱ्याहून चारपांच कोंबड्या आणलेल्या होत्या. दर एकदोन दिवसांनीं त्यांतील एकेक कोंबडी कमी होई आणि हळूहळू कोंबड्यांचा कलकलाट कमी होत जाई. स्टोव्हवरील भांड्यांतून कोंबडी उकडून काढतांनाचें तें दृश्य आणि ती सबंध कल्पनाच मनाला कातरून जाई.

बोटीवर जेवणाचें हॉटेल होतें; पण तें इतकें रानटी होतें कीं, एका टेबलावर गिऱ्हाईक जेवत बसलेलें असलें, तर शेजारच्या टेबलावर आचारी संध्याकाळच्या जेवणासाठीं बकऱ्याचा पाय तासतांना दिसायचा! कोणी जिन्यावर, तर कोणी येण्याजाण्याच्या वाटेवर आपला संसार मांडलेला होता. कोणी हौशी आणि संसारी लोक तर बोट चालू असतांना पाण्यांत गळ टाकीत आणि मिळालेल्या माशांचें कालवण करून खात. काळ्या बुरख्यांतल्या, मुलाबाळांना उघडेंनागडें ठेवणाऱ्या, उग्र दर्पाच्या अरबी स्त्रिया अतिशय गलिच्छपणें वागत आणि वाटेल तेथें थुंकत. त्यांचे 'मर्द' हुक्का ओढीत वाटेल तेथें पडलेले असत. जागेसाठीं भांडणें, मारामाऱ्या होत. सटरफटर चोऱ्याहि होत. कोणी एक बाई एकुलतें एक भांडें घेऊन बोटीवर चढलेली होती; तें चोरीला गेल्यावर तिनें मूल गेल्यासारखा आक्रोश केला.

या गर्दीचें एक कारण असें कीं, या भागांतील लोकांची आर्थिक दुःस्थिति. ते जवळपास इराण, मस्कत इत्यादि ठिकाणच्या तेल–कारखान्यांत मजुरी करण्यासाठीं जातात. बसरा ते मुंबई तिसऱ्या वर्गाचें भाडें ८॥ पौंड, तर पहिल्या वर्गाचें भाडें ३० पौंड. दोनच वर्ग आणि त्यांच्या दरांत फरक फार मोठा; त्यामुळें बहुतेकांना या कनिष्ठ वर्गातून प्रवास केल्याशिवाय गत्यंतर नसतें. वाटेंत माल आणि माणसें चढविण्या उतरविण्याकरितां अनेक ठिकाणीं बोट थांबली. त्यांपैकीं मस्कत हें गांव संस्मरणीय वाटलें. ऐन समुद्रांत उंच उंच पहाडांवर हें गांव वसलेलें आहे आणि त्याच्या आसपास मोठमोठ्या सुसरी वळवळत असतात. या ठिकाणीं चांगलीं नारळाएवढीं डाळिंबें फक्त दीड–दोन आण्यांना मिळतात. कित्येक दिवसांनंतर, बोटीवर चढल्यावर मीं पुन्हा भारतीय रुपयाचें नाणें पाहिलें. तेंच नाणें बसऱ्यामध्येंहि चालूं शकत होतें.

बोटीचा सात दिवसांचा कष्टदायक प्रवास संपला, तेव्हां कराची बंदरांत आम्ही उतरलों. बोट सात–आठ तास थांबणार होती, म्हणून खालीं जाण्यासाठीं आम्हांला पास दिलेले होते. कराचींत पांचसहा तास फिरून मी परत बोटीवर चढलों. पास देऊन पासपोर्ट मागितला; पण पासपोर्टांच्या ढिगांत माझा पासपोर्ट दिसेना. त्या अधिकाऱ्यानें बरीच शोधाशोध केली. मग त्यानें माझें तिकिट पाहिलें. त्या वेळीं तो आश्चर्यानें म्हणाला, "तुम्ही चुकीच्या बोटीवर चढलां आहांत! ही बोट मुंबईहून आली आहे आणि बसऱ्याला निघाली आहे." हें ऐकतांच मीं पास परत घेतला आणि धांवतच त्या बोटींतून उतरलों. खालीं येऊन पहातों, तों तिच्याशेजारींच 'दारा' ही आमची बोट उभी होती! दोन्ही बोटी एकाच कंपनीच्या, एकाच रंगाच्या आणि अगदीं जवळजवळ होत्या; त्यामुळें हा घोटाळा झाला होता!

त्या वेळीं माझी बोट अगदीं सुरू व्हायलाच आली होती; मला थोडा जरी उशीर झाला असता, तरी विरुद्ध दिशेनें माझा प्रवास झाला असता आणि मग ती चूक कशी आणि कोठें दुरुस्त करतां आली असती, कोण जाणे, या कल्पनेनें मला एका मोठ्या संकटांतून सुटल्यासारखें वाटलें. दुसऱ्या दिवशीं दुपारीं ही बोट मुंबई बंदराला लागली आणि माझ्या या प्रदीर्घ प्रवासाचा शेवट झाला.

अशा या धांवत्या, जलद प्रवासांतून अखेर मनावर कोणतें चित्र रहातें?—जग विविध आहे. अमर्याद आहे; आंपण जगाच्या ज्या कोपऱ्यांत रहातों, तो अगदीं छोटा आहे; त्यांतील आनंद, मान, अवमान, भलेंबुरें—सारेंच लहान आहे, आणि या जाणिवेनें आपण जगावें एवढी भावना शिल्लक राहिली, तरी खूप झालें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्र
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................

६८

# जगाला वेगळी जीवन-दृष्टि देणारें पॅरिस

सौंदर्यनगरींची ही राणी. कलावंत, साहित्यिक, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ अशा अनेक क्षेत्रांतील लहानमोठ्यांना वाटतें, एकदां पॅरिसला जाऊन यावें, आणि या क्षेत्रांत कांहीं अधिकार नसणाऱ्यांचीहि तीव्र इच्छा असते कीं, एकदां पॅरिस पाहून यावें. कला, उपभोग, जीवनानंद इत्यादींचा मेरुमणि म्हणजे पॅरिस. भारतांतील धार्मिकाला वाटतें, डोळे मिटण्यापूर्वी एकदां काशीला जाऊन यावें, अशीच जगांतील सर्व भागांतील रसिकांची मनीषा असते कीं, मरण्यापूर्वी एकदां तरी पॅरिस पहावें. "See Paris and Live" अशी म्हणच पडली आहे. कुणाला पॅरिसबद्दलचें कुतूहल इतिहास वाचून निर्माण झालेलें असतें, तर कुणाला चित्रपट पाहून, लेख वाचून, गोष्टी ऐकून अथवा कथा वाचून निर्माण झालेलें असतें. अशा या मोहमयी पॅरिस–नगरीमध्यें आहे तरी काय? ही उत्सुकता अनेकांच्या प्रमाणेंच मलाहि वाटत होती. स्त्रिया आणि मद्य यांबद्दल पॅरिस प्रसिद्ध आहे असें आपण नेहमीं ऐकतों. कुणी त्यांत कलावंतांचा समवेश करतात. पण कोणत्याहि मोठ्या शहरांत (भारतांत नव्हे) मद्य मिळतेंच, आणि सुंदर स्त्रिया नि कलावंतहि दुर्मिळ नसतात. मग पॅरिसचीच एवढी ख्याति कां? जगांतील सर्व शहरांची सम्राज्ञी ('क्वीन ऑफ सिटीज्') असें या नगरीला कां म्हणतात? ही यक्षनगरी आहे तरी कशी?

सप्टेंबर १९५६ च्या एका सकाळीं सहा वाजतां मी ब्रुसेल्सहून पॅरिसला आलों, तेव्हां माझ्या मनांत हेच विचार घोळत होते. गारदु-नॉर्द स्टेशनवर आमची गाडी थांबली होती. पावसाची लहानशी सर नुकतीच पडून गेलेली होती. त्या अवाढव्य स्टेशनवर उतारूंची गर्दी उसळली होती. निरनिराळ्या प्लॅटफॉर्म्सवर दहा-बारा गाड्या उभ्या होत्या. फ्रेंच भाषेंतील कोमल शब्द सारखे कानांवर पडत होते. साऱ्या स्टेशनवर गडबड आणि गोंगाट होता. लंडन आणि पॅरिस यांची तुलना वारंवार मनांत येई. लंडनचें स्टेशन केवढेंहि मोठें असलें आणि लोकांची कितीहि गर्दी असली तरी त्या मानानें तिथें खूपच शांतता असते. प्रवास करायचा तोहि मोठ्या गांभीर्यानें, धार्मिक बाब असल्यासारखा करायचा ही इंग्रज माणसाची वृत्ति. त्याला गडबड, घाई असली, तरी तसें तो दाखवणार नाहीं. पण पॅरिसच्या स्टेशनवर तशी लपवाछपवी दिसली नाहीं. तेथील लोक जणूं म्हणत होते, ‘ आम्ही घाईत आहों असं दिसतं आहे ना ? मग तें खरं आहे. आम्ही हे असे आहोंत ! ’ पॅरिसला आल्याबरोबर, किंबहुना येण्याच्या दोनतीन तास आधींच माझ्या लक्षांत आलें कीं, इतर कोणत्याहि शहराप्रमाणेंच पॅरिसचे लोकहि उद्योगी आहेत. पहांटे साडेतीन-चार वाजल्यापासून आमच्या डब्यांत गर्दी होऊं लागली. कारण पॅरिसला नोकरी करणारे हजारों लोक ऐंशी तें शंभर मैलांच्या अंतरावरून येतात. त्यांना भल्या पहाटें उठून नोकरीसाठीं यावें लागतें. त्यांच्यांत कांहीं स्त्रियाहि असतात. गाडींतील बहुतेक परकीय प्रवासी त्यांच्याकडे निरखून पहात असतात. त्यांच्या मनांत येतें, ‘ अरे ! पॅरिसच्या युवती जगांत एवढ्या प्रसिद्धि आहेत, त्या याच का ? या सुंदर आणि नाजुक आहेत, पण इतर युरोपियन तरुणींत आणि यांच्यांत कांहीं तसा फरक दिसत नाहीं ! ’

स्टेशनवर उतरल्याबरोबर पहिलें काम म्हणजे ‘ पौंड ’ बदलून ‘ फ्रॅन्क ’ हें फ्रेंच नाणें घ्यायचें. एका पौंडाला ( १ पौंड=१३। रु. ) सुमारें साडे नऊशें फ्रॅंकस् मिळतात. रेल्वे-स्टेशन, मनी-चेंजर, मोठी हॉटेल्स अशा थोड्याच ठिकाणीं लोकांना इंग्रजी समजते. बाकी सर्वांना फ्रेंच आणि थोडी डच व त्याहून थोडी जर्मन भाषा समजते. इंग्रजी त्यामानानें अगदीं क्वचित्. मला कामचलाऊ फ्रेंच भाषा येते, त्यामुळें फारशी अडचण भासली नाहीं. पण मुंबईला ऐकलेली फ्रेंच भाषा, लंडनला शिकलेली फ्रेंच आणि पॅरिसची फ्रेंच यांच्या

उच्चारांत इतका फरक, कीं, जणूं या एकाच भाषेच्या तीन निरनिराळ्या बोली आहेत. हातांत फ्रेंच नोटा आणि नाणीं आल्यावर मी प्रथम चहा घ्यायला स्टेशनवरच्याच लहानशा उपहारगृहांत गेलों. 'हॉटेलमध्यें गेलों', असें लिहिणार होतों, पण राहाण्याजेवण्याच्या जागेला तिकडे 'हॉटेल' म्हणतात. चहा कॉफी आणि फराळाचें जिन्नस मिळण्याच्या ठिकाणाला 'कॅफे' म्हणतात. व अधिक जिन्नस, जेवण आणि वेटर–सर्व्हिस असणाऱ्या ठिकाणांना 'रेस्टरॉ' ( रेस्टॉरन्ट नव्हे ) म्हणतात. पॅरिसमध्यें पेयांचा म्हणजे मद्य आणि कॉफी यांचा प्रसार अतिशय. मद्याचे 'बार' पहांटेपासून रात्रीं एकपर्यंत आणि कांहीं 'बार' तर चोवीस तास उघडे असतात. कित्येक ठिकाणीं कॉफीला आणि मद्याला सारखीच किंमत पडते. 'कोका–कोला' तर बऱ्याच ठिकाणीं मद्यापेक्षां महाग असतो. चहाला कॉफीच्या दुप्पट किंमत पडते. कॉफी तीस ते चाळीस फ्रॅंक्सना, मद्य तीस फ्रॅंक्सना आणि चहा ६० ते ८० फ्रॅंक्सना मिळतो. एका अर्थानें पाहिलें, तर पॅरिसला पाण्यापेक्षांहि दारू स्वस्त आहे असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण 'फ्रेंच वाईन'ला ३० फ्रॅंक्स पडतात, तर 'फिल्टर्ड' पाण्याला ४० फ्रॅंक्स पडतात.

गाग-दु-नॉर्दवरून मला पोर्त द आर्लिन्स या स्टेशनकडे जायचें होतें. म्हणून मी जिना उतरून 'मेट्रो'ला आलों. मुंबईच्या माणसाला 'मेट्रो' म्हटल्यावर जी जाणीव होते ती पॅरिसची नव्हे. पॅरिसच्या 'ट्यूब'—किंवा जमिनीखालच्या आगगाड्यांना 'मेट्रो' म्हणतात. लंडनच्या 'ट्यूब' इतकी हीं स्टेशनें स्वच्छ नाहींत, पण पॅरिसच्या 'ट्यूबस्'चे रस्ते समजायला फार सोपे आहेत. प्रत्येक स्टेशनवर विजेच्या बटनांचा एक मोठा नकाशा असतो. त्याखालीं प्रत्येक स्टेशनचें नांव असतें. आपल्याला ज्या स्टेशनला जायचें आहे, त्या स्टेशनच्या नांवापुढील बटन दाबलें, कीं, मार्ग प्रकाशमय होतो आणि गाडी कुठें बदलायची हेंहि विजेच्या दिव्यांच्या साहाय्यानें आपोआपच दाखविलें जातें. आपल्याकडील एक उदाहरण घेऊं म्हणजे या पद्धतीची कल्पना येईल.—मला कोल्हापूरहून मुंबईला जायचें आहे, तर मी कोल्हापूर स्टेशनवरील नकाशाच्या खालीं जीं स्टेशनांचीं नांवें असतात, त्यांपैकीं 'मुंबई' या नांवाजवळचें बटन दाबायचें, त्याबरोबर नकाशावरील कोल्हापूर ते मुंबई या सर्व स्टेशनांचा मार्ग प्रकाशमय होतो आणि पुणें येथें गाडी बदलायची

सप्टेंबर १९५६ च्या एका सकाळीं सहा वाजतां मी ब्रुसेल्सहून पॅरिसला आलें, तेव्हां माझ्या मनांत हेच विचार घोळत होते. गारदु–नॉर्द स्टेशनवर आमची गाडी थांबली होती. पावसाची लहानशी सर नुकतीच पडून गेलेली होती. त्या अवाढव्य स्टेशनवर उतारूंची गर्दी उसळली होती. निरनिराळ्या प्लॅटफॉर्म्सवर दहा-बारा गाड्या उभ्या होत्या. फ्रेंच भाषेतील कोमल शब्द सारखे कानांवर पडत होते. साऱ्या स्टेशनवर गडबड आणि गोंगाट होता. लंडन आणि पॅरिस यांची तुलना वारंवार मनांत येई. लंडनचें स्टेशन केवढेंहि मोठें असलें आणि लोकांची कितीहि गर्दी असली तरी त्या मानानें तिथें खूपच शांतता असते. प्रवास करायचा तोहि मोठ्या गांभीर्यानें, धार्मिक बाब असल्यासारखा करायचा ही इंग्रज माणसाची वृत्ति. त्याला गडबड, घाई असली, तरी तसें तो दाखवणार नाहीं. पण पॅरिसच्या स्टेशनवर तशी लपवाछपवी दिसली नाहीं. तेथील लोक जणूं म्हणत होते, ' आम्ही घाईत आहों असं दिसतं आहे ना ? मग तें खरं आहे. आम्ही हे असे आहोंत ! ' पॅरिसला आल्याबरोबर, किंबहुना येण्याच्या दोनतीन तास आधींच माझ्या लक्षांत आलें कीं, इतर कोणत्याहि शहराप्रमाणेंच पॅरिसचे लोकहि उद्योगी आहेत. पहांटे साडेतीन–चार वाजल्यापासून आमच्या डब्यांत गर्दी होऊं लागली. कारण पॅरिसला नोकरी करणारे हजारों लोक ऐंशी तें शंभर मैलांच्या अंतरावरून येतात. त्यांना भल्या पहाटें उठून नोकरीसाठीं यावें लागतें. त्यांच्यांत कांहीं स्त्रियाहि असतात. गाडींतील बहुतेक परकीय प्रवासी त्यांच्याकडे निरखून पहात असतात. त्यांच्या मनांत येतें, ' अरे ! पॅरिसच्या युवती जगांत एवढ्या प्रसिद्धि आहेत, त्या याच का ? या सुंदर आणि नाजुक आहेत, पण इतर युरोपियन तरुणींत आणि यांच्यांत कांहीं तसा फरक दिसत नाहीं ! '

स्टेशनवर उतरल्याबरोबर पहिलें काम म्हणजे ' पौंड ' बदलून ' फ्रॅन्क ' हें फ्रेंच नाणें घ्यायचें. एका पौंडाला ( १ पौंड=१३। रु. ) सुमारें साडे नऊशें फ्रॅंकस् मिळतात. रेल्वे–स्टेशन, मनी–चेंजर, मोठी हॉटेल्स अशा थोड्याच ठिकाणीं लोकांना इंग्रजी समजते. बाकी सर्वांना फ्रेंच आणि थोडी डच व त्याहून थोडी जर्मन भाषा समजते. इंग्रजी त्यामानानें अगदीं क्वचित्. मला कामचलाऊ फ्रेंच भाषा येते, त्यामुळें फारशी अडचण भासली नाहीं. पण मुंबईला ऐकलेली फ्रेंच भाषा, लंडनला शिकलेली फ्रेंच आणि पॅरिसची फ्रेंच यांच्या

उच्चारांत इतका फरक, कीं, जणूं या एकाच भाषेच्या तीन निरनिराळ्या बोली आहेत. हातांत फ्रेंच नोटा आणि नाणीं आल्यावर मी प्रथम चहा घ्यायला स्टेशनवरच्याच लहानशा उपहारगृहांत गेलों. 'हॉटेलमध्यें गेलों', असें लिहिणार होतों, पण राहाण्याजेवण्याच्या जागेला तिकडे 'हॉटेल' म्हणतात. चहा कॉफी आणि फराळाचें जिन्नस मिळण्याच्या ठिकाणाला 'कॅफे' म्हणतात. व अधिक जिन्नस, जेवण आणि वेटर–सर्व्हिस असणाऱ्या ठिकाणांना 'रेस्टरॉ' ( रेस्टॉरन्ट नव्हे ) म्हणतात. पॅरिसमध्यें पेयांचा म्हणजे मद्य आणि कॉफी यांचा प्रसार अतिशय. मद्याचे 'बार' पहांटेपासून रात्रीं एकपर्यंत आणि कांहीं 'बार' तर चोवीस तास उघडे असतात. कित्येक ठिकाणीं कॉफीला आणि मद्याला सारखीच किंमत पडते. 'कोका–कोला' तर बऱ्याच ठिकाणीं मद्यापेक्षां महाग असतो. चहाला कॉफीच्या दुप्पट किंमत पडते. कॉफी तीस ते चाळीस फ्रॅंक्सना, मद्य तीस फ्रॅंक्सना आणि चहा ६० ते ८० फ्रॅंक्सना मिळतो. एका अर्थानें पाहिलें, तर पॅरिसला पाण्यापेक्षांहि दारू स्वस्त आहे असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण 'फ्रेंच वाईन'ला ३० फ्रॅंक्स पडतात, तर 'फिल्टर्ड' पाण्याला ४० फ्रॅंक्स पडतात.

गाग-दु-नॉर्दवरून मला पोर्त द आर्लिन्स या स्टेशनकडे जायचें होतें. म्हणून मी जिना उतरून 'मेट्रो'ला आलों. मुंबईच्या माणसाला 'मेट्रो' म्हटल्यावर जी जाणीव होते ती पॅरिसची नव्हे. पॅरिसच्या 'ट्यूब'—किंवा जमिनीखालच्या आगगाड्यांना 'मेट्रो' म्हणतात. लंडनच्या 'ट्यूब' इतकीं हीं स्टेशनें स्वच्छ नाहींत, पण पॅरिसच्या 'ट्यूबस्'चे रस्ते समजायला फार सोपे आहेत. प्रत्येक स्टेशनवर विजेच्या बटनांचा एक मोठा नकाशा असतो. त्याखालीं प्रत्येक स्टेशनचें नांव असतें. आपल्याला ज्या स्टेशनला जायचें आहे, त्या स्टेशनच्या नांवापुढील बटन दाबलें, कीं, मार्ग प्रकाशमय होतो आणि गाडी कुठें बदलायची हेंहि विजेच्या दिव्यांच्या साहाय्यानें आपोआपच दाखविलें जातें. आपल्याकडील एक उदाहरण घेऊं म्हणजे या पद्धतीची कल्पना येईल.——मला कोल्हापूरहून मुंबईला जायचें आहे, तर मी कोल्हापूर स्टेशनवरील नकाशाच्या खालीं जीं स्टेशनांचीं नांवें असतात, त्यांपैकीं 'मुंबई' या नांवाजवळचें बटन दाबायचें, त्याबरोबर नकाशावरील कोल्हापूर ते मुंबई या सर्व स्टेशनांचा मार्ग प्रकाशमय होतो आणि पुणें येथें गाडी बदलायची

अशीहि खूण नकाशावर येते.

पॅरिसच्या ' मेट्रो 'चा आणखी एक विशेष म्हणजे सर्व स्टेशनांना एकच दर. अर्ध्या मैलावरच्या स्टेशनाला तीस फ्रँक्स आणि पोर्त द ला व्हिलेपासून पंचवीस मैलांवर असलेल्या पोर्त द व्हसीय स्टेशनालाहि तीसच फ्रँक्स. सब घोडे बारा टक्के या दराचें प्रथम आश्चर्यच वाटतें. पण समता, बंधुत्व आणि स्वातंत्र्य यांचे संदेश साऱ्या जगाला देणाऱ्या पॅरिस शहरानें ' मेट्रो ' म्हणजे मेट्रोपोलिटनच्या बाबतींत तरी समता पाळली आहे हें पाहून आनंद वाटतो. इतर देशांत उतारूजवळ तिकिट आहे कीं नाहीं हें बहुधा प्रवासाच्या शेवटीं पहातात, पण पॅरिसच्या मेट्रोचें तिकिट स्टेशनांत शिरतांच ' पंच ' केलें जातें. स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ एक पेटी ठेवलेली असते. बहुतेक उतारू आंत शिरल्याबरोबर त्या पेटींत तिकिट टाकतात, कारण बाहेर पडतांना कुणी तिकिट विचारायला नसतेंच. एकदां तिकिट घेऊन आंत गेल्यावर कुणीहि कुठेंहि उतरूं शकतो. पण तिकिट पहायचें तरी कशाला ? मेट्रोनें तिकिटें देणें आणि तीं ' पंच ' करणें हीं कामें करणाऱ्या नोकरवर्गांत ७० ते ८० टक्के तरी स्त्रियाच असतात. या मेट्रोंत आणखी एक सोय किंवा कधीं कधीं वाटणारी गैरसोय आहे ती अशी कीं, गाडी स्टेशनमध्यें शिरत असतांना स्टेशनांत शिरायचे दरवाजे आपोआपच बंद होतात आणि गाडी निघून गेली म्हणजे ते आपोआप पुन्हा उघडतात. पुष्कळसे प्रवासी ऐन गाडी सुटायच्या वेळींच पळत येऊन गाडींत घुसायचा प्रयत्न करतात, अशा वेळीं अपघात व्हायचा संभव असतो, म्हणूनच ऑटोमॅटिक सिग्नलप्रमाणें ही ऑटोमॅटिक दरवाज्यांची सोय करण्यांत आलेली आहे. सहज विषय निघाला म्हणून सांगतों, फ्रेंच रेल्वे ही सर्वांत वेगवान् आणि सर्वांत आधुनिक आहे.

पोर्त द आर्लिन्स स्टेशनमधून मीं रस्त्यावर आलों. प्रत्येक क्षणाला मनाशीं जाणीव होत होती. ' पॅरिस ', ' पॅरिस ' म्हणतात तें हेंच. रस्ता खूपच रुंद होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अतिशय रुंद फूटपाथ, त्यावर उंच उंच वृक्ष आणि फूटपाथच्या एका बाजूला उपाहारगृहें, हें पॅरिसचें नेहमीं दिसणारें दृश्य. हीं उपाहारगृहें किंवा ' कॅफे ' हें पॅरिसचें आणखी एक वैशिष्ट्य. जवळजवळ प्रत्येक उपाहारगृहाचा महत्त्वाचा भाग उपाहारगृहाच्या इमारतींत नसून रस्त्यावर म्हणजे फूटपाथवर असतो. या फूटपाथवर गोल टेबलें आणि त्याभोंवतीं

खुर्च्या टाकलेल्या असतात. ' कॅफे ' समोर पन्नास साठ तरी खुर्च्या असतात; आणि मोठ्या ' कॅफे 'समोर दीड दोनशेंपर्यंत खुर्च्या असतात. कांहीं टेबलांवर रंगीबेरंगी मोठ्या छत्र्या असतात. कुठें दुकानाच्या इमारती असून लांबवर कापडी शेड केलेली असते, तर अनेक ठिकाणीं उघड्यावर खुर्च्या मांडलेल्या असतात, त्यावर बसून हळूंहळूं मद्याचें किंवा कॉफीचे घुटके घेत रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्याकडे तासन्तास पहात रहायचें, हा पॅरिसच्या लोकांचा आवडीचा छंद. निरुद्योगीपणाची पॅरिसइतकी आवड इतरत्र कोठें नसेल. हें लोक तासन्तास रस्त्याकडे पहात बसतात, असें मी जें म्हटलें ती अतिशयोक्ति नाहीं. किंबहुना, मलाहि पॅरिसचा हा छंद आवडतो. उपाहारगृहें म्हणजे खाण्याची किंवा चहा पिण्याची जागा अशी आमची कल्पना असते. त्यामुळें उपाहारगृहांत जायचें, भराभरा खायचें आणि झटकन् बाहेर पडायचें अशी आमची मनोभूमिका असते. म्हणजे खाणें हें जणूं एक कर्तव्य होऊन बसलें आहे. आमच्याकडे उपाहारगृहांत गर्दीहि इतकी असते कीं, आपलें संपतें केव्हां आणि जागा रिकामी होते केव्हां इकडे टक लावून पहाणारे महाभाग आसपास उभेच असतात. पण पॅरिसची ' कॅफेची ' कल्पना केवळ कॉफी पिण्याचें ठिकाण अशी नसून, ' वेळ घालविण्याचें स्थळ ' अशी असल्यानें खाणें अगर पिणें याला पॅरिसीयन संस्कृतींत फारसें महत्त्व नाहीं.

या ' कॅफेच्या ' खुर्च्यांवर दोनतीन तास बसायला एका कॉफीचें निमित्त पुरें होतें. मग दोनचार मित्रांनीं किंवा प्रेमिकांच्या युगुलानें कॉफी मागवायची आणि तासन् तास गप्पा मारीत, एकमेकांकडे पहात किंवा रस्त्यावरच्या हालचाली पहात उगाच बसायचें. अमुक दिग्दर्शक कसा आहे, पॅरिसमध्यें कोणता नवा चित्रपट आला आहे, नवी चांगली कादंबरी कोणती, बॉडेलेसारख्या कविता हल्लींच्या तरुणांत लोकप्रिय नाहींत, या वर्षी उन्हाळ्याच्या फॅशन्स दमदार नाहींत, कोणत्या थिएटरांत कोणतें नाटक चालू आहे, नव्या फ्रेंच मोटारीचें ' मॉडेल ' कसें आहे, मेरिलिन मन्रो, मार्टिन कॅरोल आणि जिना लोलोब्री यांच्यांत अधिक आकर्षक कोण आहे, या वर्षाचें नोबेल पारितोषिक कुणाला मिळणार, लॅटिन–क्वार्टरमधील कॉलेजचीं नवीं मुलें कशीं बावळट आहेत, जगांतील कोणत्याहि शहरापेक्षां पॅरिसच कसें सुंदर आहे, अशा अनेक विषयांची चर्चा करीत वेळ घालवायचा हें पॅरिसचें ' स्पिरिट. ' कांहीं चित्रकार

असेच रस्त्यावरच्या खुर्च्यांवर बसून 'स्केचिस्' करीत असतात. आणि हे चित्रकार नामवंत असले तर कॅफेचे मालकच तीं 'स्केचिस्' विकत घेऊन आपल्या कॅफेमध्यें लावतात. या कॅफेमध्यें कुठें कुठें पत्त्याचे आणि बुद्धिबळाचे डावहि चाललेले असतात. त्यामुळें कॅफे म्हणजे खाण्यापिण्याचें स्थान नव्हें तर खऱ्याखुऱ्या अर्थानें विश्रांतीचें ठिकाण वाटतें. घाई, गडबड कुठें असेल, तर ती रस्त्यांत, कॅफेमध्यें नाहीं, किंवा अर्धा फूटपाथ अडवून राहिलेल्या रंगीबेरंगी छत्र्यांखालील खुर्च्यांवरहि नाहीं. या कॅफेमध्यें बसून जीवनाकडे संथपणें पहाणें हा पॅरिसवासीयांच्या दृष्टिकोनाचा महत्त्वाचा विशेष आहे. असें संथपणें पहात असतांनाच मध्येंच मंद वारा वहातो. उंच चेसनटच्या वृक्षावरचीं पानें आवाज न करतां गळून पडतात, मधेच रस्त्यावरची एखादी नाजुक फ्रेंच युवती आपल्याकडे पाहून जातां जातां अकारण हंसते आणि तिच्या घाटदार शरीराकडे आणि मत्त पोटऱ्यांवरच्या निलॉन स्टॅकिंग्जच्या रेषांकडे आपण पहात असतांनाच कॅफेचा वेटर अदबीनं म्हणतो 'बोस्वां मेस्युअर', ('गुड इव्हिनिंग, सर') मग आपली खात्री होते कीं, आपण पॅरिसमध्यें आहोंत. आतां कसली घाई नाहीं, कसली चिंता नाहीं.—या जगांत दुःखं नाहींत, युद्ध नाहींत, दारिद्र्य नाहीं, कुरुपता नाहीं,—जें जें आहे तें तें सुंदर, आनंददायी आहे, समाधान आहे, शांतता आहे...या रम्य मनःस्थितींत किती वेळ गेला याची जाणीव राहत नाहीं. आणि बऱ्याच कालावधीनंतर जेव्हां वेळेची जाणीव होते, तेव्हां फुकट गेलेल्या वेळाबद्दल खंतहि वाटत नाहीं.

पॅरिसच्या रस्त्यांत लंडनची शिस्त दिसत नाहीं. लंडनचे लोक म्हणजे अगदीं नाकासमोर पाहून चालणारे, आणि चेहेऱ्यावर कोणतेहि भाव न दाखविणारे, आणि आपण बरें कीं आपला उद्योग बरा असे मानणारे आहेत. पण पॅरिसच्या लोकांचा मात्र, फूटपाथवरूनच चाललें पाहिजे असा कांहीं आग्रह नाहीं. एखादी सुंदर मुलगी समोरून येत असली, तर तिच्याकडे सरळ पाहतांना त्यांच्या आड भीड येणार नाहीं. सौंदर्याचें रसग्रहण करणें हा पॅरिसवासीयांचा जन्मसिद्ध हक्कच आहे अशी त्यांची समजूत असतें. सुंदर मुलींच्या बाबतींत लंडनचे आणि पॅरिसचे नागरिक यांच्या दृष्टिकोनांत कसा फरक आहे, याची एक गोष्ट सांगतात. समोरून एखादी रूपवती येत असेल तर लंडनचा माणूस तिच्याकडे पाहील पण आपण तिच्याकडे मुद्दाम पाहत नाहीं असें तो

भासवील. तो आपला चेहरा निर्विकार ठेवील आणि ती जवळून गेल्यावर तिच्याकडे वळून पहाणार नाहीं पण पॅरिसचा माणूस त्या सौंदर्यशालिनीकडे लांबून एकदां पाहील, ती जवळ आल्यावर पुन्हा निरखून पाहील आणि मग दिशा बदलून तिच्या मागूनच जाऊं लागेल. एकदां पॅरिसमध्यें एका स्वरूपसुंदर परदेशीय तरुणीच्या मागून एक फ्रेंच तरुण बराच वेळ येत होता. शेवटीं त्या तरुणाच्या पाठलागाला कंटाळून त्या तरुणीनें पॅरिसच्या एका पोलिसाजवळ त्याबद्दल तक्रार केली. तेव्हां तिचें सौंदर्य निरखून पहात पोलीस उद्गारला, " हे सुंदरी, मला माफ कर. मी आतां वाहतुकीच्या ड्यूटीवर आहे, नाहीं तर त्या तरुणासारखा मीसुध्दां तुझ्यामागून आलों असतों. "

अशाच एका उमद्या आणि दिलदार पोलिसाला — पॅरिसच्या पोलिसाला ' जंडर्स ' म्हणतात—मीं रस्ता विचारला आणि त्यानेंहि आपल्या खास फ्रेंचमधून मला रस्त्याची दिशा दाखवली. पोर्त द ऑर्लीन्स भागांत बरींच हॉटेल्स आहेत. एका एका रस्त्याला सातआठ हॉटेल्स दिसलीं. पण सारीं हॉटेल्स् भरलेलीं. कुठेंहि जाऊन विचारावें, " सॅलो ? " ( खोली आहे का ? ) तर हॉटेलच्या मालकिणीचें हमखास उत्तर येई, " नान्, तूत् कॉम्प्ले, " ( ' नाहीं, सर्व खोल्या भरल्या आहेत. ' ) कुठें कुठें तर ' जागा नाहीं. ' अशा आशयाच्या पाट्याच होत्या. हॉटेल मिळविण्याचा प्रयत्न या बाजूला तरी सफल झाला नाहीं. तेव्हां मीं ठरवलें कीं, सामान स्टेशनच्या ' क्लोकरूम 'मध्यें ठेवावें, पॅरिस पाहावें आणि मग सावकाश संध्याकाळीं हॉटेल पाहावें. म्हणून मी गार द एस्त या स्टेशनवर गेलों आणि तिथल्या क्लोकरूममध्यें सामान ठेवून सड्या हातांनीं बाहेर पडलों.

पॅरिसमध्यें पन्नास लक्ष लोक राहतात. लंडन शहरामधून टेम्स नदी वहाते, त्याप्रमाणेंच पॅरिसमधून सीन नदी वहाते. पॅरिस शहराच्या मध्येंच या नदीचें दोन फांटे होतात आणि पुन्हा थोड्याच अंतरावर ते एक होतात. त्यामुळें शहराच्या मध्येंच एक लहानसें बेट तयार झालें आहे. त्याला ' सिटी ' म्हणतात. ' नॉत्रमदेम 'चें चर्च याच भागांत आहे. गॉथिक पद्धतीच्या बांधणीचा हा सर्वोत्कृष्ट नमुना असून बाराव्या शतकांत त्याच्या बांधकामाला सुरुवात झाली आणि चौदाव्या शतकांत तें बांधून पूर्ण झालें. चारशें फूट उंच आणि दीडशें फूट रुंद असें हें भव्य चर्च, जगप्रसिद्ध फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्यूगो

याच्या 'हंचबॅक ऑफ नॉत्रदेम'—('नॉत्रदेमचा कुबडा' या नांवाचा चित्रपट ह्या कांबरीवरून घेण्यांत आला होता. आणि त्याची गचाळ नक्कल 'बादशहा' या हिंदी चित्रपटांत करण्यांत आली होती.) या कादंबरीचें केंद्र आहे. या चर्चमध्यें कांहीं हॅट्स टांगलेल्या दिसल्या. या हॅट्स येथें कशासाठीं टांगल्या आहेत, अशी मीं चौकशी केली. तेव्हां असें कळतें कीं, त्या टोप्या चर्चच्या माजी धर्मगुरूंच्या आहेत. प्रत्येक धर्मगुरूच्या निधनानंतर त्याची हॅट दोराला बांधून चर्चमध्यें लोंबकळत ठेवतात. ही हॅट तुटून पडली कीं, गुरूचा आत्मा स्वर्गांत गेला असें समजायचें. अर्थात् गुरूचा आत्मा लौकरच स्वर्गांत जावा म्हणून हॅटचा दोर शक्य तितका पातळ आणि कमजोर ठेवण्यांत येतो. आणि तरीहि अजून कांहीं धर्मगुरूंचें आत्मे स्वर्गांत न जातां पृथ्वीवरच लोंबकळत असलेले दिसतात. परदेशीं जाऊन आलेले अनेक लोक आमच्या देशांतील धर्मवेडेपणाला आणि भोळ्याभाबड्या चालीरीतींना हंसतात. पण आधुनिकतेची जन्मभूमि जी पॅरिस तिथल्या 'साहेबां'च्या वेडाला कुणी हंसावें ?

या नॉत्रदेम चर्चजवळच 'पॅले द जस्टिस' आहे. येथें बरींच वर्षें फ्रेंच राजे रहात असत. या इमारतीला १६१८ पासून १७७६ पर्यंत तीन वेळां आग लागली. याच वाड्याच्या 'कॉन्सीर्जेरी' या तुरुंगवजा भागांत रोबेस्पीअर हा पुढारी आणि फ्रान्सची दुर्दैवी राणी मेरी अॅन्टोनिएट यांना अटकेंत ठेवलेलें होतें. सध्यां या इमारतींत कोर्ट आहे. गेल्या महायुद्धांतील फ्रेंच पंतप्रधान मार्शल पेतां यांची चौकशी येथेंच झाली होती. येथील कोर्टाचें कामकाज मीं पाहिलें. येथील वकीलवर्गांत तीस टक्के स्त्रिया आहेत. जगांत इतरत्र कुठेंहि या व्यवसायांत इतक्या स्त्रिया नाहींत असें मला कळलें. कोर्टांत साक्षीदार साक्ष देत असतांनाच प्रत्येक शब्द तावडतोब 'नॉइजलेस' (आवाजरहित) टाईप-रायटरवर एक टाईपिस्ट मुलगी टाईप करीत असतांना दिसली. 'पॅले द जस्टिस' या इमारतीवर १३७० सालचें एक मोठें वैशिष्ट्यपूर्ण घड्याळ असून फ्रान्समधील हें सर्वांत जुनें सार्वजनिक घड्याळ आहे.

या इमारतीजवळील 'पॉ नव्ह' पूल ओलांडून गेल्यावर समोरच पॅरिसचें जगप्रसिद्ध 'लुव्हर' हें म्युझियम दिसतें. कलेचा इतका अमोल ठेवा जगांत इतरत्र कुठेंहि नाहीं. व्हीनस द मिलो, ब्रॉझ-एज (रेडिन), पॅलाव्हेलेट्री,

सॅमोस वगैरे विख्यात शिल्पकृती, आणि लिओनार्डो ड व्हिनसी, येराया, मायकेल अँजेलो, अल् ग्रेसो, व्हॅन डाईक, राफेल, कॉरेजओ, गॉगिन, टिटियन, पिकासो, मूर, सीझस, रुबेन्स, लोरियन रेंब्रो, इत्यादि कलावंतांचीं चित्रें येथें आहेत. त्यांत मोना लिसा, लाफिंग कॅव्हेलिअर, मॅन वुइथ द ग्लोव्ह, व्हर्जिन ऑफ द रॉक्स, एन्जल्स, इत्यादि युगप्रवर्तक चित्रें आहेत. या कलाकृती पाहिल्या म्हणजे कोणत्याहि कलावंताला आपल्या नेत्रांचें पारणें फिटलें असें वाटतें. देशोदेशींचे चित्रकार त्यासाठीं लुव्हरला भेट देतात आणि लहान स्टॅन्ड घेऊन त्या कलाकृतींच्या प्रतिकृती करतात. सॉक्रेटिसच्या काळीं असे म्हटलें जात असें कीं, 'To be in Athens is to be educated' 'शिक्षण शिक्षण म्हणजे काय? अथेन्समध्यें रहाणें हेंच शिक्षण.' त्याचप्रमाणें पॅरिसच्या लुव्हरमधील विश्वविख्यात कलाकृती पाहिल्या म्हणजे वाटतें, पॅरिसमध्यें रहाणें म्हणजेच कलावंत होणें! या म्युझियमची इमारतहि अत्यंत कलापूर्ण आणि भव्य आहे. फ्रेंच राज्यक्रांति होण्यापूर्वी पांचशें वर्षें फ्रान्सचे राजे या इमारतींत रहात होते. पॅरिसच्या इतर भागांत गडबड आणि गोंगाट असला, तरी 'लुव्हर' मध्यें आणि त्या इमारतीच्या चौकांत कलावंतांच्या मनोभूमिकेला मानवणारी प्रसन्न शांतताच असते. या इमारतींत मैलच्या मैल लांबीचें 'कॉरिडॉर्स' असून शेंकडों खोल्यांतून आणि हॉल्समधून अभिजात कलाकृतींचें खजिने ठेवलेले आहेत. आधुनिक यंत्र–युग कलेपासून दूर जात आहे, ही हांकाटी या इमारतीजवळ आल्यावर खोटी वाटूं लागतें. 'एका कवितेसाठीं किंवा चित्रासाठीं प्राण देणारे रसिक पॅरिसमध्यें आहेत.' असें ब्रॉन्डलेर म्हणत असे, तें या ठिकाणीं खरें वाटूं लागतें. आणि कलात्मक जीवनाचा नवा आस्तिकवाद मनांत रुजतो.

लुव्हरला लागूनच तुलिअर्सचें उद्यान आहे. या रमणीय उद्यानांतील सुंदर झाडें, हिरवळ आणि पुतळे यांच्या सौंदर्याचा आस्वाद घेऊन आपण पुढें जातों, तों पॅरिसमधील सर्वांत प्रसिद्ध रस्ता आणि जगांतील सर्व रस्त्यांचा राजा असा 'शेप एलिसी' हा राजमार्ग दिसतो. या राजमार्गाच्या दूरच्या टोंकाला डौलानें उभी असलेली विजय–कमान–'आर्क द ट्रायंफ द इतोली'– दृष्टिपथांत येते. ही जगांतील सर्वांत मोठी कमान असून, सम्राट् नेपोलियन बोनापार्टच्या विजयाचें स्मारक म्हणून ही १६२ फूट उंचीची आणि १४७ फूट रुंदीची

कमान बांधण्यांत आलेली आहे. पहिल्या महायुद्धांत निधन पावलेल्या फ्रेंच सैनिकांच्या स्मरणार्थ एक अखंड ज्योत या कमानीच्या मध्यभागीं तेवत असते. या कमानीखालून वाहनांची वाहतुक होत नाहीं. कमानीभोंवतीं वर्तुळाकार अशी वाहतुक होते. या अवाढव्य कमानीपासून एकसारखे बारा रस्ते सायकलच्या 'स्पोक्स्' सारखे जातात, त्यामुळें या भागांतील वाहतुक, गर्दी, घरें, झाडें सारेंच अत्यंत प्रेक्षणीय वाटतें.

बॅस्टिलच्या तुरुंगाचें अवशेष सध्यां येथें नाहींत. पण त्या जागीं 'प्लास बॅस्टिल' हा चौक आहे. पॅरिसमधील सर्वांत प्रसिद्ध चौक कोणता असें विचारलें तर 'प्लास द ला कॉन्कार्ड' हा चौक असें झटकन् उत्तर देतां येईल. हा चौक म्हणजे जगांतील सर्वांत सुंदर, पण सर्वांत दुःखमय इतिहास असलेला असा चौक आहे. या चौकांतील कलात्मक पुतळे, स्तंभ, कारंजीं वगैरे पाहून जगांतील अप्रतिम सौंदर्याचा साक्षात्कार होतो, तर याच चौकांत फ्रेंच राज्य-क्रांतीच्या वेळीं सोळावा लुई आणि मेरी ॲन्टोनिएट यांना आणि इतर शेंकडों राजनिष्ठ लोकांना फांसावर देण्यांत आलें होतें याची जाणीवहि होतें. 'Our sweetest songs are those that tell of the saddest thoughts ('करुणतम विचारांनीं भरलेलीं आमची गाणींच मधुरतम आहेत') असें शेले म्हणतो, त्याचें प्रत्यंतर येथें आल्यावांचून रहात नाहीं. या दोन्हीं चौकांत मध्यभागीं बसविलेला स्तंभ मूळचा इजिप्तमधला. तो १८३१ सालीं फ्रान्समध्यें आणण्यांत आला. या चौकासारखेंच पॅरिसचे आणखी एक प्रसिद्ध स्थळ म्हणजे 'इफेल टॉवर.' १८८९ सालीं पॅरिसमध्यें भरलेल्या प्रदर्शनासाठीं म्हणून गस्टॉव्ह इफेल या फ्रेंच इंजिनियरनें हा टॉवर बांधला. जगांतील हा सर्वांत उंच टॉवर असून त्याची उंची ९८४ फूट आहे. त्याच्या बांधकामासाठीं ७००० टन लोखंड लागलें आहे. या टॉवरच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर जाण्या-साठीं 'लिफ्ट' आहे. या दोन्ही मजल्यावर प्रशस्त उपहारगृहें, मद्यालयें आणि पॅरिसच्या दृश्यांच्या फोटोंचीं दुकानें आहेत. वरच्या मजल्यावर गेल्यावर जवळजवळ ५०० फूट उंचावरून सबंध पॅरिस नदी दिसतें. शहरांतील अवाढव्य इमारती अगदीं बारीक ठिपक्याएवढ्या दिसतात. यांतील कांहीं इमारती आणि चौकांनीं जगाच्या इतिहासांत केवढी मोठी कामगिरी केली आहे असा विचार या वेळीं मनांत आल्यावांचून रहात नाहीं. पॅरिसचें प्रतीकात्मक चित्र म्हटलें

कीं, हा इफेल टॉवर तेथें हमखास असणारच. 'ईव्हिनिंग इन् पॅरिस' या जगप्रसिद्ध सेंटच्या बाटल्यांवर या टॉवरचें चित्र अनेकांनीं पाहिलेलें असेल. या टॉवरच्या उजव्या हाताला एक मोठा चौक असून त्याच्याजवळ 'हॉटेल द इन्व्हॅलिड्स्'ची भव्य इमारत आहे. ( या ठिकाणीं 'हॉटेल' हा शब्द आपल्याला परिचित असलेल्या अर्थानें वापरलेला नाहीं; येथें त्याचा अर्थ मोठी इमारत किंवा वाडा असा आहे. ) या इमारतींत सम्राट् नेपोलेलियनच्या वस्तूंचें प्रदर्शन आहे. आणि त्याजवळच नेपोलियनचें थडगें आहे. तेथें नेपोलियनच्या अस्थी एका मोठ्या सुबक लांकडी पेटींत घालून ठेवण्यांत आलेल्या असून जवळच ख्रिस्ताची मूर्ति आहे. सभोंवती ग्रीक देवतांचें पुतळे असून नेपोलियनच्या दर्जाला शोभेल असेंच हें थडगें भव्य आणि उदात्त आहे.

पण पॅरिसच्या प्रेक्षणीय स्थळांचें असें कितीहि वर्णन केलें, तरी तें संपणार नाहीं. सबंध पॅरिसनगरीचें असें स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे आणि तें तिच्या निरनिराळ्या मार्गांचें रुक्ष वर्णन करून लक्षांतहि यायचें नाहीं. म्हणून व्हिक्टर ह्यूगोनें या नगरीबद्दल काढलेले उद्‌गार उद्धृत करून त्याची थोडी कल्पना देतों. ह्यूगो म्हणतो, " विसाव्या शतकांत जें एक अद्वितीय राष्ट्र होईल त्याचें नांव 'फ्रान्स' अथवा 'युरोप' असें रहाणार नाहीं, तर सबंध मानवसमाज हेंच हें राष्ट्र राहील. पॅरिस ही या राष्ट्राची राजधानी होईल. जेरुसलेम, अथेन्स आणि रोम या तीन शहरांतून आधुनिक जगाचा जन्म झाला. रोमनें जगाला सामर्थ्य दिलें, अथेन्समध्यें कलेचा उदय झाला आणि जेरुसलेमनें स्वातंत्र्य दिलें. या तिन्हीं शहरांचा ऱ्हास झाला, तरी त्यांचा आत्मा या पॅरिस शहरांत एकवटलेला असून जगाची प्रगति करणें आतां या मनोहर नगरीच्याच स्वाधीन आहे. ..."

पॅरिस शहराला अत्तराचें फार वेड आहे आणि हस्तांदोलनाचेंहि असेंच वेड आहे. कला हा पॅरिसचा आत्मा आहे. अशा या दिमाखदार सौंदर्यपूर्ण नगरीवर जेव्हां सूर्यप्रकाशाचें अखेरचे किरण तरळूं लागतात, तेव्हां ही खरोखरच सुवर्णनगरी भासते. उंच उंच चर्चच्या टोकांवर आणि भव्य इमारतींच्या टॉवरवर रेंगाळून हे किरण हळूंहळूं दिसेनासे होतात.

आणि रात्रीचें रंगेल पॅरिस जागें होऊं लागतें.

♥♥♥

७

# रात्रीचें रंगेल पॅरिस

पॅरिसचें जीवन दुहेरी आहे. संध्याकाळ झाली, कीं यापैकीं एक जीवन संपतें आणि दुसरें सुरू होतें. संध्याकाळीं कचेऱ्या सुटल्यावर 'मेट्रो'ना ( जमिनी-खालच्या रेल्वे ) मनस्वी गर्दी होते, रस्त्यावर दाटी होते, मोटारींची रीघ लागते, वहातुकीची गति मंद होते, कामावरचे स्त्री–पुरुष थकलेल्या मनानें आणि शरीरानें घरीं परततात, दिवसाचा उजेड पॅरिसच्या उंच इमारतींच्या शेंड्यांआड लुप्त होऊं लागतो, आणि धांवपळीचें, कामाचें, व्यवहाराचें जीवन पॅरिसनगरी संपवते. याच वेळीं तिचें दुसरें जीवन सुरू होत असल्याची जाणीव होते. कित्येक प्रवाशांच्या दृष्टीनें हेंच खरें पॅरिसचें जीवन. पहिल्या जीवनांतील नायिका थकूनभागून घरीं परततात, तेव्हां या दुसऱ्या जीवनांतील ललना अद्ययावत् पोषाख करून, शरीराचा बराच भाग अनावृत्त ठेवून, अंगावर अस्सल फ्रेंच अत्तराचा शिडकाव करून आणि जगांतील सर्वोत्कृष्ट प्रसाधनांनीं आपलें सौंदर्य वर्धमान करून घराबाहेर पडतात.

पॅरिसच्या रंगेलपणाची पहिली खूण ही मोठमोठ्या 'बुलेव्हॉर'– वर दिसते. 'अव्हेन्यू द शॅप एलिसी' हा हमरस्ता म्हणजे पॅरिसच्या सर्व 'बुलेव्हॉर'चा राजाच आहे. 'बुलेव्हॉर' म्हणजे रस्ता, पण केवळ रस्ता नव्हे. इंग्लंडच्या लोकशाहीच्या भाषेंत सांगावयाचें तर 'रस्ते' म्हणजे 'कॉमन्स,' पण 'बुलेव्हॉर'



स्ट्रिप्टीज या नृत्यप्रकारांतील एक दृश्य. छायाचित्रांत काढ-लेलीं व्यंगचित्रें प्रेक्षकांचीं !



पाश्चात्य तमाशांतील एक दृश्य.

म्हणजे 'लॉर्डस' असें म्हणतां येईल. या बुलेव्हॉरवर उंचच उंच चेसनटचीं झाडें डौलानें उभीं असतात. मोठमोठ्या 'कॅफे'च्या खुर्च्या फूट-पाथवर प्रस्थान मांडून बसतात. जागोजाग वृत्तपत्रांचे 'किऑस्क' असतात आणि त्यांत 'लॉटरी नॅशनेल'चीं तिकिटें प्रामुख्यानें विक्रीला ठेवण्यांत आलेलीं असतात. कोपऱ्याकोपऱ्यावर करमणुकीच्या कार्यक्रमांच्या जाहिराती पॅरिसच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनें लावलेल्या असतात. या जाहिरातींचे मोठे पोकळ खांब असतात. त्यांचा परिघ एवढा असतो कीं, दोन माणसांनीं परस्पर विरुद्ध बाजूंनीं त्या खांबाला मिठी मारली, तर दोघांचीं बोटें कशींबशीं एकमेकांच्या बोटांना स्पर्श करूं शकतील ! या गोलाकार स्तंभांवर बहुधा तांबड्या अक्षरांत छापलेल्या जाहिराती चिकटविण्यांत येतात. त्यावर नाटकें, 'रेव्ह्यू' (तमाशे) चित्रपट, संगीत इत्यादींचे त्या त्या आठवड्याचे कार्यक्रम दिलेले असतात. बुलेव्हॉरवर जडजवाहिर, फॅशनेबल कपडे, सौन्दर्यप्रसाधनें, फर, फर्निचर, मोटारी, प्रवास-एजन्सी वगैरेंचीं मोठमोठीं दुकानें आणि ऑफिसें असतात. 'अव्हेन्यू द शॅप एलिसी' हा जगांतील अत्यंत सुंदर रस्ता पॅरिसच्या 'इतोली' या भागांत आहे. या रस्त्यावर उभें राहिलें म्हणजे एका टोंकाला 'आर्क द ट्रायंफ द इतोली' ही भव्य कमान आणि दुसऱ्या टोंकाला 'कॉंकॉर्ड'मधील उंच स्तंभ दिसतो.

या रस्त्यावरची संध्याकाळ पाहिली नाहीं, तर पॅरिसचीं सारीं इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहूनहि पॅरिस पाहिलें नाहीं असें म्हणावें लागेल. जगांतील इतर कोणत्याहि रस्त्यावर इतक्या सुंदर आणि कमनीय स्त्रिया दिसणार नाहींत, इतर कोणत्याहि रस्त्यावर इतकीं उंची अत्तरें वापरलीं जात नाहींत, आणि इतर कोणत्याहि रस्त्यावर इतकें विविध सौंदर्य दिसणार नाहीं. पॅरिसची हवा, पॅरिसचें मन, पॅरिसचें अंतःकरण अत्यंत प्रकर्षानें जर कुठें दिसत असेल, तर तें इथें. 'शॅप द एलिसि'वरच्या उघड्या कॅफेच्या खुर्चीवर बसावें, आणि जगांतील फॅशन्सची सुरुवात पहावी. या रस्त्यानें एखादी नवी फॅशन शोधून काढावी आणि पृथ्वीतलावरील अवघ्या रसिकांनीं ती शिरसावंद्य मानून आचारणांत आणावी, असा या रस्त्याचा मान आहे. पॅरिसच्या लावण्यखनींचें खरें सौंदर्य दृष्टीला पडतें तें इथें. सीन नदीच्या कांठीं वसलेल्या या पॅरिस-नगरींतील या राजमार्गावर दिमाखानें विहार करणारी फ्रेंच तरुणी केवळ सुंदर,

खेळकर, मादक असते एवढेंच नव्हे, तर तिच्या अंगीं निराळीच जादू असते. ती जादू काय आहे, तें शब्दांनीं वर्णन करून सांगतां येणार नाहीं; पण तिला पाहिल्याबरोबर वाटतें कीं, अरे, स्त्रीत्वाचें आणि यौवनाचें अत्युच्च प्रतीक म्हणून जें आपण जन्मभर अव्यक्तपणें मानीत आलों, तें हेंच. कालिदासाच्या काव्यांतहि सौंदर्याचें मर्म म्हणजे 'शाकुंतलां'तील दोन ओळी हें जसें सांगतात, तसेंच फ्रान्स देश, त्यांतूनहि पॅरिस–नगरी, आणि त्यांतूनहि 'शँप द एलिसी' म्हणजे पृथ्वीतलावरील अमृतच !

Oh to be in champs Elysees
Now that May is here !

अशा काव्यपंक्ती युरोपांत रसिकांच्या तोंडीं घोळत असतात, त्या सार्थच आहेत.

रात्रीच्या झगझगाटांत तर या रस्त्याला अलौकिक स्वरूप येतें. पण पॅरिस पहायला आलेल्या प्रवाशांना हवें असतें तें 'रात्रीचें पॅरिस' हें नव्हे. तें पॅरिस आहे 'मॉंतमार्त्र' भागांत,—'प्लास पिगाल' या चौकाच्या आसपास. पॅरिसचीं मुख्य चित्रपटांचीं थिएटरें, नाटकांचीं थिएटरें, तमाशे, नाइट–क्लब, कॅबरे, नृत्यगृहें, रात्रभर उघडीं असणारीं रेस्टॉरंट्स्, नागरिकांना मोहवश करणाऱ्या प्रमदा, मोठमोठीं मद्यालयें, या सर्वांचें मध्यवर्ती ठिकाण म्हणजे 'प्लास पिगाल'. 'शँप द एलिसी'वरून या ठिकाणीं जायचें म्हणजे चांगलें दोन-अडीच मैल गेलें पाहिजे.—इतोलीहून 'अव्हेन्यू द वॅग्रम', 'बुलेव्हॉर द कॉर्सेल', 'प्लास गॉबॉ', 'बुलेव्हॉर दे बॅरिग्नॉल्स', 'प्लास क्लिशी' आणि 'प्लास ब्लांक' ओलांडून गेलें पाहिजे.

'बुलेव्हॉर द क्लिशी' आणि 'बुलेव्हॉर रॉशकुआर्त' यांच्या मध्यें हा 'प्लास पिगाल' चौक दिसतो. या चौकांत पाऊल ठेवल्याबरोबर पटतें कीं, रात्रीचें पॅरिस ही अगदीं निराळीच चीज आहे. पॅरिस शहरावर सूर्य मावळतो, तेव्हां रात्रीच्या पॅरिसवर सूर्य उगवतो. प्लास पिगाल भागांत लोक संध्याकाळींच झोंपून उठत असावेत असें वाटतें. आणि या चौकांत विजेचा झगझगाट तर इतका दिसतो कीं ही रात्र आहे असें सांगूनहि, पुन्हापुन्हा ही रात्र कीं दिवस अशी चौकशी करावीशी वाटते. या चौकांत नजर टाकली, तर एका ओळीनें मोठमोठे नाइट–क्लब्स, बार, कॅफे, आणि रेस्तराँ दिसतात. चौकांच्यामध्यें उभें राहिलें, आणि क्लिशी रस्त्याकडे तोंड केलें, तर उजव्या हाताला 'पिगाल'

या नाइट–क्लबचे झगझगीत दिवे आणि त्याची मोठी जाहिरात दिसते. त्यांतील ‘ NUS LES PLUS ’ हीं मोठीं अक्षरें फ्रेंच न जाणणाऱ्याला फारशीं आकर्षक वाटत नसलीं, तरी ‘ न ’ म्हणजे नग्न असें कळल्यावर मात्र त्याला या जाहिरातींत अधिक स्वारस्य वाटेल. त्याशेजारींच ‘ मॉनिगो नाइट–क्लब ’ आहे. त्याला लागूनच ‘ ईव्ह ’ हा नाईट–क्लब आहे. त्याच्या शेजारीं ‘ नार्सिस् ’ आणि ‘ नॅचरिस्ट ’ हे नाइट–क्लब आहेत. त्यानंतरच्या रस्त्यानें किंचित् पुढें गेलें, म्हणजे ‘ मूलां रूज ’ हा जगप्रसिद्ध नाइट–क्लब आणि त्याच्यावरची हालत्या पंखांची पवनचक्की दिसते. मग रस्ता ओलांडून पुन्हा आपण चौक पुरा करून ‘ पिगाल नाइट–क्लब ’जवळ येतो. या ठिकाणांच्या अधेंमधें लहानलहान नाइट–क्लब्स, कॅफे आणि बार आहेत. पिगाल आणि मॉनिगो या नाइट–क्लब्सच्या मधून जो पिगाल रस्ता जातो, त्यावर तर प्रत्येक घरांत नाइट–क्लब आहे. नाइट–क्लब म्हणजे असतें तरी काय ? पुढें दिलेली चार नाइट–क्लब्सची एकत्रित जाहिरात वाचली, तर थोडी कल्पना येईल.

*NOUVEAU CABARET*

**MOULIN ROUGE**

**Presents its Super Revue**

“CHAMPAGNE—COCKTAIL”

*30 dancing girls and 40 Most Dazzling Nudes of Paris Variety Show with World Famous Attractions.*

**In the Heart of Montmartre**

*Nightly 9 P. M. till dawn.*

*No entrance fee.*

*Drinks from Frs. 500. Dinnr from Frs. 1000.*

PLOCE BLANCHE

*The Three leading Night Clubs of Ploce Pigalle.*

| **Sphinx** | **Narcisse** | **Pigall's** |
|---|---|---|
| The Nude revue with spectacular floorshow | The Queens of Strip–tease | The most daring Floorshow of Nudes in the world. |

पॅरिसच्या रात्रीच्या जीवनांत नाइट–क्लब्सना बरेंच महत्त्व आहे. कांहीं क्लब्समध्यें ५०० ते १००० फ्रँक ( १००० फ्रँक = १४ रु. ) प्रवेश–फी घेतात, तर कांहीं क्लब्समध्यें मोफत प्रवेश असतो. पण प्रवेश मोफत असला, तरी तिथें मद्य घ्यावेंच लागतें आणि त्याची किंमत बाहेरील मद्याच्या किंमतीच्या सुमारें चौपट असते. वरील जाहिरातींत लिहिल्याप्रमाणें ' मूलां रूज 'मध्यें प्रवेश–फी नाहीं; पण बाहेर जी बीअर ८० फ्रँकना मिळेल, ती तिथें पांचशें फ्रँकना मिळते आणि जेवणहि आवश्यकच असतें. जेवणाचें किमान मूल्य पंचवीस रुपये पडतें. पहिल्या दर्जाच्या नाइट–क्लबला १५ ते २० रु. आणि दुय्यम दर्जाच्या क्लबला ८ ते १० रु. पडतात. अगदीं लहान क्लबमध्यें तीनशें फ्रँक म्हणजे, ३ ते ३॥ रुपयांतहि भागूं शकतें.

नाइट–क्लबमध्यें पंचवीस ते पन्नास लोकांची बसण्याची सोय असते. मोठ्या क्लबमध्यें लहानसें स्टेज असतें; तर लहान क्लबमध्यें प्रेक्षकांच्या टेबलांच्या मध्येंच उंच प्लॅटफॉर्म केलेलें असतें. अगदीं लहान क्लब कसा असतो, हें प्रथम पाहूं.

' प्लास पिगाल 'मध्येंच हा क्लब आहे. त्याचें नांव ' जीन द काया.' दरवाज्यावर एक इसम पांढरा युनिफॉर्म घालून उभा आहे. जवळच क्लबची लहानशी जाहिरात आहे. तीवर लिहिलें आहे : ' प्रवेश १०० फ्रँक, ड्रिंक २०० फ्रँक. ' जाहिरातीवर एक कांचेचें छोटें कपाट ( ' शो-केस ' ) आहे. त्यांत क्लबमध्यें नाचणाऱ्या मुलींचे फोटो आहेत. चार अर्धनग्न मुलींचे निरनिराळ्या ' वेषां 'तले ते फोटो आहेत.

दारावर १०० फ्रँक द्यायचे, आणि क्लबांत जायचें. हा क्लब आहे तळघरांत. त्यामुळें नवख्या इसमाला प्रथम थोडी भीतीच वाटते. प्रकाशहि बेताचाच आहे. क्लबची जागा आणि आकारहि रेल्वेच्या एका डब्याएवढा आहे. जागेला रंग दिलेला नाहीं. सीलिंगचा भाग बोगद्यासारखा गोल नि काळवंडलेला आहे. एका कडेला दारूच्या बाटल्या आणि ग्लासेस् घेऊन एक इसम उभा आहे आणि दुसऱ्या कोपऱ्यांत किंचित् उंच असा प्लॅटफॉर्म आहे. दोन्ही भिंतींना चिकटून साधीं फळ्यांचीं बाकें ठेवलेलीं आहेत आणि त्यांना लगटून टेबलें आहेत. या क्लबांत फार तर वीसबावीस लोक एका वेळीं मावूं शकतील.

मी आंत गेलों, तेव्हां स्टेजवर पडदा पडलेला होता. मी बांकावर बसतों न बसतों, तोंच एक मुलगी माझ्या समोर आली, आणि तिनें मद्यांच्या किंमतीचें कार्ड माझ्यापुढें ठेवलें. त्यांतील एक पेय मीं निवडलें. तिनें ग्लास माझ्यापुढें आणून ठेवला. इतक्यांत स्टेजवरील पडद्यामागून पियानोचा आवाज ऐकूं येऊं लागला. पडदा बाजूला सरकला, तेव्हां पन्नाशीच्या वयाचा एक फ्रेंच गृहस्थ 'इव्हिनिंग ड्रेस' घालून पियानो वाजवितांना दिसला. थोड्याच वेळांत एक फ्रेंच तरुणी स्टेजवर आली आणि तिनें नृत्य करायला सुरुवात केली. नृत्य करतां करतां तिनें अंगावरचा लांब झगा काढला, मग फ्रॉक काढला, नंतर त्याखालचें 'लिंगरी' हें वस्त्र काढलें, मग बॉडी काढली, पायांतले नायलॉन स्टॉकिंग्ज काढले आणि अखेर चड्डीहि काढली! आंत फक्त लंगोटीवजा एक वस्त्र होतें, तेवढेंच शेवटीं शिल्लक राहिलें. मग त्या तरुणीनें प्रेक्षकांना अभिवादन केलें, सर्वांनीं टाळ्या वाजविल्या, आणि पडदा पडला.

मी इतर प्रेक्षकांकडे पाहूं लागलों. सारे लोक पाश्चिमात्य होते. त्यांपैकीं दहा-बारा पुरुष आणि तीनचार स्त्रिया होत्या. त्याशिवाय क्लबमध्यें नृत्य करणाऱ्या तीन मुली प्रेक्षकांतच बसून बीअर घेत होत्या. क्लबमधील वातावरण फारसें उत्साही नव्हतें; पण तें निराशामयहि नव्हतें. क्लबचें दोन 'कॉमेडियन' किंवा आमच्या भाषेंत सांगायचें तर 'सोंगाडे' अधूनमधून विनोद करून किंवा नृत्य-संगीताच्या वेळीं ताल धरून रंग आणायचा प्रयत्न करीत होते.

एकमेकांशीं गप्पा मारण्यांत आणि मद्य घेण्यांत दहापंधरा मिनिटें जातात. मग पुन्हा स्टेजवरील पडदा उघडला जाऊन दुसऱ्या एका मुलीचें नृत्य आणि कपडे काढण्याचा कार्यक्रम होतो. या कार्यक्रमाला Strip tease (स्ट्रीप टीज) म्हणतात. पण त्याच चार मुली आळीपाळीनें तोच किंवा तशाच तऱ्हेचा कार्यक्रम करीत असल्यानें तास दीड तासांपेक्षां अधिक काळ अशा क्लबांत काढणें कठिण होतें. किमान एक ड्रिंक तरी प्रत्येकानें घेतलेंच पाहिजे असा क्लबचा नियम असतो. पण एक ग्लास घेऊन माणूस किती वेळ काढणार? वेळ काढण्यासाठीं आणि लाजेकाजेस्तव तरी आणखी एखादा ग्लास घेणें भाग पडतें.

नाचणाऱ्या मुली मधल्या वेळांत गिऱ्हाइकांच्या जवळ येतात, सलगी करतात आणि 'मला ड्रिंक दे' म्हणतात. सरळ 'नाहीं' म्हणणें अनेकांच्या जीवावर येतें. त्यामुळें तिला ड्रिंक द्यावें लागतें.

आम्ही असें ड्रिंक घेत होतों, तोंच क्लबचा प्रमुख म्हणाला, “ बोस्वां मेस्युअर ए मॉदमॉयसेल. आतां जें नृत्य होणार आहे, त्यांत प्रत्येकानं भाग घेतलाच पाहिजे. त्यासाठीं आम्ही सर्वांना ‘ बॉवलर ’ हॅट्स् देणार आहोंत आणि सर्व पुरुषांना मिशा देणार आहोंत. ” हें तो सांगत असतांनाच त्याचा सहकारी हातांत हॅट्स् आणि जाड कागदाच्या काळ्या आंकडेबाज मिशा घेऊन आला. सर्व स्त्री-पुरुषांना काळ्या गोल ‘ बॉवलर ’ हॅट्स घालण्यांत आल्या आणि सर्व पुरुषांना भल्या मोठ्या आंकडेबाज मिशा लावण्यांत आल्या. स्टेजवरील पडदा बाजूला झाला, तेव्हां तिथेंहि नाचणारा इसम तसलीच काळी टोपी आणि मिशी लावून उभा असलेला दिसला. त्याच्याबरोबर नाचणाऱ्या मुलीनें काळी टोपी घातलेली होती.

पियानो सुरू झाला आणि नृत्याला सुरुवात झाली. प्रेक्षकांना नाचण्यासाठीं भरपूर जागा नव्हती. म्हणून सर्वांनीं आपले हात कोपराजवळ एकमेकांच्या हातांत अडकविले आणि गाण्याच्या ओळी म्हणत सर्वांनीं तालावर डुलायला सुरुवात केली. आपली ओळख असो अगर नसो, शेजारची व्यक्ति स्त्री असो अगर पुरुष असो, सर्वांनीं हातांत हात अडकवून नृत्यांत भाग घेतलाच पाहिजे अशी अट असल्यानें, नाना देशचे, नाना तऱ्हांचे आणि व्यवसायांचे लोक अत्यंत आनंदानें गाणीं म्हणत डुलत होते. पाश्चात्य नृत्याची ही पद्धत अगदीं संस्मरणीय आहे. तींत आप-परभाव नाहीं, लहानमोठा हा भेद नाहीं, वर्णभेद नाहीं कीं देशभेद नाहीं. सारे मजा मारायला पॅरिसला आलेले, सारेच हंसणारे, डुलणारे, नाचणारे !

रात्रभर संगीतनृत्याचा हा कार्यक्रम चालू असतो. दारूच्या बाटल्या उघडल्या जातात, संपतात. मुली स्टेजवर जाऊन कपडे काढतात, नृत्य करतात पुन्हा कपडे घालून प्रेक्षकांत मिसळून मद्य घेतात.

‘ जीन द काया ’ या क्लबापेक्षां जरा वरच्या दर्जाचे म्हणजे पॅरिसमधील दुसऱ्या प्रतीचे क्लब तिथून कांहीं लांब नाहींत. ‘ रू पिगाल ’ या रस्त्यावर त्यांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या आहेत. त्यांपैकीं एका क्लबांत मी गेलों. त्याचें, नांव ‘ ब्ल्यू हॉल ’ ( Blue Hall ) असें होतें. प्रत्येक क्लबच्या दरवाजाजवळ एकदोन दरवान असतात. येणाराजाणारांना जवळ बोलावून आणि क्लबमधील मुलींच्या सौन्दर्याचें वर्णन करून गिऱ्हाइकांना आंत आणणें हें त्यांचें काम.

त्यांना इंग्रजी, फ्रेंच, डच, जर्मन, इटालियन अशा अनेक भाषा येत असतात. एखादा पौर्वात्य इसम दिसला, तर ते म्हणतात, "सलाम आलेकुम! इंडिया? पाकिस्तान? कम् इन् मेस्युअर. मोस्ट ब्यूटिफूल गर्ल्स. पार्लेज् व्हू फ्रॉंसे मेस्युअर? नॉन्? स्पीक इंग्लिश! व्हेरी चीप क्लब. ओन्ली फाइव्ह हंड्रेड फ्रँक्स. ड्रिंक—थ्री हंड्रेड."

'ब्ल्यू हॉल' क्लबची जागा बरीच प्रशस्त आहे. चाळीसएक लोक चांगल्या तऱ्हेनें बसूं शकतील एवढी. चांगल्या गाद्यांच्या खुर्च्या आहेत. 'फॉयर'चा बार आहे. चकचकीत कांचांचीं टेबलें आहेत. क्लबमध्यें पंधरावीस सुंदर तरुण मुली आहेत. सुमारें चार फूट उंचीचें अद्ययावत् स्टेज आहे. स्टेजला लागूनच सभोंवतीं दहा–बारा खुर्च्या आहेत. स्टेजवर 'फ्लड लाइट' पडलेला आहे. त्यांतून स्टेजवर रंगीबेरंगी प्रकाश पाडतां येतो. आणि नाचणारी मुलगी जिकडे जाईल, त्या दिशेनें तो फिरवितां येतो. क्लबमध्यें सर्वत्र मंद निळा प्रकाश आहे.

मी आंत गेल्यावर दोनतीन मुली एकदम माझ्याजवळ आल्या. 'बोस्वां? मेस्युअर पार्लेज् व्हू फ्रॉंशे?" ('तुम्हांला फरेंच येतं कां?') 'मला थोडं फ्रेंच येतं' असे मी सांगितल्यावर कोणतें मद्य हवें म्हणून त्यांनीं मला विचारलें. मीं सांगितलेलें मद्य माझ्यापुढें आणून ठेवून एक मुलगी म्हणाली, "तुम्ही एकटेच घेणार का? मला नाहीं वाटतं देणार?"

आम्ही मद्य घेऊं लागलों. थोड्या वेळानें संगीत सुरू झालें. या क्लबमध्यें नृत्याच्या संगीतासाठीं ग्रामोफोनच्या रेकॉर्ड्स लावण्यांत येत होत्या. कार्यक्रम मात्र तोच, म्हणजे 'स्ट्रिप टीज'चा. कांहीं मुली नृत्य करतां करतां कपडे काढतात, कांहीं मुली खुर्चीवर बसून शांतपणें हळूहळू विवस्त्र होतात. पण सगळीकडे विवस्त्रतेची मर्यादा कायद्यानें ठरलेली. लंगोटीसारखें एक वस्त्र किमान असलेंच पाहिजे. साधारण वीतभर उंच अन् तीनचार इंच रुंद असा हा कलाबतूनें मढविलेला कपडा बारीक दोऱ्यानं पुढील बाजूला बांधलेला असतो; मागील बाजू संपूर्णपणें उघडी असते.

माझ्याजवळ एक तरुण बसला होता. सहज आमचें बोलणें निघालें. तो होता हॉलंडचा. त्याला हॉकीचा अतिशय नाद. तो मला म्हणाला, "तुमच्या देशाचे लोक हॉकी फार चांगले खेळतात." इतक्यांत एक मुलगी आमच्याजवळ आली.

ती फरेंच होती. उंची जरा कमीच; पण दिसायला सुंदर, बांधेसूद. ती मला म्हणाली, " तुम्ही हिंदुस्थानचे का ? " मी ' होय ' म्हणून सांगतांच ती म्हणाली, " आमच्याकडे एक हिंदी गाण्याची रेकॉर्ड आहे. त्या रेकॉर्डवर मी या क्लबमध्यें नृत्य करतें. " मला खूपच उत्सुकता वाटली. पॅरिसमध्यें हिंदी गाणें ऐकायला मिळेल असें मला वाटलें नव्हतें.

थोड्या वेळानें ती रेकॉर्ड लागली.— ' नाचो नाचो मेरे मन के मोर ' या गाण्याची ती रेकॉर्ड होती. गाणें सुरू झाल्यावर ती मुलगी स्टेजवर आली. तिनें हिंदी साडी परिधान केलेली होती. एक कडवें झाल्यावर तिनें साडी सोडून टाकली. मग पुन्हा नृत्य करीत फ्रॉक, आणि इतर कपडे ' स्ट्रिप टीज् ' प्रमाणें तिनें काढून टाकले. तिनें केलेलें नृत्य मात्र हिंदी नव्हतें. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य नृत्यप्रकाराची ती भेसळ होती. तिला त्या गाण्याचा अर्थ तर कळत नव्हताच. कपडे काढून टाकण्यासाठीं कांहींतरी निमित्त हवें होतें, एवढेंच !

त्या मुलीचें तें ' हिंदी नृत्य ' चाललें होतें, तेव्हां एक उंच, उमट चेहेऱ्याची पंचविशीच्या वयाची स्त्री माझ्याजवळ आली. तिला इंग्रजी येत नव्हतें. फ्रेंच आणि स्पॅनिशच येत होतें. तिनें माझ्याशीं बोलायला सुरुवात केली, तेव्हां मीं फ्रेंचमधून म्हटलं, " स्पॅनिश भाषेंतला एकच शब्द मला माहीत आहे — ' ग्राशस् ' म्हणजे ' थँक्स. ' "

ती म्हणाली, " मी मूळची स्पेनची. गेलीं आठदहा वर्षं पॅरिसला रहाते आहे. माझं नांव कारमेन. "

मला तें नांव खोटें वाटलें. पण अशा ठिकाणीं अधिक चौकशी किंवा खरें-खोटें कोण करतो ? आम्हीं बीअर घेतली. तिनें हिंदुस्थानबद्दल आणि मी स्पेनबद्दल अतिशय कळकळ दाखविली. थोडा वेळ पॅरिसच्या आणि लंडनच्या अवांतर गप्पा झाल्या आणि ती मला ' मॉनामी ' ( ' माझ्या मित्रा ' ) असें संबोधूं लागली. थोड्या वेळानें ती स्टेजवर ' स्ट्रिप टीज् 'साठीं गेली.

क्लबमध्यें वीसपंचवीस लोक होते. कुणाजवळ मुली गप्पा मारीत होत्या, तर कुणी एकटेच बसले होते. रात्रीचे अडीच वाजले होते. मुलींचा उत्साह हळूहळू मावळत होता. कुणी नवें गिऱ्हाईक आलें तर, एकदम चारदोन मुली ' बोस्वां ', ' बोस्वां ' म्हणून त्याच्याभोंवतीं घोळका करीत. त्यानें त्यांतील एखाद्या मुलीबरोबर ड्रिंक घ्यायला सुरुवात केली कीं बाकीच्या मुली

पुन्हा नव्या इसमाच्या आगमनाची वाट पहात बसत. आळीपाळीनें स्टेजवर जाऊन ‘ स्ट्रिप टीज् ’ करीत.

अधूनमधून दोनचार स्वच्छंदी तरुण आंत डोकावत, दारांतूनच चारपांच मिनिटें पहात आणि ‘ छे: बुवा ! हा क्लब कांहीं चांगला नाहीं ! ’ म्हणून परतत. क्लबच्या सुरुवातीला प्रवेश-फी दिल्यावाय आंत येतां येत नाहीं; पण रात्रीचे दोनअडीच वाजल्यावर या नियमांत जरा शिथिलता येते. क्लबच्या चालकांना वाटतें, दोनचार लोक डोकावून गेले आणि त्यांतला एखादा बसला, तरी चालेल. एखादा सोल्जर किंवा नौदलांतील तरुण मधूनच येई, प्रत्येक मुलीला जवळ घेण्याचा प्रयत्न करी, नि मग एखाद्या मुलीला ड्रिंक देऊन तिचें चुंबन घेई. या क्लबांत मुलीला एक ड्रिंक दिल्यावर तिच्याशीं नर्म-प्रणय केला तरी चालतो. पण त्याची मर्यादा एवढ्यावरच संपते. केव्हांतरी नृत्याच्या रेकॉर्ड लावल्या जातात आणि आपल्याजवळच्या मुलींच्याबरोबर कांहींजण नाचतात. बाकीचे पहात बसतात. क्वचित् कुणी रात्रीं दोनतीननंतर पेंगतो. मग क्लबमधल्या एकदोन मुली त्याच्याजवळ येऊन ओरडतात आणि तो दचकून जागा झाल्यावर मोठमोठ्यानें हंसतात. या मुलींत फ्रेंच मुली बऱ्याच असतात. बाकीच्या स्पेन, इटली, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांच्या असतात. वैचित्र्य म्हणून कांहीं क्लबांत आफ्रिकन किंवा वेस्ट-इंडियन काळ्या मुलीहि असतात. साधारण पहांटे चार-साडेचारपर्यंत नृत्य, गाणें, स्ट्रिप टीज, मद्यपान असा कार्यक्रम चालतो. चार-साडेचारला क्लब बंद होतो.

‘ ब्ल्यू हॉल ’ बंद झाल्यावर मी बाहेर पडलों, तेव्हांहि रस्त्यावर दहावीस रसिक आणि चारपांच स्त्रिया दिसल्या. पॅरिसच्या ‘ मेट्रो ’ सकाळीं सहा वाजतां सुरू होतात. त्यामुळें आणखी दीड तास तरी बाहेरच काढायला पाहिजे होता. त्या वेळींहि कॅफे, रेस्तराँ उघडीं होतीं. ताजीं वृत्तपत्रें नुकतीच विक्रीला आलेलीं होतीं. एखादा पोलिस इकडे तिकडे फिरतांना दिसत होता. टॅक्सीवाले गिऱ्हाइकांच्या शोधांत होते. एखादी मोटार भर्रकन् रस्त्यावरून जात होती. पिगाल चौकाच्या दोन्ही बाजूंच्या हमरस्त्यांवरचे उंच वृक्ष वाऱ्यानें डोलत होते. पहांटेचा गार वारा अंगाला झोंबत होता, आणि उघड्या रस्त्यावर फार वेळ उभें रहाणें कठिण जात होतें.

पिगाल चौक ओलांडून मी एका कॅफेमध्यें शिरणार तोंच कॅफेच्या भिंतीजवळ

अंधारांत उभी असलेली एक तरुणी मला म्हणाली, “ बोस्वां मेस्युअर, कम् वुइथ मी ? ” ( ‘ गुड इव्हिनिंग सर, माझ्याबरोबर येतां का ? ) मी हंसून म्हटलें, “ नो, थँक यू. ”

—ती वेश्या होती. पॅरिसमधें या व्यवसायाला कांहीं काळवेळ नसतोच असें म्हटलें तरी चालेल. तो अखंडपणें चालू असतो. या स्त्रिया अशाच रस्त्यांत कुठें तरी उभ्या असतात, पुरुषांना आकर्षित करून घेतात आणि आपल्याबरोबर नेतात. तासा–दोन तासांसाठीं भाड्यानें मिळणाऱ्या शेंकडों खोल्या आणि हॉटेल्स पॅरिसमध्यें आणि विशेषतः पिगाल भागांत आहेत. गिऱ्हाईक मिळविण्यांत पॅरिसच्या वेश्या अर्थातच अतिशय वाकबगार असतात. ज्री वेश्या आहे असा संशयहि येणार नाहीं, अशी एखादी सुंदर तरुणी रस्त्यावर किंवा उपाहारगृहांत एखाद्याजवळ जाईल आणि तोंडांत सिगरेट धरून विचारील, ‘ जरा सिगरेट पेटवाल का ? ’ त्यानें तिची सिगरेट शिलगाविली, कीं ती हळूंच विचारील, ‘ पांच हजार फ्रँक्सना माझ्याबरोबर याल ? ’ ती काय म्हणते आहे हें लक्षांत येण्यापूर्वीच ती म्हणेल, ‘ बरं तर, तूं माझा मित्र आहेस. चार हजार फ्रँक्स. ’ अशा आणखी एका ललनेचें ‘ निमंत्रण ’ नाकारून मी एका कॅफेमध्यें कॉफी घेत आणि रेल्वे सुरू होण्याची वाट पहात बसलों.

साडेपांच वाजतां मी समोरच असलेल्या ‘ मेट्रो ’–स्टेशनजवळ गेलों. एक वृत्तपत्र विकत घेतलें आणि वाचूं लागलों. स्टेशनचें दार उघडलें नव्हतें. साठसत्तर लोक दाराशीं वाट पहात उभे होते. मीहि वृत्तपत्र वाचीत त्यांच्या गर्दींत उभा राहिलों. माझ्याजवळच एक स्त्री दैनिक ‘ फिगॅरो ’चा अंक वाचीत होती. मीं सहज पाहिलें, तों ती मघांचीच स्पॅनिश ‘ कारमेन ’ होती ! मी इतक्या जवळ होतों कीं तिनेंहि मला पाहिलें असलेंच पाहिजे. पण ती ओळख दाखवीत नव्हती. इतकेंच नव्हे, तर एखाद्या संसारदक्ष गृहिणीसारखी ती दिसत होती. तिचा एखाद्या नाइट–क्लबशीं संबंध आहे असें कुणाला सांगितलें असतें, तर तें खरेंहि वाटलें नसतें. मला वाटलें, हे सभ्यतेचे बुरखे किती फसवे आहेत ! दोन तासांपूर्वीं ही मुलगी सर्वांच्या समोर नग्न होत होती, माझ्याबरोबर हंसून मद्य घेत होती, नव्या गिऱ्हाइकाची नजर आपल्यावर

पडावी म्हणून जंग जंग पछाडीत होती, आणि आतां तर ही अशी वागते आहे कीं आपण त्या गांवच्याच नाहीं !

दहापंधरा मिनिटें वाट पाहिल्यावर ‘ मेट्रो ’चें लोखंडी दार उघडलें. आम्हीं तिकिटें घेतलीं आणि गाडींत शिरलों. या वेळींहि आगगाड्यांना गर्दी दिसली. रात्रीं नाइट–क्लब्स, तमाशे, नाटकें, नृत्यगृहें, मद्यालयें, जुगार, या साऱ्यांत जिवाचें पॅरिस करून ही सारी गर्दी चुरचुरत्या डोळ्यांनीं घरीं परतत होती. काल संध्याकाळीं ताजेतवाने होऊन घराबाहेर पडलेले हे चेहेरे आतां पहांटेच्या फिकट प्रकाशांत म्लान झालेले दिसत होते. याच सुमाराला पॅरिसच्या पहिल्या जीवनांतील लोक प्रफुल्लित मनानें घराबाहेर पडतात. बाजार, कचेऱ्या, नगरपालिकांचीं कामें, वृत्तपत्र–विक्री इत्यादींसाठीं हे लोक नुकतेच घराबाहेर पडले आहेत. पॅरिसचें रात्रीचें आणि दिवसाचें जीवन असें दररोज पहांटे आणि संध्याकाळीं भेटतें. हीं दोन जगें अगदीं वेगळीं असलीं, तरी एखाद्या ‘ रिले रेस ’-प्रमाणें दुसऱ्याच्या स्वाधीन पॅरिस नगरीचा ताबा देऊनच एक जग थोड्या वेळासाठीं निवृत्त होत असतें.

पॅरिसच्या रात्रीच्या जगांत नाइट–क्लबना महत्त्वाचें स्थान आहेच; पण त्यांतूनहि पहिल्या दर्जाचे नाइट–क्लबच मुख्यतः परकीयांच्या पहाण्यांत येतात. बहुतेक परकीय प्रवासी पॅरिसमध्यें अगदीं थोडे दिवस रहातात आणि त्यांना थोड्या वेळांत जास्तींत जास्त आणि सर्वांत चांगलें पॅरिसचें ‘ जीवन ’ पहायचें असतें. त्यांचे ‘ गाइड ’ किंवा प्रवास-एजन्सीहि सर्वांत महाग तें सर्वांत चांगलें, असें समीकरण घालून प्रवाशांच्याकडून जास्तींत जास्त पैसा घेतात. पॅरिसच्या पहिल्या श्रेणीच्या नाइट–क्लबांत ‘ मूलां रूज ’, ‘ नार्सिस ’, ‘ पिगाल ’, ‘ लिडो ’, ‘ नॅचरिस्ट ’ इत्यादींचा समावेश होतो. त्यांतील जागा खूपच मोठी — ६० ते ८० लोकांना आरामांत बसायला पुरेल इतकी असते. आंत उंची फर्निचर अन् इतर झगझगाट असतो. अद्ययावत् ‘ बार ’ आणि ‘ ऑर्केस्ट्रा ’ असतो. तिथलें स्टेज थिएटरप्रमाणें गोलाकार आणि उंच असतें; पण त्यावरून प्रेक्षकांत येण्यासाठीं जिना व पायरस्ता यांची सोय असते. अशा क्लबांत चाळीसपन्नास तरुण सुंदर मुली असतात. तिथेंहि ‘ स्ट्रिप टीज् ’चे कार्यक्रम होतात; पण या मोठ्या क्लबांतील वातावरण इतर क्लबच्या मानानें ‘ औपचारिक ’ असतें. तें जवळजवळ ‘ रेव्ह्यू ’ ( तमाशा ) किंवा ‘ व्हरायटी थिएटर ’सारखें

असतें. मोठ्या क्लबमधील मुलीहि ड्रिंकसाठीं प्रेक्षकांच्या जवळ येऊन बसतात आणि नुकतीच जिला नग्न पाहिली, तिच्याबरोबर ड्रिंक घेण्यांत प्रेक्षकांना विशेष गंमत वाटते. हाच मुख्यतः मोठा क्लब आणि थिएटर यांतला फरक.

या मोठ्या क्लबांतून 'सपर' किंवा उत्तर रात्रीचें जेवण मिळतें. स्टेजवर एकाच वेळीं वीसपंचवीस स्त्रिया जवळजवळ नग्न होऊन नृत्य करीत असतांना दिसतात. आणि त्यांना ऑर्केस्ट्राची साथ असल्यामुळें एकंदर कार्यक्रम अधिक जिवंत ( lively ) वाटतो. पण दुय्यम दर्जाच्या क्लबांतील मोकळेपणा आणि अनौपचारिकता त्यांत आढळत नाहीं. नृत्याच्या दृष्टीनें मात्र पहिल्या दर्जाचे क्लब अधिक कलापूर्ण असतात. त्यांतील मुली अगदीं निवडक आणि अत्यंत लावण्ययुक्त असतातच; पण स्पेन, बाली, फ्रान्स, इटली इत्यादि निरनिराळ्या देशांच्या नृत्यांचे अत्यंत मनोहर कार्यक्रम या मोठ्या क्लबांमधून होतात.

या क्लबांच्या जाहिरातींत जरी दीड-दोन हजार फ्रँकमध्यें भागेल असें लिहिलेलें असलें, तरी हा पाहुणा चिकट आहे असा समज निर्माण करायचा नसेल, तर तीनचार हजार फ्रँक एका रात्रींत खर्च होतात. पण पॅरिसमध्यें खर्चाची काळजी करतो कोण ? आपआपल्या देशांतून नोटांचीं पुडकीं घेऊनच प्रवासी या रंगेल स्वप्ननगरींत येतात आणि तीं संपल्यावर या देशांतून काढता पाय घेतात. पॅरिसमध्यें आपण केव्हां किती खर्च केला, याचा हिशेब फ्रान्स सोडल्यावरच होतो. कारण बेहिशेबीपणा हा तर या रंगेलपणाचा परिणाम आणि कारणहि आहे !

पॅरिसला तमाशाचीं बरींच थिएटरें आहेत. पाश्चिमात्य तमाशांना 'रेव्ह्यू' ( Revue ) आणि त्यांच्या थिएटरांना 'व्हरायटी थिएटर्स' म्हणतात. पॅरिसच्या या थिएटरांत 'फॉलीज् बर्जर', 'कसिनो द पारी', 'मेयॉल', वगैरे थिएटरें प्रसिद्ध आहेत. या तमाशांत कांहीं विनोदीं दृश्यें, कांहीं अर्धनग्न आणि नग्न स्त्रियांचे नाच, संगीत, संवाद, भव्य दृश्यें वगैरे असतात. तमाशांचे खेळ रात्रीं ९ ते १२॥ पर्यंत चालतात. तमाशांत कांहीं प्रेक्षकांनाहि रंगभूमीवर लहानसें काम करण्यासाठीं केव्हां केव्हां बोलावण्यांत येतें. किमान एक लंगोटी-समान कपडा अंगावर घातला पाहिजे ही नाइट-क्लबची अट कायद्यानें तमाशांत काम करणाऱ्या स्त्रियांनाहि लागू असते. मोठ्या तमाशांतून एका वेळीं पन्नास ते पाऊणशें तरुण मुली ही अट पाळून जमेल तेवढें अंग उघडें ठेवून कामें

करतात. या तमाशांतून केव्हां केव्हां जादूचे प्रयोग आणि कसरतीचे प्रयोगहि दाखविण्यांत येतात.

पॅरिसच्या वेश्याव्यवसायाबद्दल प्रवाशांना अतिशय कुतूहल असतें; पण कोणत्याहि मोठ्या शहरांतील या व्यवसायापेक्षां तो कांहीं फार वेगळा नाहीं. पॅरिसच्या वेश्यांना सरकारकडे नांवें 'रजिस्टर' करावीं लागतात आणि दर पंधरा दिवसांनीं वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागते. पण माहितगारांच्या अंदाजाप्रमाणें पॅरिसमध्यें 'रजिस्टर' न झालेल्या सत्तर हजारांवर स्त्रिया हा व्यवसाय करीत असाव्यात. त्यांत निम्याहून अधिक परकीय असतात, आणि कांहीं काळ पॅरिसमध्यें हा व्यवसाय करून त्या आपल्या देशांत परत जातात किंवा लग्न करून रहातात. वेश्यांना रस्त्यावर फिरून लोकांना आकर्षित करण्याचा कायद्यानें अधिकार आहे; पण त्यांनीं लोकांना उपद्रव देतां कामा नये असें कायद्याचें बंधन आहे.

जीवन हें क्षणभंगूर आहे, त्याचा उपभोग जास्तींत जास्त घेतला पाहिजे, अशी भावना पॅरिसच्या जीवनाकडे वरवर पाहून होते; पण हें जीवन या भावनेहून अधिक स्थायी आणि खोल आहे. 'मॉंतमार्त्र' भागांतील विलासी जीवनाकडून पॅरिसच्या भव्य चौकांतील शांत पण प्रगल्भ जीवनाकडे पाहिलें, तर याची खूण पटते.

रोज रात्रीं पॅरिसमधील मोठमोठीं स्मारकें, कारंजीं, पुतळें, चौक, महत्त्वाचे रस्ते आणि इमारती यांच्यावर खास 'फ्लड लाइट्स' टाकून ते प्रकाशित केले जातात. त्यांपैकीं 'आर्क द ट्रायंफ', शँप द एलिसी', 'प्लास द ला कॉंकॉर्ड', 'मॅडलीन', 'नॉत्रदेम चर्च' इत्यादि ठिकाणें दिवसापेक्षांहि रात्रीं अत्यंत शोभिवंत दिसतात. रात्रीं कॉंकॉर्ड चौकांत उडणाऱ्या पाण्याच्या अखंड फवाऱ्यांकडे पाहून वाटतें, हें खरें रात्रीचें पॅरिस. शीत, प्रसन्न, निर्मळ असा हा संतत प्रवाह हेंच पॅरिसचें आणि मानवतेचें खरें प्रतिबिंब. या चौकांत साम्राज्यें उदय पावलीं आणि नष्ट झालीं. सम्राटांचें विजयी स्वागत झालें आणि शिरच्छेदहि झाले. पण जोंपर्यंत मानव आहे, तोंपर्यंत रसिकतेचा, कलेचा आणि सौंदर्याचा हा संतत स्रोत वहात राहील. तो अमर आहे.

♥♥♥

# ८

## पाश्चात्य तमाशा कसा असतो ?

( स्थळ : पॅरिसमधील एक रस्ता. स्टेजवरील पडद्यावर पॅरिसचा इफेल टॉवर, दोन–तीन 'बार', फुलविक्ये वगैरे दाखविले आहेत. जॉन नांवाचा पन्नाशीच्या सुमाराचा इसम लगबगीनें स्टेजवर प्रवेश करतो. )

जॉन – अखेर पॅरिसला तर येऊन पोंचलों; आतां खूप मजा करायला हरकत नाहीं. पण पोरीशिवाय पॅरिसला मजा कसली ? ( एखादी मुलगी येते कीं काय म्हणून इकडेतिकडे पहातो. विशीच्या सुमाराची एक सुंदर फ्रेंच मुलगी प्रवेश करते. तिच्या अंगांत अर्ध्यावर छाती दाखविणारा आणि बहुतेक मांड्या दाखविणारा अगदीं तोकडा फ्रॉक आहे. तिचं नांव मरिया. )

मरिया – अहाहा ! काय सुंदर पुरुष !

जॉन – ( इकडेतिकडे पहात ) कुठंय् ?

मरिया – कुठंय् काय ! – तूंच ! ( निरखून पहात ) अय्या ! तूं तर माझा हरवलेला प्रियकर ! (एकदम त्याच्या गळ्यांत हात घालून त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव करते.) माझ्या राजा ! कुठं होतास इतके दिवस ? मला अगदींच कसा विसरलास ?

जॉन – ( भांबावून ) कोण ? मी ?

मरिया – म्हणजे ? खरंच, तूं मला विसरलास कीं काय ? अरे देवा ! ( रडण्याचा आव आणते. )

जॉन–नाहीं नाहीं ! विसरलों नाहीं. तूंच माझी प्रेयसी हें आतां एकदम लक्षांत आलं माझ्या.

मरिया–माझ्या लाडक्या, पॅरिसमध्यें मी अगदीं एकटी आहे रे !

जॉन–पॅरिसमध्यें, आणि एकटी ? कांहीं काळजी करूं नकोस.

मरिया–चल तर, जरा ड्रिंक घेऊं या.

जॉन–( हळूंच पाकिट उघडून पहातो आणि स्वतःशीं ) पैसे आहेत ना ? मग ठीक.

( दोघेंहि स्टेजच्या एका कोंपऱ्यांत जातात. एक वेटर प्रवेश करतो आणि टेबल आणि दोन खुर्च्या आणून ठेवतो. जॉन स्वतः एका खुर्चीवर बसतो. आणि मरियाला दुसऱ्या खुर्चीवर बसायला सांगतो. )

मरिया–छेः ! मी तुझ्या अगदीं जवळ बसणार ! ( त्याच्या मांडीवर बसते. )

वेटर–( 'मेन्यू' देऊन ) बोस्वां मॅदमायसेल, बोस्वां मेस्युअर.

मरिया–जरा ड्रिंक्स घेऊं या आधीं.

जॉन–ड्रिंक्स ? हां हां ! कांहींतरी चहा–कॉफी घेऊं या.

मरिया–छट् ! मला शॅंपेन पाहिजे.

( जॉन कांहीं बोलणार, त्यापूर्वीच वेटर 'मॅर्सी मेस्युअर' म्हणून जातो. )

जॉन–( पाकिट उघडून पुन्हा पैसे मोजतो. ) अर्धे पैसे शॅंपेनमध्येंच संपले. ( वेटरला ) खायला काय आहे ?

वेटर–नो इंग्लिश.–फ्रेंच.

( जॉनला फ्रेंच येत नाहीं. तो तोंडाकडे हात नेऊन खाण्याची खूण करतो. )

वेटर–वी मेस्युअर ( होय साहेब, )

( मेन्यू देतो. पण मेन्यू फ्रेंचमध्यें असल्यानें जॉनला कांहीं समजत नाहीं. )

जॉन–मासा आणि बटाटे–चिप्स आहेत काय ?

वेटर–नो इंग्लिश.

जॉन–( पोहण्याचा अभिनय करून 'मासा हवा' असें खुणेनें त्याला दाखवतो. वेटर पाणी आणून देतो. जॉन म्हणतो 'पाणी नव्हे.' पुन्हा पोहण्याचा हावभाव करतो. )

वेटर–पाय सा ? नो मेस्युअर.

( जॉन बैलाप्रमाणें ओरडतो आणि 'बीफ' आहे काय असें विचारतो. वेटर 'नाहीं' म्हणतो. मग जॉन बकऱ्याप्रमाणें ओरडतो आणि बकऱ्याचें मांस आहे काय असें खुणावतो. वेटर 'नाहीं' म्हणतो. )

जॉन – ( मरियाला ) टोस्ट आणि अंडं हवं असलं तर कसं ओरडायचं ?

मरिया – कोंबडीसारखा ओरड.

( जॉन कोंबडीसारखा ओरडतो. वेटर 'नाहीं' म्हणतो. जॉन कंटाळून 'मेन्यू'वरचा एक पदार्थ दाखवितो आणि वेटर तो पदार्थ आणून देतो. मरिया व जॉन मिटक्या मारीत तो पदार्थ खातात. जॉन पुनः तो पदार्थ मागवितो आणि आवडीनें खातो. त्यानंतर जॉन वेटरला बोलावून खुणेनें विचारतो कीं, हा पदार्थ कशाचा केला आहे ? ).

वेटर – म्यँव्! म्यँव्!

जॉन – ( मरियाला मांडीवरून ढकलून एकदम उभा रहातो. ) काय ? मांजर ? म्हणजे मीं मांजर खाल्लं ? म्यँव्! म्यँव्! ( वेटरजवळ जाऊन मांजराप्रमाणें वेटरचें अंग चाटूं लागतो. मरिया त्याच्याकडे चमत्कारिक नजरेनें पहाते. इतक्यांत एक सुंदर तरुण इसम हॉटेलांत येतो. मरिया एकदम त्याच्याजवळ जाते आणि त्याच्या गळ्याला मिठी मारते. )


मरिया – अहाहा ! माझ्या लाडक्या प्रियकरा ! कित्ती कित्ती दिवसांनीं भेटलास रे तूं !

जॉन – ( दोघांच्या जवळ जाऊन ) वाः ग वाः ! तुझा प्रियकर हा नव्हे, मी आहे !


मरिया – तूं ? हां हां ! आत्तां मला आठवलं, तूं माझा हरवलेला बाप आहेस, आणि ( नवागत तरुणाचं चुंबन घेऊन ) हा माझा हरवलेला प्रियकर ?

( पडदा पडतो. )

पाश्चात्य तमाशांतील एक दृश्य वानगीदाखल वर दिलें आहे. पाश्चात्य तमाशाला 'रेव्ह्यू' ( Revue ) म्हणतात. इंग्लंडमध्यें होणाऱ्या तमाशांत अठरा ते वीस दृश्यें असतात आणि प्रत्येक दृश्य स्वतंत्र असतें. हा तमाशा दीड ते दोन तास चालतो. फ्रान्समध्यें आणि विशेषतः पॅरिसमध्यें होणारे तमाशे अडीच ते तीन तास चालतात. इंग्लंडमधील तमाशांत पंधरा ते




ब्रिटनचे माजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांचें जन्मस्थल : ब्लेनहीम पार्क



व्हर्सायच्या बागेंतील इतिहासप्रसिद्ध राजवाडा

पंचवीस तरुणी आणि चार ते सहा पुरुष काम करतात. पॅरिसमधील तमाशांतून मात्र पन्नास ते पाऊणशें तरुणी आणि वीस ते पंचवीस तरुण काम करतात. या तमाशांत प्रथम 'ऑर्केस्ट्रा' चा ( वाद्यवृंदाचा ) कार्यक्रम होतो. पॅरिसमधील तमाशांत पहिल्या दृश्यांत तीस ते पस्तीस सुंदर तरुणी अगदीं तोकडा, पण झगझगीत पोषाख घालून स्टेजवर येतात. त्यांच्याबरोबर दहा-पंधरा सुंदर तरुण असतात. पॅरिस नगरीचा रंगेलपणा आणि पॅरिसचें वैभव सांगणारें एक गाणें हीं सर्वजण म्हणतात. शेवटीं 'पॅरिसचा विजय असो' अशा जयजयकारांत पहिलें दृश्य संपतें.

पाश्चात्य तमाशांतील या एकंदर अठरा ते वीस दृश्यांत आठ ते दहा दृश्यें नृत्याचीं असतात, चार ते सहा दृश्यें निव्वळ विनोदी असतात, आणि बाकीच्या दृश्यांतून कुठें जादूचे प्रयोग, कुठें नेमबाजीचे प्रयोग, कुठें कसरत, तर कुठें गाणीं, अशी विविध करमणूक असते. इंग्लंडमधील तमाशांतील एक विनोदी पात्र ( 'कॉमेडियन' ) आपल्याकडील तमाशांतील सोंगाड्यासारखेंच असतें. पण नृत्याच्या दृश्यांत हें पात्र येत नाहीं. केव्हां केव्हां हें विनोदी पात्र स्टेजवर एकटेंच येतें आणि भराभर एकामागून एक चुटके सांगतें. त्याच्या चुटक्यांचे कांहीं नमुने पुढें दिले आहेत :--

" मी तरुण होतों तेव्हांची गोष्ट. लंडनहून मी पॅरिसला जायला निघालों होतों. तेव्हां माझ्या वडिलांनीं मला निरोप देतांना सांगितलं, 'पॅरिसमध्यें फॉलीज् बर्जर नांवाचा तमाशा आहे, त्या तमाशाला तूं जाऊं नकोस.' मीं विचारलं, 'कां ?' बाबा म्हणाले, 'तूं पाहूं नयेस असं कांहींतरी दिसेल तुला तिथं. म्हणून फॉलीज् बर्जरला जाऊं नकोस.' पॅरिसला गेल्यावर मीं विचार केला कीं, मीं पाहूं नये असं असणार तरी काय ? म्हणून मी मुद्दाम 'फॉलीज् बर्जर' तमाशाला गेलों. आणि काय आश्चर्य ! -- मीं पाहूं नये असं खरोखरच कांहींतरी दिसलं मला तिथं ! तें म्हणजे-माझे बाबा ! नग्न स्त्रियांचा नाच पहात ते पहिल्याच रांगेंत बसलेले होते !...

" मी सहारा वाळवंटांत एकाकी सांपडलों असतां, कुठंतरी आसरा मिळेल म्हणून भटकत भटकत निघालों होतों. मला त्या उजाड वाळवंटांत एकच झोंपडी

दिसली. त्या झोंपडीच्या दारावर मीं हातानें ‘ टक् टक् ’ आवाज केला. तेव्हां एका इंग्रज गृहस्थानं दार उघडलं. त्याला पाहून मला आश्चर्यच वाटलं. कारण तो संपूर्णपणें नग्न होता; पण डोक्याला मात्र त्यानं हॅट घातलेली होती ! मीं त्याला विचारलं, ‘ काय हो, तुम्ही असे नागवेच कां रहातां ? ’ त्यानं शांतपणें उत्तर दिलं, ‘ या बाजूला कुणी फिरकत नाहीं. ’ मीं विचारलं, ‘ मग ही हॅट तरी कशाला डोक्यावर घातली आहे ? ’ तो म्हणाला, ‘ पण समजा, चुकून तुमच्यासारखा एखादा इसम आलाच, तर असभ्य दिसूं नये, म्हणून मी ही हॅट नेहमीं डोक्यावर ठेवीत असतों. ’

“ फ्रान्समधील वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांना आपल्या विशिष्ट चालीरीती पाळण्याची फार हौस. कुणी कॉफी देऊं लागलें, तर त्या म्हणतील, ‘अप्रे व्हू.’ (‘ आफ्टर यू — आधीं आपण, नंतर मी. ’) अशीच एक बडी स्त्री किंचित् आजारी पडली असतांना, आपली नवी मोटार घेऊन ती पॅरिसमधील एका प्रसिद्ध डॉक्टरकडे गेली. डॉक्टरांनीं तिला तपासणीच्या खोलींत नेलें. तपासणीच्या खोलींत गेल्यावर डॉक्टर तिला म्हणाले, ‘ बाई, कपडे काढा ! ’ तेव्हां ती बाई नम्रपणानं म्हणाली, ‘ डॉक्टर, अप्रे व्हू. ’ ( आधीं तुम्ही कपडे काढा, मग मी काढतें. ’)...

“ एकदां मी डॉक्टरकडे गेलों असतां, डॉक्टरनं मला कपडे काढायला सांगितलं. मी सगळे कपडे काढून कोपऱ्यांत उभा राहिलों. डॉक्टर वर्तमानपत्र वाचीत होते, ते मला विसरलेच. अर्ध्या तासानं एकदम त्यांचं लक्ष माझ्याकडे गेलं, तेव्हां ते दिलगिरीच्या सुरांत मला म्हणाले, ‘ माफ करा बाईसाहेब ! तुम्ही कपडे काढून उभ्या आहांत हें मी विसरलोंच ! ’ त्यांच्या तोंडचीं हीं वाक्यं ऐकतांच मीं भराभर कपडे अंगावर चढवले अन् दवाखान्याबाहेर पळत सुटलों. स्त्री आणि पुरुष यांच्यांतला फरक ज्याला माहीत नाहीं, तो मला काय औषध देणार ?... ”

कांहीं वेळां स्टेजवर दोन विनोदी पात्रें येतात आणि त्यांचे विनोदी संवाद होतात. यांपैकीं कांहीं संवाद इंग्रजी भाषेतील खांचाखोचांवर आधारलेले

असतात. त्यांपैकीं नमुना म्हणून एक खालीं देत आहे :

Charlie – My landlady is in love with me.

( चार्ली – माझी घरमालकीण माझ्या प्रेमांत पडली आहे. )

Friend – How do you know ?

( मित्र – हें तुला कसं कळलं ? )

Charlie – She sent me this note this evening. The note says, ' Be in bed before I am. '

( चार्ली – तिनं आज संध्याकाळीं मला ही चिठ्ठी पाठवलीय्. या चिठ्ठींत तिनं म्हटलंय्, ' माझ्याआधीं अंथरुणांत ये. ' )

Friend – Let me read it you fool ! This note says, ' Be in bed before I A. M. '

( मित्र – पाहूं दे ती चिठ्ठी. मूर्खा ! या चिठ्ठींत लिहिलंय् कीं, ' रात्रीं एकच्या आधीं तूं झोंपलं पाहिजेस ! ' )

इंग्रजी भाषेवर आधारलेलें आणखी एक दृश्य असें :

( स्थळ : रस्ता. एक तरुण लगबगीनें येतो. समोरून एक तरुणी येते आहे असें पहातांच तो थांबतो. )

तरुण – Are you a good girl ? तूं सच्छील मुलगी आहेस ?

तरुणी – Yes. होय.

तरुण – Then good night ! तर मग रामराम ! ( असें म्हणून जातो. )

पाश्चात्य तमाशांत जीं विनोदी दृश्यें असतात, त्यांत बहुधा चावटपणाचा किंवा प्रेमाच्या चाळ्यांचाच भाग असतो. इंग्लंडमधील एका तमाशांत पुढील दृश्य होतें :

( स्थळ : ऑक्सफर्ड. आपल्या खोलींत विद्यार्थी खुर्चीवर बसला आहे आणि त्याच्या मांडीवर एक विद्यार्थिनी बसली आहे. इतक्यांत दारावरची घंटा वाजते.)

विद्यार्थी – अरे बाप रे ! हें कोण आलं मधेंच ? ( लगबगीनें उठतो आणि जवळच्या मोठ्या कपाटांत त्या मुलीला लपवून खोलीचें दार उघडतो. एक वृद्ध गृहस्थ प्रवेश करतो. )

वृद्ध – माफ करा हं. पण पन्नास वर्षांपूर्वी मी याच खोलींत अभ्यासाला रहात होतों. तेव्हां म्हटलं, आपली जुनी खोली पुनः एकदां पहावी.

विद्यार्थी – हो हो ! पहा ना.

वृद्ध – अहाहा ! अगदीं तीच खोली ! तेंच टेबल, तीच खिडकी, तेंच दृश्य...अरे ! अगदीं तेंच कपाट ! ( कपाटाकडे जाऊं लागतो. )

विद्यार्थी – ( अस्वस्थपणें ) अहो,—अहो, तें कपाट—

वृद्ध – या कपाटांत एका काळीं आम्ही काय काय वस्तू ठेवीत असूं! ( कपाट उघडतो. तरुणी बाहेर येते. )

विद्यार्थी – अहो, ती माझी बहीण आहे.

वृद्ध – अरे ! म्हणजे वाः ! थापाहि त्याच ! आम्हीसुद्धां असंच सांगत होतों. एकूण काय, पन्नास वर्षांत कांहींच बदल झालेला नाहीं म्हणायचा !

पॅरिसमधील एका पहिल्या दर्जाच्या तमाशांत पुढील दृश्य होतें :

( एक मध्यमवर्गीय घर. दिवाणखान्यांत नवरा वर्तमानपत्र वाचीत बसला आहे. बायको बरीच खरेदी करून प्रवेश करते. )

पत्नी – मी आज खूपखूप नव्या वस्तू आणल्या आहेत; या पाहिल्यास का ? ही बघ माझी हॅट. ( नवरा तिच्याकडे लक्ष न देतां वाचीतच रहातो. ) आणि हा बघ मिंक कोट. ( कोट काढते ) हा माझा नवा ड्रेस पाहिलास का ? किती सुंदर आहे ! ( नवरा तिच्याकडे पहातहि नाहीं. )

पत्नी – ( हॅट फेंकून देऊन रागानें ) मघांपासून मी ओरडतें आहे, माझ्याकडे लक्ष तरी देतोयस का तूं ? लग्नापूर्वी माझ्यावर किती प्रेम करीत होतास तूं! पण लग्न झाल्यापासून मात्र तूं माझ्याकडे संपूर्णपणं दुर्लक्ष करूं लागला आहेस ! ( तरीहि नवरा शांतपणें वृत्तपत्र वाचीत बसतो. )

पत्नी – ( निश्चयानें ) तें कांहीं नाहीं ! तुला वठणीवर आणायचा एकच मार्ग उरला आहे आतां. मी सारे कपडे काढतें आणि अगदीं नागडी जाऊन रस्त्यावर उभी रहातें ! ( भराभर सारे कपडे काढते आणि जवळजवळ नग्न होते. नवऱ्याकडे पहात ) पाहिलंस का ? अशी मी रस्त्यावर जाते बघ !

नवरा – ( वर्तमानपत्र बाजूला ठेवून ) अग जरा थांब.

पत्नी – ( विजयानें ) आतां कशी मात्रा लागू पडली ! आत्तां आठवण झाली काय माझी ?

नवरा – ( तिच्या हातीं एक पत्र देत ) तसं नव्हे ग ! पण तूं एवींतेवीं रस्त्यावर जातेच आहेस, तर एवढं माझं पत्र समोरच्या पोस्टांत नेऊन टाक !

पैसे मिळविण्यासाठीं काय करावें असा प्रश्न बेकारांच्यापुढें नेहमींच उभा असतो. त्यावरून एका तमाशांत पुढील दृश्य दाखविलें होतें :

( स्थळ : रस्ता. फिलिप आणि रॉबर्ट हे दोघे मित्र बोलत आहेत. )

फिलिप – काय करावं बुवा ! नोकरी नाहीं, धंदा नाहीं. अगदीं कंटाळलों. पैसा मिळवायचा तरी कसा ?

रॉबर्ट – हें बघ, माझ्याकडे एक पिस्तुल आहे. ( पिस्तुल खिशांतून बाहेर काढतो. ) या पिस्तुलाच्या जोरावर वाटमारीचा धंदा करूंया. तूं इथं पिस्तुल घेऊन उभा रहा. जो कोण येईल त्याच्यावर पिस्तुल रोख. त्याच्याजवळ असेल तें घे. जें जें मिळेल त्यांपैकीं अर्धं तुला आणि अर्धं मला.

फिलिप – ठीक आहे. दे तें पिस्तुल. ( पिस्तुल घेतो. रॉबर्ट जातो. थोड्या वेळानें चाळिशीच्या वयाचा एक इसम येतो. )

फिलिप – ( त्याच्यावर पिस्तुल रोखून ) कोण आहे तें ? थांब. खिशांत काय असेल तें टाक.

गृहस्थ – ( आनंदानें ) बरा भेटलास तूं बाबा ! काय सांगूं तुला, माझी आज फारच वाईट परिस्थिति झाली आहे ! आठ दिवसांपूर्वी नोकरी गेली. बायको माहेरीं गेली. घराचं भाडं थकलंय्. मुलांना नि मला खायला कांहीं नाहीं. कृपा करून तूंच आतां थोडी तरी मदत कर मला.

फिलिप – ( डोळ्यांत अश्रू आणून ) अरेरे ! माझ्यापेक्षांहि तुझी स्थिति वाईट दिसतेय् ! बरं, माझ्याजवळ फक्त एक पौंड आहे. ( खिशांतून पैसे काढीत ) त्यांपैकीं तुला दहा शिलिंग घे आणि मला दहा शिलिंग राहूं देत. ( दहा शिलिंग देतो. )

गृहस्थ – ( पैसे खिशांत घालीत ) थँक यू. ( जातो. )

( रॉबर्ट येतो. )

रॉबर्ट – ( उत्सुकतेनें ) काय दोस्ता, काय मिळालं ?

93६६

फिलिप – तूं माझे पांच शिलिंग देणं लागतोस.

रॉबर्ट – म्हणजे ? तूंच त्याला पैसे दिलेस ? अरे, असं करून कसं चालेल ? ती बघ, एक बाई या बाजूनं येते आहे. या खेपेला कांहींतरी मिळवच.

( रॉबर्ट जातो. एक तरुणी लचकत मुरडत येते. )

फिलिप – ( पिस्तुल रोखून ) तुझ्या पर्समध्यें काय असेल तें दे, नाहीं तर प्राणास मुकशील !

तरुणी – ( त्याच्या गळ्याभोंवतीं हात टाकीत ) माझ्या प्रियकरा ! मी तुझीच वाट पहात होतें.

फिलिप – अग, पण मला प्रेम नकोय्, मला पैसे हवेत !

तरुणी – ( त्याचें चुंबन घेऊन ) हें घे !

फिलिप – आणखी एक तरी घे. म्हणजे माझ्या भागीदाराला त्याचा वांटा बरोबर देतां येईल.

( ती त्याचें आणखी एक चुंबन घेते. )

फिलिप – थँक् यू. बरं, गुड बाय् डार्लिंग...( ती जाते. रॉबर्ट येतो. )

रॉबर्ट – हं, टाक माझा वांटा. ( फिलिप रॉबर्टचें चुंबन घेतो. )

रॉबर्ट – हें काय ?

फिलिप – मला जें मिळालं, त्यांतला अर्धा वांटा.

रॉबर्ट – छेः छेः ! असं मिळमिळितपणं वागून चालायचं नाहीं. जरा कठोरपणं काम कर. हा बघ, आणखी एक गृहस्थ येतो आहे. ( जातो. एक गृहस्थ येतो. )

फिलिप – ( पिस्तुल रोखून ) अहो मिस्टर !—

( तो गृहस्थ कांहीं न बोलतां फिलिपकडे वळून सरळ एक ठोसा त्याच्या हनुवटीवर मारतो, आणि त्याच्या हातांतलें पिस्तुल उडवून देतो. फिलिपला आणखी दोन गुद्दे मारून तो निघून जातो. रॉबर्ट येतो. )

फिलिप – ( रॉबर्टला एक गुद्दा मारून ) हा—हा घे तुझा वांटा !

रॉबर्ट – तूं अगदींच नेभळट आहेस ! आतां ही शेवटची संधि आहे बघ. एक पोरगी येते आहे. ( जातो. एक तरुणी येते. )

फिलिप – ( पिस्तुल रोखून ) तुझी पर्स दे ! ( तरुणी किंकाळी मारते आणि पर्स टाकून पळून जाते. )

रॉबर्ट–( प्रवेश करून ) काय ? काम फत्ते झालं ?

फिलिप–( पर्स उघडीत ) होय. आतां हिच्यांत काय–काय आहे पाहूंया. ( पर्समधून एक बॉडी निघते. ) हें एवढंच दिसतंय् पर्समध्यें. ( रॉबर्टचा चेहरा उतरतो. ) कात्री आहे का तुझ्याकडे ! तुझा अर्धा भाग तुला देऊन टाकतों !

( पडदा. )

सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे कांहीं लोक केव्हां केव्हां इतरांच्या खाजगी जीवनांत लुडबूड करीत असतात. त्यावर आधारलेलें दृश्य पॅरिसच्या एका तमाशांत आढळलें :

( स्थळ : रस्ता. एक वृद्ध आणि एक तरुण प्रवेश करतात. )

वृद्ध–आजपासून तूं आमच्या ' समाज–सेवा संस्थे 'चा सभासद झालास. आतां जनतेची सेवा करणं, तिला मदत करणं हेंच तुझं काम. लोक केव्हां मदत मागतील, तर केव्हां मागणार नाहींत; अशा वेळीं तारतम्य ओळखून आपण लोकांनीं न मागतांहि त्यांना मदत दिली पाहिजे.

तरुण–बरोबर आहे. आपल्या संस्थेच्या नियमाप्रमाणें मी सदैव सर्वांना मदत करीन.

( वृद्ध जातो. एक जोडपें भांडतभांडतच प्रवेश करतें. त्यांचें भांडण तो तरुण लक्षपूर्वक ऐकत रहातो. )

नवरा–गेलीं तीनचार वर्षं पहातों आहे मी, पण घरांत आणि घराबाहेर सारखीं भांडणं, भांडणं, भांडणं !

बायको–तुम्हीच कांहींतरी निमित्त काढून भांडणं करतां !

( सामाजिक तरुण कार्यकर्ता दोघांच्या जवळ जाऊन कान टवकारून ऐकतो.)

नवरा–आपलीं अशीं सारखीं भांडणं कां व्हावींत ?

बायको–मी सांगूं का, आपल्याला मूल नाहीं, म्हणून अशीं भांडणं होतात.

सामाजिक कार्यकर्ता–बाईसाहेब, या बाबतींत मी आपल्याला कांहीं मदत करूं का ?

( नवरा त्याला मारायला धांवतो. सामाजिक कार्यकर्ता पळून जातो. पडदा पडतो.)

आपल्याकडील तमाशांत एक सोंगाड्या दुसऱ्याला म्हणतो, ' चला राव, जरा गाणंबजावणं ऐकूं. ' असें म्हणून ते एखाद्या बाईकडे गाणें ऐकायला जातात. पाश्चात्य तमाशांतहि अशा धर्तीवर एक दृश्य आढळलें. त्यांत दोन मित्र पॅरिसला मजा मारायला जातात असें दाखविलें आहे. या दोन मित्रांचीं नांवें ' जॉनी ' आणि ' चार्ली ' आहेत, असें समजूं. पॅरिसच्या रस्त्यावर त्यांना एक फरेंच तरुण भेटतो. त्याचें नांव ' बॉब. ' तो त्यांना विचारतो, " काय राव, गाणं–नाच वगैरे कांहीं हवं का ? " मित्रांनीं ' होय ' म्हणतांच स्टेजवरच जरा फिरून ' बॉब ' सांगतो, " हं, हें पहा मॅदमॉयसेल फौंटेना हिचं घर. " ( इतक्यांत एक सुंदर तरुण मुलगी प्रवेश करते. )

बॉब – हिच्या नृत्याचं एक वैशिष्ट्य आहे. मी तुम्हांला एकेक गहन प्रश्न विचारीन. त्याचं तुम्ही बरोबर उत्तर दिलंत, तर ही प्रत्येक वेळीं अंगावरचा एकेक कपडा काढून नृत्य करील.

चार्ली – छान आहे कल्पना ! तुमचा प्रश्न बोला.

बॉब – तुमच्या हाताला बोटं किती आहेत ?

चार्ली – पांच.

बॉब – बरोबर ! ( फौंटेना नाच सुरू करते. नाचत नाचत ती चार्लीच्या जवळ येते आणि डोक्यांत खोंवलेलें एक कोंबडीचें पीस त्याच्या हातांत देते. )

चार्ली – अरे बाप रे ! या गतीनं सारे कपडे काढायला एक आठवडा तरी लागेल !

( मग बॉब एक–एक प्रश्न विचारतो, चार्ली उत्तरं देतो आणि फौंटेना एक एक कपडा काढीत नाचते. शेवटीं तिच्या अंगावर फक्त बॉडी आणि चड्डी रहाते. तेव्हां विचारलेल्या प्रश्नांत चार्ली हरल्यामुळें हें दृश्य एवढ्यावरच थांबतें.)

एका दृश्यांत तीन मित्र चिकार प्याले आहेत असें दाखविलें होतें. रात्रीं दोनच्या सुमाराला ते रस्त्यानें अडखळत घरीं जाऊं लागतात.

पहिला – अरे, आपापल्या घराचे पत्ते सांपडतील का आपल्याला ?

दुसरा – मला वाटतं, कुणातरी एकाचं घर सांपडलं तरी चालेल. तिथंच सारेजण झोंपूं म्हणजे झालं.

पहिला – ही कल्पना चांगली आहे. तुम्ही दोघे असं करा, कीं माझ्याच घरीं चला. माझी बायको इतकी चांगली आहे कीं, तुम्हांला ती अतिशय आदरानं वागवील. माझ्या घरांत या. हवं तर आणखी जरा ड्रिंक घ्या, थोडं फार खा, आणि स्वस्थ झोंपा.

तिसरा – बरोबर ! चला तर. ( स्टेजवर इकडेतिकडे फिरून कोंपऱ्यांतल्या दाराची घंटा वाजवितात. आंतून पहिल्या गृहस्थाची बायको हातांत लाटणें घेऊन आणि चंडिकेचा अवतार धारण करून येते. )

बायको – ( नवऱ्याला ) आलांत का घरीं ? आतां दोन–अडीच वाजले. ही घरीं यायची वेळ काय ? आणि हे कोण उपटसुंभ आणले आहेत बरोबर ? या तर म्हणावं मेल्यांनो, एकेकाची हड्डी नरम करून टाकते ! तरी माझी आई सांगत होती कीं, ' नवऱ्याला सैल सोडूं नकोस. ' आतां उद्यांच्या उद्यां मी माहेरीं जाते. मग करा काय वाटेल तें ! ( घरांत जाऊन दार धाडकन् बंद करते. )

दुसरा – कांहीं काळजी करूं नका मित्रांनो ! माझी बायको अशी नाहीं. तिचं अतिशय प्रेम आहे माझ्यावर. ती नक्कीच तुम्हांला चांगल्या प्रकारं वागवील. ( तिघेहि स्टेजवर इकडेतिकडे फिरून पुन्हा दारावरची घंटा वाजवतात. आंतून दुसऱ्याची बायको येते. तिच्याहि हातांत लाटणें असतें. )

बायको – आलांत का घरीं ? आतां दोन–अडीच वाजले. ही घरीं यायची वेळ कीं काय ? आणि हे कोण उपटसुंभ आणले आहेत बरोबर ? या तर म्हणावं––

नवरा – पुढचं तूं बोलूंच नकोस ! आम्हांला तें सारं पाठ आहे. –– ' या तर म्हणावं मेल्यांनो, एकेकाची हड्डी नरम करून टाकते ! तरी माझी आई सांगत होती कीं, नवऱ्याला सैल सोडूं नकोस. आतां उद्यांच्या उद्यां मी माहेरीं जातें––'

( बायको त्याच्याकडे रागानें पहात घरांत जाते आणि दार बंद करून घेते. )

तिसरा – तुम्हांला दोन अनुभव वाईट आले; पण माझ्या बायकोच्या बाबतींत तसं मुळींच व्हायचं नाहीं. कांहीं झालं तरी ती सुसंस्कृत स्त्री आहे. नवरा उशीरां आला म्हणून ती मुळींच रागावणार नाहीं. उलट सर्वांनाच ती प्रेमानं वागवील.

( स्टेजवर तिघेहि इकडेतिकडे फिरून दारावरची घंटा वाजवतात. एक स्त्री येते आणि तिसऱ्या मित्राच्या गळ्याभोंवतीं हात टाकते. )

स्त्री – डार्लिंग! इतक्या वेळानं का होईना, पण माझ्याकडे तूं आलास म्हणून मला खूप खूप आनंद झालाय्! ये, आंत तर ये.

तिसरा – अग, पण माझे दोन मित्र आहेत बरोबर.

स्त्री – मग, त्यांनाहि आंत येऊं दे कीं. तुम्ही सारेजण दमलेले दिसतां. घरांत या, थोडं ड्रिंक घ्या, जेवा, विश्रांति घ्या.

( तिघेहि खुषीनें आंत जातात. थोड्या वेळानें ती स्त्री दार उघडून पुन्हा बाहेर येते. )

स्त्री – ( प्रेक्षकांना उद्देशून ) माझ्या वागण्याचं आश्चर्य वाटलं असेल तुम्हांला, नाहीं? पण खरं सांगूं का? मी या तिघांपैकीं कुणाचीच बायको नाहींय्. म्हणूनच इतका जिव्हाळा दाखवते आहे मी. ( पडदा. )

इंग्लंडमधील तमाशांत फ्रेंच लोकांच्या जादा ‘ रंगेल ’पणाची चेष्टा केलेली असते, तर फ्रान्समधील तमाशांत इंग्रज लोकांच्या ‘ थंड ’पणाची थट्टा केलेली असते. इंग्रज इसम सारें कांहीं करणारा, पण कमी बोलणारा आणि सभ्यतेचा बुरखा घेतलेला असतो असें पॅरिसच्या तमाशांत दाखवितात. ‘कसिनो द पारि’ या पॅरिसच्या तमाशांत “ इंग्रज लोक ‘ येस्! ’ कसें म्हणतात? ” या नांवाचें एक दृश्य आहे. सुमारें वीस मिनिटें चालणाऱ्या या दृश्यांत अनेकदां ‘ येस् ’ आणि फक्त एकदां ‘ नो ’ एवढेंच शब्द वापरण्यांत आले आहेत. हें दृश्य पुढीलप्रमाणें आहे :

(एका मध्यमवर्गीय इंग्रज तरुणाची खोली. अल्बर्ट — तो तरुण – वृत्तपत्र वाचीत आहे. इतक्यांत टेलिफोन वाजतो. )

अल्बर्ट – ( टेलिफोन उचलून ) येस्? ( एकदम खुषींत येऊन ) येस् येस्! ( थोडा वेळ ऐकून ) येस्! ( टेलिफोन खालीं ठेवतो. पुनः जरा वृत्तपत्र वाचून उठतो आणि केंसावरून फणी फिरवतो. अत्तराचा फवारा अंगावर मारतो. इतक्यांत दारावर टिचक्या ऐकूं येतात. ) येस्. ( दार उघडतो. पंचविशीच्या वयाची एक सुंदर स्त्री प्रवेश करते. ती येतांच त्याच्या गळ्याला मिठी मारते. तो तिचें चुंबन घेतो. ) येस्?

ती – येस् !

अल्बर्ट – ( तिचा पेटिकोट काढीत ) येस् ?

ती – येस् !

अल्बर्ट – ( तिच्या फ्रॉकला हात घालून ) येस् ?

ती – येस्... ( तिचा फ्रॉक काढतो. )

अल्बर्ट – ( तिच्या फ्रॉकच्या आंत गळ्यापासून गुडघ्यापर्यंत असलेलें पांढरें वस्त्र काढीत ) येस् ?

ती – येस् !

अल्बर्ट – ( तिच्या बॉडीला हात घालून ) येस् ?

ती – येस् ! ( तिची बॉडी काढतो. )

अल्बर्ट – ( तिचा चड्डीला हात घालून ) येस् ?

ती – येस् ! ( चड्डी काढतो. तिच्याखालीं लंगोटीसारखें लहान कापड असतें. )

अल्बर्ट – ( तिच्या हॅटला हात घालून ) येस् ?

ती – ( घाबरून ) नो. ( अल्बर्ट अर्धवट काढलेली तिची हॅट पुन्हा तिच्या डोक्यावर ठेवतो. मग तिला बाहुपाशांत घेऊन तिचें चुंबन घेतो. इतक्यांत दारावर टिचक्या वाजतात. )

अल्बर्ट – येस् ! ( दुसरा तरुण — त्याचें नांव 'मायकेल' — प्रवेश करतो. )

मायकेल – ( तिला उद्देशून आणि अल्बर्टकडे बोट दाखवून ) येस् ?

ती – येस्.

मायकेल – ( अल्बर्टला उद्देशून आणि तिच्याकडे बोट दाखवून ) येस् ?

अल्बर्ट – येस्.

( मायकेल आपल्या खिशांतून पिस्तुल काढतो आणि अल्बर्टवर गोळी झाडतो. अल्बर्ट खालीं पडतो. ती तरुणी त्याच्याजवळ जाऊन त्याचें चुंबन घेते.)

ती – येस् ?

अल्बर्ट – ( मरतांमरतां ) येस् !

( दारावर टिचक्या वाजतात. एक पोलिस–अधिकारी आणि दोन पोलिस येतात. )

पोलिस–अधिकारी – ( पिस्तुल रोखून मायकेलला ) येस् ?

मायकेल – ( उद्वेगानें ) येस् !

( पोलिस–अधिकारी मायकेलला अटक करतो. ती तरुणी अल्बर्टजवळून उठते आणि मायकेलला मिठी मारते. )

ती – येस् ?

मायकेल – येस् ! ( पोलिस सर्वांना घेऊन जातात. पडदा. )

कांहीं वेळां प्रेक्षकांनाहि रंगभूमीवरच्या दृश्यांत सामील करून घेण्यांत येतें. लंडर्नच्या एका तमाशांतील दृश्यांत नवराबायकोचें भांडण होत असल्याचा प्रसंग होता. त्यासाठीं प्रेक्षकांतून एका इसमाला स्टेजवर बोलाविण्यांत आलें. स्टेजवर चाळिशीच्या वयाची एक स्त्री आणि अठ्ठावीस वर्षांची एक मुलगी होती. प्रौढ स्त्री ही त्या दृश्याची डायरेक्टर होती. तिनें रंगभूमीवर आलेल्या इसमाला सांगितलें कीं, या नाटकांत ही तुमची बायको होईल. मग डायरेक्टर त्या इसमाला नवऱ्याचा संवाद सांगते आणि लहानसें विनोदी प्रहसन करून दाखविण्यांत येतें.

पॅरिसमधील ‘ कसिनो द पारी ’ या तमाशांत एकदां चार लांकडी घोडे रंगभूमीवर ठेवण्यांत आले होते. घोड्यांना रबरी पट्टे होते आणि घोड्यावर बसून ते हलविले कीं, ते घोडे थोडे थोडे पुढें सरकत असत. यावेळीं रंगभूमीवर पांच मुली असतात. मग ‘ प्रेक्षकांतून कुणीहि चार इसमांनीं स्टेजवर यावें, ’ अशी विनंती करण्यांत येतें. चार उत्साही पुरुष रंगभूमीवर येतात. प्रमुख मुलगी त्यांना सांगते, ‘ तुम्हांला कोणती बायको पाहिजे ती निवडा. ’ चार इसम चार बायका निवडून घेतात. थोड्या वेळांत घोड्यांची शर्यत सुरू होते. घोड्यावर बसण्यापूर्वी चारहि ‘ जॉकी ’ आपल्या ‘ बायकां ’चें चुंबन घेतात. शर्यत सुरू झाल्यावर या बायका ओरडून आपापल्या नवऱ्यांना प्रोत्साहन देतात. आठदहा मिनिटेंपर्यंत चालणाऱ्या शर्यतींत घोडें फार तर तीनचार फूट पुढें सरकतात. शर्यतींत पहिला येणाऱ्याला फुलांचा गुच्छ बक्षिस देण्यांत येतो. शेवटीं सर्वजण आपापल्या तात्पुरत्या ‘ बायकां ’चें चुंबन घेतात आणि आपापल्या जागीं जातात. यानंतर दोनतीन दृश्यें झाल्यावर पुनः

रंगभूमीवर दहाबारा मुली येतात. त्यांच्यांतली प्रमुख मुलगी प्रेक्षकांना म्हणते, "चार नवरे हवे आहेत. कोण–कोण येणार ?" — अर्थात् मागील दृश्याच्या सुखद विचारानें अनेकजण पुढें येतात अणि त्यांपैकीं चार प्रेक्षकांची निवड करण्यांत येते. त्यांनीं रंगभूमीवरील आपल्या बायका निवडल्यावर त्या म्हणतात, "डार्लिंग, आतां मी बाजारांत जातें. मी येईपर्यंत हे बटाटे सोलून ठेव बरं." या वेळीं स्टेजवर बटाट्यांनीं भरलेलीं चार मोठीं पिंपें आणण्यांत येतात. नवरे कांहीं बोलण्यापूर्वीच बायका 'ऑरवॉ' ('गुड बाय्') असें म्हणून स्टेजवरून निघून जातात. चुंबनांच्या अपेक्षेनें स्टेजवर गेलेल्या 'नवऱ्यां'ची फजिती होऊन त्यांना बटाटे सोलावे लागतात आणि इतर प्रेक्षकांत हंशा पिकतो !

कांहीं तमाशांतील नृत्यांत भाग घेण्यासाठीं प्रेक्षकांना बोलाविण्यांत येतें. पाश्चात्य देशांत सर्वांनाच कांहीं विशिष्ट नृत्यें येत असल्यानें प्रेक्षकांतून हवे तेवढे लोक अशा नृत्यांसाठीं मिळूं शकतात. लंडनच्या एका तमाशांत तर प्रेक्षकांतून बोलाविलेल्या स्त्रीपुरुषांच्याच नृत्याची चढाओढ असते. एका वेळीं हव्या तेवढ्या जोड्या प्रेक्षकांतून स्टेजवर येतात. मग तमाशाच्या बँडवर प्रत्येक जोडी स्वतंत्रपणें नृत्य करते. शेवटीं प्रेक्षकांनीं टाळ्या वाजवून निर्णय द्यायचा. ज्या जोडीला सर्वांत अधिक टाळ्या मिळतील, त्या जोडीला फौंटनपेन किंवा चॉकलेटचा पुडा बक्षिस मिळतो.

पॅरिस येथील 'मेयॉल' थिएटरांतील एका तमाशाचा एक भाग म्हणून जादूचे खेळ होते. जादूगारानें प्रेक्षकांपैकीं एकाला विचारलें, "तुमचा कोट देतां का ?" प्रेक्षकानें आपला कोट काढून त्याला दिला. जादूगारानें त्याला कोटांत कोणत्या वस्तू आहेत हें विचारलें आणि प्रेक्षकानेंहि रुमाल, पाकिट, सिगारेटची डबी वगैरे वस्तूंचीं नांवें सांगितलीं. मग जादूगारानें कोटांतून त्या वस्तू बाहेर काढायला सुरुवात केली. शेवटीं जादूगारानें त्या कोटांतून स्त्रियांनीं वापरायची एक चड्डी ('निकर्स') आणि बॉडी काढून दाखविली, तेव्हां बिचारा तो कोटाचा मालक शरमून गेला ! कारण त्यानें त्या दोन्ही वस्तू कोटांत ठेवलेल्या नव्हत्या. हंसणाऱ्या प्रेक्षकांकडे पाहून जादूगार म्हणाला,

"छेः छेः! आतां हा कोट परतच दिलेला बरा! त्यांतून आणखी काय–काय चमत्कारिक वस्तू निघतील, कोण जाणे?"

पॅरिसच्या 'फॉलिज् बर्जर'मध्यें एका दृश्यांत एका प्रेक्षकाला स्टेजवर बोलाविण्यांत आलें. त्याला असें काम देण्यांत आलें होतें कीं, गाण्याचें एक कडवें संपलें कीं, त्यानें स्टेजवरच्या तरुणीच्या अंगावरील एक कपडा काढायचा. गाण्याचीं तीनचार कडवीं झालीं आणि त्यानें त्या तरुणीच्या अंगावरचे बहुतेक कपडे काढले. शेवटच्या कपड्याच्या वेळीं ती तरुणी त्याला म्हणाली, "माझे कपडे काढतांना तुम्हांला बरं वाटत असेल नाहीं का? आतां तोच प्रयोग मी तुमच्यावर करते, थांबा!" असें म्हणून ती त्याची पँट ओढते आणि तो आंतील चड्डी सांवरीत विंगमध्यें पळून जातो! मग प्रेक्षकांच्या लक्षांत येतें कीं, तमासगिरापैकींच एकाला प्रेक्षकांत बेमालूमपणें बसविण्यांत आलेलें होतें!

लंडनच्या एका तमाशांत विनोदी नट चुटके सांगायला सुरुवात करतो. तो म्हणतो, "आज लंडन शहरांत मीं एका बावळट पोलिसाची गंमत पाहिली. मी संध्याकाळीं थिएटरकडे येत होतों——" इतक्यांत प्रेक्षकांच्या जवळच्या दारांतून एक पोलिस आंत येतो आणि म्हणतो, "अहो मिस्टर, पोलिस–खात्याची अशी बदनामी कराल तर मला तमाशा बंद करावा लागेल!" तेव्हां विनोदी नट माफी मागून म्हणतो, "बरं बुवा, माझं चुकलें! पोलिसदादा, तुमची चेष्टा मी करणार नाहीं. आतां मी तुम्हांला आमच्या लँडलेडीची गोष्ट सांगतों. आमची लँडलेडी म्हणजे तिरसट आणि मूर्ख बाई आहे. काल सकाळीं मी——"

इतक्यांत प्रेक्षकांतून एक स्त्री उठून म्हणते, "मी सारं ऐकतें आहे बरं कां! माझ्या घरांत राहून माझीच निंदा करतो आहेस काय?"

तेव्हां विनोदी नट म्हणतो, "इथंहि चुकलंच आमचं! बरं बुवा, आतां मी एका आयरिश माणसाची कशी फजिती झाली तें सांगतों. काल संध्याकाळीं पॅडिंग्टन् स्टेशनवर एक आयरिश माणूस उतरला. त्या गांवढळाच्या हातांत एक भली मोठी पेटी होती——"

विनोदी नट असें बोलतो आहे तोंच, एक भला दांडगा आयरिश माणूस रंगभूमीवर चढतो आणि नटाची मान पकडून म्हणतो, "अरे लेका! काल

माझ्या पायांत पाय अडकवून मला तूंच पाडलंस ना ? थांब तुझी हड्डी चांगलीच नरम करतों ! ”


तेव्हां विनोदी नट काकुळतीला येऊन म्हणतो, “ माफ कर बाबा ! काय करावं ? या जगांत विनोदी बोलायचीच सोय उरली नाहीं. ” नंतर प्रेक्षकांच्या लक्षांत येतें कीं, तो पोलिस, घरमालकीण आणि आयरिश इसम हे सारे तमासगिरांपैकींच असतात आणि हें सारें दृश्य पूर्वनियोजित असतें.

‘ रेव्ह्यू ’मध्यें किंवा तमाशांत मुख्यतः विनोदी प्रसंग आणि नृत्य–संगीत असतें; पण केव्हां केव्हां वैचित्र्य म्हणून जादूचे खेळ, शक्तीचे प्रयोग, नेमबाजी, वगैरेंचाहि त्यांत समावेश असतो. लंडनच्या ‘ विंडमिल ’ थिएटरांत असा एक आश्चर्यकारक प्रसंग मीं पाहिला. या प्रसंगांत सुमारें दहा फूट उंच आणि अठरा फूट लांब असा प्रचंड आरसा समोर ठेवण्यांत आला होता. रंगभूमीवर एक तरुणी येते आणि आपल्या अंगावरचा ‘ गाऊन ’ काढून आरशांत पाहून केशभूषा करतें, पावडर लावतें, एकदोन कपडे बदलते. तिचें प्रतिबिंब आरशांत दिसतें. मग ती आरशाच्या जवळच नृत्य करतें. नृत्याच्या शेवटीं ती आरशांतील आपल्या प्रतिबिंबाला हात लावतें आणि प्रतिबिंबाचे दोन्ही हात हातांत घेऊन त्याला बाहेर ओढते ! प्रथम प्रेक्षकांचा या दृश्यावर विश्वासच बसत नाहीं. आरशांतील प्रतिबिंब बाहेर कसें येतें ? — पण थोड्याच वेळांत उलगडा होतों कीं, आरशाच्या ठिकाणीं फक्त फ्रेमच होती ! आरशांत दिसणारें तें प्रतिबिंब नसून खरोखरीची तरुणीच होती ! आरशांतील तरुणी आणि बाहेरील तरुणी या दोघी जुळ्या बहिणी असल्यानें अगदीं हुबेहुब एकमेकींसारख्या दिसतात आणि प्रेक्षकांना आरशांत प्रतिबिंब नाहीं अशी शंकाहि येत नाहीं. पण नृत्यानंतर त्या दोघीहि प्रेक्षकांच्या जवळ येऊन अभिवादन करतात, तेव्हां प्रेक्षक प्रशंसेनें टाळ्यांचा कडकडाट करतात. त्यानंतर या बहिणी आणखी दोन नृत्यें करतात.

‘ रेव्ह्यू ’ मधील नृत्यांतून निरनिराळ्या देशांतील नृत्यें दाखविण्यांत येतात. स्पॅनिश नृत्य, फ्रेंच ‘ कॅन्‌कॅन् ’, हवानामधील नृत्य, हंगेरियन नृत्य, अमेरिकन नृत्य, अशीं अनेक देशांचीं नृत्यें असतात. पण भारतीय नृत्य मात्र कुठेंच दिसलें नाहीं. पॅरिसमधील ‘ प्लास पिगॅल ’ या विभागांत एका लहानशा

क्लबमध्यें मात्र एका भारतीय चित्रपट–संगीताची रेकॉर्ड लावून एक मुलगी नृत्य करते. 'नाचो नाचो मेरे मन के मोर' ही ती रेकॉर्ड होती, आणि नृत्य करणाऱ्या मुलीनें भारतीय वेष केलेला होता. तिचें नृत्य मात्र भारतीय नसून पौर्वात्य आणि पाश्चिमात्य नृत्यांची सरमिसळ होती. युरोपियन नृत्य–प्रकारांत फ्रेंच 'कॅनकॅन्' व स्पॅनिश नृत्य बरेंच लोकप्रिय दिसलें.

नृत्याच्या वेळीं इंग्लंडमधील 'रेव्ह्यू'च्या थिएटरांपेक्षां फ्रान्समधील थिएटरांचीं सेटिंग्ज फार भव्य वाटलीं. 'विंडमिल' आणि 'प्रिन्स ऑफ वेल्स' हीं लंडनचीं थिएटरें अशी भव्य सीनसीनरी वापरतात. बाकीचीं लंडनचीं थिएटरें म्हणजे 'चेल्सी पॅलेस,' 'मेट्रोपॉलिटन' आणि 'ब्रिक्स्टन एस्पोरियम' हीं दुय्यम दर्जाचीं आहेत. पहिल्या दर्जाच्या वरील दोन थिएटरांत एक–एक कंपनी आठ महिने ते वर्षभर मुक्काम ठोकते. इतर थिएटरांतून दर आठवड्याला कार्यक्रम आणि कंपनी बदलत असते. इंग्लंडमधील तमाशांचे रविवारखेरीज दररोज दोन खेळ (६॥ व ८॥। वा.) असतात. 'विंड-मिल' हें असें एकच थिएटर आहे कीं, तेथील खेळ दुपारीं बारा वाजल्या-पासून रात्रीं बारापर्यंत सतत चालू असतात आणि एकदां तिकिट काढलें कीं, सलग बारा तासहि थिएटरमध्यें बसतां येतें. म्हणजे असें कीं, प्रत्येक कार्यक्रम सुमारें पावणेदोन तासांचा असतो आणि पंधरा मिनिटें विश्रांति असते. दुपारीं १२, २, ४, ६, ८ आणि १० वाजतां असा दर दोन तासांनीं तोच कार्यक्रम पुन्हापुन्हा दाखविण्यांत येतो. एकदां तिकिट काढून आंत गेलें, कीं रात्रीं बारापर्यंत कितीहि वेळ बसलें तरी चालतें. तसेंच कार्य-क्रमाच्या मध्येंच तिकिट काढून आंत जातां येतें. कारण पुनः तोच सबंध कार्यक्रम होणार असतो. त्यासाठीं तमासगिरांचे दोन गट सहा–सहा तासांच्या पाळ्यांनीं काम करतात. मात्र इंग्लंडमधील इतर तमाशांच्या थिएटरांच्या मानानें 'विंडमिल'चे दर अधिक आहेत. पहिल्या दर्जाच्या तमाशाचे दर तीन शिलिंगापासून पंधरा शिलिंगापर्यंत (सव्वादोन रु. ते दहा रु.) असतात आणि दुय्यम दर्जाच्या तमाशांचे दर एक शिलिंगापासून सहा शिलिंगापर्यंत (बारा आणे ते साडेचार रु.) असतात. 'विंडमिल'चे दर १२ शिलिंग आणि १५ शिलिंग असे दोनच आहेत. पॅरिसच्या पहिल्या दर्जाच्या तमाशाचे



जगप्रसिद्ध शिक्षणकेंद्र ऑक्सफर्डमधील मॅग्डेलन कॉलेजचा टॉवर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.. वि: ..
नों. दि.



तुर्कस्तानच्या राष्ट्रीय पोशाखांत एक तुर्की तरुणी

दर ६५० फ्रँक्सपासून १५०० फ्रँक्सपर्यंत ( सुमारें नऊ ते तीस रु. ) असतात, आणि दुय्यम दर्जाच्या तमाशाचे दर याच्या साधारण निम्मे असतात. पॅरिसच्या तमाशाचा बहुधा एक खेळ रात्रीं ९ ते १२ पर्यंत होतो.

पाश्चात्य सीनसीनरी कशी असते हें एकदोन उदाहरणांवरून लक्षांत येण्यासारखें आहे. 'प्रिन्स ऑफ वेल्स' या थिएटरांत एका दृश्यांत एक प्रचंड पेटी ( बॉक्स ) रंगभूमीवर येते. तिची उंची आठ फूट आणि लांबी चाळीस फुटांहून अधिक असते. तिचें झांकण उघडलें जातें, तेव्हां त्या पेटींत बुद्धिबळाचा भव्य पट मांडलेला दिसतो. मात्र बुद्धिबळाच्या ठिकाणीं राजा, वजीर, प्यादीं इत्यादींचा पोषाख घालून तरुण मुली उभ्या असतात. हत्ती, घोडे, उंट, यांच्यासाठींहि प्रतीकात्मक पोषाख घालून मुली उभ्या असतात. मग एक–एक प्यादें सरकत येतें आणि नृत्यमय लढाई करून मारलें जाऊन पटावरून बाजूला होतें. अशा रीतीनें बुद्धिबळाचा एक सबंध डाव त्या भव्य पटावर खेळण्यांत येतो.

पॅरिसच्या थिएटरांतून आरसे, कारंजीं, पूल, राजवाडे, जंगल इत्यादि मोठमोठ्या सीनसीनरीचे देखावे मांडण्यांत येतात. एका थिएटरांत तर ओढ्याचें पाणी वहात असल्याचें दृश्य होतें आणि त्या ओढ्याच्या डोहांत पुलावरून एक इसम पडतो असें दाखविलें होतें. त्यासाठीं एक मोठा हौद आणि ओढ्याच्या आकारासारखी पत्र्याची पन्हळी रंगभूमीवर मांडलेली होती. पॅरिसच्या एका थिएटरांत शिलिंगला एक विमान लावण्यांत आलें होतें. प्रेक्षकांच्यापासून तें खूप उंच होतें आणि त्यावर पडदा टाकलेला असल्यानें सुरुवातीला तें कोणाच्या लक्षांत येत नाहीं. विमानाच्या दृश्याच्या वेळीं थिएटरमध्यें सीलिंगजवळून एकदम विमानाची घरघर ऐकूं येते म्हणून प्रेक्षक वर पहातात, तों तें विमान हळूहळू खालीं येतांना दिसतें आणि स्टेजवर उतरतें. मग विमानाखालीं उंच शिड्या लावण्यांत येतात आणि विमानांतून तोकडा पोषाख घातलेल्या सहा तरुणी पॅरिसचा जयजयकार करीत खालीं उतरतात. मग पुनः विमान पूर्वीच्या जागीं जातें.

इंग्लंडमधील 'रेव्ह्यू'मध्यें अथवा तमाशामध्यें संपूर्ण नग्न स्त्री क्वचितच दाखवितात. पण केवळ चड्डी अथवा लंगोटीसारखें त्याहून लहान वस्त्र घातलेल्या स्त्रिया अनेकदां दाखवितात. इंग्लंडच्या कायद्याप्रमाणें अशा स्त्रियांना

रंगभूमीवर आणतां येतें; पण त्यांना हालचाल करतां येत नाहीं. त्यामुळें इंग्लंडमधील तमाशांतून अशा स्त्रिया पुतळ्याप्रमाणें निश्चल उभ्या असतात. केव्हांकेव्हां त्या हातांत पंखे घेऊन नृत्य करतात आणि नृत्याच्या अखेरीला पंखे टाकून निश्चल उभ्या रहातात. पॅरिसच्या तमाशांतून मात्र अर्धनग्न किंवा जवळजवळ नग्न स्त्रियांना कायद्यानें नृत्य करतां येतें आणि संवाद वगैरे म्हणतां येतात.

पाश्चात्य तमाशांचा आणखी एक विशेष म्हणजे, तमाशाला जाणें म्हणजे कांहीं वाईट अथवा कमी प्रतीचें आहे असें कुणी मानीत नाहींत. 'विंडमिल' थिएटराला युद्धकालांतील कार्याबद्दल सरकारकडून मानचिन्हहि मिळालें आहे. मोठमोठे लोक आणि केव्हांकेव्हां राजघराण्यांतील मंडळीहि तमाशाला जातात. तसेंच, अनेक पुरुष आपल्या पत्नीसह तमाशाला जातात. इंग्लंडमधील तमाशांना सुमारें एकतृतीयांश आणि फ्रान्समधील तमाशांना जवळजवळ निम्मा प्रक्षकवर्ग स्त्रियांचा असतो. कित्येक तमाशांच्या थिएटर्समधून दुर्बिणी भाड्यानें मिळतात आणि वृद्ध नवराबायकोहि त्यांचा वापर करतांना दिसतात! तमाशा संपल्यावर प्रेक्षक लगेच बाहेर जाण्याची घाई करीत नाहींत. तमाशाच्या शेवटीं सर्व पात्रें रंगभूमीवर येतात आणि प्रेक्षकांना अभिवादन करतात; त्या वेळीं प्रेक्षक पांच-पांच, दहा-दहा मिनिटें टाळ्या वाजवून त्यांचें कौतुक करतात. तमाशांचे कार्यक्रम छापील असतात आणि कार्यक्रम-पुस्तिकेंत प्रमुख नटनट्यांचीं व कांहीं दृश्यांचीं छायाचित्रें असतात. तमाशांच्या जाहिराती बहुतेक सर्व सायंदैनिकांत येतात. कांहीं तमाशांच्या पंचवीस-तीस वर्षांच्या इतिहासाचीं मोठीं पुस्तकेंहि मिळतात. नवीन तमाशांवरील अभिप्राय कांहीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतात. अशा रीतीनें पाश्चात्य देशांत चित्रपटांप्रमाणेंच तमाशांचीहि शास्त्रीय आणि बळकट पायावर उभारणी झालेली आहे.

# १

# लंडन

लंडन ब्रिज. पहांटेचे पांच वाजले आहेत. उन्हाळ्याचे दिवस असल्यानें चार वाजल्यापासूनच प्रकाश पडला आहे. रस्त्यावर तुरळक रहदारीहि गेली तासभर चालू झालेली आहे. पण पांच वाजतां रेल्वे सुरू होत असल्यानें आतां ही रहदारी चांगलीच वाढली आहे. हा लंडन ब्रिज म्हणजे टेम्स नदीवर असलेल्या अनेक पुलांपैकीं सर्वांत जुना पूल. या पुलावरून दूरवर टॉवर-ब्रिज दिसतो, त्याच्याजवळ टॉवर ऑफ लंडन ही शेंकडों वर्षें भयावह ठरलेली जुनी इमारत पहांटेच्या प्रकाशांत अंधुकपणें दिसते. पण दिवसाच्या सुरुवातीला लंडनच्या या भागांत प्रथम हालचाल व रहदारी सुरू होते. कारण लंडन ब्रिजच्या पायथ्याशीं जगांतील सर्वांत मोठा मासळीबाजार एखाद्या अजस्र स्वमाशाप्रमाणें पसरलेला आहे.

या बाजाराचें नांव ' बिलिंग्गेट फिश-मार्केट. ' गेलीं चारशें वर्षें हा बाजार येथें भरतो आहे. रविवारखेरीज दररोज पहांटेपासून या बाजारांत मोटारींनीं, रेल्वेनें आणि बोटींनीं मासळी येण्यास सुरुवात होते. पुरुषभर उंचीच्या माशापासून, मुठींत एका वेळीं पन्नाससाठ मावूं शकतील इतक्या लहान चिंगळ्यांपर्यंत हरत-हेचे मासे येथें येतात. त्याशिवाय खेकडे, लॉब्स्टर्स, इत्यादि पाण्यांतील इतर निरनिराळ्या प्राण्यांच्याहि राशीच्या राशी विक्रीला

येतात. कांहीं मासे तर पाण्याच्या डब्यांत जिवंतच विक्रीला ठेवलेले असतात. गिऱ्हाइकानें ते विकत घेतले कीं त्यांना पाण्याच्या डब्याबाहेर काढून, मारुन ते गिऱ्हाइकाच्या हवालीं करण्यांत येतात. बाजारांत गोंगाट तर इतका होतो कीं, जवळच्या माणसाबरोबर बोलतांनाहि ओरडून बोलावें लागतें. शाळेंत विद्यार्थी दंगा करूं लागले कीं मास्तरहि म्हणतात, 'ही शाळा आहे, कीं मासळीबाजार ?' मग जगांतील या सर्वांत मोठ्या मासळीबाजारांत किती गडबड गोंधळ आणि गोंगाट असेल याची कल्पनाच केलेली बरी ! या बाजारांत दोन हजार हमाल मासळीची वाहतूक करण्याचें काम करीत असतात. त्यांचा गणवेष पांढरा आणि डोक्यावर जाड लांकडी टोपी असते. लांकडी टोपी म्हटलें म्हणजे जरा विचित्रच वाटतें. पण ही टोपी पातळ लांकडाची असते आणि तिच्या आंतील भाग मऊ कापसाच्या गादीनें मढवलेला असतो. टोपीचा वरील भाग मध्यें किंचित् खोलगट असतो. या भागावर माशाच्या तीनचार टोपल्या ठेवून हे हमाल माशांची ने-आण करतात. सबंध बाजारांत — आणि आसपासच्या भागांतहि—मासळीचा दर्प पसरलेला असतो. या बाजारांतल्या एका 'कॅफे'मध्यें मी चहा घेतला, तेव्हां कपाला आणि चहाला मासळीचा इतका वास येत होता कीं, चहाऐवजीं आपण माशाचें सूप घेत आहों कीं काय, अशी शंका माझ्या मनांत येऊन गेली.

बिलिंग्गेट बाजाराच्या एका टोंकाला एक उंच, पांढराशुभ्र मनोरा दिसतो आणि कुतुबमिनारची आठवण होते. या मनोऱ्याचें नांव 'मॉन्युमेंट'— स्मारक. १६६६ सालीं लंडनमध्यें प्रचंड आग लागून ऐशीं टक्के लंडन शहर जळून खाक झालें. त्या आगीचें हें स्मारक. या स्मारकाच्या पायथ्याशीं जें चित्र कोरण्यांत आलेलें आहे त्यांत आगीमुळें लंडन शहररूपी स्त्री शोक करीत आहे आणि नव्या आशा तिला दुःख विसरण्यास सांगत आहेत, असें दाखविलें आहे. या स्मारकाची उंची २०२ फूट आहे. जगांतील हें सर्वांत उंच दगडी स्मारक आहे, असें म्हटलें जातें. स्मारकाच्या पायथ्याशीं एका बाजूला १६६६ सालच्या आगीची जी माहिती दिलेली आहे, तिचा सारांश असा : "या जागेपासून २०२ फुटांवर २ सप्टेंबर १६६६ रोजीं रात्रीं एका घराला आग लागली. या आगींत १३२०० घरें, ४० रस्ते, २६ वॉर्डस् आणि कित्येक इस्पितळें, चर्चेस्, सार्वजनिक इमारती जळून खाक झाल्या. तीन दिवस ही

आग जळत होती आणि ४३६ एकर जागा या आगीनें बेचिराख केली..."

या आगीमुळें जुन्या लंडनचीं कोंदट घरें आणि अरुंद रस्ते नाश पावून नवीं प्रशस्त घरें व रुंद रस्ते बांधणें शक्य झालें, हा या आगीचा एक फायदा झाला. नव्या घरांच्या बांधकामांत लांकडाचा उपयोग शक्य तों कमी करावा आणि दगड-विटांचा अधिक उपयोग करावा असें बंधन त्या वेळच्या सरकारनें घातलें होतें! या आगीची दहशत अद्यापहि लंडन शहराला एवढी आहे कीं, इमारत बांधण्यापूर्वी तिचा 'प्लॅन' लंडन नगरपालिकेकडे द्यावा लागतो आणि तिच्यांत अग्निप्रतिबंधक उपाययोजना व दारें व्यवस्थित ठेवण्यांत येत आहेत अशी नगरपालिका खात्री करून घेते. लंडन नगरपालिकेची अग्निप्रतिबंधक आघाडी ('फायर-ब्रिगेड') ही अत्यंत कार्यक्षम असून जगांतील सर्वांत उत्कृष्ट फायर-ब्रिगेड मानली जाते.

मॉन्युमेंटच्या पायऱ्या चढून जायचें म्हणजे एक दिव्यच आहे. अरुंद अशा तीनशेपंचेचाळीस पायऱ्या असून हा जिना गोल आहे. त्याच्या अखेरीला लहानशी गॅलरी आहे आणि तिथून लंडनचें विहंगम दृश्य दिसतें. या दृश्यांतून चटकन् नजरेंत भरणारा विशेष म्हणजे लंडन ही काळपट नगरी आहे. इमारतींचीं छपरें, चर्चेस्, घुमट, चबुतरे, पूल, रस्ते, खांब – या अनेकांची खिचडी दिसते आणि सर्वांचा रंग काळा किंवा काळसर दिसतो. रस्ते डांबरी असल्यानें अर्थातच ते काळे दिसतात; पण इतर इमारती काळसर दिसण्याचें कारण म्हणजे या शहरांत असलेले शेंकडों कारखाने. या कारखान्यांचा धूर शहरावर पसरतो आणि धुक्यामुळें तो इमारतींच्या छपरांना चिकटून बसतो. काळ्या रंगाचा दुःखाशीं संबंध जोडण्याची संवय झाल्यानें कीं काय, कोण जाणे, पण मॉन्युमेंटवरून दिसणारी लंडन नगरी कष्टी, शोकग्रस्त, दिसते. मॉन्युमेंटच्या वरच्या गॅलरीभोंवतीं जाड सळयांचा सांपळाच केलेला आहे. जिवाला कंटाळलेल्या लोकांनीं तेथून उडी टाकून आत्महत्त्या करूं नये, म्हणून ही खबरदारी घेण्यांत आली आहे.

या स्मारकापासून एकदोन रस्ते ओलांडले म्हणजे आपण 'बँक' या स्टेशनजवळ येतों. या चौकांत उभें राहिलें, तर डाव्या बाजूला 'बँक ऑफ इंग्लंड', मागें 'रॉयल एक्स्चेंज' ही इमारत, आपल्यासमोर लंडनच्या मेयरचें निवासस्थान व कमेटी (मॅन्शन हाऊस) आणि उजव्या बाजूला 'लॉइडस्'

ही जगप्रसिद्ध विमा आणि बँक-कंपनी, अशा मोठ्या भारदस्त संगतींत आपण येतों. इंग्लंडच्या आर्थिक सुरक्षिततेचें निधान म्हणजे 'बँक ऑफ इंग्लंड'. या बँकेच्या दगडी इमारतीवर कोरलेलीं चित्रें सुरक्षितता आणि सुबत्ता दाखवितात. या बँकेच्या प्रवेशद्वारावर ग्रीक भाषेंत कोरलेल्या वचनाचा अर्थ 'Let no one bring dishonest schemes here.' ('अप्रामाणिक हेतु मनाशीं ठेवून येथें येऊं नका.') असा आहे. या बँकेची स्थापना १६९४ सालीं झाली. चौदाव्या लुईबरोबर लढाई करण्यासाठीं इंग्लंडच्या सरकारला पैसे हवे होते; म्हणून ही बँक स्थापन करण्यांत आली आणि या बँकेनें सरकारला बारा लक्ष पौंड कर्ज दिलें. अद्यापहि ही बँक ब्रिटिश सरकारची 'बँकर' म्हणून काम करते.

बँक ऑफ इंग्लंडबद्दल अनेक कथा ऐकूं येतात. १७४० सालीं एका डायरेक्टरनें तीस हजार पौंडांची (सुमारें चार लाख रु.) खास नोट बँकेकडून घेतली. ती नोट घेऊन तो घरीं गेला; पण कांहीं वेळानें, टेबलावर ठेवलेली नोट नाहींशी झाल्याचें त्याला आढळून आलें. त्यानें खूप तपास केला, पण पत्ता लागेना; तेव्हां नोट वाऱ्यानें उडून शेगडींत पडली असावी असा तर्क करून त्या बँकेला तसें लिहून दिलें आणि दुसरी नोट घेतली. त्यानंतर तीस वर्षांनीं एका इसमानें पहिली तीस हजार पौंडांची नोट आणली आणि बँकेकडे तिचे पैसे मागितले. ही पहिली नोट रद्द झाली आहे, असें सिद्ध करण्याचा बँकेनें प्रयत्न केला; पण तो यशस्वी न झाल्यानें बँकेला तिचे पैसे द्यावे लागले. चौकशीअंतीं असें आढळून आलें कीं, त्या डायरेक्टरचें घर एका इंजिनियरनें विकत घेतलें होतें. त्यानें तें घर पाडून दुसरें बांधण्यास सुरुवात केली, तेव्हां घराच्या धुराड्यांत त्याला ही तीस हजार पौंडांची नोट सांपडली होती!

बँक ऑफ इंग्लंडचें रक्षण करण्यासाठीं दररोज रात्रीं सशस्त्र सैनिकांची एक तुकडी ठेवण्यांत येते. १७८० सालच्या गॉर्डन दंगलीच्या वेळेपासून ही तुकडी तेथें ठेवण्यांत येऊं लागली आहे. पण गेल्या पावणेदोनशें वर्षांत या बँकेवर कोणताहि हल्ला झालेला नाहीं. बँकेजवळची स्टॉक एक्स्चेंजची इमारत हा लंडनचा मुख्य वायदे-बाजार. परवांपरवांपर्यंत हा जगांतील सर्वांत मोठा शेअर आणि वायदेबाजार होता; पण अलिकडे न्यूयॉर्कच्या बाजारानें कांहीं व्यवहारांत या बाजाराला मागें टाकलें आहे. अद्यापहि लंडनचा शेअर-बाजार हा सचोटी

आणि परंपरा यांत आदर्श मानला जातो. या बाजाराच्या नियामक-मंडळाच्या साहाय्यानें मीं एक दिवस या बाजाराचे व्यवहार पाहिले, आणि त्या व्यवहारांचें अवाढव्य स्वरूपहि पाहिलें. रॉयल एक्स्चेंज हॉल ( गिल्ड हॉल ) हा मेयरच्या समारंभाचा अधिकृत मुख्य हॉल. इंग्लंडला भेट देणाऱ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पाहुण्यांचा सत्कार करायचा तर, या सभागृहांत मेयर अथवा राणीनें केलेला सत्कार हा त्या पाहुण्याचा इंग्लंडमधील सर्वांत मोठा बहुमान. १९५५ सालीं रशियाचे नेते मार्शल बुल्गानिन आणि क्रुश्चेव्ह यांचा सत्कार या ठिकाणींच झाला होता.

लंडनच्या मेयरचा अधिकार फार मोठा आहे. इतका कीं, इंग्लंडच्या राजाला किंवा राणीलाहि लंडन शहरांत अधिकृत प्रवेश करायचा झाला, तर मेयरची अधिकृत परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी कशी घेतली जाते, हेंहि पहाण्यासारखें आहे. ब्रिटिश लोक परंपरेचे भारी अभिमानी. पूर्वीच्या काळीं इंग्लंडच्या राजाला शहरांत प्रवेश करतांना मेयरची परवानगी घ्यावी लागत असे त्यावेळीं लंडन शहराभोंवतीं तट होता आणि 'टेंपलबार' या ठिकाणीं तटाचा दरवाजा असे. राजानें तटाबाहेर येऊन मेयरकडे निरोप पाठवायचा आणि मग मेयरनें येऊन मोठा दरवाजा उघडून राजाचें स्वागत करायचें—हा त्या वेळचा शिरस्ता. बहुधा राजापेक्षां जनतेचा अधिकार मोठा हें दाखविण्यासाठीं ही रूढी पडलेली असावी. आतां शहराभोंवतीं तट नाहीं आणि अर्थात् 'टेंपलबार' दरवाजाहि नाहीं. पण तरीहि राजानें किंवा राणीनें शहरांत प्रवेश करण्यापूर्वी पूर्वीच्या 'टेंपलबार' दरवाजाजवळ थांबायचें, काल्पनिक दरवाजा ठोठवायचा आणि मग मेयरनें येऊन काल्पनिक किल्लीनें तो उघडायचा, असा रिवाज अद्यापहि चालू आहे. जगांतील सर्वांत सुधारलेल्या या देशांत अरेबियन नाइट्स्सारखीं जीं कांहीं दृश्यें दिसतात त्यांपैकींच हा एक प्रकार.

टेंपलबार ही जागा बँक ऑफ इंग्लंडच्या पूर्वेला सुमारें दोनशे यार्डांवर आहे. ज्या रस्त्यानें या जागेकडे जावें लागतें, त्याचें नांव फ्लीट स्ट्रीट. साऱ्या जगांत इंग्लंडचा जर कोणता रस्ता सर्वांत प्रसिद्ध असेल, तर तो हाच. या रस्त्यावर गेल्या दीडदोनशें वर्षांत जितक्या विविध घडामोडी झाल्या, तितक्या जगांतील इतर कोणत्याहि रस्त्यावर झालेल्या नसतील. कारण हा वृत्तपत्र–

कचेऱ्यांचा रस्ता आहे. ब्रिटनचें सरकार उलथून पाडून दुसरें सरकार स्थापन करण्याची जबरदस्त शक्ति असलेलें 'टाईम्स'सारखें पत्र, लोकप्रियतेचे जागतिक विक्रम करणारें 'मिरर'सारखें दैनिक, विनोदी वृत्तपत्रांत अग्रगण्य असलेलें 'पंच' साप्ताहिक, चित्रमय वृत्तपत्रांत आदर्श मानलें जाणारें 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज', आंतरराष्ट्रीय राजकारणांत महत्त्वाचें मानलें गेलेलें 'ऑब्झर्व्हर', जगांतील सर्वांत अधिक खपाचें 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड' साप्ताहिक, अशा अनेक पत्रांच्या कचेऱ्या या फ्लीट स्ट्रीटवर किंवा त्या नजीक आहेत. त्यांत वर दिलेल्या पत्रांशिवाय 'डेली एक्स्प्रेस', 'टेलिग्राफ न्यूज', 'क्रॉनिकल', 'स्टार', 'ईव्हिनिंग न्यूज', 'एव्हरीबडीज', 'इलस्ट्रेटेड', 'पिक्चर-पोस्ट', 'पीपल' इत्यादि वृत्तपत्रांचा समावेश होतो. या रस्त्यावरील कचेऱ्यांत काम चालू नाहीं असा एकहि क्षण वर्षातून एकाहि दिवसांत मिळणार नाहीं. 'रॉयटर्स' या सर्वांत मोठ्या जागतिक वृत्तसंस्थेची कचेरीहि याच रस्त्यावर आहे. या रस्त्यावर दररोज लाखों पौंडांच्या घडामोडी होतात. कोणी प्रसिद्धीच्या उजेडांत आणले जातात, तर कोणी अनुल्लेखाच्या अंधारांत फेंकले जातात; कोण मंत्रिपदावर जातो, तर कोणी मंत्रिपदावरून फेंकला जातो. रस्त्यावरच्या अनंत आशा, आकांक्षा, निराशा आणि श्रम याचें दिग्दर्शन करणारें टोपणनांव या रस्त्याला मिळालेलें आहे; कारण त्याला 'साहसाचा रस्ता' ( Street of Adventure ) असेंहि म्हणतात.

फ्लीट स्ट्रीटवरून चेरिंग-क्रॉसकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'बी. बी. सी.'ची मोठी इमारत आहे. 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' ही संस्था जगांतील सर्वांत मोठी रेडियो आणि टेलिव्हिजन वितरण-संस्था आहे. ती सरकारी नसून सार्वजनिक कॉर्पोरेशन आहे. या संस्थेंत बारा हजारांवर लोक काम करतात आणि तिचा वार्षिक खर्च दीड ते पावणेदोन कोटी पौंड होतो. ब्रिटनची लोकसंख्या पांच कोटी आणि 'बी. बी. सी.'चे ग्राहक एक कोटी यांवरून ब्रिटन-मधील जवळजवळ प्रत्येक घरांत रेडिओ आणि पन्नास टक्के घरांत टेलिव्हिजन आहे, असें दिसून येतें. रेडिओ आणि टेलिव्हिजन हें ब्रिटिश जनतेच्या जीवनाचें एक अविभाज्य अंग आहे. या बी. बी. सी. च्या इमारतीजवळच 'इंडिया हाऊस' ही भारतीय हायकमिशनची इमारत आहे. या इमारतीवर भारताचें तिरंगी निशाण फडकत असतें, आणि इमारतीवर कोरलेल्या हत्ती, मोर, वाघ

इत्यादि पशुपक्ष्यांच्या चित्रांमुळें इमारतीला पौर्वात्य वळण मिळालेलें आहे. इंडिया हाऊसच्या शोकेसेस्‌मध्यें बहुधा भारतीय साड्यांचे नमुने मांडलेले असतात. ब्रिटिश आणि इतर पाश्चिमात्य स्त्रिया रस्त्यांवरून जातां येतां या खिडक्यांकडे आशाळभूतपणें पाहात असतात. साडी या देशांतील स्त्रियांना आवडूं लागली आहे. पण ब्रिटिश स्त्रिया म्हणतात कीं, 'पिना, टांचण्या न लावतां किंवा कपडा न शिवतां अंगावर साडी कशी टिकूं शकते?' अशा प्रकारें पिना किंवा टांचण्या न लावतां भारतीय स्त्रिया साडी नेसूं शकतात याबद्दल पाश्चिमात्य स्त्रिया त्यांचें कौतुक करतांना आढळतात.

इंडिया हाऊसकडून होबर्न स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'इनर टेंपल' ही कायद्याचें शिक्षण देणारी संस्था आहे. म. गांधी व भारताचे पंतप्रधान पं. नेहरू हे या संस्थेंचे विद्यार्थी होते.

इंडिया हाऊसकडून जातांना टेम्स नदीवर जो पूल दिसतो, तो 'वॉटर्लू ब्रिज'. लंडनचा हा सर्वांत नवा पूल. त्याच्या एका टोंकाला लंडन कौंटी कौन्सिल ही जगांतील सर्वांत श्रेष्ठ नगरपालिका आणि दुसऱ्या टोंकाला लंडन कौंटी कौन्सिलचा 'रॉयल फेस्टिव्हल हॉल' हा अत्यंत प्रशस्त आणि रमणीय हॉल आहे. या हॉलमध्यें शास्त्रीय संगीत, 'बॅले' वगैरेंचे कार्यक्रम होतात. हा हॉल जगांतील सर्वांत सुंदर हॉल मानला जातो. लंडनची ही एक गंमत आहे कीं, कोणत्याहि भागांत सहज जरी फिरलें, तरी जगांतील सर्वांत मोठें, श्रेष्ठ, उंच, जुनें अथवा वैशिष्ट्यपूर्ण असें कांहींतरी दिसतें. मग तें दुकान असो, चर्च असो, किंवा प्रदर्शन असो. 'जगांतील सर्वांत मोठें फरचें दुकान' अशी पाटी एखाद्या दुकानावर दिसेल, तर 'जगांतील सर्वांत श्रेष्ठ नृत्यगृह' अशी पाटी एखाद्या नृत्यगृहावर दिसेल. (अशी पाटी 'ल्युसियम्' या स्ट्रँडवरील नृत्यगृहावर आहे.) तसेंच 'जगांतील सर्वांत उत्कृष्ट कॉफी मिळण्याचें ठिकाण' असाहि उल्लेख एखाद्या उपहारगृहाच्या पाटीवर केलेला असेल. या साऱ्या जाहिराती पाहून वाटतें कीं, जगांत इतरत्र कांहीं सर्वांत श्रेष्ठ, प्रचंड असें शिल्लक आहे कीं नाहीं?

चेरिंग–क्रॉसजवळ एक उंच मनोरा आणि त्यावर नेल्सनचा पुतळा दिसतो. या मनोऱ्याखालीं चार सिंहांचे प्रचंड पुतळे आहेत. त्याभोंवतालचा जो मोठा चौक आहे, त्याला 'ट्रॅफल्गार स्क्वेअर' असें नांव आहे. लंडनच्याच नव्हे,

तर इंग्लंडच्या सार्वजनिक जीवनाचें केंद्र म्हणजे ट्रॅफल्गार स्क्वेअर! इंग्लंडचा नागरिक परदेशांत गेला तर त्याला इंग्लंडची तीव्र आठवण व्हायची म्हणजे हा 'ट्रॅफल्गार स्क्वेअर' नजरेसमोर यायचा. '१९८४' (नाइन्टीन् एटीफोर') या नांवाचें पुस्तक जॉर्ज ऑरवेलनें भविष्यकाळाबद्दल लिहिलें आहे, त्यांतील प्रमुख घटनांसाठीं या ट्रॅफल्गार स्क्वेअरचेंच स्थळ घेतलेलें आहे. या चौकांत सुंदर कारंजें असून त्यावर पाण्यांतून प्रकाश सोडण्यांत येतो. येथें शेंकडों कबुतरें विहार करतात आणि सहलीला बाहेर पडलेले नागरिक त्या कबुतरांना चणे टाकतांना नेहमीं दिसतात. मुंबई म्हटलें म्हणजे जसें चौपाटीचें खुलें, स्वच्छंदी चित्र नजरेसमोर येतें, तसेंच लंडन म्हटलें म्हणजे ट्रॅफल्गार स्क्वेअरचें मन-मोकळें वातावरण दिसूं लागतें. नाताळांत या चौकांत गेलें, तर खिसमसला नाताळ असें नांव कां पडलें याची कल्पना येतें. ता. २४ डिसेंबर व ३१ डिसेंबर या रात्रीं या ट्रॅफल्गार स्क्वेअरमध्यें येणाऱ्या कोणत्याहि मुलीचें कोणीहि चुंबन घ्यावें असा लंडनचा शिरस्ता शेंकडों वर्षें चालू आहे. त्या रात्रीं या चौकांत शंभरदीडशें मुली आणि पांच हजारांवर पुरुष इतस्ततः हिंडत असतात आणि मिळतील तितकीं चुंबनें पदरांत पाडून घेतात! या रात्रीसाठीं खास मजकूर छापलेल्या कागदी टोप्या मिळतात. त्या घालून मुली जणूं कांहीं पुरुषांना आव्हान देत चौकांत हिंडतात. त्यांच्या टोप्यांवर असा मजकूर असतोः 'Kiss me quick' (चटकन् माझें चुंबन घे'); 'I am no angel' ('मी देवता नाहीं'); 'You are smashing' ('तूं जेता आहेस'); 'Don't crush me' ('मला चिरडूं नकोस'); 'You are sweet' ('तूं गोड आहेस.')

ट्रॅफल्गार स्क्वेअरपासून जवळच असलेला पिकॅडिली, सोहो, लेस्टर स्क्वेअर, हा भाग म्हणजे लंडनच्या रंगेल जीवनाचें केंद्र. चित्रपट कंपन्यांच्या कचेऱ्या, नाइट–क्लब्स, नृत्यगृहें, इंग्रजी तमाशांचीं म्हणजे 'रेव्ह्यू'चीं थिएटरें, उंची दारूचें 'बार', चित्रपटगृहें आणि वेश्या या साऱ्यांमुळें या भागाला 'लंडनचें पॅरिस' म्हणतात. या जभागांत जवळजवळ साऱ्या गांतून आलेले लोक कामें करतात. हिंदी, चिनी, जपानी, फरेंच, इटालियन, स्पॅनिश अशा अनेक देशांचें रुचकर अन्न आणि खास मद्यें या भागांत मिळतात. संध्याकाळीं सहा वाजल्यापासून या भागांतील जीवनाची सुरुवात होते आणि पहाटे

चारपांच पर्यंत कांहीं क्लबांमधून तर अक्षरशः नंगा नाच चालू असतो. येथील रात्रींच्या क्लबांचीं नांवेंहि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदाहरणार्थ' 'ताबू क्लब', 'लॅटिन कार्टर' (पॅरिसमधील एका भागाचें नांव), 'हेवन अँड हेल', 'क्रोकोडाइल क्लब', 'ब्ल्यू क्लब', 'फरेंच यूथ सेंटर', 'को व्हॅडिस', 'इस्तंबूल क्लब', 'हाफ् मून क्लब', वगैरे.

या भागांतील बहुतेक उपाहारगृहांत मुद्दाम अगदीं कमी उजेड ठेवलेला असतो. अंधुक दिवे असतात आणि तेहि नक्षीदार झुंबरांत अथवा पडद्यांत लपविलेले असतात. त्यामुळें आपण एखाद्या स्वप्नमय वातावरणांत असल्यासारखें वाटतें. (अर्थात् बिल येईपर्यंतच हा भास टिकतो!) स्त्रिया मिळविण्यासाठीं अनेक देशांचे हजारों लोक या भागांत घिरट्या घालीत असतात. आणि त्यांना जाळ्यांत पकडण्यासाठीं येथें अनेक तऱ्हेचें सांपळेहि असतात. एकदां एक तरुण, ग्रीक स्ट्रीट या रस्त्यावरून रात्रीं आठच्या सुमाराला चालला होता. रस्त्यावर सिगारेट ओढीत चारपांच स्त्रिया भिंतीला टेकून उभ्या होत्या. एकदोघींनीं त्या तरुणाला विचारलें, "गुड इव्हिनिंग. वॉट ए गुड टाइम?" पण तें न ऐकल्यासारखें करून तो तरुण पुढें गेला. एका सुंदर घराच्या दारांत एक अतिशय सुंदर तरुणी उभी होती. ती त्याच्याकडे पाहून हंसून म्हणाली, "हॅलो, आमच्या क्लबचं सभासदत्व घेतां का आपण?" त्यानें उत्सुकतेनें विचारलें, "कसला आहे तुमचा क्लब?" ती म्हणाली, "आंत तर या ना, चेरी सांगेल तुम्हांला सारं." तो धडधडत्या अंतःकरणानेंच आंत गेला. त्या मुलीनें आंत पाहून मोठ्यानें सांगितलें, "चेरी, या सद्गृहस्थांना जरा क्लबची माहिती सांगशील?" आंतून दुसरी एक तरुणी सुहास्य मुद्रेनें आली आणि म्हणाली, "आनंदानं. या ना!" तिनें त्याला माडीवर नेलें. तिथें एका कोचावर त्याला बसवून ती म्हणाली, "तुम्ही कोणतं मद्य घेतां?" तो म्हणाला, "कोणतंहि चालेल. पण तुम्ही क्लबची माहिती —" त्याचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच तिनें जवळची घंटा दाबली. त्याबरोबर पांढरे शुभ्र कपडे घातलेला एक वेटर नम्रपणें तिथें आला. त्याला ती म्हणाली, "दोन डबल व्हिस्की." हें घर आहे, कीं हॉटेल आहे, कीं क्लब आहे हें पाहुण्याला कळेना. त्यानें कांहीं विचारण्यापूर्वींच वेटरनें व्हिस्कीचा एक ग्लास त्याच्या हातीं दिला आणि दुसरा चेरीच्या हातीं दिला. पाहुण्यानें घुटका

घेतला तेव्हां व्हिस्कींत भरपूर पाणी मिसळलेलें आहे हें त्याच्या लक्षांत आलें. त्यानें चेरीचा प्याला पाहिला; तेव्हां ती मात्र निर्भेळ व्हिस्की असावी अशी त्याची खात्री झाली. चेरी म्हणाली, " क्लब म्हणजे जरा शांतता हवी हो. आमच्या क्लबमध्यें जादा गर्दी नसते. फी फक्त एका दिवसाला चार पौंड दहा शिलिंग. ( सुमारें साठ रुपये. ) क्लबचे इतर मेंबर येतीलच आतां. तुम्हांला आणखी व्हिस्की पाहिजे ? " त्यानें कांहीं उत्तर देण्यापूर्वींच तिनें घंटा दाबली आणि वेटरनें पूर्वीसारखेच दोन ग्लास आणून ठेवले. पाहुण्याला काय करावें तें सुचेना. तो ' नको ' म्हणणार होता; पण त्यापूर्वी चेरीनें आपला ग्लास संपवलाहि होता. पण आपण या साठ रुपयांच्या चक्रांत सांपडायचें नाहीं असें मनाशीं ठरवून तो म्हणाला, " मी पुन्हा केव्हां तरी होईन क्लबचा सभासद; आज — " ती मध्येंच म्हणाली, " कांहीं हरकत नाहीं. आज फक्त दहा शिलिंग ॲडव्हान्स भरून नांव रजिस्टर करा, आणि मग बाकीचे चार पौंड देऊन केव्हांहि सभासद व्हा. " तिनें पुनः घंटा दाबली. वेटरनें नम्रपणें चार डबल व्हिस्कीचें बिल दीड पौंड आणि दहा शिलिंगचें रजिस्ट्रेशनचें बिल त्या तरुणापुढें ठेवलें. आतांपर्यंत पाहुण्याची समजूत अशी होती कीं, ही स्त्रीच आपल्याला पाहुणचार म्हणून मद्य देत आहे; पण आतां बिल आल्यावर हुज्जत घालून कांहीं उपयोग नव्हता. त्यानें मुकाट्यानें दोन पौंड आणि टिपचे अडीच शिलिंग काढून ट्रेमध्यें ठेवले. मग वेटरनें ' थँक्यूं ' आणि चेरीनें सुहास्य मुद्रेनें दिलेले ' थँक्स ' आणि हस्तांदोलन असा मोबदला घेऊन वरकरणी हंसत, पण मनांतून चरफडत पाहुणा त्या ' क्लब ' मधून बाहेर पडला.

या भागांत वेश्याव्यवसायाच्या जाहिराती दुकानांच्या कांचांवर लावलेल्या आढळतात. पण त्या अशा शब्दांत मांडलेल्या असतात कीं, पोलिसांना त्याविरुद्ध कांहींहि कायदेशीर उपाययोजना करतां येत नाहीं. उदाहरणार्थ —

Wendy gives massage you want. For appointment phone AMB 7988.

Social partners provided. fee £ 2.

Artist's model free for appointment to professionals and amateurs.

A couple with unusual conventions would like to meet another couple with similar views.

Private lessons in French.

बहुतेक जाहिरातींवर संबंधित स्त्रियांचे फोटो आणि छाती, कंबर व नितंब यांचीं मापेंहि असतात. उदाहरणार्थ, Betty; 36–25–37, open for appointments to old and new friends.. हीं मापें देण्याची पद्धत आमच्याकडील वाचकांना चमत्कारिक वाटेल. पण 'डेली मिरर' सारख्या वृत्तपत्रांत लग्नाच्या बातम्या देतांनाहि अशीं मापें देण्यांत येतात.— 'Maryl; 37–26–37 marries six feet Cameraman. अशा बातम्या त्यांत येतात.

इंग्रजी तमाशांना 'रेव्ह्यू' म्हणतात. त्यांत गाणीं, प्रहसनें, विनोदी प्रसंग, कंचित् जादूचे प्रयोग, अर्धनग्न स्त्रियांचीं नृत्यें, असा विविध कार्यक्रम असतो. तो सुमारें दोन तास चालतो. कांहीं वेळां संपूर्ण नग्न स्त्रियाहि दाखवितात. इंग्लंडमधील कायद्याप्रमाणें स्टेजवर नग्न स्त्री दाखवितां येते; पण तिला हालचाल करतां येत नाहीं. त्यामुळें तमाशांत एखादा प्रसंग चालू असतां पुतळे म्हणून अशा नग्न स्त्रिया उभ्या करतात. केव्हां केव्हां नग्न स्त्री दोन मोठे पंखे घेऊन नाचत येते आणि नाचतां नाचतां आपल्या शरीराचे शक्य ते भाग झांकायचा प्रयत्न करते. नृत्याच्या शेवटीं दोन्ही पंखे खालीं टाकून ती निश्चल उभी रहाते. तमाशांना जाणें हें इंग्लंडमध्यें कमीपणाचें मानीत नाहींत. मोठमोठे लोकच नव्हे, तर इंग्लंडच्या राजघराण्यांतील लोक आणि क्वचित् प्रसंगीं राणीहि अशा तमाशांना जाते. लंडनमध्यें तमाशाचीं सहा थिएटरें आहेत. त्यांत पिकॅडिली सर्कसवरचीं 'विंडमिल' आणि 'प्रिन्स ऑफ वेल्स' हीं प्रसिद्ध आहेत. 'विंडमिल' या थिएटरांत कार्यक्रमाला सुरुवात दुपारीं साडेबाराला होते आणि मध्यें न थांबतां रात्रीं दहापर्यंत हा कार्यक्रम चालू असतो. एकदां तिकिट काढून आंत गेलें म्हणजे कितीहि वेळ तिथें बसतां येतें.

मुंबईमध्यें जसा गोलपिठा आणि भेंडीबाजार हा भाग 'ज्वालाग्राही' म्हणजे दंगली लौकर पसरणारा समजला जातो, तसाच लंडनमधला 'सोहो' हा पिकॅडिली सर्कसजवळचा भागहि पोलिसांना सतत सतावीत असतो. सुरामाऱ्या, बेकायदा दारूविक्री, कुंटणखाने, जुगार, रेस–बेटिंग इत्यादि सर्व प्रकारांनीं

हा भाग भरलेला असतो. सोहोमधील घडामोडी लंडनच्या वृत्तपत्रांना नेहमीं खुमासदार मजकूर पुरवीत असतात. स्कॉटलंड यार्डचे अनेक डिटेक्टिव्ह या भागांत नेहमीं नजर ठेवीत असतात आणि गुन्हेगार त्यांच्या नजरा चुकवून आपले उद्योग पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतात.

ट्रॅफल्गार स्क्वेअरच्या एका बाजूला असा रंगेल आणि बकाल भाग, तर दुसऱ्या बाजूला ब्रिटिश साम्राज्याचा मेरुमणि — पार्लमेंट आहे. ट्रॅफल्गार चौकापासून जवळच १० डाउनिंग स्ट्रीट म्हणजे ब्रिटनच्या पंतप्रधानांची कचेरी आहे. डाउनिंग या इंजिनीयरच्या नांवावरून या रस्त्याला डाउनिंग स्ट्रीट हें नांव देण्यांत आलें आहे. ह्या रस्त्यावरील १० नंबरचें घर इतर सर्वसामान्य ब्रिटिश घरांप्रमाणेंच साधें दिसतें; पण जगांतील मोठमोठ्या घडामोडींचीं सूत्रें या घरांतून हालविलीं जातात. या डाउनिंग स्ट्रीटवरच 'युद्ध–प्रदर्शन' आहे. त्यांत ब्रिटननें केलेल्या अनेक लढायांचीं चित्रें, त्या लढायांतील हत्यारें, स्मारकें वगैरे वस्तू ठेवण्यांत आलेल्या आहेत. आमच्या देशांतील प्लासीच्या लढाईचें मोठें दृश्य तेथें ठेवण्यांत आलेलें आहे. बंगाल प्रांत काबीज करण्याबाबत ब्रिटिशांना साहाय्य करणाऱ्या हिंदी गृहस्थाचा उल्लेख 'देशभक्त व इमानी सद्‌गृहस्थ' असा केलेला आहे. तो पाहतांना मात्र एकाच घटनेकडे पाहण्याचा आमचा आणि त्या वेळच्या राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन कसा निरनिराळा आहे हें दिसून येतें. याच प्रदर्शनांत सम्राट् नेपोलियनच्या घोड्याचा सांगाडा आहे. त्या उमद्या घोड्यावर नेपोलियन बसलेला असल्याचें दृश्य दाखविणारें तैलचित्रहि जवळच आहे. या घोड्याच्या सांगाड्याला तीनच खूर आहेत. सांगाड्याजवळ लिहिलेल्या वर्णनांत असा खुलासा आहे कीं, 'घोड्याचा एक खूर एका ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यानें तपकिरीची डबी करण्यासाठीं घेतला आहे.' नेपोलियनसारख्या पराक्रमी सम्राटाच्या घोड्याच्या खुरांतून तपकीर ओढतांना त्या लष्करी अधिकाऱ्याला विशेष पराक्रम करीत असल्याचा आभास होत असावा! या म्युझियमसमोरच 'बकिंगहॅम पॅलेस' हें इंग्लंडच्या राणीचें निवासस्थान आहे.

पार्लमेंटची इमारत अतिशय जुनी, मूळची पांढरट रंगाची, पण लंडनच्या धुरामुळें काळसर होऊं पाहणारी अशी आहे. टेम्स नदीच्या किनाऱ्यावर उभी असणारी ही नक्षीदार इमारत लांबून सुंदर दिसते. विशेषतः आसपासची

हिरवळ आणि टेम्सचें काळपट-निळसर पाणी, त्या पाण्यांतून संथपणें जाणाऱ्या लहानमोठ्या हरत-हेच्या नौका, वेस्ट-मिनिस्टर ब्रिजवरून धांवणारीं वाहनें, हें सारें चित्र रमणीय वाटतें. आमच्या देशाच्या स्वातंत्र्याचा कायदा या ठिकाणीं पास झाला हा विचार या इमारतीकडे पाहतांना भारतीयांच्या मनांत आल्यावांचून राहात नाहीं. पार्लमेंट आणि बकिंगहॅम पॅलेस यांच्यामध्यें ' स्कॉटलंड यार्ड ' पोलिस कचेरी आहे. स्कॉटलंड यार्ड पोलिस म्हणजे जगांतील सर्वांत कार्यक्षम पोलिस–दल. फार पूर्वी स्कॉटलंडचे राजे आणि राजघराण्यांतील इतर मंडळी या वाड्यांत उतरत असत. पुढें पोलिस–दलाची कचेरी त्याच इमारतींत आल्यानें त्या इमारतीचें ' स्कॉटलंड यार्ड ' हेंच नांव पोलिस–दलालाहि पडलें. याच्या जवळच ' वेस्ट–मिनिस्टर ॲबे ' हें सर्वांत प्रसिद्ध चर्च असून तेथेंच इंग्लंडच्या राजांचा आणि राण्यांचा राज्याभिषेक–समारंभ होतो. इंग्लंडचे श्रेष्ठ कवि, राजकीय नेते, संशोधक इत्यादींचे दफनविधि या ठिकाणीं करण्यांत आलेले आहेत. वेस्ट–मिनिस्टर ॲबेजवळच ' टेट गॅलरी ' ही जगप्रसिद्ध पुतळे व चित्रें यांचा संग्रह असलेली संस्था आहे. तेथें इप्स्टिन, रोडिन मूर, गॉगिन, वगैरे शिल्पकारांच्या आणि चित्रकारांच्या श्रेष्ठ कलाकृती आहेत.

तेथून ' व्हॉक्सॉल ' पूल ओलांडून गेलें, म्हणजे ' ओव्हल ' हें जगप्रसिद्ध क्रिकेटचें स्टेडियम लागतें. मिल बँक भागांतून बसनें दोन मैल गेल्यावर ग्रीनविच विभाग लागतो. शाळेंत अक्षांश–रेखांश शिकतांना ग्रीनविचचा उल्लेख अटळ असतो, कारण जगाच्या रेखांशाची सुरुवात या ठिकाणापासूनच होते आणि ' ग्रीनविच टाईम ' ही जगांत अधिकृत वेळ समजलेली आहे. तेथें एक वेधशाळा आणि नौकानयनशास्त्रांतील महत्त्वाच्या वस्तूंचें छोटें प्रदर्शन आहे. ही वेधशाळा एका टेकडीवर आहे आणि त्या टेकडीच्या पायथ्याशीं इंग्लंडची नाविक शिक्षणसंस्था आणि नाविक प्रदर्शन आहे. त्यांत इंग्लंडच्या मोठमोठ्या बोटींचीं मॉडेल्स, इंग्लंडनें मिळविलेल्या नाविक-विजयांतील स्मृतिचिन्हें, लॉर्ड नेल्सनच्या अनेक वस्तू, ट्रॅफल्गारच्या आणि वॉटर्लूच्या लढायांचीं मॉडेल्स वगैरे आहेत. ग्रीनविचची मुख्य वेधशाळा सध्यां ससेक्स परगणांत नेण्यांत आलेली आहे. या वेधशाळेची स्थापना १६७५ सालीं दुसऱ्या चार्ल्सनें केली होती आणि १८८४ च्या आंतरराष्ट्रीय करारानें ग्रीनविचपासून जगाचे रेखांश मोजले जातात.

ग्रीनविच हें लंडनच्या अगदीं टोंकाला असलें, तरी येथून चेरिंग क्रॉससारख्या मध्यवर्ती ठिकाणीं जाण्यासाठीं लहानलहान होड्या मिळतात. चेरिंग क्रॉसवरून ‘ ट्यूब ’नें म्हणजे जमिनीखालच्या ‘ रेल्वेनें ‘ ऑक्सफर्ड सर्कस ’ला जातां येतें. ट्यूबला जाण्यासाठीं ‘ एस्केलेटर ’ किंवा चालता जिना असतो. या जिन्याचे दोन भाग असतात. एक वर येण्यासाठीं आणि दुसरा खालीं जाण्यासाठीं. हे दोन्ही जिने दिवसरात्र एकसारखे वर किंवा खालीं सरकत असतात. त्यांच्या टोंकाला उभें राहिलें कीं, एका मिनिटांत ६० ते ८० फूट खालीं जातां येतें. लंडनची ‘ट्यूब’ म्हणजे जगांतलें एक आश्चर्यच आहे. सबंध शहरभर किंवा खरें म्हणजे शहराखालीं आगगाड्यांचें हें जाळें पसरलेलें आहे. जमिनीखालीं एकंदर पावणेचारशें स्टेशन्स आहेत. कांहीं ठिकाणीं जमिनीखालीं एक रेल्वे आणि पुन्हा त्याखालून दुसरी रेल्वे जाते. सहा ठिकाणीं तर ही रेल्वे टेम्स नदीच्याहि खालून जाते! पहांटे पांचपासून रात्रीं साडेबारापर्यंत या मार्गांवर आगगाड्या सारख्या धांवत असतात. कचेरीच्या वेळेला म्हणजे सकाळीं ८ ते ९ च्या दरम्यान आणि संध्याकाळीं ५ ते ६ च्या दरम्यान प्रमुख मार्गांवर प्रत्येक अर्ध्या मिनिटाला एक गाडी असते. या गाड्यांत एक मात्र तोटा असतो. सर्वच गाड्या बोगद्यांतून जात असल्यानें गाडी चालू असतां खिडकीबाहेर पाहून मनाला विरंगुळा वाटावा, असें कांहीं नसतें. गाडींतील इतर उतारूंकडे पाहात किंवा हातांतील वर्तमानपत्र वाचीत प्रवास करावा लागतो. ट्यूबमधून उतारू पडून अपघात होत नाहींत. कारण प्रत्येक स्टेशनवरून गाडी सुटण्यापूर्वी गाडीचीं सर्व दारें गार्ड लावून घेतो आणि पुनः स्टेशन आल्यावर गार्ड आपल्याजवळचें बटन दाबून सर्व दारें उघडतो. गाडीची रचनाच अशी असते कीं, सर्व दारें बंद झाल्याशिवाय गाडी सुरू होत नाहीं.

‘ लॅंगम प्लेस ’ चौकांत बी. बी. सी. ही जगांतील सर्वांत मोठी रेडिओ व टेलिव्हिजन कंपनी आहे. बी. बी. सी. वरून प्रत्येक बुधवारीं सायंकाळीं ७ते७॥ पर्यंत मराठींतून कार्यक्रम ध्वनिक्षेपित होतात. बी. बी. सी. जवळचा ‘ ऑक्सफर्ड स्ट्रीट ’ आणि ‘ ऑक्सफर्ड सर्कस ’ हा भाग म्हणजे लंडनचें शॉपिंग किंवा खरेदीचें केंद्र. ‘ सेल्फ्रिडीस् ’ सारखीं अवाढव्य डिपार्टमेंटल स्टोअर्स या रस्त्यावर आहेत. हिंदुस्थानच्या खेड्यापाड्यांतहि पसरलेल्या ‘ हिज् मास्टर्स व्हॉइस ’ ग्रामोफोन-कंपनीचें केंद्रहि याच रस्त्यावर आहे.

ऑक्सफर्ड स्ट्रीटला जोडून असलेले 'रीजंट स्ट्रीट' आणि 'बॉंड स्ट्रीट' हे रस्ते म्हणजे फॅशन्स, उंची कपडे, मोटारी, दागिने, शोभेच्या मौल्यवान् वस्तू, जुनीं नाणीं, इत्यादींचें माहेरघरच. पॅरिस हें स्त्रियांच्या फॅशन्स करणारें जगांतील सर्वांत मोठें केंद्र आहे, तसें बॉंड स्ट्रीट आणि ऑक्सफर्ड स्ट्रीट हे रस्ते म्हणजे पुरुषांच्या कपड्यांच्या नव्या नव्या फॅशन्स पाडणारे जगांतील सर्वांत महत्त्वाचे रस्ते आहेत. येथील कांहीं कांहीं शिंप्यांचीं दुकानें तीनशें वर्षांपूर्वींपासून चालत आलेलीं आहेत. हॉलिवुडच्या एका चित्रपट-कंपनीला नेल्सनच्या जीवनावरील चित्रपट काढायचा होता. तेव्हां लॉर्ड नेल्सनचे कपडे कसे होते आणि त्यांचीं मापें काय होतीं याची बॉंड स्ट्रीटवर चौकशी केली, त्या वेळीं त्या कंपनीला नेल्सनच्या कपड्यांचीं मापेंहि एका दुकानांत काळजीपूर्वक नोंदलेलीं आढळलीं! प्रत्येक गिऱ्हाइकाच्या कपड्यांच्या मापाचें अक्षरवारी रेकॉर्ड ठेवण्याची पद्धत या रस्त्यावरील दुकानांत शेंकडों वर्षें चालू आहे. ऑक्सफर्ड स्ट्रीटवरून तसेंच पश्चिमेला गेलें म्हणजे 'मार्बल आर्च' ही प्रचंड संगमरवरी कमान आणि 'हाइड पार्क' ही जगांतील सर्वांत प्रसिद्ध बाग लागते.

हाइड पार्कचें क्षेत्रफळ तीनशेंसाठ एकर आहे. या बागेंत फुलझाडें थोडींच आहेत; पण फर्लांगच्या फर्लांग पसरलेली सुंदर हिरवीगार हिरवळ आणि तीवर जागोजाग उभे असलेले प्रचंड वृक्ष अत्यंत रमणीय आहेत. बागेच्या मध्यें 'सर्पेंटाइन' नांवाचें सुंदर तळें आहे. त्यांत पोहण्याची आणि बोटिंगची व्यवस्था आहे. हाइड पार्कची निसर्गशोभा अत्यंत मनोहर आहेच; पण हा पार्क अधिक प्रसिद्ध आहे तो त्याच्या स्वातंत्र्याबद्दल आणि लोकशाहीबद्दल. या ठिकाणीं शेंकडों स्त्रीपुरुष मुक्तपणें प्रणय करतांना दिसतात. हिरवळीवर स्वस्थपणें नवराबायको किंवा तरुणतरुणी एकमेकांच्या बाहुपाशांत पडून गप्पा मारीत आहेत, पोर्टेबल रेडिओ जवळ ठेवलेला असून त्यांतून कर्णमधुर संगीत ऐकूं येत आहे, जवळच छोटीशी बॅग असून तिच्यापाशींच चहाचा थर्मास, सॅंड-विचिस्, केक्स वगैरे सामान अर्धेमुर्धे संपून पडलेलें आहे, अशीं दृश्यें बऱ्याच वेळीं आणि विशेषतः शनिवारीं-रविवारीं दिसतात. ऊन पडलेलें असलें तर अशा लोकांची संख्या फारच वाढते आणि एरवींहि संध्याकाळीं आलिंगन-चुंबनाचे प्रकार सर्रास दिसतात. सार्वजनिक उद्यानांत या गोष्टी पाहून पौर्वात्य देशांतून आलेल्या नवीन माणसाला आश्चर्यच वाटतें. मला

वाटलें कीं, या प्रकारांना बंदी करणारा एखादा नियम असेल. म्हणून मी उत्सुकतेनें पार्कातील नियमांचा एक फलक वाचूं लागलों; पण त्यांत मला माझ्या अपेक्षेच्या उलटच नियम आढळला. इतरांच्या अशा 'मौजें'त (एन्जॉयमेंट) व्यत्यय आणणें हाच त्या नियमाप्रमाणें गुन्हा होता!

मात्र प्रणयांतील मोकळेपणा एवढेंच हाइड पार्कचें स्वातंत्र्य नाहीं. मार्बल आर्चसमोरील हाइड पार्कची बाजू म्हणजे जगांतील सर्वांत खुली लोकशाही मानली जाते. तेथें कोणीहि उभें राहावें आणि कोणत्याहि विषयावर केव्हांहि भाषण करावें, असा प्रघात आहे. राजकारण, धर्म, लिपीसुधारणा, वर्णभेद, मजूर चळवळ, काव्य, लैंगिक नीति, तत्त्वज्ञान, इत्यादि अनेक विषयांवरचीं भाषणें मीं या ठिकाणीं उत्सुकतेनें ऐकलीं आहेत. श्रोत्यांपैकीं कोणीहि केव्हांहि वक्त्याला प्रश्न विचारावे अशी रूढी आहे. त्यामुळें वक्त्याच्या हजरजबाबीपणाचे नमुने येथें पहायला मिळतात. 'चर्चिल गुन्हेगार आहे', 'मी ख्रिस्ताचा अवतार आहे', 'इंग्लंडचें युद्धखातें जनतेला लुटीत आहे', 'इजिप्तबाबत इंग्लंड अन्याय करीत आहे', 'इंग्रज लोकांनीं जगाचा छळ केला, आतां इंग्रजांचाहि जग छळ करील,' अशीं अनेक विधानें मीं या सभांतून ऐकलीं आहेत. या सभांना श्रोत्यांचा फार मोठा समुदाय असतो असेंहि नाहीं; केव्हां केव्हां तर एकदोन लोकांच्यापुढेंहि वक्ते आपलीं जोरदार व्याख्यानें ऐकवीत असतात. राजकीय पक्षांचे शिकाऊ नेते या ठिकाणीं भाषणें करून मौलिक शिक्षण मिळवीत असतात. भारताचे सध्यांचे परराष्ट्रीय राजकारणधुरंधर श्री. व्ही. के. कृष्ण मेनन या सभांतून पूर्वी भाषणें करीत असत.

हाइड पार्कमधून सरळ गेलें, म्हणजे केन्सिंग्टन विभाग लागतो. लंडनमधील चोखंदळ लोकांचा राहाण्याचा हा भाग. भारताचे गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल म्हणून आलेले बरेच प्रसिद्ध पुरुष या भागांत राहात असत. या भागांत 'एक्झिबिशन रोड' म्हणजे प्रदर्शनांचा रस्ता आहे. या रस्त्यावर व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम, सायन्स म्युझियम, नॅचरल हिस्टरी म्युझियम, इंपीरियल इन्स्टिटयूट, जिऑलॉजिकल म्युझियम, लंडन म्युझियम, इत्यादि अनेक ख्यातनाम वस्तुसंग्रहालयें आहेत. लंडनमधील सर्व म्युझियम्स सर्वांना मोफत असतात आणि त्यांपासून फार मौलिक मार्गदर्शन होतें. इंपिरि-यल इन्स्टिटयूटमध्यें राष्ट्रकुलांतील देशांचे विभाग असून त्यांत भारत, पाकि-

स्तान, सिलोन, वगैरे देशांतील वस्तूंचीं प्रदर्शनें आहेत. या ठिकाणीं दररोज दोन वेळां त्या त्या देशासंबंधींचे शैक्षणिक चित्रपट मोफत दाखविण्यांत येतात. त्याशिवाय दररोज एक अथवा दोन व्याख्यानें होतात. वस्तुसंग्रहालयांतील वस्तूंचें आणि चित्रांचें महत्त्व, ऐतिहासिक पार्श्वभूमि वगैरेवरील तज्ज्ञांचीं हीं व्याख्यानें मोफत असतात. हा केन्सिग्टन विभाग म्हणजे परराष्ट्रांच्या कचेऱ्यांचे मोठें केंद्र आहे. या भागांत 'अर्ल्स – कोर्ट' 'ऑलिंपिया' हीं दोन मोठीं प्रदर्शनें आहेत – म्हणजे प्रदर्शनांच्या जागा आहेत. मोटार, यंत्रसामुग्री चित्रपट, हस्तव्यवसाय इत्यादि क्षेत्रांतील अनेक जागतिक प्रदर्शनें या जागांत भरविलीं जातात.

येथून जवळच असलेला चेल्सी हा भाग म्हणजे कलावंतांचें निवासस्थान. दाढी आणि केंस वाढविलेले, अगदीं फॅशनेबल किंवा अगदीं गबाळे कपडे केलेले, हातांत चित्रें काढण्याचें साहित्य किंवा ग्रंथ बाळगणारे असे कलावंत किंवा साहित्यिक या भागांत हिंडत असतात. कांहीं चित्रकार आपलीं चित्रें विक्रीसाठीं फूटपाथवर किंवा चौकांत ठेवतात. 'जागा भाड्यानें देणें आहे' या सदरांत या भागांत मीं एकदां पुढील जाहिरांत वाचली : 'To Let: Single room for a Gentleman. No artist.' यावरून कलावंतांच्या या भागांत घरमालकांचें कलावंतांच्याबद्दल काय मत आहे हें दिसून येतें. काय करणार ? पिकतें तेथें विकत नाहीं !

कलावंत व प्रदर्शनें यांचा भाग हाइड पार्कच्या एका टोंकाला आहे, तर दुसऱ्या टोंकाला 'एजवेअर रोड' हा चमत्कारिक भाग आणि 'मेरिलबोन' हा प्रतिष्ठित भाग आहे. एम्. सी. सी. ('मेरिलबोन क्रिकेट क्लब') या नांवानें जगांत प्रसिद्ध असलेला क्रिकेट संघ हा या मेरिलबोन भागांतीलच. 'लॉर्ड्स' हें जागतिक महत्त्वाचें क्रिकेटचें स्टेडियम याच भागांत आहे. त्याच्याजवळ असलेला एजवेअर रोड आणि पॅडिंग्टन भाग हा चमत्कारिक म्हणण्याचें कारण असें कीं, उदात्त आणि हिणकस यांचें विचित्र मिश्रण या भागांत आढळतें. लो. टिळक याच भागांत हॅवेल प्लेसमध्यें राहात होतें. जॅक स्पॉट नांवाचा लंडनचा अट्टल गुन्हेगार आणि स्वतःला लंडनच्या गुन्हेगारांचा राजा म्हणविणारा इसम याच भागांत राहातो. 'वेस्टबोर्न टेरेस' आणि 'मैदा अव्हेन्यू 'सारखे रमणीय रस्ते येथें आहेत, तर एजवेअर रोडच्या आसपास अनेक गलिच्छ

रस्तेहि आहेत. 'मैदा अव्हेन्यू' या भागांत मी कित्येक दिवस राहात होतों. हा भाग अतिशय शांत असला तरी गुन्हेगारांच्या बाबतींत कुप्रसिद्ध असलेले आणि अतिशय गोंगाटाचे रस्तेहि अगदीं जवळच आहेत. 'रीजंट्स पार्क'-सारखा लंडनचा सर्वांत सुंदर व रमणीय बगीचा येथून जवळच आहे, आणि 'मेट्रोपोलिटन'सारखीं तमाशाचीं थिएटरेंहि जवळ आहेत. 'मॅडम् टुसाड्स' हें मेणाच्या पुतळ्यांचें प्रसिद्ध प्रदर्शनहि रीजंट्स पार्कजवळ आहे.

मेरिलबोन रोडवरून युस्टन रोडला गेलें, म्हणजे लंडन युनिव्हर्सिटी हें विख्यात विश्वविद्यालय लागतें. त्याच्यासमोरच 'रसेल स्क्वेअर' नांवाचा मोठा चौक आहे. या चौकांत एक आणि चौकाजवळ 'टॉटनहॅम कोर्ट रोड'वर एक, अशा दोन दुकानांत भारतीय स्वयंपाकाच्या वस्तू मिळतात. लंडनमध्यें भारतीय जेवण देणारीं पन्नासवर हॉटेल्स आहेत; पण भारतीय स्वयंपाकाच्या वस्तू विकणारीं हीं दोनच दुकानें आहेत. इंग्रजांच्या या राजधानींत हिंग, जिरें, मिरीं, हळद, मिरची, बडिशेप, पापड, लोणचें, सुपारी वगैरे वस्तू पाहिल्यावर गंमत तर वाटतेच; पण घरच्या सुग्रास जेवणाचीहि भारतीयांना आठवण होते.

रसेल स्क्वेअरच्या दुसऱ्या टोंकाला ब्रिटिश म्युझियम हें जगांतील सर्वांत मोठें वस्तुसंग्रहालय आहे. या संग्रहालयांत इतिहास, वास्तुशास्त्र, भूगर्भशास्त्र, भूगोल, चित्रकला, शिल्पकला इत्यादि विविध क्षेत्रांतील लक्षावधि मूल्यवान् वस्तू आहेत. जगांतील पहिलें छापील पुस्तक, ग्रीसमधील देवालयांचे अवशेष, सीझर, सॉक्रेटिस वगैरेंचे पुतळे, जगांतील सर्व प्रमुख लेखकांचीं मूळ पुस्तकें आणि पत्रें, इत्यादि वस्तू विशेष उल्लेखनीय आहेत. 'बहुरत्ना वसुंधरा' हें विधान येथें चांगलें पटतें. निरनिराळ्या देशांतून ब्रिटिश-सरकारनें मौलिक वस्तू आणिल्या असून, 'एल्जिन मार्बल्स्'च्या खरेदीसाठीं सरकारनें पाऊण लक्ष पौंड खर्च केले. ब्रिटिश म्युझियमच्या मध्यभागीं जें ग्रंथालय आहे, तें जगांतील सर्वांत मोठें ग्रंथालय आहे. कार्ल मार्क्सनें अठरा वर्षें या ठिकाणीं अभ्यास करून 'कॅपिटल' हा जगन्मान्य ग्रंथ लिहिला. हें ग्रंथालय मोफत आहे आणि तेथें एका वेळीं ४५० लोकांना बसून अभ्यास करण्याची सोय आहे. इंग्रजांच्या संस्कृतींत ज्ञानाला केवढें मोठें महत्त्व आहे हें या ग्रंथालयांत पाऊल ठेवल्याबरोबर लक्षांत येतें

रसेल स्क्वेअर हा मोठमोठ्या हॉटेलांचा भाग आहे. या भागांतील ८० टक्के घरांत हॉटेलें आहेत. येथून 'ट्यूब'नें हॅम्पस्टेडला जातां येतें. हॅम्पस्टेड आणि बेल्साइज पार्क हे भाग लंडनच्या धकाधकीपासून जरा लांब, शांत आणि इतर भागाच्या मानानें राहाणीला स्वस्त आहेत. या भागांत महाराष्ट्रीयांची वस्ती बरीच आहे. इंग्लंडचा प्रसिद्ध कवि जॉन कीट्स हा याच भागांत राहात असे आणि अद्याप त्याचें घर त्याची स्मृति म्हणून तसेंच ठेवण्यांत आलेलें आहे. 'हॅम्पस्टेड हीथ' ही टेकडी आणि आसपासचा भाग झाडी, मोकळी हवा, हिरवळ, इत्यादींमुळें फारच आल्हाददायक वाटतो. कवीच्या वास्तव्यास शोभण्यासारख्या या प्रशांत भागाच्या अगदीं विरुद्ध असा लंडनचा कोणता भाग असेल, तर तो 'पेटिकोट लेन' हा भाग. मूरगेटच्या बाजूला हा भाग आहे. हा लंडनचा 'नळबाजार' किंवा 'चोरबाजार' आहे. येथें जुन्या वस्तू मोठ्या प्रमाणावर विकल्या जातात. कांहीं नव्या वस्तूहि अगदीं स्वस्त मिळतात. या बाजारांत घड्याळें, विजेचीं उपकरणें वगैरे विकणारा एक इसम अजून माझ्या लक्षांत आहे. तो म्हणत होता, "हा माल मीं इतका स्वस्त कसा विकतों याचं तुम्हांला आश्चर्य वाटत असेल; पण मी त्याचं रहस्य सांगतों. या धंद्यांत आम्हीं पांच भाऊ आहोंत. चौघे भाऊ रात्रीं दुकानें फोडून माल आणतात, आणि मी रविवारीं सकाळीं तो माल इथं विकतों." या बाजारांत मीं एकदां एक काश्मिरी गृहस्थ साध्या उदबत्त्या विकीत असतांना पाहिला. तो या उदबत्त्यांची इतकी महती सांगत होता कीं, तें ऐकून माझ्यासारख्या भारतीयाला हंसूंच कोसळावें. तो म्हणत होता, "हीं कांडी मीं काश्मीरच्या दुर्मिळ वनस्पतींपासून बनविली आहे. या कांडीला प्रज्वलित केल्याबरोबर सर्व वातावरण सुगंधित तर होतंच; पण अनेक रोग बरे करण्याची शक्तीहि या कांड्यांत आहे..." अशा अनेक थापा मारून तो इकडे चार आण्यांना मिळणारा उबदत्तीचा पुडा तिकडे पांच शिलिंगांना ( ३॥ रु. ) विकत होता.

या बाजारासारखाच एक बकाल बाजार म्हणजे 'शेफर्ड्स बुशमार्केट.' पण हा बाजार जुन्या वस्तूंचा नाहीं. या बाजाराजवळच 'व्हाइट सिटी' (श्वेतनगरी) नांवाचें एक प्रचंड स्टेडियम आहे. जागतिक कीर्तीचे अनेक क्रीडांचे सामने येथें होतात. त्याशिवाय दर गुरुवारीं आणि शनिवारीं संध्याकाळीं येथें कुत्र्यांच्या शर्यती होतात. त्या जरूर पाहाण्यासारख्या असतात. या शर्यतीवर घोड्यांच्या

शर्यतींप्रमाणेंच लोक पैसे लावून जुगार खेळतात. पण घोड्यांवर 'जॉकी' बसतात, त्याप्रमाणें कुत्र्यांवर बसून त्यांना थांबवितां येत नसल्यानें त्यांच्या धांवण्यासाठीं खास व्यवस्था करावी लागते. रेसच्या सुरुवातीला सात ते दहा कुत्रे ओळीनें उभे करतात. त्यांच्यापुढें दहाबारा फुटांवर एका लहान डब्यांत झांकून ठेवलेला एक कृत्रिम ससा असतो. सबंध मैदानांत ट्रॅमच्या रुळासारखा एक लहान पोलादी मार्ग असतो आणि रेस सुटल्याबरोबर खटका दाबून ह्या कृत्रिम सशावरचा डबा उघडला जाऊन विजेच्या साहाय्यानें ससा जोरांत पळविला जातो. तो खराच ससा आहे असें समजून सर्व कुत्रे त्याच्या मागें धांवतात. या शर्यतींत 'Win' या फलकाजवळ ससा पुन्हा आपल्या डब्यांत गुप्त होतो आणि कुत्रे धापा टाकीत उभे राहातात. तोंपर्यंत रेसचा निकाल लागलेला असतो. व्हाइट सिटीप्रमाणें एकंदर सहा स्टेडियम्स लंडनमध्यें निरनिराळ्या भागांत असून त्यांत कुत्र्यांच्या शर्यती चालतात. घोड्यांच्या शर्यतींप्रमाणेंच या शर्यतींची माहिती, अंदाज आणि निकाल दैनिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतात.

लंडन शहराची नवलाई अशी कितीहि वर्णन केली तरी संपणार नाहीं. 'No one can see the whole of London in his life' ('कुणीहि आपल्या हयातींत संपूर्ण लंडन पाहूं शकणार नाहीं.') अशी या अवाढव्य शहराबद्दल म्हण असून ती लंडनला गेलेल्या प्रत्येकाला खरी वाटूं लागते. पण एखादें शहर म्हणजे त्यांतील इमारती, रस्ते, उद्यानें आणि नवलाईच्या इतर जागाच नव्हेत. तें शहर म्हणजे त्याचें व्यक्तिमत्व. लंडन शहराचें व्यक्तिमत्व पॅरिसहून निराळेंच आहे. पॅरिस नगरी ही कलासक्त, विलासी, रंगेल वाटते, तर लंडन शहर म्हणजे राजदरबारी, खानदानी, श्रेष्ठ परंपरेची नगरी वाटते. कपडे आणि 'मॅनर्स' किंवा वागण्याच्या पद्धति यांत लंडनइतकें सनातनी शहर जगाच्या पाठीवर दुसरें कोणतेंहि नसेल. कपड्यांत किंचित्हि गबाळेपणा येथें खपणार नाहीं. दिवसांतून किती वेळां 'थँक यू' म्हणावें लागतें, याला तर अंतच नाहीं. बस्‌चें तिकीट काढतांना, दुकानांत कसलीहि वस्तु खरेदी करतांना, लिफ्टमध्यें चढतांना आणि उतरतांना, दार झांकतांना आणि उघडतांना–प्रत्येक वेळीं 'थँक यू', 'थँक यू' असें सारखें म्हणत राहावें लागतें !

लंडनमध्यें जागोजाग विखुरलेले 'पब्' या नांवानें ओळखले जाणारे मद्याचे 'बार' म्हणजे इंग्लंडचें खास वैशिष्ट्य आहे. 'पब्लिक हाउस'चें पब् हें छोटें नांव आहे. या 'पब्'मधील वातावरण अगदीं खुलें, मनमोकळें आणि विलोभनीय असतें. मद्य अथवा बीअरचा प्याला झटकन् संपवून पुनः आपल्या रस्त्याला लागणें हें पब्च्या चाहत्यांचें काम नाहीं. आपल्या मित्राला अथवा मैत्रिणीला घेऊन 'पब्'मध्यें जायचें, बीअरचे अथवा स्कॉचचे ग्लास घ्यायचे आणि लहानशा टेबलाभोंवतीं खुर्च्या टाकून मद्याचा स्वस्थपणें स्वाद घेतां घेतां मनसोक्त गप्पा मारायच्या, हें पब्चें वैशिष्ट्य. कांहीं पब्मध्यें पियानो असतात, कोठें टेलिव्हिजन असतो, कोठें 'डार्ट' (भिंतीवरील चक्रांत हातानें छोटे बाण फेंकून मारायचा खेळ) असतो, तर कोठें कोणीतरी माउथ ऑर्गन-वर गाणें वाजवीत असतें. मद्य घेणाऱ्यांविषयीं आमच्याकडे विलक्षण कल्पना आढळतात. मद्य घेणें म्हणजे बेसुमार दारू पिऊन रस्त्यावर अगर गटारांत लोळणें अशी पोरकट कल्पना अनेकांच्या मनांत असते, पण असे प्रकार लंडन-सारख्या ऐशीं लाखांच्या वस्तींत क्वचित्—अगदींच क्वचित्—फार तर नाताळच्या–रात्रीं घडतात. पब्सना लोक दिवसा सहसा आश्रय देत नाहींत. संध्याकाळीं काम संपल्यावर लोक येथें येतात. संध्याकाळीं ७ ते ११ पर्यंत हीच पब्सची खरी वेळ आणि गेल्या अनेक वर्षांत इंग्लंडमध्यें मद्य आणि तंबाखू यांवर दोनशें टक्के कर असल्यानें व्हिस्की अथवा रम यांसारखीं कडक पेयें सर्वसामान्य लोकांना परवडतहि नाहींत. त्यामुळें लंडनच्या 'पब'मध्यें बीअर हेंच आतां लोकमान्य पेय झालें असून त्याच्या बाटलीला तेथें १० ते ११ आणे पडतात. (करासह; म्हणजे मूळ पेयाची किंमत ३॥ ते ४ आणेच.) या पब्समध्येंच इंग्लंडच्या लोकांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक मतांची घडण होत असते म्हणून 'पब्स'ना 'जनतेची लोकसभा' (Parliament of the people) असें म्हणतात.

इंग्लंडचे लोक आणि त्यांतूनहि लंडनचे लोक फारच 'रिझर्व्ह' किंवा अबोल असतात. ते अपरिचित माणसाशीं सहसा बोलणार नाहींत आणि आपल्या प्रिय व्यक्तीबद्दलच्या भावनाहि न दाखविण्याचा प्रयत्न करतील. इंग्रज लोक किती अबोल आहेत, याबद्दल एक गोष्ट सांगतात. एकदां एक इंग्रज हाइड पार्कमध्यें गेला आणि आपली हॅट बांकावर जवळच ठेवून वर्तमानपत्र वाचीत बसला. इतक्यांत

दुसरा एक इंग्रज जवळ आला आणि चुकून तो पहिल्या गृहस्थाच्या हॅटवर बसला. त्यामुळें हॅट अर्थातच चेपली गेली; पण दोघांपैकीं कोणीहि बोलण्यास तयार नव्हतें-रागानेंसुद्धां. कारण त्यांची कोणी ओळख करून दिलेली नव्हती! तेव्हां त्या दुसऱ्या इंग्रजानें शांतपणें आपली हॅट काढून बांकावर ठेवली, मग पहिला गृहस्थ उठला आणि दुसऱ्या गृहस्थाच्या हॅटवर बसून त्यानें ती चेपून टाकली. त्यानंतर अर्थातच दोघांनाहि न्याय प्रस्थापित झाल्याचें समाधान वाटलें आणि दोघेहि कांहींएक न बोलतां आपआपल्या वाटेनें निघून गेले!

इंग्रजांच्या याच गुणाची आणखी एक गोष्ट आहे. एकदां एक गृहस्थ संध्याकाळीं कचेरींतून लंडनच्या आपल्या घरीं परत आला. नंतर पत्नीबरोबर चहा घेतां घेतां तो शांतपणें म्हणाला, "आज घरीं येतांना मीं टेम्स नदींत एक इसम बुडतांना पाहिला. बिचारा मदतीसाठीं अगदीं कळवळ्यानं ओरडत होता." पत्नीनें विचारलें, "मग तुम्हीं त्याला वांचवलं कां नाहींत?" नवरा म्हणाला, "त्याला वांचवावं असं माझ्या मनांतून फार होतं; पण काय करणार! त्याची नि माझी कुणी ओळखच करून दिलेली नव्हती; त्यामुळें माझा नाइलाज झाला!"

असे हे इंग्रज व त्यांतूनहि 'लंडनर्स' अबोल असले, तरी एकदां त्यांची मैत्री झाली, कीं त्यांच्या स्वभावांतील गोडवा व प्रेमळपणा विलोभनीय वाटल्यावांचून राहात नाहीं. किंबहुना, अलिप्तपणा आणि प्रेमळपणा या दोन विरोधी प्रवृत्तींचें असें कांहीं मिश्रण त्यांच्या स्वभावांत झालेलें असतें, कीं तेंच एक लंडनचें आकर्षण झालें आहे. हे लोक इतरांच्या भानगडींत पडणारे नसल्यामुळें व्यक्तीचें संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे काय याची कल्पना लंडनइतकी जगांत इतरत्र कोठेंच येत नाहीं. स्वातंत्र्य, लोकशाही, टेलिव्हिजन यांसारख्या अद्ययावत् शोधांचा घरोघर प्रसार, स्वच्छता आणि सौंदर्य, ज्ञानाचीं अद्ययात् साधनें, इत्यादि वैशिष्ट्यांमुळें लंडन शहराची मोहिनी जबरदस्त वाटते. इतकी कीं, 'Once a Londoner always a Londoner' ही म्हण सार्थ ठरते!

♥♥♥

# १०

## लंडनमधील ना-ताळ

खिरसमसच्या सणाला ‘नाताळ’ कां म्हणतात हें पूर्वी मला माहीत नव्हतें. पण मीं लंडनमध्यें १९५५ सालचा नाताळ पाहिला नि जगप्रसिद्ध ट्रॅफल्गार–चौकांतील नाताळनिमित्त होणारा समारंभ आणि कार्यक्रम पाहिले; तेव्हां मला समजून आलें कीं, ‘ना-ताळ’ ही केवळ शाब्दिक कोटी नाहीं. नाताळच्या समारंभांत या चौकांत खरोखरच लोक बेतालपणें वागतात आणि स्वतःला विसरून जातात.

ट्रॅफल्गार-चौक हा लंडनमधील सर्वांत प्रसिद्ध चौक. तीस–चाळीस हजार लोक मावतील असा हा मोठा चौक आहे. त्यांत पाण्याचे लहानलहान हौद आणि कारंजीं आहेत. ट्रॅफल्गारची लढाई जिंकून इंग्लंडला विजयश्री मिळवून देणाऱ्या नेल्सनचा पुतळा या चौकाच्या मध्यभागीं आहे. या पुतळ्याचा चबुतरा म्हणजे सुमारें शंभर फूट उंचीचा एक स्तंभ असून त्या स्तंभावर हा पुतळा बसविलेला आहे. स्तंभाच्या पायथ्याशीं चारी बाजूंना सिंहाचे चार प्रचंड पुतळे आहेत. या ट्रॅफल्गार–चौकाची जागा अगदीं मोक्याची आहे. त्याच्या एका बाजूला ‘पिकॅडिली सर्कस’ हा लंडनचा रंगेल भाग आहे, तर दुसऱ्या बाजूला ‘बकिंगहॅम पॅलेस’ हें राणीचें निवासस्थान, नं. १० डाउनिंग स्ट्रीट ही पंतप्रधानांची कचेरी आणि त्यापलीकडे पार्लमेंट हाऊस आहे. अशा

प्रकारें एका बाजूला रंगेल आणि दुसऱ्या बाजूला अतिगंभीर अशा भागांच्या मध्यें हा चौक आहे. राजकीय सभांच्या वेळीं हा चौक गंभीर स्वरूप धारण करतो, तर नाताळसारख्या सणांत किंवा 'गाय फॉक्स डे'ला याला रंगेल स्वरूप प्राप्त होतें.

नाताळांत प्रत्येक ख्रिश्चन कुटुंबांत 'यूल' नांवाच्या झाडाची फांदी आणण्यांत येते. खेडेगांवांत सार्वजनिक झाड असतें, आणि शहराच्या मानानें मोठमोठे वृक्ष या वेळीं जंगलांतून तोडून आणून शहरांतील मध्यवर्ति ठिकाणीं पुरले जातात. लंडन शहराला भेट म्हणून नॉर्वेकडून दरसाल हें झाड पाठविण्यांत येतें. गेल्या वर्षी -- १९५५ सालच्या नाताळांत -- ऐंशीं फूट उंचीचें हें झाड समारंभपूर्वक लंडन शहरांत आणण्यांत आलें. ता. २३ डिसेंबर रोजीं नॉर्वेची राजधानी ऑस्लो या शहराच्या मेयरच्या हस्तें तें झाड ट्रॅफल्गार चौकांत उभारण्यांत आलें. त्या वेळीं झाडावर विजेचे रंगीबेरंगी दिवे लावण्यांत आले होते. गांवोगांवचे नागरिक येत आणि या झाडाभोंवतीं फेर धरून नाचत नि गाणीं म्हणत. नाताळाचीं खास गाणीं असतात, तीं म्हणून ख्रिस्त-गुणगान करण्यांत येतें. कुणी 'सेक्झागॉन', 'माउथ-ऑर्गन', 'ब्युगल' 'गुइटर' अशीं वाद्यें आणतात आणि या वाद्यांच्या आवाजाच्या साथींत गाणीं म्हणण्यांत आणि नृत्य करण्यांत लोक बेहोष होऊन जातात. नाताळ हा सण वास्तविक धार्मिक. ख्रिस्तजन्माचा हा धीरगंभीर सण, पण ट्रॅफल्गार-चौकांतील या सणाच्या उत्सवांत मात्र धार्मिकपणा फारच थोडा दिसतो. या चौकांतील नाताळचा उत्सव जगांत प्रसिद्ध आहे तो मद्यासक्ति, प्रणय, हास्य, नृत्य यांच्या मुक्त प्रदर्शनाबद्दल. कारण गेल्या अनेक वर्षांची अशी परंपरा आहे कीं, २४ डिसेंबर आणि ३१ डिसेंबर या रात्रीं ट्रॅफल्गार-चौकांत येणाऱ्या कोणत्याहि स्त्रीचें कुणीहि चुंबन घ्यावें! आणि प्रणयाच्या या खुल्या बाजारामुळेंच ट्रॅफल्गार-चौकांतील नाताळ जगांत वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. नाताळच्या सुरुवातीला आपल्या मैत्रिणीचें, प्रेयसीचें किंवा पत्नीचें चुंबन घेऊन 'हॅपी ख्रिसमस टु यू' ('तुला नाताळ आनंदाचा जावो,') अशी शुभेच्छा व्यक्त करायची, या नाजुक घरगुती शिष्टाचारांतून ही परंपरा सुरू झाली. तसेंच ३१ डिसेंबरच्या रात्रीं चुंबन घेतांना 'हॅपी न्यू इयर टु यू' ('तुला नवें वर्ष सुखाचें जावो,') असें म्हणायचें. पण ट्रॅफल्गार-चौकांतील प्रचंड गर्दीत चुंबन घेतांना हे शब्द उच्चारायला फारच

थोड्यांना फुरसद असते. किंबहुना हे शब्द उच्चारले आहेत असें गृहीतच धरलें जातें. या एकंदर प्रकाराची कल्पना येण्यासाठीं ३१ डिसेंबरच्या संध्याकाळपासून १ जानेवारीच्या पहांटेपर्यंत ट्रॅफल्गार-चौकांत काय-काय घडामोडी होतात, तें पाहूं.

३१ डिसेंबर १९५५. ' पिकॅडिली सर्कस ', ' लिस्टर स्क्वेअर ', ' रीजंट स्ट्रीट ', ' शॅफ्ट्स्बरी अव्हेन्यू ', ट्रॅफल्गार-स्क्वेअर ', ' स्ट्रँड ' हा लंडनचा भाग आधींच रंगेल. ' वेस्ट एन्ड ' म्हणून हा भाग, नि विशेषतः ' पिकॅडिली सर्कस ', ' लिस्टर स्क्वेअर ', ' चेरिंग क्रॉस ' हा भाग प्रसिद्ध. नाताळांत आणि ३१ डिसेंबरला संध्याकाळपासूनच या भागांत अतोनात गर्दी असते. इंग्लंडच्या दूरदूरच्या भागांतूनहि तरुण-तरुणी मुद्दाम या कत्तलच्या रात्रीसाठीं आलेल्या आहेत. आपल्या प्रियकराच्या, नवऱ्याच्या किंवा मित्राच्या हातांत हात घालून किंवा कमरेभोंवतीं हात टाकून अनेक स्त्रिया रस्त्यावरून चाललेल्या आहेत. या भागांत सिनेमा-नाटकांचीं थिएटरें बरींच असल्यामुळें आधींच दिव्यांचा झगझगाट असतो; त्यांत नाताळची जादा रोषणाई. त्यामुळें सगळीकडे झगझगाट दिसतो आहे. ' विंडमिल ' आणि ' प्रिन्स ऑफ वेल्स ' या दोन ' तमाशा 'च्या थिएटरांवर लावलेलीं अर्धनग्न स्त्रियांचीं चित्रें पहात कांहीं लोक घोटाळत आहेत. ' पिकॅडिली सर्कस '— येथें ' सर्कस ' हा शब्द चौक या अर्थानें वापरला जातो--हा तर अतिशय गजबजलेला आणि रंगेल भाग. छंदी-फंदी लोक, बडे दादा, स्वच्छंदी स्त्रिया, दारूचे ' बार ', मोठमोठीं ऐषआरामी हॉटेलें यांचें हें केंद्र. या चौकाच्या खालीं ' पिकॅडिली सर्कस ' हें ' ट्यूब-स्टेशन '— म्हणजे जमिनीखालील रेल्वेचें भव्य स्टेशन आहे. या स्टेशनवर हजारों उतारू दिसतात. हें स्टेशन गोलाकार आहे आणि तिथें जगाचा नकाशा आणि जगाचें घड्याळ आहे. त्या घड्याळांत एकाच वेळीं जगांतील प्रत्येक देशांत किती वाजले आहेत हें दाखविलें जातें. आतां लंडनमध्यें संध्याकाळचे सात वाजले आहेत, तर मुंबईला रात्रीचे साडेबारा वाजले आहेत. या घड्याळाजवळ अनेक परकीय चेहेरे दिसतात. प्रत्येकाला उत्सुकता असते कीं, या वेळीं आपल्या देशांत, आपल्या गांवांत, किती वाजले असतील ? आणि मग मनांत विचार येतो, आपली प्रिय व्यक्ति या वेळीं काय करीत असेल ?

या ट्यूब-स्टेशनमधून आपण वर आलों म्हणजे ' हे मार्केट ' रस्त्याला

लागतो. या रस्त्यानें सरळ गेलें म्हणजे ट्रॅफल्गार–चौक लागतो. ‘ऑल रोड्स लीड टु रोम’ (‘सर्व रस्ते रोमला मिळतात,’) असें म्हणतात, त्याप्रमाणें आज संध्याकाळीं सारे रस्ते या ट्रॅफल्गार चौकाकडे जातात. जसजसे आपण चौकाकडे जाऊं लागतों, तसतशी गर्दी वाढत जाते. इंग्रज लोक नेहमीं शिस्तींत फूटपाथवरून चालणारे. रस्ता हा फक्त वाहनांसाठीं असतो आणि पादचाऱ्यांनीं त्याचा उपयोग ठराविक ठिकाणीं रस्ता ओलांडण्यासाठींच फक्त करायचा, ही सर्वमान्य कल्पना. पण आज नाताळनिमित्त फूटपाथ इतके खच्चून भरले आहेत, कीं कांहीं लोकांनीं तरी रस्त्यावरून चालल्याशिवाय गत्यंतर नाहीं, आणि आज जे अनेक नियम झुगारून देण्यांत आले आहेत, त्यांपैकींच हा एक. ट्रॅफलगार–चौकाजवळ पोंचल्यावर जें विराट् दृश्य दिसतं तें विलक्षणच !

या चौकांत आठदहा हजार माणसें आहेत. चौकाच्या मध्यभागीं ऐशीं फूट उंचीचें ‘ख्रिसमस ट्री’ (नाताळचें झाड) लावण्यांत आलें आहे. त्या झाडावर रंगीबेरंगी विजेचे दिवे लटकत आहेत. जवळच्या कारंज्यांतून पाण्याचे फवारे अखंड उडत आहेत. या कारंज्यांत पाण्याच्या आंत दिवे बसविलेले असल्यानें हे फवारे फारच मनोहर दिसत आहेत. हा ट्रॅफल्गार–चौक रस्त्यापासून बारा ते पंधरा फूट आंत असल्यामुळें रस्त्याच्या कडेला उभे राहून हजारों लोक पाहात आहेत. कारण या चौकांत ‘स्मर-युद्ध’च चालल्याचें दिसत आहे.

आजच्या रात्रीं टॅफल्गार–चौकांत येणाऱ्या कोणत्याहि स्त्रीचें कुणीहि चुंबन घ्यावें, असा प्रणयाचा मुक्त परवाना असल्यामुळें हजारों उत्साही तरुण आणि तारुण्य न विसरलेले प्रौढ या चौकाकडे लोटावे हें साहजिकच आहे. पण विशेष म्हणजे चुंबनोत्सुक अशा शेंकडो मुलीहि या चौकांतील मुक्त प्रणयांत हिरीरीनें भाग घेतांना दिसत आहेत. अर्थात् त्या भाग घेतात म्हणूनच ही रूढी शक्य झाली आहे. या मुली बहुधा इंग्लंडच्याच, पण लंडनपासून लांब असलेल्या गांवच्या, किंवा इंग्लंडखेरीज इतर युरोपियन देशांतल्या आहेत. या मुलींना वापरण्यासाठीं खास टोप्या तयार केलेल्या आहेत. या टोप्या जाड कागदाच्या आहेत नि त्यावर मोठ्या अक्षरांत पुढील वाक्यें छापलेलीं आहेतः—

Kiss Me Quick.
( 'झटकन् माझें चुंबन घे.' )
I'm No Angel.
( 'मी देवता नाहीं.' )
You Are Sweet.
( 'तूं गोड आहेस.' )
You Are Smasher.'
( 'तूं मला जिंकलें आहेस.' )

अशा संदेशवाही टोप्या घालून मुली चौकांत हिंडत असतात व त्यांच्यामागें पुरुषांचे घोळके असतात. कुणीतरी एखाद्या मुलीला एकदम हटकून 'हॅपी न्यू इयर' म्हणून तिचें दीर्घ चुंबन घेतो आणि मग इतरहि त्याचें अनुकरण करतात. अर्थात् नव्या वर्षाच्या शुभेच्छा व्यक्त करण्यासाठीं त्यांना शब्द सांपडत नाहींत आणि शब्द शोधण्याचा ते प्रयत्नहि करीत नाहींत. बऱ्याच वेळां तर आपलें चुंबन कोण घेतें आहे हें मुलींनाहि कळत नाहीं आणि आपण कुणाचें चुंबन घेत आहोंत याची पुरुषांनाहि कल्पना नसते! ओठ लिपस्टिकचे आहेत, एवढी गुलाबी जाणीव असली म्हणजे झालें! मग ही लिपस्टिकची खूण रुमालानें पुसायची, आणि दुसऱ्या लिपस्टिकसाठीं ओठ तयार करायचे, असा तरुणांचा उद्योग चालू असतो!--शाळेंत मास्तर फळ्यावर लिहिलेलें पुसून पुनः फळा तयार ठेवतात, तसेंच!

कांहीं वेळां असें होतें कीं, अनेक चुंबनांनीं बेजार झालेली एखादी मुलगी आठदहा पुरुषांचें कडें फोडून बाहेर जाण्याचा प्रयत्न करते आणि ओरडते. अशा प्रसंगीं बहुधा तिच्याभोंवतालचे पुरुष स्वतः होऊन बाजूला होतात अन् तिला वाट करून देतात. कुठें फारच दांडगाई होत आहे असें वाटलें, तर पोलिस मध्यें पडून लोकांना बाजूला करतात. पण सहसा पोलिस या भानगडींत पडत नाहींत. या चौकांत नाताळच्या रात्रीं शंभर-दीडशें पोलिस असतात; पण 'आज रात्रीं हें असें चालायचेंच', अशा समजुतीनें ते या प्रकाराकडे दुर्लक्ष करतात. या वर्षीच्या — १९५५ सालच्या — नाताळांत लंडनच्या पोलिसांच्या टोप्यांसारख्या उंच काळ्या कागदी टोप्या बाजारांत विकायला आल्या आहेत. बऱ्याच तरुणांनीं या टोप्या आणि पोलिसांच्या गणवेषासारखे गडद

निळे ओव्हरकोट घातले आहेत. पांचसहा पुरुषांच्या घोळक्यांत सांपडलेल्या एखाद्या मुलीला सोडविण्याच्या मिषानें हे बनावट पोलिस त्या घोळक्याजवळ जातात, आणि लोकांना बाजूला करून आपणच त्या मुलीला मिठी मारतात! मग या तोतया पोलिसाचा बनाव लोकांच्या लक्षांत येतो. खरोखरीचे पोलिस यालाहि अडथळा करीत नाहींत. आज 'ना-ताळ' आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असते.

या ट्रॅफल्गार चौकांत धाडशी तरुण आहेत, उन्मत्त तरुणी आहेत. त्यांच्याप्रमाणेंच आपल्यालाहि चुंबनांची मजा मिळेल या आशेनें आलेल्या पस्तीस ते पंचेचाळीस वर्षांच्या प्रौढ स्त्रिया आणि प्रौढ पुरुषहि आहेत. भर चौकांत एका हातांत मद्याची बाटली नि दुसऱ्या हातांत ग्लास घेऊन पान करणारे लोक आहेत. लंडनच्या या जगावेगळ्या नाताळाची ख्याति ऐकून तो पहायला आलेले चीन, भारत, अमेरिका, इटली, सिलोन, आफ्रिका इत्यादि देशांतील लोक आहेत. या ऐन धुमश्चक्रींत कुणाला फोटो काढून घ्यायचा असेल, तर ती हौस पुरविणारे फोटोग्राफर्स फ्लॅशलाइटसह सज्ज आहेत, 'फादर ख्रिसमस'चा वेष परिधान केलेले आणि लांब पांढरी शुभ्र दाढी लावलेले गमत्ये इंग्रज आहेत. या साऱ्या प्रकाराकडे किंचित् भयानें आणि अधिक औत्सुक्यानें पाहणारीं बाराचौदा वर्षांचीं कांहीं लहान मुलेंहि आहेत. मधूनच एखादा फटाका उडवून देणारे 'टेडी बॉइज्' म्हणजे उनाड पोरगे आहेत, 'माउथ-ऑर्गन' किंवा 'ब्युगल' वाजवून या कोलाहलांतहि संगीत आणणारे उत्साही लोक आहेत. कारंज्यांतील पाणी घेऊन एकमेकांच्या अंगावर उडवणारे तरुण आहेत, हातांत मोठमोठे फुगे घेऊन नि विदूषकी टोप्या घालून हिंडणारे लोक आहेत, या रात्रीसाठीं मुद्दाम रजा घेऊन आलेले उत्साही नाविक आणि सैनिक आहेत, आणि या सर्वांच्या उत्साहाला आलेलें उधाण शांतपणें पहाणारे पोलिसहि आहेत. भारतासारख्या पौर्वात्य देशांतील तरुण, विशेषतः विद्यार्थी, या गर्दींत घुसून मन मानेल तशी 'वसुली' करतात. पण ती करतांना आपल्याला ओळखणारें जवळपास कुणी आहे का हें किंचित् बावरून इकडे-तिकडे पहातात. कुणी ओळखीचें भेटलेंच तर म्हणतात, 'कांहीं नाहीं, सहज इकडची गंमत पहायला आलों होतों.' अर्थात् दुसरा भारतीयहि यावर चटकन् विश्वास ठेवतो नि आपणहि 'गंमत पहायला' गर्दींत घुसतो. अगदीं निकटचा

मित्र जर भेटला तर मात्र त्या गर्दीतहि आपण मिळविलेल्या कमाईची मोजदाद हे मित्र करूं लागतात. ट्रॅफल्गार–चौकांतली ही सांथ जवळपासच्या भागांतहि पसरते; पण मर्यादित स्वरूपांत. इतर भागांत सहसा अनोळखी मुलीवर कुणी प्रयोग करीत नाहीं. पण 'पिकॅडिली सर्कस', 'पाल्माल', 'रीजंट स्ट्रीट', 'सोहो–स्क्वेअर' या आसपासच्या भागांत मित्रमैत्रिणींचा रंगेलपणा उतूं जात असतो. हे लोक कधीं फूटपाथवर, तर कधीं भर रस्त्यावरच निरनिराळीं वाद्यें घेऊन नृत्य-गायन सुरू करतात. विशेषत: 'रंबा' आणि 'संबा' हीं अति द्रुत लयीचीं नृत्यें तर हलकल्लोळ माजवून सोडतात.

लंडनच्या 'ट्यूब'—म्हणजे जमिनीखालच्या लोकल रेल्वे आणि बसेस् रात्रीं साडेबाराच्या सुमाराला बंद होतात. त्यामुळें एरवीं दररोज रात्रीं बारा वाजल्यापासूनच लंडनच्या रस्त्यांवरील गर्दी ओसरायला सुरुवात होते. पण आजच्या नाताळच्या रात्रीं घरीं परत जायला उत्सुक असें कुणी फारसें नसतेंच. त्यामुळें आज मात्र मध्यरात्रीं गर्दी ओसरत नाहीं. उलट, रात्रीं बारा वाजतां जुनें वर्ष संपून नवें वर्ष येत असल्यानें, रस्त्यांवर, चौकांत, क्लबसमध्यें, नृत्य-गृहांतून आलिंगनांना आणि चुंबनांना अधिकच भरती येते. नृत्यगृहांतून पावणे-बाराच्या सुमाराला एक स्त्री नि एक पुरुष अशा अनुक्रमानें एकमेकांच्या हातांत हात घालून सर्वांचें एक मोठें रिंगण करतात आणि नव्या वर्षाच्या खास नाचाला सुरुवात करतात. रात्रीं बरोबर बारा वाजतां सर्व दिवे मिनिटभर मालविण्यांत येतात. त्या वेळीं नृत्यांतील आपल्या सहचारिणीचें चुंबन घ्यायचें असतें. ट्रॅफल्गार–चौकांत या वेळीं फार मोठीं देवघेव होते, हें सांगणें नकोच. बारा वाजल्यानंतरहि बराच वेळ हा प्रकार चालू असतो. एक–दीड वाजण्याच्या सुमाराला मात्र टॅक्सीवाल्यांची धांवपळ जोरांत सुरू होते. ह्या वेळीं कांहीं स्त्रिया नि पुरुष घरीं परत जातात. पण त्यांची संख्या एकंदर गर्दीच्या पांचदहा टक्क्यांहून अधिक नसते. त्यानंतरहि अनेक तरुण एका हातांत बीअरच्या बाटल्या घेतात नि कोपराचे कोन करून, एकमेकांच्या हातांत हात अडकवून रस्त्यानें गाणीं म्हणत हिंडतात. मग समोरून येणाऱ्या एखाद्या मुलीला धरण्याचा प्रयत्न होतो. क्वचित् त्यांतून भांडणें होतात नि क्वचित् छोट्या मारामाऱ्याहि होतात. रात्रीं दोननंतर अधिकाधिक लोक घरीं परतायला सुरुवात होते. बसेस् नि आगगाड्या बंद झाल्यामुळें खासगी मोटारी व टॅक्सीज् यांची

वर्दळ ट्रॅफल्गार –चौकांभोंवतीं व विशेषतः पिकॅडिली सर्कस या चौकांत मोठ्या प्रमाणावर सुरू होते. हा वेळपर्यंत कांहीं लोकांना मद्याचा कैफ बराच चढलेला असतो. त्या तारेंत कुणी रस्त्याच्या मध्यभागीं उभें राहून पोलिसांप्रमाणें येणाऱ्याजाणाऱ्या मोटारींना हात दाखवून वाहतूक–नियंत्रण करीत असल्याचा बहाणा करतात, कुणी रस्त्याच्या मध्यभागींच नृत्याचा पसारा मांडतात, तर क्वचित् कुणी 'फायर–फायटर'ला आगीची खोटी वर्दी देतात नि अग्निशामक मोटारी धांवत आल्यावर आपण त्या गांवचेच नव्हे असा चेहरा करून 'कुठें आग लागलीय्?' अशी पृच्छा करूं लागतात. रस्त्यावरच्या वाहतुकींत फारच अडथळा होऊं लागला, तर पोलिस अशा इसमांना हाताला धरून रस्त्याच्या कडेला आणून सोडतात; पण अटक, खटला असे प्रकार सहसा होत नाहींत.

रात्रीं तीन-साडेतीन वाजल्यापासून गर्दी बरीच कमी झालेली दिसते. दोनचार तासांपूर्वी ज्या रस्त्यावर हजारभर लोक असतील, तिथें आतां दोनतीनशें लोक ओसरलेल्या भरतीची आठवण म्हणून वावरतांना दिसतात. या वेळीं पोलिस ट्रॅफल्गार–चौक मोकळा करण्याच्या उद्योगाला लागलेले असतात. चौकाच्या मध्यभागापासून ते गर्दी हटविण्यास सुरुवात करतात नि सौम्यपणें समजावून सांगून लोकांना चौकाबाहेर नेतात. चौक खालीं करण्याचें कामच तास–दीड तास चालतें. कारण सारेच कांहीं पोलिसांचें शांतपणें ऐकून घेणारे नसतात. कुणाला मदिरा चढलेली असली तर ते अडथळा करण्याचा प्रयत्न करतात; पण एकंदरींत 'पोलिसी' सामर्थ्य दाखविण्याचे प्रसंग फारच थोडे येतात. चौकांतून बाहेर पडलेल्या लोकांत पुरुषांची संख्याच जास्त. ज्या थोड्या स्त्रिया असतात, त्यांत नवऱ्याबरोबर किंवा मित्रा-प्रियकराबरोबर असणाऱ्या स्त्रियाच बहुधा असतात. टॅक्सींतून जाणारे हा वेळपर्यंत गेलेले असतात नि इतर माणसें रेल्वे व बसेस् सुरू झाल्यावर जाऊं असें म्हणून रेंगाळत असतात.

एखादी लढाई संपून गेल्यावर रणांगणावर जसा शस्त्रास्त्रांचा किंवा मोडून पडलेल्या वस्तूंचा खच दिसावा तद्वत् रस्त्याच्या कडेला, क्वचित् रस्त्यांत, दोन इमारतींच्या मध्यें, केराच्या कोंडाळ्याजवळ, बीअरच्या बाटल्या, फुटके ग्लासेस्, स्त्रियांचे हातरुमाल, मिठाई खाऊन टाकलेले कागद इत्यादि वस्तू पडलेल्या दिसतात. पहांटे चारपासून सकाळीं सातपर्यंत वेळ कसा काढायचा हाच मुख्य

प्रश्न या मागें रेंगाळलेल्या लोकांपुढें असतो. कारण लंडनच्या लोकल आग-गाड्या दररोज पहांटे साडेचार–पांचच्या दरम्यान सुरू होत असल्या, तरी सुट्टीच्या दिवशीं त्या सात–साडेसातच्या दरम्यान सुरू होतात. मग मागें राहिलेल्या लोकांपैकीं कुणी आळसटलेल्या डोळ्यांनीं दुकानाच्या दाराजवळ विश्रांति घेण्याचा प्रयत्न करतात, तर कुणी चर्चच्या पायऱ्यांवर बसून डुलक्या घेतात. अशाहि वेळीं कांहीं प्रणयी युगुलें कमरेभोंवतीं हात टाकून रस्त्यानें गाणें गुणगुणत जातांना आढळतात, तर कांहीं जोडपीं टेलिफोनच्या बूथमध्यें जातात, पण टेलिफोनचा उपयोग करीत नाहींत! हा वेळपर्यंत चांगलीच थंडी पडूं लागलेली असते. कुठें कुठें रस्त्याच्या कडेला 'हॉट डॉग्स' आणि सॅंड-विचिस् विकणारा हातगाडीवाला दिसतो; मग त्याच्याभोंवतीं जमून लोक त्याच्या या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतां घेतां त्याच्या शेगडीची ऊबहि घेतात.

नव्या वर्षाच्या उषेचीं किरणें लंडनवर आस्ते आस्ते येऊं लागतात, तेव्हां रस्त्यावरून पसरलेले कागद नि बाटल्या उचलण्यासाठीं 'लंडन कौंटी कौन्सिल'च्या मोटारी आलेल्या असतात. त्यांतील कामगार झटपट रस्ते साफ करतात, मोटारींनीं पाणी मारलें जातें नि यांत्रिक ब्रशांनीं रस्ते स्वच्छ केले जातात. ट्रॅफल्गार–चौकांतील जगावेगळा नाताळ पहायला आणि अनुभवायला आलेले बहुतेक लोक किंचित् अंधाऱ्या जागा पाहून डुलक्या घेण्यांत गुंतलेले असतात.

अगदीं थोडीं चहाचीं दुकानें रात्रभर उघडीं असतात. 'फ्लीट स्ट्रीट' या रस्त्यावर वृत्तपत्रांच्या कचेऱ्या आहेत. या रस्त्यावर चोवीस तास उघडें असणारें एक उपाहारगृह आहे. कांहीं मोठ्या स्टेशनांवरहि अशीं उपाहारगृहें आहेत. त्यांतून आसरा घेणारेहि अनेकजण आढळतात. जड डोळे मिटत असतात; अधूनमधून ते घड्याळाकडे पहात असतात. आपल्या मित्राच्या खांद्यावर डोकें ठेवून, पुसलेल्या लिपस्टिकची डागडुजी न करतां, मुली उपाहारगृहांत, टेलिफोन बूथमध्यें किंवा दुकानांच्या शेडच्या आडोशाला झोंप घेत असतात.

उजाडूं लागलें, कीं कांहीं वेळासाठीं बाजूला ठेवलेली औपचारिकता लंडन शहरांत पुनः प्रगट होऊं लागते. झोंपेंत चुकून शेजारच्या अनोळखी इसमाच्या अंगावर आपण डोकें ठेवलें आहे असें लक्षांत येतांच इंग्रज इसम म्हणतो,

'आय् बेग युवर पार्डन!' (माफ करा हं!) मग लोक हळूहळू आळस झाडतात, एखादें उपाहारगृह उघडें दिसलें तर सकाळच्या थंडींत चहाचे गरम घोट घेतात, सिगरेटचे झुरके मारतात आणि स्वतःशीं म्हणतात, 'जुनें वर्ष गेलें, नवें वर्ष हात पसरून स्वागत करीत आहे.' जुन्या वर्षांतील तृप्त आणि अतृप्त आशा-आकांक्षा मनाशीं तरळतात. नव्या वर्षाच्या नव्या आशा-आकांक्षा डोकावतात. जुन्या वर्षांतील मित्र, मैत्रिणी, प्रेम यांचीं चित्रें इतिहासाकडे जाऊं लागतात आणि नव्या वर्षाच्या नव्या संधी बोलावूं लागतात. जुन्या वर्षाचे कष्ट, आपत्ति, दुःख यांचा विसर पडूं लागतो आणि अज्ञात नव्या वर्षांतून जीवनाचा जास्तींत जास्त आस्वाद घ्यावा म्हणून मनाला नवा हुरूप येतो. या नव्या उत्साहानेंच चहाच्या उपाहारगृहांत जाऊन इंग्रज माणूस म्हणतो-'टी प्लीज', रेल्वेस्टेशनवर जाऊन वृत्तपत्र घेतो-'ऑब्झर्व्हर प्लीज', आणि रेल्वेचें तिकिट मागतो-'एजवेअर रोड प्लीज!' लंडनचें दैनंदिन जीवन पुनः सुरू होतें ...

♥♥♥

# ११

## हरपलेलें वैभव शोधणारें इस्तंबूल

ग्रीसहून तुर्कस्तानला येणारी आगगाडी सकाळीं दहाच्या सुमारास इस्तंबूलच्या ' सिरकेसी ' स्टेशनवर आली. भौगोलिक दृष्ट्या मी युरोपांत होतों कीं आशियांत होतों, याबद्दल माझी खात्री नव्हती. कारण इस्तंबूल शहर अर्धें युरोपमध्यें आणि अर्धें आशियांत आहे. स्टेशनवरचें वातावरणहि कांहींसें युरोपचें, कांहींसें आशियाचें आहे. स्टेशनची इमारत, आगगाडी, बुकस्टॉल, वेटिंगरूम पाहिली तर युरोपप्रमाणें असावत्; पण उपहारगृह, उतारू, अस्वच्छता, गोंगाट, गबाळेपणा पाहिला तर तो युरोपांत खपणार नाहीं. आमच्या डब्यांतून आम्ही चौघेजण उतरलों. माझ्याबरोबर एक पाकिस्तानी उतारू, एक बगदादचा व्यापारी आणि एक फ्रेंच सैनिक असे तिघेजण होते. पैकीं फ्रेंच सैनिक हा फ्रान्समधून पळून आलेला होता. त्याला फ्रेंचशिवाय कोणतीहि भाषा येत नव्हती. अल्जीरियामध्यें त्याला लढण्यासाठीं जायचा हुकूम झालेला होता, पण तिथें जायची त्याची तयारी नसल्यामुळें तो पळून आला होता. ग्रीसमध्यें थिसोलिनीकी स्टेशनवर त्याची-आमची मैत्री झाली. इस्तंबूल स्टेशनवर उतरल्याबरोबर त्यानें जें वातावरण पाहिलें, त्यामुळें तो भिऊन गेला. त्याच्याजवळ शंभरदीडशें लिरा आणि कांहीं हजार फ्रँक होते. त्याला कुणाचा विश्वास पटेना. ' या विचित्र देशांत आपला निभाव लागणार नाहीं, मी आपला परत जातों '

असें तो स्टेशनवरच बोलूं लागला. 'ज रितुर्नें' ('मी परत जातों') हें त्याचें पालुपद कांहीं केल्या संपेना.

पॅरिसवासीयांच्या कोमल आणि संवेदनाक्षम मनाला भीति वाटावी असेंच इस्तंबूलचें वातावरण होतें. हे धिप्पाड तुर्की लोक दिलदार असले, तरी उग्र वाटतात. बऱ्याच लोकांचे कपडे गबाळे, अस्वच्छ. परदेशी प्रवाशाला प्रथम वाटतें, पैशासाठीं हें लोक कांहींहि करतील पण हा समज खरा नाहीं. हे लोक जितके उग्र वाटतात, तितकेच सरळ, मदत करण्याची इच्छा धरणारे आहेत. पण त्यांच्याशीं थोडा संबंध येईल तेव्हांच हें पटतें. तोंपर्यंत मात्र आमच्या फरेंच सैनिकाप्रमाणें तिऱ्हाइताला त्यांच्याविषयीं अविश्वास, भीति वाटते. अस्ताव्यस्त पसरलेला काळा वेष घालून स्त्रिया स्टेशनवरच्या बांकांवर किंवा जमिनीवर घोळके करून बसलेल्या आहेत, —त्यांच्यापैकीं कुणीकुणी फक्त डोळ्यांजवळच वीतभर लांब आणि दोन इंच रुंद काळें कापड बांधलें आहे. अर्थात् बाहेरचें पहाण्यासाठीं डोळ्यांच्या समोर छिद्रें ठेवलेलीं आहेत. पण एकंदरींत पाहिलें तर, सबंध किंवा अर्धा बुरखा घेणाऱ्या स्त्रियांची संख्या फारच थोडी. स्टेशनवरचे हमाल खास तुर्की पद्धतीनें सामानाची ने-आण करीत आहेत. कितीहि सामान असलें, तरी एका दोरीवर ते भागवून नेतात. एकदोन ट्रंका आणि एकदोन वळकट्या असल्या, तरी हा तुर्की हमाल सामान जमिनीवर ठेवून प्रथम मण्यांची माळ करावी तशी ट्रंकांच्या कड्यांतून आणि वळकट्यांच्या दोऱ्यांतून आपली दोरी नेतो. मग जमिनीवरच बसून तो हें सर्व ओझें डोक्यावर अथवा पाठीवर व्यवस्थित ठेवून घेतो. सामानाच्या मालकाला तो म्हणतो, 'साहेब, हात द्या.' मग मालकानें आपला हात पुढें करायचा आणि त्याचा आधार घेऊन हा हमाल तें अवाढव्य ओझें पाठीवर अगर डोक्यावर घेऊन उभा रहातो. युरोपांतील स्टेशनांवर गर्दी असली तरी सहसा गोंधळ अगर आरडाओरडा दिसत नाहीं. (याला युगोस्लाव्हिया हा देश अपवाद म्हटला पाहिजे.) पण इस्तंबूल स्टेशनला तिथले हमाल, उतारू, फेरीवाले, हॉटेलवाले यांच्या बोलण्यानें आणि आरडाओरड्यानें एखाद्या युद्धभूमीचें स्वरूप येतें. अनेक फेरीवाले मिठाई विकीत असतात. त्या मिठाईवर माशा बसतात. गर्दीत मिठाई खालीं पडली तरी तीच पुन्हा उचलून ताटांत ठेवली जाते. मिठाईचीं चित्रविचित्र नांवें परकीय प्रवा-

शांना विलोभनीय वाटतात. बाकी खाण्याच्या पदार्थांचें नांव कांहींहि असलें, तरी तें विलोभनीय वाटतेंच !

स्टेशनच्या आवारांतून मी बाहेर आलों. पुण्याप्रमाणेंच इस्तंबूललाहि स्टेशनबाहेर मोठा चौक आहे. या चौकांतून ट्रॅम्स, बसेस्, मोटारी, उंटांच्या गाड्या, गाढवांच्या गाड्या यांची वाहतूक एकसारखी चाललेली असते. परका इसम दिसला कीं, दहा-पांच मुलें त्याला गराडा घालतात, 'ओटेली सर ?', 'ओटेली मेस्युअर ?' 'सलाम अलेकुम्, ओटेली ?'—अशा निरनिराळ्या भाषेंत त्यांचा गलबला चालू असतो. त्यांना काय म्हणायचें आहे, हेंच प्रथम लक्षांत येत नाहीं. माझ्या पाकिस्तानी मित्रानें सांगितलें कीं, "आपल्या हॉटेलांत उतरा, असें म्हणत आहेत हीं मुलें." आमच्याकडे नृसिंहवाडीला, पंढरपूरला किंवा तुळजापूरला जसे बडवे-भोपे 'कॅनव्हसिंग' करतात, तसें हें कॅनव्हसिंग होतें. स्टेशनपासून अर्ध्या-पाऊण मैलांत प्रवासी कुठेंहि गेला, तरी 'ओटेली'चा साद त्याच्या कानीं पडतोच. या ओटेलीवाल्यांच्या माऱ्यांतून आपण सुटतों न सुटतों, तोंच 'पॉलिश, मेस्यूअर ?' किंवा 'पॉलिश सर ?' अशा आरोळ्या आणि आग्रह होतो. त्यांतून बचावल्यास मिठाईवाले पांच-दहा 'कुरुस'पासून एखाद्या 'लिऱ्या'पर्यंतची मिठाई दाखवून मोह पाडतात. कुणीं मध्येंच एकदम येऊन खांद्यावर थाप मारून म्हणतो, 'स्टेडी प्लीज.' त्यानें डोळ्याला कॅमेरा लावलेला पाहून प्रवासी एकदम भानावर येऊन ओरडतो, 'नो, नो ! नो फोटो !' एवढ्यांत प्रवाशाला आढळतें कीं, आपल्या कोटाची बाही ओढली जात आहे. 'टॅक्सी ?' एवढेच शब्द बाही ओढणारा म्हणत असतो. 'टॅक्सी नको' म्हणून सांगून आणि बाही परत मिळवून प्रवासी दगडी रस्त्यावरून चार पावलें चालतो न चालतो, तोंच एखादा तरी भिकारी अल्लाचें नांव घेऊन त्याला सांकडें घालतो. ही सारी गडबड, गोंधळ, थोडासा बुभुक्षितपणा यांपासून प्रवाशाचे डोळे जरा दूरवर जातात, तेव्हां मात्र त्याला भव्य मशिदी आणि उंच मनोऱ्यांचीं टोकें दिसतात आणि त्याला प्रगल्भतेचा साक्षात्कार होतो.

इस्तंबूल म्हणजे जगाच्या इतिहासांतील एक अत्यंत महत्त्वाचें शहर. मानवाच्या सांस्कृतिक इतिहासाला वळण लावणारीं जगांतील सर्वांत महत्त्वाचीं शहरें म्हणजे—अथेन्स, रोम, जेरूसलेम, पॅरिस आणि इस्तंबूल किंवा

कॉन्स्टॅन्टिनोपल. इस्तंबूल जेव्हां बादशाही वैभवांत होतें, तेव्हां लंडन, पॅरिस हीं नुसतीं खेडीं होतीं. एका काळीं या इस्तंबूलनें पूर्वेकडील रोमन साम्राज्याची आणि ओटोमन साम्राज्याची राजधानी म्हणून जगावर जरब बसविली. या राजधानीचें धार्मिक महत्त्व एवढें कीं, अद्यापहि ग्रीक चर्चच्या मुख्य धर्मगुरूच्या नांवापुढें 'कॉन्स्टॅन्टिनोपलचे अर्थात् नव्या रोमचे धर्मगुरु' ही बिरुदावलि असते. धर्मगुरूंनीं वर्षानुवर्षें इथें अध्ययन करून शास्त्रांची प्रगति केली. या शहराचा आंतरराष्ट्रीय मान सतत सोळाशें वर्षें एवढा मोठा होता कीं, 'कॉन्स्टॅंटिनोपल, दि क्व्हेटेड् सिटी' ('कोणत्याहि देशाला लोभ वाटावा असें शहर') म्हणून याची ख्याति होती. ग्रीक लोक या शहराला 'देवांचें निवास-स्थान' (Dwelling of the Gods) म्हणत, तर ख्रिश्चन लोक त्याला 'ख्रिश्चनांच्या जागतिक साम्राज्याची राणी' (Queen of Christiandom) म्हणत. जगांतील सर्वांत मोठ्या मुस्लिम साम्राज्याची तर इस्तंबूल ही राजधानीच होती. या शहरावर ग्रीक, अव्हार्स, बल्गेरियन्स, तुर्क, रोमन अशा अनेक परकीयांनीं स्वाऱ्या केल्या. तुर्कांचा दरारा पार हिंदुस्थानपर्यंत बसला होता. चेंगीजखान, तैमुरलंग, बाबर, अकबर, औरंगजेब हे सारे तुर्क किंवा तुर्की वंशांतले. चेंगीजखानाच्या हाताखालीं होतें तेवढें सैन्य जगांतील कोणत्याहि एका व्यक्तीच्या नियंत्रणाखालीं आतांपर्यंत राहिलेलें नाहीं. त्यानें आपल्या हयातीच्या वीस वर्षांत एक कोटी वीस लाख लोकांची कत्तल केली. दारू-गोळ्याचा वापर पहिल्यानें याच चेंगीजखानानें केला.

इस्तंबूलहून शास्त्री, पंडित, धर्मगुरू युरोपांत पसरले आणि तेथें विद्या-कलांचें पुनरुज्जीवन झालें. इस्लाम धर्मसंस्थापक महंमद म्हणत असे, "तुर्कांची भाषा शिका, कारण त्यांचें राज्य चिरकाल टिकणार आहे." हें इस्तंबूल म्हणजे ग्रीक, बिझंटाइन आणि तुर्की कलांचें महत्त्वाचें केंद्र. अद्याप इस्तंबूलच्या 'सेराग्लियो पॅलेस'मध्यें जगांतील सर्वांत मोठा चिनी 'पोर्सेलेन'च्या कलात्मक वस्तूंचा ठेवा आहे. रोमन साम्राज्याचे कायदे, ग्रीक साहित्य, ख्रिश्चन धर्मसंस्था यांवर इस्तंबूलची चिरंतन छाप पडली आहे. इ. स. ३२८ मध्यें रोमचा सम्राट् कॉन्स्टन्टाइन यानें या शहराची स्थापना केली. रोम शहर सात टेकड्यांवर वसलें आहे म्हणून त्यानें इस्तंबूल शहरहि सात टेकड्यांवर वसविलें. पूर्वेकडील रोमन साम्राज्याची राजधानी म्हणून इस्तंबूलला

'नवें रोम' असें नांव त्यानें दिलें. बिझंटीयनची जुनी वस्ती इथें ख्रिस्तपूर्व सातव्या शतकापासून होती. कॉन्स्टन्टाइननें रोमचा स्तंभ आणून या शहरांत उभा केला. त्यानें या शहराचें नांव 'नवें रोम' असें ठेवलें, तरी संस्थापकाच्या नांवावरून या शहराला 'कॉन्स्टॅन्टिनोपल' असें नांव पडलें. इस्तंबूल या शब्दाचा अर्थ 'शहरांत' असा आहे. व्यापार, नौकानयन, राजकीय हालचाली, कला, संस्कृति, धर्म इत्यादि सर्व दृष्टींनीं हें शहर अगदीं मोक्याचें होतें आणि म्हणूनच त्याला वारंवार शत्रूच्या हल्ल्यांना तोंड द्यावें लागलें. अकराव्या कॉन्स्टन्टाइनच्या काळांत, १४५३ सालीं सुलतान महंमदानें केलेल्या हल्ल्याचें रोमहर्षक वर्णन गिब्न या जगप्रसिद्ध लेखकानें 'डिक्लाइन अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर'मध्यें केलें आहे. इस्तंबूल शहराभोंवतीं महंमदानें वेढा दिला, तेव्हां आंतील ख्रिश्चनांनीं तटबंदी बळकट करून तोफा डागण्यास सुरुवात केली. महंमदाला विश्वास वाटत होता कीं, २९ मे रोजीं आपला निश्चितपणें विजय होणार. या दिवसाची महंमद वाट पहात होता. रात्रीं त्यानें आसपासच्या जंगलांतील वृक्ष हजारों सैनिकांकरवीं तोडून आणवले आणि खंदक भरून काढायचा प्रयत्न केला. पण बाण, बंदुका आणि तोफा यांच्या माऱ्यामुळें तो अयशस्वी झाला. महंमदानें उलट तोफा डागल्या. पण बळकट तटबंदीपुढें त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. शेवटीं महंमदानें ठरविलें कीं, वाटेल तें झालें तरी सैन्य तटावर चढवायचें. शहरांतील ख्रिश्चनहि जिवावर उदार झाले होते. राजा कॉन्स्टन्टाइन स्वतः तटावर येऊन सैन्याला प्रोत्साहन देऊं लागला. या वेळीं जें घनघोर युद्ध झालें तें इस्तंबूलच्या इतिहासांत अजोड असें होतें. आपले दुर्बल आणि बाजारबुणगे लोक महंमदानें सैन्याच्या पुढें घातले होते. हेतु हा कीं, ते मारले गेले म्हणजे त्यांच्या प्रेतांनीं खंदक भरून येईल आणि त्यावरून आपल्या बळकट सैनिकांना चढून जातां येईल. त्याचा हा डाव यशस्वी झाला. प्रेतांचा खच पडला आणि खंदक त्या प्रेतांनींच भरून जाऊन महंमदाचें सैन्य सहज खंदक ओलांडून पलीकडे गेलें. गिब्न म्हणतो, —

"लढाईत मरण पावलेल्यांच्या शरीरांनीं खंदक भरून गेला होता. त्यांच्या प्रेतावर पाय ठेवून त्यांचे सहकारी पलिकडे गेले. या विश्वासू सैनिकांना आपल्या सहकाऱ्यांच्या जीवनापेक्षां त्यांच्या मृत्यूचाच अधिक उपयोग झाला ..." (The ditch was filled with the bodies of the slain, they

supported the footsteps of their companions, and of this devoted vanguard the death was more servicable than life.) एकदां तटबंदी ओलांडल्यावर महंमदाचें सैन्य अतुल ईर्षेनें लढलें. ख्रिश्चनहि अटीतटीनें लढले. कॉन्स्टन्टाइन स्वतः दहा हजार निवडक सैनिकांनिशीं प्राणपणानें लढला; पण महंमदाच्या सैन्यानें त्याच्या सैन्याचा असा धुव्वा उडविला कीं, खुद्द कॉन्स्टन्टाइनचें प्रेत साध्या शिपायांच्या प्रेतांच्या ढिगाऱ्यांत सांपडलें! त्याचे सर्व अवयव विच्छिन्न झाले होते. त्याच्या पायांतील बादशाही वाहणांवरूनच लोकांनीं ओळखलें कीं हा कॉन्स्टन्टाइन,— इस्तंबूलचा सम्राट् असावा. महंमदाच्या सैन्यानें ख्रिश्चनांचीं प्रेतें रस्त्यांतून बाजूला केलीं आणि विजयी महंमद रोमानस दरवाज्यानें 'अल्ला हो अकबर' च्या निनादांत इस्तंबूलमध्यें शिरला. त्यानंतर तुर्कस्थानांत धर्मसत्तायुक्त राजेशाही होती. अगदीं अलीकडे, १९०८ सालीं याच इस्तंबूलमध्यें क्रांति झाली आणि शेव्हकेटपाशानें इस्तंबूल शहर घेऊन अबदुल हमीदला पदच्युत केलें. इस्तंबूलच्या सुरुवातीपासून आतांपर्यंत तेथील रस्त्यांवर कित्येक मोठ्या लढाया होऊन गेल्या आहेत.

या घनघोर लढाया, जय, पराजय, रक्तपात, अत्याचार, कत्तली, वैभव यांचा इस्तंबूलमध्यें आज मागमूसहि नाहीं. पॅरिस, अथेन्स, इस्तंबूल, रोम, अशा, एके काळीं अबाढव्य साम्राज्यें असलेल्या शहरीं गेलें, म्हणजे मन उदास होतें. तें सामर्थ्य आज लयाला गेलें आणि हीं राष्ट्रें म्हणजे जगाच्या राजकारणांतील नुसतीं प्यादीं बनलीं आहेत, असें आढळतें. पण साम्राज्यें गेलीं, तरी त्यांची सांस्कृतिक शक्ति वांया गेली नाहीं. ही शक्ति दशदिशांत पसरली. ती नवी प्रेरणा झाली. विद्या, संस्कृति, कला यांची वाढ करणारी ती प्रेरणा होती. ती कांहीं नष्ट झाली नाहीं.

सिरकेसी स्टेशनवरून आम्ही जवळच्याच एका हॉटेलांत उतरलों. इस्तंबूलचे रस्ते अगदीं अरुंद. 'अतातुर्क बुलवारी' किंवा 'फेवझी पाशा काडेसी' सारखे मोठे रस्ते अपवादात्मकच. बाकीचे रस्ते अरुंद आणि दगडी फरशीचे. अशा अरुंद रस्त्यांवरूनच ट्राम जाते. तींत उतारू खच्चून भरलेले असतात; कुणी लोंबकळत असतात. बहुतेक रस्ते अरुंद असल्यामुळें एकमार्गी आहेत. या अरुंद रस्त्यांवरच फेरीवाले, मिठाईवाले, बुटपॉलिशवाले यांची गर्दी असते. पोलिस कुठें कुठें दिसतात; पण गर्दीसारख्या किरकोळ कामासाठीं पोलिस—खातें नाहीं

अशी त्यांची समजूत आहे. साध्या पोलिसांच्याकडेहि पिस्तुलें दिसतात. त्याव-रून त्यांच्या कामाची आणि एकंदरींत जनतेची उग्रता लक्षांत येईल. इस्तंबूल-मध्यें कुठेंहि गेलें, तरी मशिदी आणि उंच मनोरे दिसतात. सोफिया मशीद, सुलतान अहंमद मशीद, इसा कापू मशीद, फतिया मशीद, तोपकापी मशीद, इम्रहर मशीद, दाउद मशीद, मिहरिम मशीद, सुलेमानिया मशीद, बोदरम मशीद, कुका मुस्तफा मशीद, सेकुलु मशीद, रुस्तुम मशीद, सुलतान सलीम मशीद, करिया मशीद, शहाजादा बासी मशीद...या सर्व मशिदींची यादी करणें शक्य आहे कीं नाहीं कुणास ठाऊक! आणि शक्य झालें तरी ती यादी फार मोठी होईल. आज धीरगंभीरतेनें उभ्या असलेल्या मशिदी इस्तंबूलमध्यें सर्वत्र दिसतातच; पण जुन्या मशिदींचे अवशेषहि बरेच दिसतात. त्यांच्या पांढऱ्या, मळकट दगडांकडे पाहून वाटतें, मुस्लिम साम्राज्याच्या आजच्या अवस्थेचें हें प्रतीक आहे. ‘ सिटी वॉल्स ’ म्हणजे शहराच्या प्राचीन तटबंदीचे अवशेष किंवा ‘ अक्वाडक्ट ऑफ व्हॅलेन्स’च्या कमानी पाहूनहि अशीच विषण्णता आल्यावांचून रहात नाहीं. इस्तंबूलचा मसाले-बाजार तर अशाच एका माजी मशिदीच्या अवाढव्य इमारतींत भर-विण्यांत येतो. या बाजारांत मध्य-पूर्वेकडील आणि पूर्वेकडील देशांतील हर-तऱ्हेचे मसाले, कापड, खेळणीं, मणी, दागिने मिळतात. या वैचित्र्यपूर्ण बाजारांत फिरल्यावांचून इस्तंबूलचा रागरंग नीटसा ध्यानीं येणार नाहीं. या गांवचीच ही गोष्ट नव्हे. मला वाटतें, कोणत्याहि गांवाचें अकृत्रिम प्रतिबिंब त्या त्या गांवच्या बाजारांत दिसतें. त्या देशांत काय पिकतें, काय खपतें, लोक कसे आहेत, कसे बोलतात, कसे भांडतात, कसे गर्दी करतात, किती सहनशील आहेत, या साऱ्यांचें बरोबर मापक यंत्र म्हणजे त्या गांवचा बाजार. म्हणून इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी, युगोस्लाव्हिया, इजिप्त, हॉलंड, इराक असे अनेक देश मी फिरलों तरी प्रमुख गांवच्या बाजारांतून एक चक्कर टाकल्या-शिवाय तो देश मीं पाहिला असें मला कधींच वाटलें नाहीं.

या मसाले-बाजाराला लागूनच रुस्तुमपाशा मशीद आहे. या मशिदीसमोर खूपच मोठी मोकळी जागा आहे. या जागेंत खुर्च्या टाकलेल्या आहेत आणि त्यावर बसून दीडदोनशें लोक कावा, कॉफी, ताक पितांना किंवा हुक्कापान करतांना दिसतात. हा कावा म्हणजे चहा. पण तो आमच्या चहासारखा नसतो. अगदीं

लहान ग्लासांतून दिलेला तो चहाचा अर्क असतो आणि तो बराच कडक असतो. दुधाशिवाय हा कावा बराच कडवट लागतो आणि सरावाशिवाय तो फारसा घेणेंहि जमत नाहीं. रुस्तुम पाशा मशिदीसमोरच्या रस्त्यावरून उजवीकडे वळलें म्हणजे 'गलाता पूल' हा 'गोल्डन हॉर्न'वरील प्रसिद्ध पूल लागतो. अनेक देश, अनेक भाषा, अनेक तऱ्हेचा व्यापार याचें हें केंद्र आहे. इस्तंबूलचा एक भाग आशियांत आणि दुसरा भाग युरोपांत आहे, आणि या दोन भागांना जोडणारे दोन पूल 'गोल्डन हॉर्न' या समुद्राच्या पट्ट्यावर आहेत. भूमध्य समुद्र आणि काळा समुद्र यांना जोडणारा हा 'गलाता पूल' म्हणजे अत्यंत मनोवेधक दृश्य आहे. या पुलावर उभें राहिल्यावर दोन खंडांच्या मध्यभागीं उभें राहिल्याचा कांहीं आगळाच आनंद होतो. लहानमोठ्या पन्नाससाठ बोटी पुलाजवळच्या धक्क्यावरून किंवा 'गोल्डन हॉर्न'मधून जात आहेत, त्या कोणत्या देशाच्या आणि कुठें चालल्या आहेत हें जाणण्याची उत्सुकता वाटते. होड्यांत, जहाजांत, बोटींत कुणी इराणी, कुणी इजिप्शियन, ग्रीक, इंग्रज, अरब, हिंदी, आफ्रिकन असे अनेक देशांचे लोक दिसतात. या गलाता पुलावर तीस देशांच्या भाषा ऐकूं येतात, अशी याची ख्याति आहे आणि ती अस्थानीं असेल असें वाटत नाहीं. या पुलावर आणि पुलाखालच्या धक्क्यावर दररोजच आंतरराष्ट्रीय परिषदा भरतात ! मात्र त्यांना ठराविक विषय नसतो आणि वेळेचेंहि बंधन नसतें. त्यांचे अहवाल वृत्तपत्रांतून येत नाहींत. पण मसाले, फळफळावळ, कापड, खजूर इत्यादींचे ढीगच्या ढीग दररोज इथून जातात आणि येतात. समुद्राची हवा कशी आहे, आज बोटींची फार वर्दळ आहे का, कोणतें जहाज काय घेऊन आलें, कुठले खलाशी आपल्या ओळखीचे आहेत, अशा अनेक विषयांवर इथें चर्चा होते. एके काळीं या ठिकाणीं इतर मालाबरोबर सुंदर तरुण मुलींनीं भरलेलीं जहाजें त्यांना गुलाम म्हणून विकण्यासाठीं येत आणि मोकळीं केलीं जात असत. बगदादच्या बाजारासाठीं हा माल नेणारे खलाशी युरोपांतून याच मार्गानें जात आणि इस्तंबूलचे बडे व्यापारी वाटेवरच त्यांतला थोडा माल खरेदी करीत. उमर खय्यामनें तुर्की सुंदरीचा उल्लेख 'रुबायां'त केला आहे. या 'लावण्यबाजारा'ची हवा अद्याप या पुलावर येत असते. डोक्यावर काळ्या दोऱ्या आणि लांब पांढरा रुमाल बांधून पायघोळ झग्यांतून जाणाऱ्या अरबांकडे पाहून मनांत येतें, ग्रीसच्या जहाजावरील एखादी

सुंदर मुलगी विकत घेण्यासाठीं तर हा निघाला नाहीं ना ? पण छे ! तो सौंदर्याचा बाजार गेला, त्यांतील पाशवी सामर्थ्य गेलें, त्यांतील दांडगाईचा प्रणय गेला. त्यांतील केविलवाणी असहाय रूपसंपत्ति गेली. मोहरांची थैली उलटी करून एखादी स्त्री जन्मभर आपली म्हणण्यांतली पैशाची रग गेली, त्यांतला अन्याय गेला आणि त्यांतलें वैभवहि लोपलें.

गलाता पुलावरून पलीकडे गेलें, म्हणजे आधुनिक किंवा अद्यावत् इस्तंबूल लागतें. या भागाला 'पेरा' म्हणतात. या भागांत मोठमोठीं पाश्चात्य पद्धतीचीं हॉटेलें, परराष्ट्रांच्या वकिलाती, बँका, प्रवासी--एजन्सीज्, आधुनिक मोठीं दुकानें आहेत. या 'पेरा' भागांत आल्याबरोबर जर्मनी किंवा फ्रान्ससारख्या अद्यावत् देशांत आल्यासारखें वाटतें. पण मौज अशी कीं, मशिदी, जुनें तट, अरुंद रस्ते, दर्गे हें सारें आहे 'युरोपियन इस्तंबूल'मध्यें, आणि आधुनिक भाग आहे तो 'आशियन इस्तंबूल'मध्यें. या 'पेरा' भागांत पॅरिसच्या धर्तीवर नाइट–क्लब्ससुद्धां आहेत. चित्रपट, नाटकें, तमाशे यांचें केंद्र म्हणजे 'बेअगल्ढ' हा भाग. येथील एका चित्रमंदिरांत भारताचा 'बहुत दिन हुए' हा चित्रपट चालू होता. या भागांतील एका नाट्यमंदिरांत एका रात्रीं आम्ही एक नाटक पहायला गेलों. तिथें पाहिलेली नाटकाची तऱ्हा मीं इतरत्र कुठेंच पाहिली नाहीं. कारण तें नाटक म्हणजे सामाजिक नाटक आणि तमाशा यांचें मिश्रण होतें. संपूर्ण तमाशा झाल्यावर संपूर्ण नाटक असेंहि तें मिश्रण नव्हतें, तर नाटकाचा एक प्रवेश, मग तमाशाचें एक गाणें, नृत्य किंवा विनोदी प्रवेश, आणि पुन्हा मग नाटकाचा प्रवेश, आणि तो प्रवेश झाल्यावर पुन्हा तमाशाचें दृश्य, असा प्रकार चालू होता. नाटकांतील नायक–नायिकेचें भांडण होऊन त्या भांडणाचें काय होतें या उत्सुकतेनें पुढें पहावें, तोंच स्पॅनिश वेष परिधान करून सातआठ तरुणी नृत्य करीत. त्यानंतर पुन्हा नाटकांतील नायकनायिका आपलें भांडण पुढें सुरू करीत. नायक आणि खलनायक एकमेकांवर पिस्तुलें रोखून उभे आहेत अशा वेळीं नाटकाचा पडदा पडायचा आणि मध्येंच तमाशाचा सोंगाड्या नर्तकीबरोबर आपला शेलका विनोद करीत प्रवेश करायचा. या नाट्य-तमाशाला मी शेवटपर्यंत बसलों नाहीं. पण नाटकाच्या शेवटीं नायक-नायिकेचें लग्न झाल्यावर बहुधा नायक म्हणत असेल, "सखे, चल, आतां आपण तमाशालाच जाऊं." मग नाटकाच्या नायक—

नायिकेसमोर तमाशाचें शेवटचें दृश्य दाखवून त्या उभयतांच्या मीलनाबरोबरच नाट्य आणि तमाशा या शाखांचेंहि मीलन शेवटीं होत असावें !

आधुनिक इस्तंबूलच्या गमती जरी गलाता पुलाच्या पलीकडे दिसत असल्या, तरी इस्तंबूलच्या प्राचीन वैभवाचे अवशेष पहायला पुलाच्या अलीकडेच यायला हवें. येनी कामील मशीद ओलांडून आपण सिरकेसी स्टेशनजवळ आलों कीं, सिरॅगलियो पॅलेस व त्याभोंवतालचें मोठें उद्यान दिसतें. या उद्यानांत प्राचीन वस्तुसंग्रहालय, ओरिएंटल म्युझियम आणि फत्तेह म्युझियम आहेत. त्यांत ग्रीक, बिझंटाइन आणि तुर्की कलासंग्रहांचे उत्कृष्ट नमुने आहेत. त्याच रस्त्यानें पुढें गेलें कीं, दिवानिलोयु रस्ता व त्या रस्त्याच्या टोंकाला असलेलें सोफिया म्युझियम लागतें. या म्युझियमची ख्याति आम्ही इतकी ऐकली होती कीं, मोठ्या उत्सुकतेनें तीस ' कुरुस ' प्रवेश–फी देऊन आम्ही आंत गेलों. ( १०० कुरूस = १ लिरा. ७॥ लिरा = १ पौंड = १३। रु. ) आंत पाहिलें तों काय ? — सारी इमारत मोकळी ! म्युझियमच्या दालनांत न जातां आपण चुकून दुसऱ्या कुठल्या तरी दालनांत आलों कीं काय असें वाटून आम्ही पुन्हा प्रवेशद्वाराशीं येऊन विचारलें, " अहो, म्युझियममधील वस्तू कुठें आहेत ? " तेव्हां तेथील मार्गदर्शकानें मोडक्यातोडक्या इंग्रजींत सांगितलें, " हेंच म्युझियम. पण त्यांत वस्तू नाहींत. सोफियाची इमारत हीच पाहण्यासारखी वस्तु ! " हें ऐकून मला वाटलें कीं, जिथें फक्त इमारत हीच पहाण्याची वस्तु आहे असें सोफिया हें जगांतील एकमेव ' म्युझियम ' असावें. नाहीं तरी ' म्युझियम ' शब्दाचा मूळ अर्थ ' कलांचें निवासस्थान ' असाच आहे. आणि भरपूर मोकळी जागा असल्याशिवाय कला तरी तिथें कशा राहूं शकणार ? अशा विचारानें मी सोफिया म्युझियममधील एकुलती एक वस्तू म्हणजे इमारत पाहूं लागलों. ही इमारत इ. स. ५३२ मध्यें बांधली असून ती खरोखरीच अतिशय भव्य आणि प्रेक्षणीय आहे. सात हजार चौरस मीटर्सवर उभारलेली ही इमारत इस्तंबूलचें एक मोठेंच भूषण आहे. या दुमजली मशिदींत तळमजल्यावर चाळीस आणि वरच्या मजल्यावर अडुसष्ट असे एकंदर १०८ सुंदर खांब आहेत. मशिदीचा घुमट ६७ मीटर्स उंच आहे आणि त्याचा व्यास ३३ मीटर्स आहे. या मशिदीचा विशेष असा कीं, इसवी सन ५३७ पासून १४५३ पर्यंत ही मशीद चर्च म्हणून वापरांत होती.

बायबलांतील कांहीं प्रसंगांचीं चित्रें अद्याप या मशिदीच्या भिंतीवर आहेत. इ. स. १४५३ नंतर या चर्चचें पुन्हा मशिदींत रूपांतर झालें. पण अतातुर्कच्या हुकुमानें या मशिदीचें म्युझियम करण्यांत आलें. २९ मे १४५३ रोजीं महंमदाच्या सैन्यानें ग्रीकांचा पाडाव करून या शहरांत प्रवेश केला आणि ख्रिश्चनांची कत्तल करायला सुरुवात केली, तेव्हां हजारों ख्रिश्चन याच सोफिया मशिदींत—त्या वेळच्या चर्चमध्यें—जमले होते. त्यांनीं चर्चचीं दारें आंतून बंद करून घेतलीं. हजारों भक्तांच्या हांकेसरशीं ख्रिस्त धांव घेईल आणि आपल्यावरचें संकट टळेल या आशेनें त्यांनीं प्रार्थना करण्यास सुरुवात केली. पण या सामुदायिक प्रार्थनेचा धीरगंभीर निनाद होत असतांनाच महंमदाच्या सैन्याच्या कुऱ्हाडी चर्चच्या दरवाज्यावर चालत होत्या. थोड्याच वेळांत दारें मोडलीं आणि विजयी सैनिक आंत घुसले. त्यांनीं प्रथम सुंदर स्त्रियांना आपल्या ताब्यांत घेतलें. ज्याच्या हातीं जी स्त्री सांपडेल ती त्याची गुलाम अशी मुभा सैन्याला मिळाल्यामुळें त्यांच्या तडाख्यांतून चर्चच्या आश्रयाला आलेल्या ख्रिश्चनांपैकीं एकहि स्त्री शिल्लक उरली नाहीं. ज्या स्त्रिया जन्मभर बुरख्यांत राहिल्या आणि ज्यांचीं मुखकमलें घरांतल्या कांहीं लोकांनाहि कधीं पहायला मिळालीं नाहींत, त्यांचे बुरखे फाडून त्यांच्या सौंदर्याची किंमत केली जाऊं लागली. स्त्री-पुरुषांना एकत्र घोळका करून जखडून टाकलें. या प्रसंगाचें वर्णन करतांना गिबन म्हणतो, "मालक आणि नोकर, धर्मगुरु आणि खलपुरुष, शिपाई आणि हमाल, आई आणि मुलगा, या साऱ्यांनाच एकत्र बांधण्यांत आलें. तरुणबांड पुरुषहि आपल्या आईच्या ओरडण्याकडे नि मुलांच्या केंविलवाण्या हाकांकडे परिस्थितीमुळें नाइलाजानें दुर्लक्ष करूं लागला. या साऱ्या जमावांत चर्चमधील जोगिणींच्या किंकाळ्या करुण वाटत होत्या. मंदिरांतील जीवनाऐवजीं त्यांना बादशहाच्या जनानखान्यांतील जीवनाचें का आकर्षण वाटणार आहे?...पण या प्रसंगीं समाजांतील सर्व थर आणि सर्व भेदाभेद नाहीसे झाले होते आणि सारेजण परिस्थितीपुढें नमले होते ..."

२९ मे रोजीं पहांटे सर्व ख्रिश्चनांना या सोफिया चर्चमधून बाहेर काढण्यांत आलें. सकाळीं आठ वाजतां बादशहा महंमद आपल्या मानकऱ्यांसह चर्चमध्यें वैभवानें शिरला. 'अल्ला हो अकबर'च्या गर्जना झाल्या आणि गेलीं सुमारें

हजार वर्षें जिथें बायबल वाचलें जात होतें, तिथें इमाम कुराण पढूं लागले. इस्तंबूलच्या विजयाबद्दल अल्लाचे आभार याच सोफिया मशिदींत मानण्यांत आले.

सोफिया मशिदीजवळच जगप्रसिद्ध 'टर्किश बाथ'ची लहानशी इमारत आहे. तिच्यासमोरचा 'हिपोड्रम-चौक' म्हणजे इस्तंबूलच्या इतिहासाचा मेरुमणि आहे. इस्तंबूलची स्थापना करणाऱ्या कॉन्स्टन्टाइन यानें रोमहून एक स्तंभ आणून इथें उभा केला. 'थिओडोसियस' स्तंभ याच्या शेजारींच आहे; तो या शहराचा सर्वांत जुना अवशेष. 'हेलिओलिस'मध्यें बादशहा तुतमुरसनें खिस्तपूर्व १४७१ सालीं तो उभारला होता, आणि बादशहा थिओडोसियसनें तो इस्तंबूलला आणला. त्या जवळच डेल्फीचा 'सर्पंटाइन' स्तंभ आहे. रोमन कालांत या चौकांत रथांच्या शर्यती होत असत. सम्राटांचे सत्कार या चौकांत होत आणि गुन्हेगारांचे शिरच्छेदहि इथेंच होत. 'बिझंटाइन–जगताचा कणा' या नांवानें हा चौक त्या वेळीं प्रसिद्ध होता. या विस्तृत चौकांत क्रीडा, उत्सव आणि शिरच्छेदच होत नसत, तर साम्राज्याचीं राजकीय खलबतेंहि या चौकांत चालत असत. आसपासचीं राज्यें जिंकण्याच्या विजिगीषु घोषणा इथेंच होत असत. एका काळचा वैभवशाली पण आतां सुना वाटणारा हा 'हिपोड्रम' सोडल्यावर जें रस्त्यांचें जाळें दिसतें, त्यांतील एका मोठ्या रस्त्यानें गेल्यावर 'पिअर लोटी ओटेली' आणि त्यापुढेंच इस्तंबूलची नगरपालिका लगते. त्यानंतर आपण पुन्हा मघांच्या दिवानियोलु रस्त्यावर येतों. इस्तंबूल शहर सात टेंकड्यांवर वसलेलें असल्यानें अनेक रस्त्यांना एकदम चढण लागतें तर कुठें कुठें मधेंच उतरण लागतें. या अवघड रस्त्यांवर वाहनें चालणें कठिणच. कांहीं ठिकाणीं तर पायऱ्याच केलेल्या आहेत. त्यामुळें नवख्या इसमाला हें शहर बरेंच गुंतागुंतीचें वाटतें. कांहीं चढणी पाहून कोंकणांतल्या सावंतवाडी गांवीची आठवण होते. 'बियाझित चौक' किंवा 'पेरा' भागांतील 'तक्सिम –चौक' हे भव्य आणि प्रशस्त आहेत, पण ते चौक कांहीं इस्तंबूलचें वैशिष्ट्य म्हणून दाखवितां येणार नाहींत. 'बियाझित–चौका'जवळचा ग्रँड बाजार हा इतका मोठा आहे कीं, छपराखालीं असलेला हा जगांतील सर्वांत मोठा बाजार आहे. उघड्यावर असलेले कांहीं बाजार याहून अधिक मोठे आहेत; पण मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटसारखी इमारत असलेला हा जगांतील सर्वांत मोठा

बाजार आहे; —नव्हे, होता, असें आतां म्हणावें लागतें. कारण २७ नोव्हेंबर १९५४ रोजीं या बाजाराला प्रचंड आग लागून दोनतृतीयांश बाजार जळून खाक झाला. यापूर्वी १८९८ सालींहि त्याला आग लागली होती; पण तो पुन्हा बांधण्यांत आला. अद्यापहि या बाजारांत साडेतीन हजार दुकानें आहेत. या बाजारांतून डावीकडे वळून 'उर्दु काडेसी'वरून आपण 'अतातुर्क बुलवारी' या हमरस्त्यावर येतों. सम्राट् व्हॅलन्सनें इ. स. ३७८ मध्यें बांधलेल्या कमानी या रस्त्यावर अद्याप दिसतात; पण 'आपले दिवस संपले' अशा करुण जाणिवेनें त्या दिवस मोजीत असलेल्या भासतात. याच अतातुर्क बुलवारीवरून पुढें गेल्यावर अतातुर्क पूल लागतो आणि त्यावरून पुन्हां गलाता भागांत जातां येतें. जुन्या इस्तंबूलच्या अगदीं पश्चिमेच्या सीमेवर अद्यापहि 'सिटी वॉल्स' ही तटबंदी आहे. सत्तर मीटर्स रुंद आणि सात किलोमिटर्स लांब अशी ही अजस्र भिंत इसवी सनाच्या पांचव्या शतकापासून शहराचें रक्षण करीत आहे. या भिंतीपलीकडे खोल खंदकहि आहे. धनुष्य, बाण, बंदुका, तोफा यांच्या लढायांचें युग गेलें आणि आतां विमानांचें आणि अणुबॉंबचें युग आलें. पण कुत्रा वृद्ध झाला, तरी अन्यायाचें रक्षण करायचा यथाशक्ति प्रयत्न करतोच. त्याच्या या रक्षणांत उपयोगापेक्षां ममतेचचा भाग अधिक हें जाणूनच मालक त्याला जवळ करीत नाहीं काय ?

'फैवझी पाशा काडेसी'जवळ इस्तंबूल युनिव्हर्सिटी आहे. १९२३ पासून अंकारा ही तुर्कस्थानची राजधानी झाली असली तरी, अद्याप शिक्षण, कला, परंपरा, संस्कृति इत्यादींत इस्तंबूलचाच अग्रमान आहे. आज या शहराची लोकसंख्या पंधरा लक्ष आहे. ट्रॅम, बस्, टेलिफोन, तार—सर्व सोयी आहेत. सुलतान सुलेमान मशीद, सोफिया मशीद, सुलतान अहंमद मशीद इत्यादि धार्मिक केंद्रांनीं जगांतील सर्व मुस्लिमांचा आदर मिळविला आहे. ओटोमन साम्राज्याचें केंद्र म्हणजे 'सिराग्लिओ पॅलेस' हा प्रासाद तर प्राचीन आणि मध्ययुगीन कलावस्तूंचें जगांतील अत्यंत महत्त्वाचें ठिकाण आहे. बिझंटाइन काळचे पाण्याचे सांठे या शहरांत आहेत आणि ते जमिनीखालीं असून तिथें जाण्यासाठीं पायऱ्या केलेल्या आहेत.

'गोल्डन हॉर्न' हा अतिशय सुंदर असा समुद्राचा पट्टा शहराच्या दोन भागांमध्यें आहे. आशिया आणि युरोप यांच्या व्यापाराचें हें जगप्रसिद्ध केंद्र

आज मुख्यतः तंबाखू, कापूस, सुकीं फळें, बार्ली, अफू, लोकर यांचा व्यापार करीत आहे. तुर्कस्थानच्या आर्थिक परिस्थितीबद्दल अनुकंपा वाटण्यासारखीच परिस्थिति आहे. 'लिरा' या तुर्की नाण्याचा दर घसरत आहे; पण आपल्या नाण्याचा दर घसरत आहे हें कबूल करायला तुर्कस्थानचें सरकार तयार नाहीं. एक पौंडाला साडेसात लिरा असा अधिकृत दर आहे आणि खुद्द तुर्कस्थानांत हाच दर काटेकोरपणें सरकारकडून पाळला जातो. पण तुर्कस्थानच्या सरहद्दी-बाहेर मात्र, ग्रीसमध्यें एका पौंडाला वीस लिरा आणि ऑस्ट्रिया-जर्मनींत एका पौंडाला पंचवीस ते तीस लिरा मिळतात. लोकांना बचत करायला उत्तेजन देण्यासाठीं बँका जाहिराती देण्याचा अतिरेक करतात आणि जिथेंतिथें 'बँकासी' ( बँका )च्या पाट्या दिसतात.

इस्तंबूल शहरांतील घरें फारशीं मोठीं नाहींत. अगदीं जुन्या अवा-ढव्य इमारती सोडल्यास लहान लहान, फार तर दुमजली घरेंच जास्त. बहुतेक घरांचा रंग पांढरा, निदान कधीं काळचा पांढरा, व आज मळकट झालेला. भरपूर मिठाई खावी, त्यावर ताक प्यावें आणि रात्रीं गाणेंबजावणें करावें, हा तुर्की माणसाचा आवडीचा छंद. रात्रीं बऱ्याच उपाहारगृहांत असें गाणेंबजावणें चाललेलें दिसतें. हें गाणें कव्वालीच्या धर्तीवर असतें आणि त्यांत म्हणणारे, ऐकणारे, गिऱ्हाईकें, बघ्ये, सारेच रंगून जातात. 'पेरा' भागांतील 'इस्तिकलाल काडेसी' हा रस्ता अशा मोठमोठ्या हॉटेलांचें, अद्यावत् दुकानांचें आणि सर्व प्रकारच्या करमणुकीच्या ठिकाणांचें केंद्र. इस्तंबूलच्या कोणत्याहि भागांत गेलें, तरी मनस्वी गर्दी असते. रस्ते अरुंद असल्यामुळें तर ही गर्दी त्याहून अधिक वाटते. एखाद्या उपाहारगृहांतील वातावरण मुंबईच्या प्ले-हाउस ( पीला हौस ) भागांतील वातावरणासारखें गडबडीचें, खणखणाटाचें आणि गर्दीचें असतें. मात्र या उपाहारगृहांतील मुख्य जिन्नस म्हणजे वीसपंचवीस तऱ्हांचे गोड जिन्नस. ही तुपाळ गोड मिठाई आणि ताक अत्यंत स्वस्त, म्हणजे आपल्याकडील दराच्या सुमारें एकचतुर्थांश दरानें मिळते.

मिठाई व फळफळावळ इतकी स्वस्त मीं इतरत्र कुठेंच पाहिली नाहीं. चार आण्यांचीं द्राक्षें घेतलीं, तर एका माणसाला संपत नाहींत. फळ-बाजारांत कलिंगडें, अक्रोड, खरबुजें, केळीं, सफरचंद, द्राक्षें इत्यादींचे ढीगच्या ढीग

दिसतात. इस्तंबूलच्या आणखी एक विशेष म्हणजे, या गांवाला अत्तराची हौस फार. या गांवची अशी चमत्कारिक तऱ्हा कीं, लोक कपडे मळकट घालतील, सूट गबाळा असेल, घर अस्वच्छ असेल; पण खाणेंपिणें, अत्तर, रोषणाई यांचा षौक भारी. कांहीं मांसाहारी दुकानांत एका टेबलावर गिऱ्हाईक जेवत आहे आणि त्यांच्या शेजारच्या टेबलावर बसून दुकानाचा नोकर शांतपणें संध्याकाळच्या जेवणासाठीं मेंढीचा पाय तोडीत आहे असें दृश्य दिसतें. कांहीं म्हटलें, तरी तुर्की माणूस अन्नाचा मोठा भोक्ता. हिंदुस्थानवर तुर्कांनीं स्वारी केली, ती या देशांत भरपूर आणि उत्तम खायला मिळेल अशी बातमी लागल्यामुळें केली असावी, असें मला वाटतें.

कुठें कुठें अन्नांत तांदुळाचा वापर दिसतो. पण पाव आणि मांस यांवर जेवणाच्या वेळीं तुर्की लोक चांगलाच हात मारतात. इस्तंबूलचे पाव सहजासहजीं न विसरण्यासारखेच असतात. हे पाव तव्याएवढे गोल आणि चारपांच इंच उंच असतात. कांहीं पाव पडवळासारखे दोन फूट लांब आणि मोठ्या वाळकाएवढे जाड असतात. हे लांब पाव खांद्यावर काठीसारखे टाकून प्रवासाला निघणारे अनेक लोक इस्तंबूल स्टेशनवर दिसतात. विशेषतः हैदरपाशा ते बगदाद हा प्रवास सतत चार दिवस रेल्वेनें करावा लागतो. त्या वेळीं मलीन कपडे घातलेले, एकेका कुटुंबांतील चारसहा तुर्क किंवा अरब भले मोठे पाव खांद्यावर टाकून आणि बरोबर मीठ-मसाला, मासे असे खाद्यपदार्थ घेऊन जातात, तेव्हां या बाजूच्या संस्कृतींतील दांडगटपणा चांगलाच नजरेंत भरतो.

तुर्कांची कला, शौर्य, जगज्जेता अभिनिवेष, विशाल दृष्टि यांची आज छायाहि दिसत नाहीं. आजचें इस्तंबूल हें तुर्की राज्याचें यथार्थ प्रतिबिंब आहे. कसा तरी काल ढकलावा, ही सर्वसामान्य माणसाची प्रवृत्ति. आपल्या छोट्या जगांत खाऊनपिऊन मजा करावी ही जरा वरच्या वर्गांतील लोकांची मनोभूमिका. अतातुर्कनें बुरखा, फेज टोपी, फारसी लिपि यांना बंदी करून युरोपियनांचें अनुकरण केलें. पण वरून युरोपियन आवरणें, पण आंतलें मन ऐषआरामी अशी स्थिति आज झाली आहे. स्त्रियांचे पोषाख दोन प्रकारचे दिसतात. कांहीं तुर्की स्त्रिया फ्रान्स-इंग्लंडमधील स्त्रियांप्रमाणें अद्यावत् वेष—फ्रॉक, नॉयलॉन स्टॉकिंग्ज वगैरे घालतात आणि लिपस्टिकहि वापरतात. जुन्या पद्धतीच्या स्त्रिया बहुधा बुरखाविरहित, पण क्वचित् बुरख्यासह काळा लांब

झग्यासारखा पोषाख घालतात. पुरुषांचा पोषाख गबाळा सूट आणि इंग्रज लोक गोल्फ खेळतांना घालतात तशी टोपी असा असतो. कांहीं कडवे मुसलमान किंवा अरब पांढरा चोळणा आणि त्यावर लांब अंगरखा असे कपडे घालतात.

एका काळीं जगाच्या राजकारणांत अग्रभागीं असलेलें इस्तंबूल शहर आज प्राचीन वैभव शोधीत आहे. पण तें शय्येवर पडल्यापडल्या, फक्त आठवणीनें बरें वाटतें म्हणून! — 'रिस्टर' म्हणतो त्याचप्रमाणें, — 'जिथून आपल्याला कुणी हांकलून देत नाहीं, असा एकच स्वर्ग आहे, आणि तो म्हणजे स्मृति!' (Remembrance is the only paradise from which we cannot be driven away.) पण केवळ स्मृतीवर माणूस किती पराक्रमी होईल? हतबल झालेलें हें इस्तंबूल पाहून उमरखय्याम आठवतो :

**'जगताचा मी बघतों यदा तमाशा**
**अखिल जगत हें मिथ्या! ही ये भाषा.**
**सुबहानल्ला! येथें जें जें बघतों**
**त्यांत त्यांत मज दिसते आत्मनिराशा...'**

♥♥♥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम...३८००९१८...... दि: ...
क्रमांक ......३३४...... नों. दि. ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२१६०८

तुमच्या संग्रहीं हीं पुस्तकें असायलाच हवींत

## तें माझें घर

लेखक : **मनोहर महादेव केळकर** किं. ३ रु.

घर म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत. ज्या वास्तूंत आपलीं माणसें राहतात, आपल्या दुःखसुखाची वांटेकरी होतात आणि म्हणूनच ज्या वास्तूशीं आपलें मन पुष्पकोमल धाग्यांनीं निगडित झालेलें असतें तेंच आपलें घर! 'घरा'च्या या कल्पनेभोंवतीं गुंफलेल्या ललितलेखांचा हा संग्रह आहे. ज्यांना ज्यांना आपलं घर आवडतं त्यांना हें पुस्तक आवडेल.

•

## उभविलीं जयांनीं स्वप्नमंदिरें

लेखक : **मनोहर महादेव केळकर** किं. ४ रु

ज्यांनीं महान् स्वप्नें रंगविलीं आणि तीं साकार करण्यासाठीं सर्वस्व वेंचलें अशा थोरांच्या जीवनकथा.

•

**विचारस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता**

## जे फ र्स न

अनुवादक : **मनोहर महादेव केळकर** किं. २ रु.

अमेरिकेचा दोनदां अध्यक्ष झालेल्या थॉमस जेफर्सन या लोकशाहीच्या पुरस्कर्त्याच्या उद्‌बोधक चरित्राचा रसाळ अनुवाद.

•

## उ पा य न

लेखक : **मनोहर महादेव केळकर** किं. २॥ रु.

दहा निवडक ललित निबंध व अकरा वेगवेगळ्या प्रकारच्या कथा, यांचा हा नजराणा वाचकांना नक्कीच आवडेल.

**मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २.**

**ग्रंथमालेचें विस्तृत माहितीपत्रक मागवा.**

तुमच्या संग्रहीं हीं पुस्तकें असायलाच हवींत

# अमेरिकेस पहावें जाऊन

लेखक : **अरविंद गोखले** **किं. ३ रु.**

प्रवासाचीं साधनें आतां वाढलीं आहेत आणि खूप माणसें प्रवास करतात. त्यांतलीच कांहीं प्रवासवर्णनेंहि लिहितात. पण त्या सर्वांपेक्षां वेगळें असें हें प्रवासवर्णन आहे. अरविंद गोखले यांनीं नुसती स्थळयात्रा केली नाहीं, नुसता भूगोल पाहिला नाहीं, तर माणसें जाणायचा प्रयत्न केला. ही अनुभूति त्यांच्या समर्थ शैलीमुळें वाचकांना समरस करते व पुस्तक पुनः पुनः वाचावेसें वाटतें.

●

# सा ख रे चीं चि त्रें

लेखक : **रमेश मंत्री** **किं. ३ रु.**

रमेश मंत्रींच्या चुरचुरीत लेखणींतून उतरलेल्या खुसखुशीत विनोदी लेखांचा हा संग्रह आहे. 'माझा दालचीनचा प्रवास' चांगलाच गाजला होता. त्याचप्रमाणें 'प्रो. दिघ्याची कायदेशीर दुर्दशा' हा लेख तुम्हाला तुमच्या झालेल्या 'तशा'च एखाद्या दुर्दशेचा पुनः प्रत्यय घडवील. मात्र यावेळीं तुम्ही कष्टी होणार नाहीं तर मनमोकळं हंसाल.

## मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २.

**ग्रंथमालेचें विस्तृत माहितीपत्रक मागवा.**

REFBK-0013377
REFBK-0013377